


घोसरवाड येथील हालसिध्दनाथांची मूर्ती



मामांचे जन्मस्थळ



मामांनी आपल्या वयाच्या आठव्या वर्षी स्थापित केलेली मूर्ति.

# मधुसंचय

प्रसन्न ही मज वाग्देवी
व्यास महर्षी कृपा असावी ॥

# मधुसंचय

लेखक – साक्षी

© सौ. माधवी मधुकर शिपूरकर
५ / फ, श्री शिवराज गृह निर्माण संस्था, आयुर्विमा संकुल,
डफळे कॉम्प्लेक्स, ताराबाई पार्क, कोल्हापूर - ४१६ ००३.

• आवृत्ती पहिली •
श्रावण कृष्ण - ३० पिठोरी आमावस्या ३ सप्टेंबर २००५

• मुद्रक •
व्ही प्रिंटींग प्रेस
२८४५ 'ए', जोशी वाडा, वरुणतीर्थ वेस कोल्हापूर - ४१६ ०१२.

• अक्षरजुळणी •
दिशा ग्राफिक्स
१८०२ 'ए', अर्ध शिवाजी पुतळा, वरुणतीर्थ वेस, कोल्हापूर.

स्वागतमुल्य – रु. ५० /-



## 'अर्पण पत्रिका'

*प्रकाश झोतापासून नेहमीच दूर राहिलेले व नंदादीपाप्रमाणे*
*सतत शांतपणे तेवत राहिलेले, ज्यांना आमच्या*
*नाथ सांप्रदायाचे चित्सुर्य निवृत्तीनाथ*
*म्हणता येईल अशा माझ्या काकांच्या*
*वंदनीय तीर्थस्वरूप आण्णांच्या*
*पवित्र व प्रेरक स्मृतीस*

**''समर्पण''**

क्षीरसिंधुपरिसरीं। शक्तीचां कर्णकुहरीं।
नेणों कैं श्रीत्रिपुरारी। सांगितलें जें ॥१॥
तें क्षीरकल्लोळाआंतु। मकरोदरीं गुप्तु।
होता तयाचा हातु। पैठें जालें ॥२॥

*(ज्ञानेश्वरी १८ वा अध्याय)*

आ नो भद्राः क्रतवो यन्तु विश्वतः ।

# प्राक्कथन

सा माम् पातु सरस्वती ॥

बरेच दिवसांपासून माझ्या मनात माझ्या वडिलांचे चरित्र लिहिण्याचा विचार होता. पण हे जमावे कसे ? दररोजच्या व्यापातून, नोकरीतून वेळ मिळणे दुरापास्त होते. त्यासाठी लागणारी साधन-सामुग्री उपलब्ध नव्हती. घरातील व बाहेरील ताणतणाव या आणि इतर कांही कारणांनी ते राहून गेले.

पण आता मामांना (वडिलांना) जावून येत्या सप्टेंबर २००५ मध्ये २५ वर्षे पूर्ण होतात. यानिमित्ताने चरित्र लिहिण्याच्या विचाराने उचल खाल्ली. त्यात माझी मुले चि. अभि, चि. पंकज व परदेशस्थ चि. प्रसाद व त्याची सुविद्य पत्नी सौ. रूचिका यांनी प्रत्यक्ष व फोनवरून प्रोत्साहन दिले आणि स्वेच्छेने आर्थिक जबाबदारी संपूर्णपणे उचलली. मुलांची आई तर 'सच्चिदानंदबाबा लेखकू' व्हायला सदैव तयार होतीच. त्यामुळेच हा सारा प्रपंच घडून आला.

माझे स्नेही श्री. डी. एन्. जोशी हे त्यांच्या कार्यबाहुल्यातून वेळ काढून दररोज लिहून घ्यायला २-३ तास येवू लागले. सुंदर हस्ताक्षर असलेली आणि शुद्धलेखनाची पूर्ण जाण असलेली, माझी भाचेसून चि. सौ. पद्मजा जयंत गंधे ही उत्साहाने, स्वेच्छेने व नियमितपणे येवून सर्व माहिती नकलू लागली. त्यामुळे हे चरित्र मार्ग चालू लागले. या साऱ्या गोष्टी पूर्व नियोजित असाव्यात अशा रितीने घडत गेल्या.

**'आले देवाजीच्या मनां । तेथे कोणाचे कांही चालेना ॥**

असेच या घटनेबाबत म्हणावे लागले.

खरं म्हणजे, मी हे चरित्र मुलगा म्हणून प्रथम पुरुषी लिहिले असते तर कदाचित काहींना ही 'ज्योतीने तेजाची आरती'च वाटली असती. मला 'मुंडक' उपनिषदातील एक गोष्ट आठवते. एक पक्षी फळांच्या झाडावर या फांदीवरून त्या फांदीवर उंच उंच पुढे जात असतो. जाता जाता वाटेतली फळे



तो चाखत असतो. कांहीवेळा गोड तर कांही वेळा कडू फळे त्याच्या वाट्याला येतात. नक्की कुठे जायचे हे त्याला माहीत नसते. तो तसाच वर वर जात असतो. जिथून निघाला ती जागा फार दूरवर राहिलेली असते. शेवटी अपरिहार्यपणे झाडाच्या शेंड्याजवळ येतो. त्यावेळी त्याला आश्चर्याचा धक्काच बसतो. त्याच्यासारखा बरहुकुम एक पक्षी शांतपणे शेंड्याजवळ बसलेला असतो. खालून वर आलेल्या पक्षाला अंतर्मुख होवून विचार करता समजते की हा आपला आत्मा (Counter Part) च आहे. 'तो' आणि 'मी' एकच आहोत. (तत्वमसि) तो 'शिव' आहे आणि मी 'जीव' आहे. मग आमच्यात फरक काय ? 'जीव' हा क्षरभावाने वावरणारा मायारूप आहे. त्यालाच 'प्रकृती' म्हणतात. हीच 'प्रकृती' विश्वातील सृष्ट पदार्थांचा सर्व पसारा मांडत असते आणि तो सारा प्रपंच तटस्थपणे, साक्षीभावाने पहाणारा तो 'शिव'. माझ्याकडून हे जे चरित्र लिहिले गेले आहे ते शिवभावाने, साक्षीरूपाने, म्हणून या चरित्रात तृतीयपुरुषी नामांचा आणि सर्वनामांचा आश्रय घेतला गेला आहे हे कृपया वाचकांनी समजून घ्यावे.

मामांचे हे चरित्र लिहिले गेले आहे ते त्यांचे महत्त्व सांगण्यासाठी नाही. ते एक निमित्तमात्र आहेत. आप्पाच्यावाडीत वसत असलेल्या नाथांच्या जागृत स्वरूपाची प्रचिती देणारे हे प्रसंग आहेत. नाथांची ही शाबरी शक्ति आपल्या 'आर्त व कळि गिळिलिया जीवांनां' दीपस्तंभासारखे मार्गदर्शन कसे करत असते यावर प्रकाश टाकणाऱ्या या आठवणी आहेत. नाथांची कीर्ति आणि महती सुदूर जावी आणि तुम्हा आम्हां भक्तांना 'उजेडात उजेड' होवून रहाण्याचे भाग्य मिळावे हा त्यामगचा हेतू आहे.

माझा हा चरित्र लिहिण्याचा प्रसंग पहिलाच आहे. पण व्ही प्रिंटींग प्रेसचे मालक व मुद्रक श्री. हरीष तेंडुलकर व त्यांचे सहकारी श्री. संतोष कदम यांनी हे पुस्तक सुबक बांधणीचे व आकर्षक कसे करता येईल यासाठी जे कष्ट उपसले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी यांनी या पुस्तकाला प्रदीर्घ प्रस्तावना देवून प्रतिपाद्य विषय सुलभ केला आहे. त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. प. पू. चंद्रकांत आण्णांनी (केळकर) आपल्या भावाकाशातील चंद्रकिरणांनी भुकेलेल्या कैवल्य चकोराची

मनसोक्त तृप्ती केली आहे. त्याबद्दल त्यांना जेवढे धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. माझे परमस्नेही प्रा. डॉ. गुरुनाथ नाडगोंडे आपल्या अलंकारीक पण प्रवाही शैलीत लेखक परिचय करून देवून आम्हाला उपकृत केले आहे.

मला कल्पना आहे की, या चरित्रात अनेक त्रुटी आहेत. पण महाराष्ट्राच्या रसिकतेचे वर्णन करताना गडकऱ्यांनी म्हटले आहे.

'स्वजनकृतीचे गुरुदोष झाकुनिया, घेती गुणलव जे गोड मानुनिया' तुम्ही माझे गुरूदोष झाकून 'गुणलव' गोड मानून घ्याल याची मला खात्री आहे. तेव्हा ज्ञानेश्वर माऊलींच्या शब्दात एवढेच म्हणतो, 'न्यून्य ते पुरते, अधिक ते सरते' करून घ्यावे ही भक्तांना विज्ञापना.

साक्षीरूपाने जे जे मी माझ्या वडिलांचे आयुष्य पाहिले त्याचा हा 'मधुसंचय' आहे एवढेच आणि यापुढेही... 'तुमच्या पायाचा साक्षेप, हाचि माझा कालक्षेप' व्हावा हीच वांछा.

वर उल्लेखिलेल्या लोकांनीच नव्हे तर अनेक ज्ञात, अज्ञात भक्तांनी या वाक्‌यज्ञात आपली समिधा टाकली आहे. त्या सर्वांचा नामोल्लेख करणे स्थल विस्तार भयास्तव केवळ अशक्य आहे. ज्यांना नामोल्लेख झालेला नाही त्यांनी कृपया गैरसमज करून घेवू नये. एका इंग्रजी म्हणीचा आधार घेवून मी एवढेच म्हणतो, 'Heard Songs are Sweet, unheard are Sweeter या न्यायाने ज्यांचा उल्लेख केला आहे. त्यांचे शतश: आभार आणि ज्यांचा उल्लेख केला गेला नाही त्यांचे सहस्त्रश: आभार !

या सर्वामागची प्रभावळ गुरुमाऊलींची, नाथांची कृपा आणि कूर्मदृष्टी हे होय. त्याचेचे हे फलित आहे अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे.

प. पू. सत्यदेवानंद सरस्वतींच्या शब्दात एवढेच म्हणतो की -

**तुझेच सारे तुला अर्पिता मन माझे लाजे ।**
**प्रेमाश्रुपरी पदी वाहतो, तेचि मात्र माझे ।।'**

**।। शुभं भवतु ।।**

***- साक्षी***



# 'भावाकाशातील चंद्रकिरणे'



श्री नाथभक्त श्री. मधुकरपंत शिपूरकर हे त्यांचे पितृदेव प. पू. श्री. शंकरमामा शिपूरकर यांचे जीवन चरित्र लिहून प्रकाशित करीत आहेत ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे.

चरित्र हे पहायचे असते आणि पाहिलेले चरित्र वाचताना एक वेगळाच आनंद मिळतो. ''थोर महात्मे होऊनी गेले चरित्र त्यांचे पहा जरा । आपण त्यांच्या समान व्हावे हाचि सापडे बोध खरा'' हा शाहीर श्री. अनंत फंदी यांचा फटका आपल्याला हेच सांगतो.

माझे पितृदेव ती. प. पू. श्री. दादा महाराज केळकर ज्यांना दहावे नाथ म्हणत असत असे श्री. हालसिध्दनाथांचे परमभक्त श्री. गोविंदपंत घोसरवाडकर यांचे श्री. शंकरमामा शिपूरकर हे अधिकारी चिरंजीव. श्री. बाबूराव आण्णा, श्री. शंकरमामा व श्री. अप्पाराव हे तिघे बंधू. या घराण्यात सगळ्यांच्याच अंतरात श्री. हालसिध्द नाथांची परमभक्ती वास्तव्य करून होती. श्री. गोविंदपंत घोसरवाडकर यांचे ठिकाणी श्री. हालसिध्दनाथांचा संचार व्हावयाचा तो संचार म्हणजे समत्वाचा आचार होता. यांचे चरित्र आमचे प. पू. प्रा. म. अ. कुलकर्णी तथा स्वामी प्रज्ञानंद यांनी शब्दबध्द केले आहे ते प्रसिध्दही झालेले आहे. ती. प. पू. श्री. दादा महाराज आपले कीर्तनात सांगत असत. संचार पहावा श्री. गोविंदपंतांचा, प्लँचेट पहावे ते श्री. केतकर महाराज यांचे, (त्यांचे ठिकाणी श्री. ब्रम्हचैतन्य महाराज त्यावेळी अविर्भूत होत असत) आणि भविष्य ऐकावे ते श्री. शंकरमामांचे. श्री. शंकरमामांचे नुसतेच भविष्य नव्हते तर त्यांना तसे श्रीहालसिध्दनाथांचे वरदान होते. त्यामुळे त्यांचा अनुभव अनेकांना आलेला आहे. हा सारा विषय आपल्याला श्री. मधुकरपंतांच्या या चरित्र लेखनातून पहावयास मिळणार आहेच.

प. पू. श्री. गोविंदपंत घोसरवाडकर हे आमचे वाड्यात श्रीमती चंद्राक्का उदगांवकर रहात असत त्यांचेकडे येत असत. त्यांचेकडे आले की आमचेकडे यावयाचे. असेच एकदा आले असताना मंदिरात पाऊल टाकता क्षणीं त्यांना संचार झाला व ते म्हणाले ''अखंड कीर्तनाने व नामस्मरणाने बापूराव केळकर हे या संप्रदायात अधिकारी पुरूष ठरतील '' आणि त्यांचे हे शब्द अगदी खरे ठरले. अशाच एका वेळी आमचे ती. प. पू. श्री. दादा श्री. गोविंदपंत घोसरवाडकर यांना

नमस्कार करायला गेले आणि श्री. गोविंदपंत एकदम म्हणाले ''अरे तू नमस्कार करू नकोस'' तेव्हा आमचे श्री. दादा त्यांना म्हणाले ''तुमच्या अंगात श्रीहालसिध्दनाथांचा संचार होतो म्हणून आपणाला नमस्कार'' तेव्हा श्री. गोविंदपंत म्हणाले '' अरे संचार माझ्यामध्ये केव्हातरी होतो तुझ्या डोळ्यात मात्र मला तो सारखाच दिसत आहे'' असा घोसरवाडकर शिपूरकर-केळकर यांचा संबंध आहे. हा संबंध मध्यंतरी काही काळ गुप्त होता. काही वर्षापूर्वी आमचे घराचे मागील बाजूस श्री सेना मंदिर रोडवर एका घरात रात्रीच्या वेळी चिमड संप्रदायाची पंचपदी सुरू असलेली श्री. दादांचे कानावर आली. श्री. दादा आम्हाला म्हणाले, ''अरे आपली पंचपदी कोण म्हणत आहे जरा बघून या'' तेव्हा श्री. अनंतराव कुलकर्णी-कुंभोजकर, श्री. रानडे यांचे घरी माडीवर रहात होते. तेथे श्री. शंकरमामा शिपूरकर वगैरे मंडळी आली होती व पंचपदी म्हणत होती. नंतर ही सर्व मंडळी आमचेकडे आली. पूर्वीचा संबंध पुन्हा प्रगट झाला. व तो अधिकच दृढ होत गेला. हा आत्मसंबंध आहे. श्री. बाबूराव आण्णा, श्री. शंकरमामा व श्री. आप्पा राव यांनी जे अलौकीक प्रेम आमचे श्री. दादांचेवर केले तेच प्रेम आज श्रीनाथभक्त श्री. दत्तोपंत, श्री. मधुकरपंत व त्यांचे बंधू श्री. अनिल कुलकर्णी (घोसरवाडकर) आमचेवर करीत आहेत.

साधारण १९७६ साल असावे. श्री. दादांचे बरोबर आम्ही सर्वजण श्री आप्पाचेवाडीस श्री हालसिध्दनाथांचे दर्शनास गेलो होतो. श्री. शंकर मामांनी श्री. दादांचेसह सर्वांना घुमटात दर्शनासाठी नेले. तो आत एकदम अनामिक सुगंध सुटला. श्री हालसिध्दनाथांनी श्री. दादांचे वरील प्रेमाची व कृपेची साक्ष दिली. व याचे सर्वांनाच आश्चर्य वाटले.

शेवटी श्री हालसिध्दनाथांची अशीच कृपा आमचे सर्व केळकर घराण्यावर रहावी व घोसरवाडकर शिपूरकर घराण्याचे असेच प्रेम, वात्सल्य आमचेवर रहावे अशी प्रार्थना भगवान श्री. सद्गुरू श्री. तात्यासाहेब महाराज कोटणीस, माझे आजोबा ती. प. पू. श्री. मामा महाराज केळकर व पितृदेव ती. प.पू. श्री. दादा महाराज केळकर यांचे चरणी करून श्री हालसिध्दनाथांचे चरणी विनम्र अभिवादन करून येथेच थांबतो.

**।। राजाधिराज श्री सद्गुरूनाथ महाराज की जय ।।**


श्री दादांचा कृपाभिलाषी,

सांगली, **चंद्रशेखर**

दि. ११-८-२००५ *(श्री चंद्रशेखर रामराय केळकर)*



# प्रस्तावना



नाथकृपांकित
**प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी**
७७२, गावभाग सांगली.
२६-८-२००५ गोकुळाष्टमी
शुक्रवार, श्रावण वद्य ८ शके १९२७

## ।। श्रीमामांची प्रथम दर्शन भेट ।।

**''संचाराद्भुत गात्राय कामितार्थ प्रदायिने ।**
**श्रीमद् शंकरनाथाय हालसिद्धाय ते नमः ।।''**

प. पू. श्री. शंकरमामा शिपूरकर यांच्या या अद्भुतरम्य किंवा रम्याद्भूत असलेल्या चरित्रग्रंथास स. स. प. पू. श्री. दासराम महाराजांच्या जन्मोत्सव पर्वकाळात ही प्रस्तावना लिहीण्याचा अपूर्व योग प्राप्त होणे हा समर्थ सद्गुरु श्री. दासराम महाराज आणि श्रीहालसिद्धनाथांच्या पूर्णकृपेचा प्रसाद आशीर्वादच होय. श्रीक्षेत्र घोसरवाड येथील श्रीनाथमूर्तीची प्राणप्रतिष्ठा करताना २६-२७ ऑगस्ट १९९७ ला 'श्रीसिद्धमूर्ती' या स्मरणिका प्रकाशनाच्या रूपानं सर्व नाथभक्तांचा आनंद मेळावा जमला होता. आज पुन्हा श्री क्षेत्र आप्पाचीवाडी येथे प. पू. श्री. मामांच्या चरित्रवाङ्मयीन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा व उद्घाटन सोहळा होत आहे, हा एक अपूर्व, अविस्मरणीय सोहळा आहे. प.पू. दादांच्या शब्दात सांगायचे तर

**'' अपूर्व हा सेवालाभ पद्मनाभ जोडिला ।।''**

अशी स्थिती आहे. श्री. मामांचे चरित्र म्हणताच नाथांची घुमटी, नाथांचा दरबार, चिंचवनाची गर्द सावली, अस्मान भेदून उठलेला ढोलांचा सोहं घोषध्वनी, भंडाऱ्याची पखरण आणि उधळण, दंडवत घालणारे भक्तजन,

''चांगभलं'' च्या ललकाऱ्या, श्रीनाथांची आश्वारूढ स्वारी, चंद्रसूर्यांकित छत्रचामरे, अब्दागीरींची दाटीवाटीने उसळलेली गर्दी, महाराजांची संचाराद्‌भुत भारलेली पालखी, हत्यारांचा अद्‌भुत खेळ लाख लाख भक्तांच्या प्रचंड गर्दीतदेखील मुंगीच्या पायातील घुंगराचा आवाज ऐकू यावा अशा विलक्षण शांततेत चाललेली भाकणुकीची ''ब्रह्मवाणी'' असा सर्व भक्तिचा अपूर्व दरबार आणि प्रचंड काहिलीतून शिजणाऱ्या गोड खिरीच्या महाप्रसादाचा, अन्नदानाचा घमघमाट अशा पार्श्वभूमीवरचे कथाचित्र म्हणजे श्री. मामांचे चरित्र होय.

प्रसंग आहे श्रीक्षेत्र आप्पाच्यावाडीचा ! प. पू. श्री. दासराम महाराज, श्री. धनंजय भावे, प्रा. सौ. अनुराधा कुलकर्णी, चि. अलकनंदा, चि. दीपशिखा यांच्यासमवेत स्पेशल गाडी काढून आम्ही प्रथमच श्री हालसिद्धनाथांचे दर्शनास आलो होतो. दर्शन-प्रदक्षिणा घालून घुमटीसमोरील नाथभक्त श्री. भीमाच्या पडवीत आलो. तेथे शुभ्र धोतर, पांढराशुभ्र तलम नेहरूशर्ट, मस्तकावर शिवलिंगाप्रमाणे शोभणारी काळी टोपी, भाळी पांढरे गंध कपाळभर भंडारा, दोन्ही हात भंडाऱ्याने भरलेले, डाव्या हाताशी भंडाऱ्याची कामधेनू (पिशवी) आणि उजव्या हाती मूठभर भंडारा घेऊन तळहातातील भंडाऱ्याकडे दृष्टी रोखून पहात असलेले प्रसन्नवदन असे श्री. मामा भिंतीला टेकून उकिडवे बसलेले. शेजारी प. पू. श्री. दासराम महाराजही बसलेले. अनेक स्त्रीपुरुष, लहानमोठे भक्त आपली अर्जी सांगून माथा टेकून भंडारा घेत होते.

**॥ संचाराद्‌भुत गात्राय ॥**

आम्ही आप्पाचेवाडीस प्रथमच आलो होतो. भंडारा-संचार-हत्यारांचा खेळ-अमावस्येची यात्रा-महाप्रसाद इ. सर्वच आम्हास नवीन होते. आम्ही नमस्कार करून मुठीमुठीचा कपाळभर भंडारा आयुष्यात प्रथमच लावून घेत होतो. त्यावेळचा विलक्षण प्रसंग म्हणजे प्रा. सौ. अनुराधा कुलकर्णी यांनी वाकून श्री. मामांच्या पायावर डोके टेकले मात्र ! आणि त्याक्षणी उजव्या हातात भंडारा घेतलेल्या स्थितीत बसल्याजागीच, श्री. मामांना संचार होऊन जमिनीपासून जवळजवळ ४-६ इंच वर उसळी घेतल्याप्रमाणे ते उंच उडाले आणि मुखाने अरे ऽऽ असा शब्दोच्चार करीत शेजारीच बसलेल्या



प. पू. श्री. दासराम महाजांकडे त्यांनी पाहिले. दुसऱ्याक्षणी भंडाऱ्याची कामधेनू श्री. दादांच्यापुढे सरकवून ''आता तुम्ही भंडारा द्या!'' असे म्हणाले यावेळी श्री. मामांच्या चरणस्पर्शाबरोबरच डॉ. सौ. अनुराधा यांनाही त्याक्षणी आपण स्वत:देखील उंच उचलले गेल्याचे जाणवले. अद्‌भुत संचाराची वीज क्षणभर सळसळून जावी तसे भारलेले वातावरण पडवीत पसरलेले त्यावेळी तेथे सर्वांनीच प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले आहे. उघड्या पडवीच्या बाहेर श्रीमामांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. मधुकरपंत उभे होते. त्यावेळी त्यांनी अंगावर पांढरी शुभ्र सफारी घातली होती. मी त्यांच्याजवळ जाताच मोठ्या आवेगाने त्यांनी मिठीच मारली आणि म्हणाले - मामांच्या एवढा मोठा संचार मी कधीच पाहिला नाही. आजचा हा संचार काही वेगळाच घडला. यावेळी श्रीदत्तोपंतही तेथेच उभे होते.

अशारितीने नाथांचा असा अद्‌भुत संचार गात्रागात्रातून सावरित, हाती ''बोधभंडाऱ्याचे'' बळ घेऊन ''कामितार्थ प्रदायिने ।'' म्हणजे समोर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची कामना पूर्ण करण्यासाठी श्री. मामा मुठीमुठीने भंडाऱ्याची उधळण करीत होते. शेजारीच पू. श्री. दासराम महाराज बसले होते. जणू गुरुशुक्राची तेजस्वी युतीच !

**''दोघेही गुरु शुक्र मित्रच म्हणा दोघे विचाराग्रणी ।**
**तो त्यागी कृश एक आणि दुसरा हा राजयोगी ऋषी''**

असे ते ''मित्र'' (सूर्य) दोघेजण प्रसन्नपणे तेजस्वी नेत्रकटाक्षांनी सर्वांवर कृपेचा वर्षाव करीत राहिले. याभेटीत श्री. मामांनी अक्षरश: मला कडकडून क्षेमालिंगन दिले आणि पुढे मग अशा अनेक आमावस्या, वार्षिक यात्रा, उत्सव, नानाप्रसंगी मामांची भेट घडत राहिली. आश्चर्य म्हणजे त्या त्या प्रत्येकभेटीत त्यांनी क्षेमालिंगन देऊन आमच्या समस्त कुटुंबियांवर पुण्यपावन आशीर्वादाचे कृपाछत्र धरले आहे.

**''शुक्लांबरधरं देवं शशिवर्णं च द्वीभुजम् ।**
**प्रसन्न वदनं ध्यायेत सर्व विघ्नोपशांतये ॥''**

विष्णुसहस्त्रनामातील हे वर्णन जणू श्री. शंकरमामांचेच- शुक्लांबरधरं

म्हणजे अंगावर अक्षरश: पांढराशुभ्र पोषाख ! शुभ्र पांढरे तलम धोतर-शुभ्र नेहरू शर्ट, गोधूम अंगकांती. पांढरे गंध-भाळावर भंडारा भरलेला, डोकीवर काळी टोपी ! यात कधी बदल नसे, सदैव प्रसन्नवदन. भेटीस येणाऱ्या भक्तमंडळींचे प्रश्न-विघ्न निवारण करण्यासाठी नाथांचा भंडारा आणि कुंडलीचा नाममात्र तपशील समोर ठेवून मामांनी अनेकांना नीट भक्तिमार्गी लावून प्रपंचाची वाटही दाखविली. प्रस्तुत चरित्रग्रंथात श्री.मामांचीच कुंडली प्रारंभी दिली आहे. पण वास्तविक ज्यांची कुंडलिनी सदैव जागृत आहे आणि जे नवग्रहांच्यावर नाथमंडळात भक्तिसंचार करीत आहेत अशा शंकरनाथांची कुंडली कुणी मांडावी ? या नाथभक्तिबळावर शंकरमामा ठामपणे सांगतात की, ''ते कारण, महाकारण इ. सर्व विनाकारण आहे.'' इथे नाम भजन भक्ती मात्र श्रेष्ठ आहे हे त्यानी आवर्जून सांगितले.

### कथा त्रिवेणी संगम

श्री. मामांच्या या चरित्रग्रंथात त्यांच्या तीन प्रमुख गोष्टींचा केलेला निर्देश अत्यंत महत्त्वाचाच आहे. तुकारामांनी म्हटल्याप्रमाणे **''कथा त्रिवेणी संगम । देव भक्त आणि नाम ।।** या त्रिवेणीत मामांचे चरित्र सामावले आहे.

१) ज्योतिष ज्ञानाची श्रेष्ठता - वाचासिद्धी, ब्रह्मवाणी.

२) नामस्मरण - भजन तलीन पूजापाठ, पंचपदी इ. भक्तियोग.

३) आप्पाच्या वाडीतील अन्नदान, अमावस्या, यात्रा.

यात्रिवेणीचा परोपरीने घडत राहिलेला विस्तार संगम म्हणजे श्री. मामांचे चरित्र म्हणता येईल. एका अर्थी प्रस्तुत चरित्रात वरील ''त्रिशूलावरी'' श्री. शंकर मामांची ''कथाकाशी'' प्रकटली आहे.

भगवान वेदव्यासांचे वर्णन करताना म्हटले आहे की,

**''अचतुर्वदनो ब्रह्मा द्विबाहुरपरो हरिः ।**

**अभाललोचनः शंभुः भगवान बादरायणः ।।''**

अर्थात श्रीवेदव्यास म्हणजे एक मुखी ब्रह्मा, दोन हातांचे हरी आणि भाळावर प्रत्यक्ष तृतीय नेत्र नसलेले शंभूशंकर होत. श्री. शंकरमामांच्या बाबतीतदेखील हे बरेचसे लागू असून नाममात्र कुंडली समोर धरून सर्व



ग्रहावरून नजर फिरवीत भंडाऱ्यात खोलवर अंतदृष्टीने पाहून अचूक भविष्यातील ब्रह्मवाणी सांगत असलेले श्रीमामा प्रस्तुत चरित्रात अनेक घटना प्रसंगातून दिसून येतात. (पृ. २३ ते २५, पृ. २६, २७, ३३, ४२, ४३ मध्ये) या नाथभक्तांची ही भविष्यवाणी ब्रह्मवाणीप्रमाणेच यथार्थ ठरत आली.

श्री. शंकरमामा हे खरोखरीच ''आभाललोचन'' शंकर होते. दृश्यरूपात, नृतीय नेत्र नसला तरी, भंडाऱ्यात पाहताना त्यांचा सूक्ष्मज्ञानी नेत्र उघडलेला असे. अशावेळी त्यांना ते सर्व दृश्य प्रत्यक्षात दिसून येई. बेळगावचे गणेशदर्शन (पृ. ३६-३७) किंवा घराच्या परसदारी संडासमोरीच्या सांडपाण्याच्या जागी जमिनीत गाडलेल्या श्रीदत्तपादुका दिसून येणे आणि पुढे त्यातून उजळलेली श्री दत्तकृपेची पौर्णिमा ही प्रज्ञाचक्षूंना दिसून आलेली प्रत्यक्ष घटना होय. (पृ. ३६)

श्री. शंकरमामांचे पिताश्री - ''श्री. गोविंदपंत घोसरवाडकर म्हणजे दहावे नाथच होत'' असे आमचे सद्‌गुरु दासराम महाराज सांगत. अशा गोविंदपंतानी सुरु केलेली आप्पाच्यावाडीच्या दर अमावस्येची भक्तियात्रा-तेथील अन्नदान, भजनभक्ती पंचपदी इत्यादी भक्ती उपक्रम श्रीमामांनी नेटाने चालू ठेवले व भरभराटीला आणले. त्यानिमित्ताने अनेक नाथभक्तांची मांदियाळी मेळविली. मामांचे हे लोकसंग्रहाचे मोठेच कार्य होय. लोकांच्या अडीअडचणींचे निवारण करून लोकांना मार्ग सांगून सकाम भक्तीतून निष्काम भक्तीची त्यांनी प्रेरणा दिली. श्री. मामांचे हे कार्य आजही मोठ्या संपन्नतेने, भावभक्तीने चालले आहे. वर्षाच्या बाराही आमावस्या भक्तांनी आनंदाने वाटून घेतल्या असून महाप्रसाद-अन्नदानाच्या रूपाने त्यांची नाथसेवा अखंडीतपणे सुरु आहे. हे (पृ. १८ ते २१) वर सविस्तर तपशील पाहता येईल. नावनिशीवार सांगितलेली अन्नदानाची ही माहिती नाथ भक्तांना व इतरांना आदर्श अशीच असून अभिमान वाटावा अशीच आहे.

### श्री गणेशमूर्तीचे पुनरूज्जीवन

श्री मामांच्या चरित्रात आलेली ही सविस्तर घटना (पृ. ३७) अवघ्या बेळगावच्याच आध्यात्मिक आणि सांस्कृतिक इतिहासात अपूर्व आणि अद्वितीय अशीच आहे. शेंदूर थापून थापून गोल गोटा बनलेली दुर्लक्षित

गणेशमूर्ती अक्षरशः राखेच्या ढीगाऱ्यात गडप झाली होती. अत्यंत प्राचीन रेखीव, सुबक, घडीव आणि सर्वांगसुंदर अशी श्रीगणेशमूर्ती झाकोळून गेली होती. ३०-३५ किलो शेंदूराची पुटे चढलेली ! श्री. खासबाग यांना प्रेरणा देऊन श्री. मामांनी या गणेशाची वेदोक्त प्राणप्रतिष्ठा करविली. नित्योपासना सुरु झाली. प्रतिवर्षी तेथे श्रीगणेशयाग - एक हजार मोदकांचे हवन, स्वाहाकार आजही अखंड सुरु आहे.

बेळगांवात भरबाजारात दिमाखदार मंदिर उभे राहिले. श्री. मधुकरपंतांच्या बरोबर जाऊन आम्हीदेखील या यज्ञहवनात प्रत्यक्ष भाग घेतला आहे. श्री. मामांच्या या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यास तोडच नाही. **''मोडिली मांडिली क्षेत्रे''** असे हे कार्य असून अकोळ (ता. चिक्कोडी) येथे श्री. विठ्ठल वासुदेव कुलकर्णी यांच्याकडून श्री दत्तपादुका कुदळीने खणून बाहेर काढण्यास लावून श्री पादुकांची प्राणप्रतिष्ठा करविली. घुमटी बांधवून उपासना सुरु केली.

**।। अमानित्वं - अदंभित्वम् - लोकेषणा पराङ्मुखता ।।**

श्री. शंकरमामांचे हे विविधप्रकारचे भक्तिकार्य एकाचवेळी सुरू असूनही त्यांनी त्याचा गाजावाजा कधी केला नाही. हे सर्व अत्यंत शांतपणे सुरु होते. नाथभक्तिची ही सहजता होती. संत चमत्कार करीत नाहीत. पण बुद्धीतर्कातीत अशा गोष्टी त्यांच्याकडून सहजपणे घडून जातात. त्यांना त्याचे काही वाटत नाही. त्यामुळे सामाजिक मोठेपणा मानसन्मान या सर्वांपासून ते दूर असतात. श्री. मामांच्या चरित्रात साठी समारंभाचा कार्यक्रम त्यांनी किती निग्रहाने रहित केला ही गोष्ट इथे लक्षणीय ठरते. ही लोकेषणा पराङ्मुखता दुर्मीळ अशीच आहे.

**।। रम्याद्‌भुत आणि अद्‌भुतरम्य ।।**

श्री. मामांच्या या चरित्रात अशा अनेक घटना घडलेल्या दिसतात की, अद्‌भुतरम्यता हा शब्द देखील इथे कमी पडतो. उदा. त्यांचा रयत ज्योती घाटगे आणि गुंड बाबू पवार यांची हकिकत - IGP कामटे साहेबांचा स्नेह (पृ. २३ ते २५) श्री. अंबिके DSP यांची अडचण (पृ. २५), कोल्हापूरचे प्रसिद्ध हार्डवेअर श्री. डुबले (पृ. २५), शेंडूरचे मामा (पृ.२४) इत्यादींच्या



हकिकती मन थक्क करणाऱ्या असून तथाकथित बुद्धिवाद्यांना अंतर्मुख करणाऱ्या अशाच आहेत. नास्तिकांचा आणि बुद्धिवाद्यांचा पार धुव्वा उडवून भक्तिमार्गाची प्रेरणा देणाऱ्या अशाच या चरित्र घटना आहेत.

पू. श्री. पद्मसागरजी महाराजांची भेट आणि तेथेच श्री. अशोक जैन (टाईम्स ऑफ इंडियाचे मालक) यांचेशी त्यांची झालेली ओळख ही मुळातूनच वाचावी अशी आहे. हा सर्वकथाभाग एखाद्या अद्‌भुतरम्य कादंबरीला मागे टाकेल इतका वेधक आणि उद्‌बोधक आहे. कोठीवाले बेडकीहाळकर यांच्या मामांच्या कन्येच्या विवाहाची कथादेखील तितकीच रम्याद्‌भुत ठरली आहे. (पृ.४२-४३)

**।। ते माझे सोयरे सांगाती ।।**

श्री. मामांच्या कृपा छायेत आलेली सर्वच मंडळी ही त्यांच्या कुटुंबातच सामावलेली असत. त्यामुळे मामांचे विशाल कुटुंब झाले होते. या कुटुंबाची उस्तवार करणारी माऊली, श्री. मामांच्या पत्नी तसेच मामांच्या मातोश्री यांचा भावपूर्ण निर्देश या चरित्रात आला असून परंपरेचे सोयरे इथे आवर्जून निर्दिष्ट केले आहेत. खरे तर सारेच आपले.

**''ते माझे सोयरे सज्जन सांगाती ।**

**आठविती पाय विठोबाचे ।।** किंवा

**''एका देवासाठी झाले ब्रह्मांड सोयरे । हेच खरे ।''**

प. पू. श्री. दादांच्यामुळे आम्ही नाथकृपांकित झालो आणि श्री. मामांनी पहिल्या भेटीतच क्षेमालिंगन देऊन आम्हास आपल्या सोयऱ्यात मेळविले. त्यांच्या क्षेमालिंगन भेटीच्या, 'तथा दर्शन स्पर्शनाचा' कोणासही कदापि ''विसर न व्हावा' ही श्रीनाथचरणी प्रार्थना ! यानिमित्ताने आम्हा सर्व कुटुंबियांचे श्री. मामांचे चरणी सांष्टांग प्रणिपात.

**।। सहज उचलिले धनू शंकराचे ।।**

श्री. शंकरमामांच्या चरित्राचे लेखन ही गोष्ट सामान्य नव्हे. त्याच तोलामोलाच्या अंतरंग अधिकारी अशा सव्यसाची नाथभक्तांकडूनच हे होणे शक्य होते. आमचे अत्यंत जिव्हाळ्याचे, अंतरंगातील परमप्रिय गुरुबंधू व श्री. मामांचे ज्येष्ठ चिरंजीव श्री. मधुकरपंत यांनी **''सहज उचलिले धनू**

**शंकराचे''** असेच म्हणावे लागेल. कारण हे श्री. मामांचे चरित्र हे केवळ त्यांच्या पिताश्रींचे चरित्र नाही तर असंख्य नाथभक्तांच्या ''मर्मबंधातील ती ठेव'' आहे. त्यादृष्टीने चरित्रातील मुख्य मुख्य घटना प्रसंग हळुवारतेने - श्रद्धाभक्तीने - ऋजुतेने त्यांनी उलगडत नेले आहेत. साहित्य समीक्षेचा हा अवकाश नाही. तरीपण श्री. मधुकरपंतांची भाषाशैली सहज सुलभ प्रासादिक-ओघवती आणि अकृत्रिम अशी आहे. सहजभाषेत निर्व्याज ऋजुतेने त्यांनी हे निवेदन मांडले आहे. मुळात चरित्र लिहिणे ही गोष्ट सामान्य नव्हे. त्यासाठी फार खस्ता खाव्यालागतात. माहिती-कथा-घटना प्रसंग सारे सारे संकलित करावे लागते. त्यांची सत्यासत्यता पडताळून पाहून त्यांचा आकर्षक गटनाक्रम सजवावा लागतो. रोचकता यावी लागते. इ. इ. चरित्राला सत्यालाप चालत नाही. म्हणून हे कार्य जोखमीचे असते. चरित्र नायकाशी एकरूप व्हावे लागते आणि अशा चरित्राला प्रस्तावना लिहीणे हेदेखील त्याहून जोखमीचे ! हे कार्य आम्हांवर सोपवून अल्पकाळात श्री. मधुकरपंतांनी ही प्रस्तावना आम्हाकडून घेतली ती गोड मानून घ्यावी. श्री. मधुकरपंतांना याबाबतीत संपूर्ण सहयोग देणाऱ्या त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. रेखावहिनी यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. चि. प्रसाद, चि. अभिजीत, चि. पंकज या सर्वांची सेवा श्रीनाथचरणी ऋजु आहे. वास्तविक श्री. शंकरमामा हे ३-४ पिढ्यांचे साक्षीदार आहेत. त्यामुळे त्यांच्यासंबंधी किती आणि कोठवर लिहिणार ? शेवटी ग्रंथमर्यादा लक्षात घेऊन लिहिलेले चरित्रअल्पसे वाटले तरी **''यद्‌ल्पमपितद्‌बहुः''** असेच म्हणावे लागेल.

ही प्रस्तावनेची शब्दकुसुमांची सेवा श्रीहालसिद्धनाथांचे चरणी समर्पित करून श्री. शंकरमामांना प्रणिपात करून लेखणीस विराम देत आहे.

**।। राजाधिराज श्री सद्‌गुरुनाथ महाराज की जय ।।**

**।। राजाधिराज श्री हालसिद्धनाथ महाराज की जय ।।**


**।। राजाधिराज श्री रामराय महाराज की जय ।।**

■ ■ ■





**मामांच्या आत्या (दत्तक मातोश्री)**



**गोविंदपंतदादा घोसरवाडकर**
**मामांचे जनक वडील**






**मामा व त्यांच्या पत्नी पार्वतीबाई शिपूरकर**



श्रीक्षेत्र सिध्दापूर
मंदिरातील पूजामूर्ती



प.पू. रामनाथ
केळकर महाराज.



श्री. आप्पाचीवाडी येथील समाधी

॥ श्री गजानन प्रसन्न ॥
॥ श्री मल्हारी म्हालसाकांत प्रसन्न ॥
॥ श्री रेवणनाथ प्रसन्न ॥
॥ श्री महालक्ष्मी प्रसन्न ॥


**आता हृदय हें आपलें । चौफुलुनियां आलें ।**
**वरी बैसऊं पाऊलें । श्री गुरुची ॥**
**ऐक्या भावाची अंजुळी । सर्वेंद्रियकुङ्मुळी ।**
**धरुनिया पुष्पांजली । अर्घ्यु देवो ॥**

तडित् कांती धरो देवो शूलिश्रृंगी विभूषितः ।
जटा मुकुट भस्मांगे कर्ण कुंडल धारकः ।
कौपिन पादुकाधारी धर्मपालन तत्परः ।
निग्रहानुग्रहीदक्षो वरदोभक्तपालकः ।

गोरक्ष जालंदर चरपटाश्च अडभंग कानीफ
मच्छिंद्राद्या चौरंगी रेवाणक भर्तुरी संज्ञाम्
भूम्यां बभुर्वो नवनाथ सिद्धाः ।

## श्री. शंकरराव दत्तात्रय शिपूरकर

श्री शके १८३१, अश्विन वद्य द्वादशी (गुरु)
पहाटे ५ ते ६ च्या दरम्यान उत्तरा नक्षत्र, चतुर्थ चरण, दि. ९-११-१९०९




॥ शुभं भवतु ॥

भंडाऱ्याचे भांडार म्हणून ज्यांना ओळखले जाते ते ब्रह्मीभूत श्री. शंकरराव दत्तात्रय शिपूरकर उर्फ शिपूरकर मामा यांनी दि. १२-९-१९८० रोजी सकाळी अकरा वाजता देह ठेवला. त्यांच्या खडतर आयुष्याचा मागोवा घेताना एक गोष्ट लक्षात आल्याशिवाय रहात नाही, ती ही की त्यांच्या खडतर आयुष्याच्या वाटचालीत त्यांच्याबरोबर एक अनामिक दैवीशक्ती त्यांना सहाय्यभूत व सांगाती होती. ''पुनश्च विजयी दैव एकदां'' असे म्हणणाऱ्या गीत रामायणातील श्री रामाप्रमाणे त्यांचे दैवाशी जणू काय द्वंद्वयुद्ध चालले होते.

मामांचा जन्म एका सत्पुरुषाच्या पोटी झाला. मुळचे ते घोसरवाडकर. श्री. गोविंद चिमणाजी घोसरवाडकर ह्यांना तीन मुलगे आणि तीन मुली झाल्या. मुलांमध्ये हे दुसरे. मामांचा जन्म घोसरवाड मुक्कामी ९.११.१९०९ रोजी भटांचे घरी झाला. श्री. भट हे त्यांच्या आईचे वडील. घोसरवाड हे गांव श्री नृसिंहवाडी पासून सहा मैलावर आहे. एकदा त्यांची आई लहानपणी त्यांना घेऊन श्री देवाचे चरणावर घालण्यासाठी गेली होती. हे बाळ दिसायला आपल्या वडीलांच्यासारखे गोरेपान व रेखीव होत. त्या बाळास देवापुढे ठेवले असताना वाडीला परमहंस परीव्राजकाचार्य श्री टेंबे स्वामी तेथे आले व त्यांनी मुलाचे अंगावर हात फिरवून आशिर्वाद दिला. ही हकीकत घरी कळताच त्यांच्या वडीलांना आनंद झाला.

## कुलवृत्तान्त व परंपरा : श्री. गोविंदपंत घोसरवाडकर

श्री. गोविंदपंत घोसरवाडकर हे सिद्रामपंत शिंदे सरकार घोसरवाड यांचेकडे नोकरीस होते. त्यांचा आध्यात्मिक अधिकार फार मोठा होता. चिमड सांप्रदायाचे श्रेष्ठतम अधिकारी प्रा. डॉ. श्री. गुरुदेव रानडे त्यांना एक सिद्धपुरुष म्हणून मानत होते. हे घोसरवाडकर कुलकर्णी मुळचे कोकटनूरचे (तालुका अथणी, जिल्हा बेळगांव). कोकटनूरला एकदा दुष्काळ पडला असता त्यांचे पूर्वज मजल दरमजल करत घोसरवाड मुक्कामी आले व तेथेच स्थायिक झाले. त्यांचे कुलदैवत श्री मल्हारी म्हाळसाकांत असले तरी पिढ्यान्‌पिढ्या त्यांचे अंत:करणात श्री दत्तभक्ती रूजली होती. श्री. गोविंदपंतांचे पणजोबा बाबुराव यांना अपत्य नव्हते. म्हणून ते घोसरवाड ते नृसिंहवाडीस अक्षरश: साष्टांग

दंडवत घालत गेले. तिथे त्यांना प्रसाद मिळाला आणि पुढे त्यांना वर्षभरात तिळं (तीन आपत्ये एकाचवेळी) झाले. तिथून हा वंश वाढीस लागला. गोविंदपंतांच्या आजोबांना म्हणजे श्री. खंडोपंतांना तीन मुलगे झाले. पहिले दत्तोपंत, दुसरे चिमणाजीपंत आणि तिसरे रघुनाथपंत. श्री. चिमणाजीपंत हे गोविंदपंतांचे वडील. श्री. चिमणाजीपंतांनादेखील तीन मुलगे झाले. पहिले गोविंदपंत, दुसरे बाळाजीपंत व तिसरे श्रीपादपंत. गोविंदपंतांना तीन मुलगे झाले. पहिले श्री. व्यंकटेश उर्फ बाबुराव, दुसरे श्री. शंकर आणि तिसरे श्री. आप्पाजीपंत.

## श्री. सिद्धेश्वर उर्फ श्री हालसिद्धनाथ

घोसरवाड या गावचे दैवत श्री सिद्धेश्वर उर्फ श्री. सिदोबा उर्फ श्री. हालसिद्धनाथ. हे नवनारायणातील चमस नारायणाचे अवतार. कलीयुगामध्ये धर्मरक्षणासाठी अवतार धारण केला पाहिजे असा विचार करून भगवंतांनी उद्धवाकडून नवनारायणांना निरोप पाठवून द्वारकेस बोलावून घेतले. नवनारायणांची षोडशोपचारी पूजा करून भगवंतांनी आपली मनोकामना त्यांना सांगितली आणि त्याप्रमाणे असे ठरले की, कवी नारायणांनी मच्छिंद्राचा, हरी नारायणांनी गोरक्षनाथांचा, अंतरीक्ष नारायणांनी जालिंदरनाथाचा, प्रबुद्ध नारायणांनी गोरक्षनाथांचा, पिप्पिलायन नारायणांनी चर्पटीनाथांचा, अविरहोत्र नारायणांनी नागनाथांचा, द्रुमिल नारायणांनी भर्तरी नाथांचा, चमसनारायणांनी रेवणनाथांचा, करभाजन नारायणांनी गहिनीनाथांचा अवतार घेऊन धर्मरक्षण, धर्मजागृती करावी.

साधारणपणे १० व्या शतकाच्या सुमारास मतमतांचा गलबला झाला होता. अनेक पंथ आणि सांप्रदाय यांचे प्राबल्य वाढल्यामुळे आचार-विचारांचा संकर झाला होता. तंत्रमंत्रादि गोष्टी व बाह्य आचार-विचार यांना प्राधान्य मिळून खरा धर्म सामान्यांना पारखा झाला होता. परस्परांच्या सांप्रदायांनी एकमेकांवर आघात करून सामाजिक जीवन बिघडवून टाकले होते. कर्मकांडाच्या गर्तेत सामान्य माणूस रूतला होता व किमूकर्तव्यमूढ झाला होता. अशावेळी श्री नाथसांप्रदायांनी समन्वयाची दृष्टी ठेवून आत्मानुभूतीला प्राधान्य दिले आणि सामान्य माणसाला जन्मसार्थकतेच्या वाटा दाखविल्या.



त्यामुळे श्री नाथसांप्रदाय लोकप्रिय झाला.

हे सर्व नाथ अयोनिसंभव आहेत. ज्यावेळी धर्मसंहार होतो त्यावेळी विविध अवतार घेऊन धर्मग्लानी दूर करत असतात. श्री रेवणनाथांचा अवतार त्यापैकी एक आहे. श्री नवनाथ भक्तिसार ग्रंथामध्ये ३४, ३५ व ३६ अध्यायांमध्ये श्री रेवणनाथांचा अवतार - कार्याची हकिकत आली आहे.

## हालसिद्ध नाथांचा अवतार

दोन अडीचशे वर्षापूर्वी रेवणनाथांनी नवीन अवतार घेतला. रेवणनाथांना गाईचे दूध अत्यंत प्रिय आहे. कानडीत दूधाला 'हाल' म्हणतात. दूग्ध प्राशनाने प्रसन्न झाले म्हणून हालसिद्धनाथ या नावाने ते प्रसिद्ध झाले. अलमप्रभू व हालसिद्धनाथ यांचे बरेचसे कार्य कर्नाटक प्रांतात झाले आहे. हिंदू, जैन, लिंगायत, मुसलमान अशा समाजातील, सर्व जातीच्या व थरांच्या लोकांना एकत्र आणण्याचे महान कार्य त्यांनी केले. अद्यापही कर्नाटकात सर्व जातीचे हजारो भक्त त्यांची उपासना करत असल्याचे आपणास पहावयास मिळते.

साधारणपणे इ. स. १६८२ ते १७७६ हा त्यांच्या अवताराचा काल असावा. १७७६ च्या सुमारास ते घोसरवाड ग्रामी आले असावेत. दूधगंगेकाठी ते काहीकाळ थांबले. तिथे इनामदारांचे एक कुरण होते. गावातील मुले तिथे गुरे चरण्यासाठी म्हणून जात असत. तेंव्हा हे गोसावी वेषात असलेले महाराज मुलांना बोलावून ''तुला काय पाहिजे'' म्हणून विचारीत आणि त्या मुलाच्या इच्छेप्रमाणे त्याला जो पदार्थ पाहिजे असेल तो ते देत असत. त्यामुळे मुले आनंदित होत. मुलांना चटक लागल्याने ती न कुकुरता पहाटेपासून गुरे चरायला आणू लागली. हा हा म्हणता ही बातमी गावात पसरली. लोकांचा लोंढा त्यांच्या दर्शनासाठी आला. घोसरवाड येथे शिंदे-देसाई इनामदार नावाचे सरदार रहात असत. मूळ संस्थापकांपासून पाचव्या पिढीतील भिकाजी देसाई यांची पत्नी सौ. सावित्रीबाई ही अत्यंत सत्शील, सात्विक व देवावर अतिशय श्रद्धा असणारी बाई होती. त्यांना ही बातमी कळताच त्या स्वत: आपल्या सेवकांसह महाराजांच्या दर्शनास गेल्या महाराजांचे दर्शन झाल्याबरोबर त्यांना जाणवले

की, हा कोणीतरी एक सिद्ध पुरुष आहे. आपल्या भाग्यवशात आपल्याला त्यांचे दर्शन घडले आहे. त्यांनी महाराजांना आपल्या वाड्यावर येण्याची विनंती केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन श्री महाराज वाड्यावर येण्यास तयार झाले. वाड्यावर सदरेजवळ एक खोली होती. तिथे महाराजांच्या राहण्याची व्यवस्था केली. या साध्वी बाईंनी महाराजांची सेवा आरंभिली. या शिंदे देसाई इनामदारांचे कुलदैवत शंभू होते. या शंभूची एकनिष्ठेने व भक्तिभावाने त्या पूजा करीत असत. गृहस्थाश्रमातील सर्व सुखे त्यांच्या पायाशी लोळण घेत पण ''कल्पतरूला फूल नसे कां वसंत सरला तरी ?'' अशी त्या बाईंची स्थिती होती. त्यांना अपत्य नव्हते. एकाग्र मनाने एक दिवस पूजा करताना त्यांना वाटले की, आपल्याला एक छोटेसे बाळ असते तर किती बरे झाले असते. असे म्हणताच एक गोंडस मूल त्यांच्याकडे रांगत रांगत आले, ते पहाताच मातृभावाने उचंबळून जाऊन त्यांनी त्या मुलाला हृदयाशी धरले. आणि काय आश्चर्य, त्यांना पान्हा फुटला. त्यांनी मुलाला पाजविले. रेवणनाथ महाराजांच्या सामर्थ्याची आणि दैवी शक्तीची खात्री त्यांच्यापुरती त्यांना पटली. हा कार्यक्रम काही दिवस चालला असताना भिकाजीरावांच्या अवती-भवती असलेल्या मित्रमंडळींच्या मनामध्ये संशयाचे भूत प्रगट झाले. त्यांनी मंथरेसारखे भिकाजीरावांच्या कानामध्ये वीष भरले. ते म्हणाले, ''अरे हा सत्पुरुष वगैरे कोणी नाही, हा बंगाली जादुगार असावा. त्यांनी तुझ्या पत्नीस वशीकरण केले आहे. एक दिवस हा गोसावी तुझ्या पत्नीस पळवून नेईल. सावध रहा !'' भिकाजीरावांचे मन बिथरले आणि त्यांनी महाराजांना ठार मारण्याचे ठरविले. एके दिवशी सती सावित्रीबाईंचे जवळ महाराज बालरूपाने बसले असता शिपायांनी त्या खोलीला गराडा घातला. हेतू हा की, मुलाला पकडून ठार मारायचे. अशावेळी ते मूल एकदम बंद खोलीच्या बाहेर शिपायांना दिसू लागले. तिथे त्या मुलास शिपाई पकडायला गेले असताना एकदम उंच असलेल्या बुरुजावर दिसू लागले तेंव्हा सारे शिपाई त्याला पकडण्यासाठी त्याच्या मागे धावू लागले. त्यावेळी महाराजांनी आपले खरे स्वरूप प्रगट करून ते गावाचे बाहेर पडले. तेंव्हा भिकाजीरावांनी त्यांच्यामागे घोडेस्वार सोडले. महाराज पुढे पुढे जात होते व घोडेस्वार जीवाच्या आकांताने पाठलाग करत होते असे



करताना काही घोडेस्वारांचे डोळे गेले, काही घोडी वाटेत मेली व उरलेल्यांना मात्र चिकोडी तालुक्यातील आप्पाचीवाडी नामक गावाजवळ असलेल्या फडांच्या वनात ते गुप्त झाल्याचे दिसले.

ही हकिकत सावित्रीबाईंना कळताच त्यांना अतिशय दुःख झाले. श्री महाराजांचे परत दर्शन झाल्याशिवाय तोंडात पाणीही घ्यायचे नाही असा त्यांनी निश्चय केला आणि उपोषणाला प्रारंभ केला. सात दिवस झाल्यानंतर श्री महाराजांनी सावित्रीबाईंचा कळवळा आणि तळमळ बघून ते तिच्यासमोर प्रगट झाले. भिकाजीरावांनाही पश्चाताप झाला. यावेळी महाराजांनी आत वाड्यात येण्यास नकार दिला व तिथे असलेल्या एका लिंबाच्या झाडाखाली ते बसले, तिथे सध्या ते मंदिर आहे. पुढे तिथे गुप्त होऊन आप्पाच्या वाडीस आले.

इकडे श्री. गोविंदपंतदादा यांची ईश्वरभक्ती वृद्धींगत होत होती. ग्रामदैवत असलेल्या श्री हालसिद्धनाथांचा लळा त्यांना लागला होता ते दररोज मंदिरात जावून त्यांचे दर्शन घेत असत. हालसिद्धनाथांचे पुजारी हे धनगर समाजातले होते. त्यामुळे त्या देवाला 'धनगरांचा देव' असे अगदी अज्ञानपणाने संबोधले जात होते. श्री गोविंदपंतांचे वडील हे दत्तभक्त होते. त्यामुळे त्यांना गोविंदपंतदादांची धनगराच्या देवाची उपासना तितकीशी रूचणारी नव्हती. श्री. दादांना वयाच्या आठव्या वर्षापासून श्री हालसिद्धनाथांचा संचार होऊ लागला. संचार अवस्थेत ते हालसिद्धनाथांचे मंदिरात जावून 'तलवारीचा' व 'गुंडांचा' खेळ खेळू लागले. ते त्यांच्या घरातील लोकांना कमीपणाचे वाटू लागले आणि ते दादांना मंदिरात जाण्यापासून परावृत्त करू लागले. एकदा तर त्यांना कोंडून घातले असता त्यांनी दाराला टक्कर दिली. त्यावेळी दाराची कडी निघाली आणि ते पळत पळत मंदिरात गेले. अशाप्रकारचे अनेक चमत्कार पाहून त्यांच्या लोकांची देवावर श्रद्धा बसली. एकदा तर दादांच्या विवाहाच्यापूर्वी दोन दिवस त्यांना धनुर्वात झाला. सर्वजण भयभीत झाले. अशावेळी दादांना संचार झाला आणि स्वतःला बुक्या मारून धनुर्वात घालविला. आणखी एक गोष्ट सांगण्यासारखी म्हणजे एकदा दादांना संचार झाला आणि त्यांनी आपल्या वडीलांना बोलावून घेतले आणि म्हणाले, 'अरे तीन मुलांच्या बापारे, हे बघ, थोरल्या मुलाच्या पाळण्याची दोरी बळकट

आहे. धाकट्या मुलाच्या पाळण्याची बळकट आहे. पण मधल्या मुलाच्या पाळण्याची दोरी तुटली बघ.’ दादांना दोन भाऊ. ते स्वत: सर्वात मोठे आणि सर्वात धाकटे बंधू श्रीपादपंत. हे वर सांगितले आहेच मधले बाळाजीपंत यांचा वंश नाही. दादांच्या चुलत घराण्यात अशीच स्थिती आहे. दादांनाही तीन मुलगे. शंकरराव तेही भावंडात मधलेच. म्हणून दादांनी त्यांना दत्तक घातले. त्यांची आत्या म्हणजे दादांच्या सख्या बहिणीलाच दत्तक घातले. त्यांचे नांव गंगूबाई. गंगूबाईंना इचलकरंजी संस्थानातील शिपूर या गावच्या कुलकर्ण्यांना दिले होते. त्यांचे लग्न त्यांच्या वयाच्या नवव्या वर्षी झाले होते आणि सहा महिन्यातच त्यांचे पती निवर्तले. त्यामुळे तिकडच्या घराण्याची फारशी माहिती नव्हती. भाऊबंधांनी पन्नास एकर जमीन आपल्या ताब्यात ठेवली होती. परगोत्रात दत्तक घेतला असल्याने तो दत्तक अवैध आहे व म्हणून तो उत्पन्नाला पात्र नाही, असा भाऊबंदांचा दावा होता. म्हणून त्यासंबंधी कोर्टात केसेस चालल्या होत्या. त्यांचे नातेवाईकच संस्थानातील कारभारी असल्यामुळे सरकारी दरबारी त्यांचे फार वजन होते.

## मामांचे बालपण

मुलांच्या शिक्षणासाठी म्हणून गोविंदपंत घोसरवाडकर सांगलीला रहायला आले. सांगलीला ते पांजरपोळात रहात होते. सांगली येथील श्री. गोपाळराव उकीडवे गोविंदपंतदादांच्या माहितीचे होते. त्यांनी श्री. गोविंदपंतदादांना पांजरपोळात नोकरी दिली. बहुतेक १९१८ सालातील ही घटना असावी, श्री. मामा त्यावेळी ९ वर्षाचे होते. त्यांना लहानपणापासून देवाचा छंद होता. त्यांचे लहानपणाचे खेळही देवाच्या संदर्भातीलच असायचे म्हणजे पालखी काढणे. तलवारीसारखा खेळ खेळणे. त्यासाठी ते एक टाक (लिहीण्याचा) तलवार म्हणून ठेवत आणि गुंड म्हणून लोखंडाच्या साखळीचा वापर करत. ते सांगत असत की, ‘टाकांनी तलवारीसारखे खेळत असताना पोटावर ओरखडा उठला होता. पूर्वी पंगतीला अंगातील कपडे काढून बसण्याची प्रथा असल्याने ते गोविंदपंतदादांच्या पंगतीला आठ दिवस ते बसलेच नाहीत. कारण तो ओरखडा दादांच्या लक्षात आला असता. श्री. मामा एका बाणाची हालसिद्धनाथ म्हणून पूजा करत असत. अतिशय श्रद्धेने ती त्यांची



पूजा चालत असे. एकदा दुर्दैवाने तो बाण हरवला. त्यावर ते आपल्या वडीलांना मूर्ती घेऊन देण्यासाठी हट्ट करू लागले. गोविंदपंतदादांचे म्हणणे असे की, मूर्तीची स्थापना घरी करू नये. कारण त्याची पूजा अर्चा नित्य नेमाने व सातत्याने पिढ्यान्‌पिढ्या व्हायला हवी. पण श्री मामांनी इतका हट्ट धरला की, पायाचे अंगठे धरून ते तीन दिवस स्फुंदून स्फुंदून रडत होते. शेवटी दादांनी मूर्ती आणणेस आठ आणेची आधेली दिली. ती आधेली घेऊन ते सराफ कट्ट्यावर गेले. तिथे त्यांचा मित्र मुर्त्या विकत होता. त्यातील एक मूर्ती मामांनी निवडली. खरं म्हणजे त्या मुर्तीची किंमत बाराआणे होती. परंतु तो मामांचा मित्र असल्याने ती मूर्ती त्याने आठ आणेस दिली. त्या मूर्तीची स्थापना करून श्री नाथांची सेवा ते करू लागले. ती मूर्ती अद्यापही मामांच्या घराण्यात नित्य पूजनात आहे. पुढे एके दिवशी सांगलीच्या पटवर्धनांच्या गणपतीजवळ असलेल्या केंगणेश्वराच्या पटांगणात खेळत असताना तो बाण ही सापडला अद्यापही तो बाण घराण्यात पूजनात आहे.

एकत्र कुटूंब आणि मिळवते व्यक्ती दोन असलेने ओढगस्तीची परिस्थिती निर्माण झाली. केवळ तीन रूपये फी भरता न आल्याने श्री. मामांना दुसरीतच शाळा सोडावी लागली. पण योगायोग असा की, त्या पांजरपोळात मामांची मुंज वैदिक ब्राह्मणांच्या मंत्रघोषात साजरी झाली ते संस्कार त्यांच्या मनावर खोलवर गेले होते. मामांचे काका श्रीपादपंत ते नणदिकर सरकारांचेकडे नोकरीला होते. ते साल १९२९ असावे. मामा काही दिवस एका प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून काम करत असत. तेथून ते परत घोसरवाडला आले आणि १९३२ साली त्यांना आपल्या आत्या गंगुबाई यांना दत्तक घातले. पण गंमत अशी की, दत्तक गेल्यामुळे जनक घराण्यातील स्थावर जंगमाचा हक्क गेला आणि दत्तकाकडील स्थावर जंगम ताब्यात नव्हती त्यामुळे ‘न घरका न घाटका’ अशी त्यांची परिस्थिती झाली. मामांच्या दत्तक मातु:श्री गंगूबाई या माहेरी म्हणजे घोसरवाडकरांचेकडेच होत्या. मामांच्या जनक मातु:श्री १९१४ सालीच वारल्या होत्या. त्यामुळे गोविंदपंतदादांच्या सर्व मुलांचे संगोपन मातृवत गंगूबाईंनी केले. पुढे मामांचा विवाह १९३३ साली करणेचे ठरले. एके दिवशी ते रेल्वेने किर्लोस्करवाडीला चालले होते. ते ज्या बाकावर बसले होते त्यांच्या

समोरच्या बाकावर एक नाकी डोळी निटस, देखणे पाणीदार डोळे असलेले, डोक्यावर उंच टोपी घालणारे एक गृहस्थ बसले होते. ते एकसारखे मामांचेकडे पहात होते. त्यांना बोलावून घेऊन त्या गृहस्थांनी मामांचा हात बघितला आणि पहिला प्रश्न विचारला की, 'बाळ तू दत्तक आहेस कारे ? ते स्तिमित होऊन ''होय'' म्हणाले. दत्तकाच्या स्थावर जंगम प्रॉपर्टीबद्दल कज्जा चालला आहे काय ? मामांनी 'होय' म्हणून सांगितले. 'बाळ, तू आता मुलगी बघायला चाललास काय रे ? मानेने 'हो' म्हणत मामा अवाक् झाले. ते गृहस्थ पुढे म्हणाले, 'अरे हीच मुलगी ठरणार' आणि पुढे तसेच घडले. हे सांगणारे गृहस्थ कोण होते ? चौकशी अंती कळले की मास्टर दिनानाथ मंगेशकर होते. मास्टर दिनानाथ मंगेशकर एक निष्णात ज्योतिषी होते. मामांना ज्योतिष शास्त्राची स्फूर्तीही त्यांच्यापासूनच मिळाली. ज्याअर्थी माझ्या चेहऱ्यावरून व हातावरून एवढे अचूक भविष्य मा. दीनानाथांनी सांगितले त्याअर्थी हे काहीतरी शास्त्र आहे याची त्यांना खात्री पटली आणि त्यांनी याचा अभ्यास सुरु केला. पुढे श्री. मामाही एक निष्णांत ज्योतिषी झाले.

## प्रपंचाची सुरुवात

श्री. मामांचे लग्न थायामाटात झाले आणि पुढे संसार सुरु झाला. शिपूर हे गांव इचलकरंजी संस्थानातील असल्यामुळे घोसरवाड ते इचलकरंजी अशा मामांच्या येरझाऱ्या सुरु झाल्या प्रतिस्पर्धी हा धनदांडगा व इचलकरंजी संस्थानातील कारभाऱ्यांचा नातू असलेने त्यांच्याशी झुंज खेळणे अवघड होते. याविरूद्ध मामांचेकडे ना पैसा, ना सत्ता त्यामुळे वकीलपत्र स्वेच्छेने घ्यायला कोणीही तयार नव्हते. ''बाळा, मगरेच्या दाढेतील मणी काढण्याइतके तुझे काम अवघड आहे.'' असे लोक म्हणत. पण मामांची जमेची बाजू एकच आणि ती म्हणजे श्री. नाथांचेवरील अढळ श्रद्धा व त्यांच्या वडीलांचे (दादांचे) पूर्ण आशिर्वाद. मामांना ज्योतिष शास्त्राचा नाद लागल्याने लोकांचा हात बघून, चेहरा बघून कुंडली पाहून त्यांचे भविष्य ते सांगत असत. नाथांची कृपा म्हणा, दादांचा आशिर्वाद म्हणा त्यांचे भविष्य तंतोतंत बरोबर यायचे. एक हकिकत इथे सांगण्यासारखी आहे. त्यांचे एक मित्र बुवा नावाचे. ते इचलकरंजीला कोर्टात होते. तेव्हा मामा त्यांचेकडे घरी अधूनमधून जात असत. इचलकरंजीचे



सावकार श्री आप्पासाहेब पळसुले म्हणून एक प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांच्या वाड्यात बुवा रहात असत. तेव्हा त्यांच्या वाड्यात गेले आणि बुवा आहे का? म्हणून विचारले की हे आप्पासाहेब अंगावर खेकसून म्हणायचे, ''बुवा बिवा इथे कोणी नाही.'' असे म्हणून अंगावर कुत्रे सोडीत असत. म्हणून श्री मामांनी बुवा वाटेत भेटले असता त्यांना सांगितले, 'अरे बुवा, तुझा घरमालक किती विचित्र आहे ते बुवाबिवा कोणी नाही असे म्हणून अंगावर कुत्रे सोडतो.' बुवा त्यावर उत्तरले, ''होय हो फार चमत्कारिक माणूस आहे तो, पण शंकररा[व] त्याला जोतिषाचा नाद आहे आणि मी त्यांची तुम्हाला ओळख करून देतो.' आणि दुसरेच दिवशी त्यांनी ती ओळख करून दिली. पळसुलेंनी आपल्या मित्रमंडळात ही हकिकत सांगितली. रविवारचा दिवस निश्चित केला आणि सर्वांनी मिळून जोतिषाची म्हणजे मामांची फजिती करायची ठरविले. रविवारी मामा त्यांचेकडे गेले त्या मंडळात वकील आडनांवाचा एक फौजदार होता. पण त्या दिवशी काहीतरी काम लागले म्हणून तो आला नाही. तेव्हा गैरहजर असलेल्या या वकिलांची कुंडली मामांना दाखवावी असा विचार करून त्यांनी त्यांची कुंडली मामांचे पुढे ठेवली. मामांनी पहिल्यांदाच सांगितले की, ''मी जे प्रश्न विचारतो त्याची खरीखुरी उत्तरे तुम्ही दिली पाहिजेत.'' तुम्ही मुद्दाम म्हणून मिसगाईड करण्याचा प्रयत्न केलात तर माझे भविष्य बरोबर येणार नाही. त्यांनी ती अट मान्य केली. मामांनी वकिलांची कुंडली पाहून पहिला प्रश्न विचारला तो हा, 'हे पोलीस खात्यात आहेत का ?'' सर्वजण होय म्हणाले. ''हे फौजदार असून त्यांना सध्या प्रमोशन मिळण्याची शक्यता आहे. कारण इचलकरंजीकर संस्थानिक श्री. घोरपडे सरकार यांच्या मर्जितील ते आहेत.'' मामांनी विचारले. यांना मुले किती ? उत्तर आले की, एक आठ वर्षाचा मुलगा आहे. मामांनी ताडदिशी सांगितले की, ''प्रमोशनचे तर सोडाच पण येणाऱ्या एक तारखेला या फौजदाराची नोकरी जाणार आहे व पुढे आठ दिवसात त्यांचा मुलगा मरणार आहे.'' सर्वजण अवाक् झाले. कोणी पुढे कुंडली दाखविण्यास धजेना ही हकिकत बुवांना पण कळली आणि दुसरे दिवशी वकिल फौजदार आप्पासाहेबांचे घरी आले असताना त्यांना सांगितलेल्या भविष्यातील एकच गोष्ट सांगितली, ''एक तारखेस तुझी नोकरी

जाणार आहे.'' म्हणून धक्का बसलेला तो फौजदार मिशीला पीळ देत म्हणाला ''कसला ज्योतिषी आहे ते बघतो. मला तर सरकारनी सांगितले आहे की, एक तारखेला तुला प्रमोशन देतो म्हणून एक तारीख काय लांब नाही.''

काय गंमत झाली होती की, कोल्हापूर संस्थान व इचलकरंजी संस्थान यांच्यात भांडणे लागली होती. कोल्हापूर संस्थान म्हणत असे की, इचलकरंजी संस्थानिक हे आमचे मांडलीक आहेत. ते स्वतंत्र नाहीत आणि इचलकरंजीकर आपण स्वतंत्र असल्याचा दावा करीत. त्या संबंधीचे काम दिल्ली कोर्टात चालू होते आणि कोल्हापूरच्या संस्थानिकांनी आबासाहेब खेबुडकर नावाच्या कारभाऱ्याला निलंबीत केले होते.

इकडे जशी एक तारीख जवळ येऊ लागली. तशी बुवा नावाच्या मामांच्या मित्राला हुडहुडी भरू लागली. ते मामांना म्हणत असत, ''शंकरराव आज तारीख २६, अजून तो वकिल फौजदार नोकरीवर आहे. बघा, नाहीतर तो तुमचा व माझा फज्जा उडवेल. मामा त्याला आश्वासनपूर्वक सांगत की अजुनी चार दिवस बाकी आहेत. तू काळजी करू नकोस माझे भविष्य खरे होणारच.''

२९ तारखेला दिल्ली हायकोर्टाचा निकाल लागला आणि इचलकरंजी संस्थान हे स्वतंत्र संस्थान आहे. असा निकाल लागला. श्री. घोरपडे सरकारांना अतिशय आनंद झाला. त्याप्रित्यर्थ त्यांनी आबासाहेब खेबुडकरांना परत कारभारी म्हणून नेमले आणि आपले सर्व अधिकार त्यांना देऊन टाकले. या आबासाहेब खेबुडकरांचे व त्या वकिल फौजदाराचे वाकडे होते. त्यांनी ३० तारखेला ऑर्डर काढली की, ''आपल्या सेवेची आम्हाला गरज नाही. एक तारखेपासून तुम्हाला कमी करण्यात आले आहे.'' ही ऑर्डर मिळताच वकील फौजदाराचे डोळ्यासमोर दिवसाढवळ्या काजवे चमकले आणि तो तोंड सुकलेल्या व कंठ शोषलेल्या अवस्थेत सरकारांचेकडे गेला व म्हणाला, ''मला तुम्ही प्रमोशन देतो म्हणून सांगितले होते आणि आता तर मला नोकरीतून कमी केले आहे.'' सरकार निक्षून म्हणाले, ''हे बघ, माझे सर्व अधिकार खेबुडकरांना दिले आहेत. मी आता काही करू शकत नाही. तू त्यांना भेट.'' आप्पासाहेब पळसुल्यांचे मंडळ खऱ्या झालेल्या वकीलाच्या



नोकरीच्या भविष्यामुळे हबकून गेले आणि दुसऱ्या भविष्याची चिंतातूर मना वाट पाहत होते. हे भविष्य मात्र त्यांनी वकिलांना सांगितले नव्हते. पुढे चार सहा दिवसात त्यांच्या मुलाला घोड्या गोवर उठला आणि तो पोटात पडल आणि त्यातच त्याचे देहावसान झाले.

ही हकिकत मामांच्या वडीलांना समजली. त्यावेळी मात्र त्यांन मामांची कानउघडणी केली. ''अरे शंकर, हे तुझे भविष्य वगैरे काही नाह तुझे मुखातून श्री नाथमहाराजच बोलतात. तेव्हा यापुढे वाईट भविष्य तडकाफडकी सांगत जाऊ नकोस. तेव्हापासून मामांनी कानाला खडा लावला व वाईट भविष्य तडकाफडकी न सांगता सौम्य करून सूचकतेने सांगत असत.

आप्पासाहेब पळसुले हे तर मामांचे भक्तच झाले. मामा कुरूंदवाडला असताना ते वरचेवर कुरूंदवाडला येत असत त्यांचे घरात एक मोर पाळला होता. त्याचे लोकांना फार आकर्षण होते. पळसुलेंची पहिली पत्नी निवर्तली होती आणि आप्पासाहेबांची बहीण लग्नाची होती. तिच्या तोंडावर देवीचे वण उठलेने व वय फार झालेने तिचे लग्न ठरणे अवघड झाले होते. तिचे लग्न झाल्याशिवाय आपण लग्न करायचे नाही. असा त्यांनी पण केला होता. मामांना ज्या ज्या वेळी पळसुले आपल्या बहीणीची कुंडली दाखवत असत त्या त्या वेळी हिचे लग्न होणार आणि ही फॉरेनला जाणार असे भविष्य सांगत. आप्पासाहेबांना या गोष्टीचा अचंबा वाटे आणि ''तुम्ही चेष्टातर करत नाही ना?'' असा अविर्भाव त्यांच्या चेहऱ्यावर दिसत असे. मामा मात्र सांगितलेल्या भविष्यावर अविचलीत असत.

कुरूंदवाडला तेरवाडकर नावाचे एक सावकार होते. त्यांची एक मुलगी अफ्रिकेत होती. तिला एक मुलगा होता. ती आणि तिचा मुलगा माहेरी कुरूंदवाडला आले असता तो मुलगा आजारी पडला. त्याला ताप आला. तपासणी अंती तो विषमज्वर ठरला. त्यावेळी कुरूंदवाडला सरकारी दवाखान्यात टी.बी. वाटवे नावाचे प्रसिद्ध डॉक्टर होते. सध्याचे सांगलीच्या डॉ. एस.टी.वाटवेंचे वडील. विषमज्वरांवरील औषधांची योजना ही डॉ. टी.बी. वाटवेंची खासियत होती आणि असे पुष्कळ रोगी त्यांनी बरे केले होते. त्यावेळी क्लोरोमायसेटीन सारखी औषधे नव्हती. डॉ. टी.बी. वाटवेंनी तेरवाडकरांच्या

नातवासाठी आपले हे कौशल्य पणाला लावले, तरी ताप हटेना. १०१ दिवस ताप येत होता. सर्वजण हतबल झाले होते. डॉ. टी. बी. वाटवेंनी तेरवाडकरांना सांगितले की, ''तुम्ही या मुलाची कुंडली शंकरराव घोसारडकरांना (शिपूरकर मामांना) दाखवा. त्याप्रमाणे पत्रिका दाखविली. पुढे काही दिवसात सूर्यग्रहण होते. या निमित्ताने मामांनी त्यांना काही उपाय करावयास सांगितले. आठ दिवसात ताप नॉर्मलला येईल आणि पुढे आठ दिवसांनी परत एक दिवस ताप येईल. परत तो उपाय करा म्हणजे मुलगा कायमचा बरा होईल. त्याप्रमाणे सर्व घडले ही हकिकत अफ्रिकेहून आलेल्या मुलाच्या वडीलांना त्यांच्याबरोबर आलेल्या इतर मित्रांना कळली. त्यांचेबरोबर जमेनिस नावाचे गृहस्थ अफ्रिकेहून आले होते. त्यांचा जमिनीसंदर्भात एक मोठा कज्जा चालला होता. पंडीत नावाचे सातान्याचे वकील या कामी दिले होते. त्या कज्जाचे काय होईल म्हणून ते मामांना विचारत होते. मामांना त्यांना ती केस जमेनिसांचे बाजूने होऊन दरम्यानचे उत्पन्नही मिळेल असे सांगितले. मामांनी त्यांना परत एका न विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर सांगितले होते. आणि ते म्हणजे, 'तुमचे लग्न होणार' त्यावेळी ते म्हणाले की, ''मामा तुमचे दुसरे भविष्य खोटे ठरणार. कारण अफ्रिकेत माझा प्रेमभंग झालाय आणि मी लग्न करायचे नाही अशी शपथ घेतली आहे, ''पाहू काय होते ते'' एवढेच मामा त्यांना म्हणाले.

पुढे जमेनिसचे कज्जाचे काम मामांनी सांगितल्याप्रमाणे त्यांच्या सारखे झाले. ऐंशी हजार रूपयांचे दरम्यानचे उत्पन्न मिळाले. त्यांना अतिशय आनंद झाला. भारतामध्ये त्यांची ऐंशी वर्षाची वृद्ध आई होती ते मोठे मातृभक्त होते. हे परत आफ्रिकेला जायला निघाले. त्यावेळी त्यांची आई ओक्साबोक्सी रडू लागली. तेव्हा कळवळ्याने व काकुळतेने ते आईला म्हणून लागले, ''आई तुला काय दु:ख आहे, तुझी तब्बेत बरी नाही का ? तुला पैशाची गरज आहे का ?'' त्यावेळी डोळे पुसत पुसत त्याची आई रडवेल्या पण कणखर आवाजात म्हणाली की, 'मला आधी वचन दे, मग मी सांगते.'' भावनातिरेकाने भरलेल्या आणि भारलेल्या सुरात तो म्हणाला, ''तुला दिले हे वचन , काय करू सांग?'' त्यावर आई संधीचा फायदा घेत म्हणाली, ''मला सूनमुख पहायचे आहे लग्न कर.'' त्यावर तो चांगलाच हबकला. त्याचे वय त्यावेळी ४२ होते. तो



मामांचेकडे आला व झालेली सर्व हकिकत त्यांनी सांगितली. त्यावर मामा म्हणाले, ''आता वचन पाळले पाहिजे.'' माझेकडे तुम्हाला अनुरूप अशी मुलगी आहे. परस्परांची पसंती ही वैयक्तिक बाब आहे. पहा पसंत पडती काय ?''. पळसुलेंची बहिण या जमेनिसना दाखविली आणि पसंत होऊन लग्न ठरले. ते लग्न वाडीला इचलकरंजीकरांच्या उपासना धाममध्ये झाले. अशा तऱ्हेने ती मुलगी फॉरेनला गेली व मामांचे भविष्य तंतोतंत बरोबर ठरले.

एकत्र कुटुंब असल्याने आर्थिकदृष्ट्या थोडी हलाखीची परिस्थिती होती. घोसरवाड ते इचलकरंजी हे अंतर केवळ नऊ मैल आहे. मामा घोसरवाडहून चालत येत असत. खानावळीत दोन आण्याला राईस प्लेट मिळायची. पण तेवढेही पैसे जवळ नसत पण मामांच्या ज्योतिषाचा आणि भविष्यवाणीचा प्रभाव एवढा की, ''माझ्याकडे आज जेवायला या'' असे सांगणाऱ्या माणसांची रांग लागायची. या भविष्यवाणीला आणखी एका प्रसंगाने चांगलीच धार आली. ते मी यथाकाल सांगणारच आहे.

मामा इकडे शिपूरला अधूनमधून येऊन जात असत. गहाण घातलेल्या एका जमिनीच्या तुकड्यातून थोडेफार उत्पन्न, मिळते काय हे पहाण्यासाठी ते शिपूरला येत असत. शिपूरला यायला त्यावेळी बरेच चालावे लागत असे. मामांचे प्रतिस्पर्धि म्हणजे बडे प्रस्थ होते. मोठे उत्पन्नदार होते. अनेक गावांना त्यांच्या जमिनी होत्या. त्यावेळी ते सातशे रूपये शेतसारा भरत असत. त्यांच्या घरावरून जाताना भीतियुक्त आदरापोटी पायातले चप्पल हातात घेवून सगळे जात असत.त्यावेळी मामांना गावात रहायला जागा मिळत नसे. पण एका यरनाळ गावाच्या बाजूला मैलभर खाली उतरून गेल्यावर एक अतिशय सुंदर आणि प्रसन्न असे महादेवाचे मंदिर आहे. त्याला रामलिंग' असे म्हणतात. ते त्या गावाचे जणूकाय दैवतच आहे. तिथे पाण्याचे जिवंत कुंड आहे. आजही लोक त्या कुंडातील पाणी घेऊन देवदर्शनला जातात. श्री प्रभू रामचंद्र लंकेकडे जात असताना एक दिवस तिथे थांबले होते आणि दररोज पार्थिव लिंगाची पूजा करण्याचा त्यांचा नेम होता. म्हणून ते जे लिंग आहे ते प्रत्यक्ष रामाच्या हातचे आहे म्हणून त्याला फार महत्त्व आहे. त्याठिकाणी सतत धुनि पेटलेली असे. म्हणून तिथे श्री नाथांचे वास्तव्य असावे असा तर्क करणेस वाव आहे.

मामांना त्या ठिकाणी वरदहस्त केलेली देवी दिसली. तिची पृच्छा करताच तिने सांगितले, ''अरे मी अन्नपूर्णा आहे. माझा आशिर्वाद आहे.'' म्हणून मामांच्या आयुष्यात धान्याची कधी कमतरता नव्हती. मामा शिपूरला आले म्हणजे तिथे मुक्कामाला रहात असत. पण अवती भवती सर्व जंगल असल्यामुळे 'वाघरू'ची भीती होती. तिथला एक पहारेकरी अर्धवट होता. त्याने एक गाय पाळली होती. तो पहारेकर, अधूनमधून रात्री-बेरात्री मामांना एकटे सोडून निघून जायचा. बाहेर एक उघडी पडवी होती व आतल्या बाजूस एक लहानशी खोली होती. पडवीच्या व खोलीच्यामध्ये काट्या बांधलेले एक दार होते. एकदा गंमत झाली की, मामा एकटेच त्या पडवीत झोपले असताना तिथे असलेल्या गायीच्या वासाने एक वाघरू डरकाळ्या फोडत येऊ लागले. गायीची घालमेल झाली. ती थरथर कापू लागली व बांधलेल्या ठिकाणी नाचू लागली. ते वाघरू आपल्यावरही हल्ला करणार असे मामांना वाटले. उठून खोलीत जावे तर वाघरू आपल्यावर झडप घालेल ही भीति होती. तेव्हा काय करावे हे समजेना. त्यांनी श्री नाथांचे स्मरण केले आणि त्यांना एकदम सुचले ते लोळत लोळत त्या खोलीच्या दाराकडे गेले आत जाऊन त्यांनी दार दडपून टाकले श्वास रोखूनच ते सकाळची वाट पहात होते. अशावेळी एक-एक क्षण हा एकेक दिवसासारखा वाटत होता. याचा अनुभव मामा घेत होते.

सकाळी तो पहारेकरी आला. पहातो तर मामा पडवीत नव्हते. आत जाऊन खोलीत पहातो तर तिथे मामा जीव मुठीत घेऊन बसले होते. त्याला ती सर्व हकीकत सांगितली पण ईश्वर कृपेने गायीला व मामांना काहीही झाले नव्हते. ही केवळ रामलिंगाची कृपा.

मामांचे आयुष्य असे खडतरपणे चालले होते. कळसाचा अध्याय अजून पुढेच होता. जणू काय दैव आणि मामांचे जीवन यांची झुंजच चालली होती. नाही म्हणायला त्यांचा देव मात्र त्यांच्या पाठीशी होता.

मामांच्या वडीलांनी आता कुरूंदवाडला बिऱ्हाड हलविले होते. प्रथम ते गाडगीळांच्या वाड्यात होते. पुढे लट्ठेच्या वाड्यात मामा रहायला गेले. पंधरा ते बीस माणसांचे एकत्र कुटुंब असल्याने आणि मिळविता एखाद् दुसराच असल्याने ओढगस्तीची परिस्थिती निर्माण झाली होती. मामांचे थोरले बंधू



व्यंकटेश ऊर्फ बाबुराव हेच काय ते मिळविते होते. ते देवी डॉक्टर होते. पगार ५-७ रू. असावा. ही गोष्ट साधारणपणे १९४१-४२ सालची असावी. मामांचे वडील दादा यांच्या मधुमेहाने उचल खाल्ली होती. घरामध्ये आजारपणाला ऊत आला होता. एका वर्षामध्ये त्यांच्या घरातील लहान मोठे मिळून तेरा माणसे निधन पावली. १९४२ साली मामांचे वडील दादा हे नेहमीप्रमाणे आप्पाचेवाडीला यात्रेला गेले होते. यात्रा संपल्यावर देवाची पालखी वाड्यात जायला व कुर्लीची पालखी कुर्ली गावाला जायला निघते तो सोहळा अवर्णनीय असतो ते सांगून वा ऐकून कळणार नाही. अनुभवाचा कोट्यांश देखिल वर्णन करता येणार नाही. ज्याचा त्यानेच तो अनुभव घ्यायला हवा.

लक्ष्मण खोतांच्या घराजवळ पालखी येताना तिथे मामांच्या वडीलांचा 'खेळ' होत असे. असा १९४२ साली खेळ झाल्यावर त्या संचार अवस्थेतच दादा समोरच्या पडवीत बसत असत, तिथं टेकून बसत असलेल्या तक्यावर त्यांनी भंडारा फेकला. हे दु:चिन्ह आण्णांच्या व मामांच्या लक्षात आले. ते रडू लागले. संचारावस्थेतच दादांनी लक्ष्मण खोतांना बोलाविले आणि त्यांचा हात आपल्या हातात घेऊन सांगितले की, हे 'झाड' पुढच्यावर्षी यात्रेला येणार नाही. हे शेवटचे वर्ष आहे. माझ्या या मुलाला घेऊन ही परंपरा पुढे न्यायची आहे असे करतो म्हणा म्हणजे मी भंडारा देतो. त्यावेळी लक्ष्मण खोत म्हणाले की, ''आम्ही चौघे भाऊ आहोत. माझ्या हिश्याप्रमाणे मी करीन.'' त्यावेळी स्वारीचा संचार जोरात होऊन त्यांनी लक्ष्मण खोतांना निक्षून सांगितले, ''नाही'', त्यांच्या हातून होणार नाही. तूच पुढे होऊन ते करायला हवेस.'' लक्ष्मण खोतांनी ते कबूल केले आणि संचार शांत झाला.

दादा यात्रेहून परतले तरी त्यांचे एकच पालूपद सुरु झाले की, माझे आता दहा महिने राहिले. माझा हा शेवटचा कोट, या शेवटच्या वहाणा, शेवटचे धोतर, त्यांची बहिण व इतर माणसे त्यांना हटकत की, 'उगीच काहीतरी बोलू नकोस' असे म्हणत. आणि त्यांनी सांगितलेला ५ जून १९४३ हा दिवस उजाडला. त्यांनी दुपारी ३ वेळ दिली होती. आदले दिवशी त्यांना काहीतरी त्रास झाला होता. त्यांची बहिण गंगूबाई यांना जागरण झाले होते. त्यांचे चुलत बंधू शामूकाकां त्यांना बघायला म्हणून एक दिडचे सुमारास आले

होते. शामूकाकांना ते म्हणाले, ''तू लवकर जेऊन घे. मी कोणाच्या जेवणाच्या आड येणार नाही. मी निघालो आहे.'' शामूकाकांनी प्रश्नार्थक नजरेने विचारले, 'कुठे?' त्यावर दादांनी स्पष्ट सांगितले, ''शेवटच्या यात्रेला'' यावर शामूकाका ''काय तरी बोलतोस'' एवढे म्हणून आत जेवायला गेले. जेवण करून दादांचेजवळ बसायला आले. दादांचे सर्वात धाकटे चिरंजीव आप्पा त्यांच्या पाठीशी बसून दोन्ही आंगठ्यांनी पाठ रगडत होते. मागे तक्क्या ठेवला होता. पावणेतीनचा सुमार झाला होता. दादांना त्यादिवशी शौचास झाले नव्हते. म्हणून बाबुरावांनी (आण्णांनी) विचारले की, डॉक्टरांचेकडे जाऊन औषध घेऊन येऊ का ? त्यावर तेथे असलेल्या मामांनी त्यांच्या कानात कुजबूज केली. ''अरे त्यांनी तीनची वेळ दिली आहे, जरा थांब !'' हे ऐकल्यावर बाबूराव, ''हॅं, हे काय बोलतोस'' असा अविर्भाव त्यांनी केला. मामा ज्योतिषी असलेने हाताशी असलेने पंचांग चाळू लागले. दादांचे त्याकडे लक्ष गेले. आणि दादा हसत म्हणाले, ''अरे शंकर मी काय पंचकात मरत नाही, तू पंचांग बघू नकोस.'' एवढे झाल्यावर दादांनी मामांना समोर बसविले आणि अतिशय अंत:करणपूर्वक त्यांना म्हणाले, ''अरे शंकर तुझे जमीनीचे काम तुझ्या सारखेच होतेय, काळजी करू नकोस, पण लक्षात ठेव हे काम झाल्याबरोबर तू दर अमावस्येला आप्पाच्यावाडीला जात जा. माझा तुला आशिर्वाद आहे.'' असे म्हणून मामांच्या डोक्यावर त्यांनी हात ठेवला. मामांच्या अंगातून वीज सळसळत गेल्यासारखे वाटले. आणि नेत्रातून अश्रूपूर वाहू लागला. हाच मामांना मिळालेला वडीलांचा अनुग्रह होता. असे मामा म्हणत असत.

दादांची बहिण गंगूबाई त्यांच्याजवळ रात्री जागरण झालेने पेंगत बसली होती. ते बघून दादा तिला म्हणाले, ''माझ्याजवळ इथे जरा लवंड.'' गंगूबाई, हाताची उशी करून व देहाचा मुगटा करून तिथे लवंडल्या. हातावर डोके टेकतात न टेकतात घड्याळात तीनचा पहिला ठोका पडला. दादांना पहिला गचका आला. दोन सेकंद त्यांनी डोळे झाकले. इतक्यात दुसऱ्या ठोक्याला दुसरा मोठा गचका आला. मान मागे झुकली आणि तिसऱ्या ठोक्याला त्यांच्यातोंडूत ''हालसिद्धनाथ'' असे उद्गार निघत असताना त्यांचे 'प्राणोत्क्रमण' झाले. एक वर्षभर ते सांगत होते त्याची प्रचिती आली. 'शूर



ओळखावा रणी आणि साधू ओळखावा मरणी ?' माणूस कसा जगतो यापेक्ष तो कसा कालवश होतो यावर त्याचे मूल्यमापन होते. नाथ परंपरेतल्या माळेती एक मणी त्यादिवशी ओघळला. अनेकांना आयुष्यभर मार्गदर्शन करून त्यां जन्मसार्थकेच्या वाटा दाखविणारा एक दीपस्तंभ त्यादिवशी मावळला. आधी विशाल असलेल्या भाळावर भंडाऱ्याचे लेपन झाल्याने ते अधिक विशा आणि तेज:पूंज वाटत होते. शवाची काहीच कळा किंवा अवकळा नव्हती नाथांच्या दरबारातील एक सरदार चार लोकांच्या खांद्यावरून परत आपल्य मूळ ठिकाणी दिमाखाने जात होता. ही एक अपूर्व घटनाच होती. ब्रह्मीभू श्री गुरुदेव रानडे त्यांना 'सिद्ध पुरुष' का मानीत ते त्या दिवशी लोकांना कळ असेल.

## जगी ज्यास कोणी नाही..

पितृछत्र हरविल्याचे अतिव दु:ख सर्वांनाच झाले. त्यातल्या त्या मामांना तर तीव्रतर वाटत होते. कारण अजून त्यांचे काहीच बस्तान बस नव्हते. ना नोकरी, ना धंदा अशी अवस्था होती. काळ हा अशा दु:खाव धन्वंतरी असतो. जसा काळ लोटत असतो तशी दु:खाची तीव्रता कमी होते पण आर्थिक विसंवाद वाढत जात असतो. दादा नामक कुटुंबप्रमुख निवर्तल्याव एकत्र कुटुंबाच्या धाग्याला शिथिलता येऊ लागली. सालीसकट असलेल्य संत्र्याची साल काढल्यावर आतल्या फोडी वेगवेगळ्या दिसू लागतात. एक कुटुंबाचे वेगळेपण जाणवायला लागले आणि हळूहळू विघटनेची प्रक्रिय सुरु झाली. मामा खऱ्या आर्थाने निराधार झाले. दत्तकाचे उत्पन्न न्यायप्रवि असल्याने मिळत नव्हते आणि जनक घराण्याकडील उत्पन्नावर हक्क नव्हता बुडत्याचा पाय खोलात या म्हणीप्रमाणे याचवेळी हायकोर्टातील मामांची के त्यांचे विरूद्ध गेली होती. काय करावे, कोठे जावे हे मामांना कळेना आंधळ्याला विंचू चावावा म्हणजे तो जसा सैरभैर होतो. तशी त्यांच्या मनाच अवस्था होती. पण मामांच्या मनामध्ये परंपरेची गाढ निष्ठा असलेने त्यांच पाऊले अनाथांच्या नाथाकडे वळली. एका शनिवारी ते चालत घोसरवाडल गेले. सकाळी उठून स्नान करून ते देवाकडे जायला निघाले. साकडे आत देवालाच घालायचे आहे. हायकोर्टामध्ये निकाल विरूद्ध लागलेने सुप्रि

कोर्टात जाणे भाग होते. सुप्रिम कोर्टात जाणे फार खर्चाचे हाते. सुप्रिम कोर्टात निकाल आपल्या बाजूने लागेल त्याची खात्री असलेशिवाय जाणे शहाणपणाचे नव्हते. म्हणून ते देवाला विचारायला आले होते. सकाळी ७ वा. तिथे असलेल्या आपल्या १० वर्षाच्या चुलत भावाला (प्रभाकरला) घेऊन ते देवळात गेले. तिथे जाऊन त्यांनी कौल मागितला. ''सुप्रिम कोर्टात यश येते, तू बेलाशक जा. असे सांगत असशील तर उजवा कौल दे.'' असे त्यांनी मागितले. पण काही केल्या कौल होत नव्हता. आठ, नऊ व दहाही वाजले तरीही कौल मिळण्याची चिन्हे दिसेनात. मामा भिंतीला टेकून बसले होते. वडीलांचा पहाडासारखा आधार आता उरला नव्हता. नाथांचे दरबारी काही दाद लागत नव्हती म्हणून अश्रुपूर्ण नयनांनी आणि करुण भावनेने देवांची प्रार्थना करीत होते. बाराच्या सुमारास गावातील एक प्रतिष्ठित माणूस आणि नि:सीम भक्त 'श्री अण्णू चौगुले' आपल्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे देवाला आला. आत येतो तोच भिंतीला टेकून बसलेले मामा त्याला दिसले. देवाला प्रदक्षिणा घालता घालताच त्याने मामांना विचारले की, ''देवाला काय संकट घातले शंकरराव?'' त्यावर मामा म्हणाले ''हाय कोर्टात केस माझ्याविरूद्ध झाली. दादातर निघून गेले, सुप्रिम कोर्टात मी जाऊ काय ? यश येईल काय ? असे मी त्याला विचारतोय. पण हा काही उत्तरच देत नाही. पोटाशी सुपाऱ्या घेऊन बसलाय.'' हे ऐकल्यावर अण्णू चौगुले सात्विक संतापाने प्रदक्षिणा संपवित देवासमोर आला आणि उजव्या हाताला तिथे असलेला नारळ वाढवायचा गोल दगड उचलून देवाच्या मंडपिवर ठेवत रागाने म्हणाला, ''तुला उत्तर द्यायचे नसेल तर हा दगड घाल त्यांच्या टाळक्यात, त्यानं आता कुठं जावं ?'' एखाद्या वडीलधाऱ्या माणसाच्याबरोबर त्राग्याने पण प्रेमाच्या अधिकाराने बोलावे तसे तो म्हणाला आणि काय आश्चर्य ! देवाच्या दोन्ही कानांमध्ये दाशाळीची फुले पूजा करताना सकाळी ६ वा. घातली होती. त्यातील उजव्या कानातील दाशाळीचे फूल टिचकी मारल्यावर हातातील लहान खडा जसा वेगाने उडतो तसे ते फूल उडाले आणि मामा बसले होते तिथे येऊन उताणे पडले. मामांना अतिशय आनंद झाला. ते फूल घेऊन एका चांदीच्या डबीत ठेवले. त्याची पूजा ते दररोज करत व कामाला जात. यावेळी त्यांच्या भविष्यवाणीला मोठी



धार आली आणि ते जे-जे बोलत त्याची सत्यता लोकांना पटू लागल एखाद्या बेलीफला 'तुझी बदली होतीय' असे सांगावे आणि त्याची बद होऊन मामांच्या कामाच्या ठिकाणी त्याने यावे असे होत असे.

## सुप्रिम कोर्टाचा निकाल

मामांनी सुप्रिम कोर्टामध्ये दावा दाखल केला. त्यावेळी माडगांव म्हणून अतिशय प्रसिद्ध सुप्रिम कोर्ट होते. ते फार कडक शिस्तिचे होते. दररो हातात घेतलेली केस त्याच दिवशी पूर्ण करणेचा त्यांचा शिरस्ता होता. त्यामु पुढील तारीख पडणे दुरापास्त होते. गंमत अशी झाली, २५ ऑक्टोबर १९ रोजी तिकडे आप्पाचीवाडीची यात्रा सुरु झाली. घुमटासमोर ज्या दिव भाकणूक होत असते त्याचदिवशी तीच तारीख बरोबर पडली होत माडगांवकरांची तर वरीलप्रमाणे ख्याती होती. आता काय करायचे ? भाकण चुकवून तारखेला कोर्टात जायचे की तारीख चुकवून भाकणूकीला थांबाय असे फार मोठे प्रश्नचिन्ह मामांच्यापुढे होते. मामांच्या मनाने ठरविले. वाटे ते होवो, भाकणूक चुकवायची नाही. देवाची सेवा खंडीत करायची नाह मामा दुसरे दिवशी तारखेला गेले आणि काय आश्चर्य आदले दिवशीची के अजूनही अपूर्ण राहिली होती. त्यामुळेच त्यांना दुसरे दिवशीची तारीख दि गेली होती. माडगांवकरांच्या आयुष्यातील ही पहिलीच घटना होती. दु दिवशी दुपारी मामांची केस सुरु झाली. एकंदरीत जज्जाचा कल मामाच केसच्या विरूद्धच होता. मामांचे हात पाय अक्षरश: गळून गेले. त्या केसम 'पोलिटीकल एजंटकडे' दत्तकाचा अर्ज केला आहे का ? याचा पुरावा नव्हत ती थैली (पुरावा) हजर करणे जरूरी होते आणि केस थांबली आणि दुसरेदिव निकाल होणार होता. मामांच्या वकिलांनी सांगितले की, ती थैली रातोर मिळवा व उद्या सकाळी हजर करा. म्हणजे काहीतरी आशा निर्माण होईल आता कोणाची मदत घ्यायची ? राजाज्ञे म्हणून मामांचे दूरचे नातेवाईक मित्रही होते. त्यांना घेऊन ते बिनखांबी गणेशमंदिराचे मालक सर श्री जोशीर यांचेकडे गेले. एक टांगा करून ही माणसे दिवसभर फिरली आणि गुहेत सीमंत मणी शोधावा तशी ती थैली शोधून काढली. यावेळी श्री राजाज्ञे व जोशीराव यांनी बहुमोल सहकार्य केले. ती थैली हजर करताच गुरु पालट

आणि पारडे फिरले. सुप्रिमकोर्टाचा निकाल मामांच्या बाजूने झाला. आनंदोत्सव साजरा झाला. त्या प्रित्यर्थ मामांना कोणीतरी जेवायला बोलविले होते. इकडे आप्पाच्यावाडीत देवांनी संचारात सांगितले होते की, उद्या सकाळी ११ वा. कोर्टात जातो आहे रे, काळजी करू नका म्हणून. दुसरे दिवशी मामांचे दोन्ही बंधू बाबुराव व आप्पाराव देवाला प्रार्थना करीत आप्पाचेवाडीस बसले होते. त्यांनी तोंडात पाणीही घेतले नव्हते. तुरबतीच्या डोक्यावर एक केवड्याचे मोठे कणीस ठेवले होते. तिकडे निकाल लागला आणि इकडे कणीस तोफेतून गोळा सुटावा तसे उडून समोर बसलेल्या मामांच्या बंधूसमोर येऊन पडले. त्यांच्या समवेत लक्ष्मण खोत इ. माणसे होती त्या सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला. आता शंकरराव पेढे घेऊन तासाभरात येतीलच अशा आशेने सर्वजण वाट पाहत होते. मामांना तर इकडे जेवणाचे आमंत्रण होते. ते आता जेवायला पाटावर बसणार त्या आधी हातपाय धुवायला, लघुशंकेला गेले त्यावेळी त्यांना कानावर स्पष्ट शब्द आले की, ''तू इथे काय जेवत बसलास, आप्पाच्यावाडीत उपाशीपोटी तुझी वाट बगताहेत, चल नीघ.'' त्याबरोबर मामांनी कान धरले आणि त्या यजमान मित्राला नाथांचा आदेश सांगितला आणि हार पेढे घेऊन ते तडख आप्पाचेवाडीस आले. आनंदाचा जल्लोष झाला. सत्याचा असा विजय झाला. मामांच्या पोटी नाथभक्ती दाटून आली. आणि श्रीनाथ कसे आपल्या मागे पुढे आहेत. याची निःसंदिग्ध प्रचिती आली.

## विजय केतू

मामा शिपूरला गेले आणि ५० एकर जमिनीचा भर पिकावर कब्जा घेतला. श्रीपती पाटील, ज्योती घाटगे, त्यांचा पुतण्या व जानबा हे शिपूरला रयत होते. आणि डांगे म्हणून अर्जुनीला रयत होता. शिपूरला ४० एकर आणि अर्जुनीला ११ एकर अशी ती जमीन होती,. सगळी पिके आता मामांच्या ताब्यात होती. पंचक्रोशीत सनसनाटी निर्माण करणारा असा निकाल होता. एवढ्या प्रचंड विजयाने एखादा मनुष्य हुरळून गेला असता आणि आपल्या प्रतिस्पर्ध्याला अंकीत असलेल्या रयतांच्याकडून सर्व शेतातील माल हिसकावून घेतला असता पण मामांच्या दूरदृष्टीने व समबुद्धीने तसे न करता रयतांना योग्य मोबदला दिला. त्यामुळे रयतांच्या मनात असलेली भीति तर



नाहीशी झालीच झाली पण आपल्या नव्या मालकाच्या माणूसकीची व उदा[illegible] अंतःकरणाची त्यांना जाणीव झाली. खरं म्हणजे यावेळी दरम्यानचे उत्पन्नदेखील मिळणे अवश्यक होते ते मिळाले असते तर सर्व चित्रच बदलले असते. पण तसे होणार नव्हते याची साक्ष नाथांनी अगोदरच दिली होती. दरम्यानचे उत्पन्न मिळाले नाही. तेव्हा त्यांच्या सूचनेचा अर्थ खऱ्या अर्थाने आकळला. त्याचे असे झाले, एकदा एक कुडबुड्या जोशी दारावर आल[illegible] आपले लहान डमरू जोराने वाजवत तोंडाने भविष्य सांगू लागला. बाहेरच्या बाजूला मामांची आई गंगूबाई तिथे होत्या. ''कोर्टात तुझे काम चालले आहे यावेळी कुणीतरी कामात पाय मारलाय. पुढच्या कोर्टात तुझ्यासारखे काम होतेय, काही काळजी करू नकोस मला एक गुळाचा खडा आणि एक पैस[illegible] दे. तेव्हा मामांची आई उठल्या आणि एक गुळाचा खडा दिला. तो पैसा माग[illegible] लागला घरात कोणी पुरुष माणूस नसल्याने पैसे वगैरे काही नाही असे त्यांन[illegible] सांगितले. पैसा दिला असता तर दरम्यानचे उत्पन्न मिळाले असते. अस[illegible] त्याचा अर्थ लावला. याआधी देखील मामांना असाच एक दाखला मिळाल[illegible] होता. घोसरवाडहून ते कुरूंदवाडला मधल्या रस्त्याने येत होते. तो रस्ता शेतातू[illegible] होता. त्यांच्याबरोबर त्यांचा थोरला मुलगा मधू होता. तो लहान असल्या[illegible] रयताने त्याला खांद्यावर घेतले होते. बोलत जात होते इतक्यात एका शेताच्य[illegible] बांध्यावर दोन कणसं आणि एक खुरपं ठेवलं होतं. ते पाहिल्यावर मामा [illegible] त्यांचा रयत दोघेही थांबले. खुरपं आणि दोन कणसं कोणाची' याची चौकश[illegible] केली. कुणीही आपलं म्हटलं नाही. त्याचवेळी शिपूरच्या उत्पन्नाबद्दल चच[illegible] करत ते येत होते, 'देवाने कृपा केली तर मला माझं शेत मिळेल' असं म्हणायल[illegible] व त्या बांधावर यायला एक गाठ पडली होती. म्हणून त्या दोन कणसाला [illegible] खुरप्याला विशेष महत्व होतं. त्यांना नंतर ५० एकर जमिनीचा कब्जा मिळाल[illegible] त्याचे ते पदचिन्हच होते. मामांनी रयताला ते खुरपं आणि कणसं घ्यायल[illegible] लावली व पुढचा प्रवास सुरु केला.

मामा आता कुरूंदवाडला परत आले. आनंदोत्सव झाला. आत्तापर्य[illegible] दारिद्र्याच्या गर्तेत पिचत राहिलेल्या आपल्या कुटूंबाला चांगले दिवस यावे यासाठी काय करता येईल ? याची स्वप्ने ते पहात होते. पण इतरांच्या मनामध[illegible]

कांही वेगळेच होते. त्यामुळे ते तसे घडणार नव्हते. रामाला राज्याभिषेक करायचा म्हणून मुहूर्तदेखील काढावा आणि प्रत्यक्षात त्याला वनवासात जावे लागावे. हा जो नियतीचा खेळ आहे. तसाच खेळ मामांच्या जीवनात ती खेळू लागली. मामांचे बंधू आणि मामा वेगळे झाले. कुरुंदवाडला मामा डोंगरकर यांचे घरी रहावयास गेले. डोंगरकर यांच्या घरापलिकडेच माधवराव देशपांडे नावाचे मामांचे जीवलग स्नेही रहात होते. त्यांनी मामांना खूप मदत केली. मामा शिपूर अर्जुनी इकडे जाऊन येऊन करीत असत. मामांचे वडील ती. दादा यांनी सांगितलेला आदेश त्यांच्या आठवणीत होता. पण खऱ्या अर्थाने आचरणात आला नाही. ते अर्जुनी शिपूरला ज्यावेळी जात असत त्यावेळी आप्पाचेवाडीस जाऊन येत असत. कुरुंदवाडहून आप्पाचेवाडीस दर अमावस्येला जाणे त्यांना अवघड होते कारण त्यावेळी परिवहनाच्या सोयी फार कमी होत्या.

एकदा ते शिपूरला गेले असताना शिपूरच्या बंगल्यात त्यांचा मुक्काम होता. मामा ज्योतिषी आहेत व आप्पाचेवाडीचे भक्त आहेत हे आता शिपूरच्या लोकांना माहित झाले होते. ५० एकर जमीनीवरील भर पिकांवर कब्जा ही तर शिपूरच्या परिसरातील लोकांना दैवी घटनाच वाटत होती. कारण प्रतिस्पर्धी अतिशय बलाढ्य आणि धनदांडगा व सत्ताधारी होता. शिपूरला मामांना 'घोसरवाडकर' म्हणून ओळखत. 'अरे, त्या घोसरवाड्याच्या मागे हालसिद्धाप्पा आहे रे ! तो कोणाला ऐकणार नाही' असे लोकांचे सहजोद्‌गार निघत असत. मामा बंगल्यात बसले असताना एक माहितीचा शेतकरी मामांचेकडे पॅरॅलीसीस् झालेल्या एका पेशंटला घेऊन आला. आणि म्हणाला, 'दादा हा बरा झाला पाहिजे बघा ! सर्व डॉक्टरी उपचार झाले पण काही उपयोग झाला नाही.' मामा त्याला म्हणाले, 'अरे, मग मी काय करणार मी थोडाच डॉक्टर आहे ?' त्यावेळी शेतकरी म्हणाला, ''दादा, तुमच्या तोंडात हालसिद्धाप्पा आहे हो! तुमच्या उपायाने हा नक्की बरा होणार'' त्याचा हा विश्वास व देवावरील श्रद्धा पाहून मामांनी नाथांचे स्मरण केले आणि त्याला उपाय सांगितला. 'अरे, हे बघ' ते एका अन्तरिक स्फुर्तीने म्हणाले, ''ही पारवळं आहेत ना पारवळं !, ती कापायची आणि त्याचं रक्त अर्धांगवायू



झालेल्या भागाला चोळायचे.'' पारवळाचे रक्त ताबडतोब गोठते म्हणून ते कापल्याबरोबर ताबडतोब उपाय करावा लागतो. त्या शेतकऱ्याच्या सुदैवाने त्या बंगल्याच्या मागील बाजूस एक एक खोल विहीर आहे. त्या विहीरीत अनेक पारवळं होती. त्यांनी तसा प्रयोग केला आणि महिन्याभरात त्याचा अर्धांगवायू झालेला हात व्यवस्थित चालू लागला.

अशीच एक घटना मांगल्याला घडल्याची मामा सांगत असत. मामांच्या पत्नीला कन्यावारसांनी उत्पन्न आले होते. ते बत्तीसशिराळ्याजवळील 'कांदे मांगले' या गावी होते. बरेच दिवस मामा तिकडे गेले नव्हते. ती जमीन विकून टाकावी या उद्देशाने ते एकदा मांगल्याला गेले. मांगल्याचे श्री. रामचंद्र वामन कुलकर्णी मामांना फार मानत असत. त्यांचे आणि मामांचे अतिशय घरोब्याचे संबंध होते. त्यांच्या थोरल्या मुलीचे लग्न मामांनीच ठरविले होते. त्यांच्या जावयाचे नाव व्ही. आर. जोशी. ते सेशन जज्ज म्हणून निवृत्त झाले. मामा घरी येणार या वार्तेने त्यांना आनंद झाला. कांदे मांगले गावातल्या प्रतिष्ठीत लोकांना मामा ज्योतिषी आहेत हे त्यांनी सांगूनही टाकले होते. मामा आल्यावर जमीनीसंबंधीची चर्चा झाली. एका जमिनीसंबंधी कोर्टात एक रयत गेला होता. त्याची तारीख ही दुसऱ्या दिवशी बत्तीस शिराळ्याला होती. मामा परस्पर बत्तीस शिराळ्याहून आपल्या गावी जाणार हे कळल्यावर कुलकर्णींच्या दारात एक बैलगाडी आली. त्या बैलगाडीत गावचे पाटील वाय. सी. नावाचे गृहस्थ होते. त्याला चार माणसांनी उचलून मामांच्या पुढे आणला. त्याला अतिशय तीव्र असा अर्धांगवायूचा झटका आला होता. सर्व डॉक्टरी उपाय झाले होते तो गोरखनाथांचा भक्त होता.

बत्तीस शिराळ्याला गोरखनाथांचे एक मंदिर अद्यापि आहे. त्यावेळी ते थोडेसे दुर्लक्षीत असे होते. मांगल्याहून साधारणपणे ९ मैलावर होते. या पाटलाला काय सांगावे असा मामांच्या पुढे प्रश्न होता, नव्हे तर आव्हान होते. या रेवणनाथाच्या भक्ताच्या बुद्धीला गोरखनाथांनीच अभिप्राय सुचवला त्यांनी त्या पाटलांना सांगितले की, दररोज गाडी घेऊन मांगल्याहून गोरखनाथांना जायचे आणि गोरखनाथांचे दर्शन घ्यायचे. एक पाऊल चालता आले तर एक पाऊल चालायचे आणि गाडीत बसायचे. असे न चुकता वर्षभर करायचे.

एक दिवस चुकला तर मी बांधील राहणार नाही. यातील काबील हेतू हा की, वर्षभरात एकतरी दिवस तो चुकेलच चुकेल. पण तोही बहाद्दर जिद्दीचा. तो वर्षभरात एक दिवसही चुकला नाही आणि काय आश्चर्य ! ज्या दिवशी वर्ष झाले त्या दिवशी तो पाटील स्वत:च्या पायाने ९ मैल चालत गेला आणि त्याने गोरखनाथांच्या देवळाचा जिर्णोद्धारही केला आणि ते देऊळपण नावारूपाला आले. आज तिथे मोठी यात्रा भरते.

दुसऱ्यादिवशी कोर्टात केस होती. पंडीत नावाचे जज्ज होते. ते मामांचे काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हते. मामा थोडे खट्टू झाले. त्यांनी आपले स्नेही कुलकर्णी यांना ही हकिकत सांगितली. ते एक क्षणभर विचार करून म्हणाले, ‘‘त्यांना थोडा ज्योतिषाचा नाद आहे. त्यांना तुम्ही ज्योतिषी आहात म्हणून सांगतो.’’ तसे सांगितल्यावर मामांना जज्जांनी रिटायरींग रूममध्ये बोलावले व आपल्या मुलीची कुंडली मामांपुढे टाकली. मामांनी कुंडली पाहून सांगितले. हिचे लग्न विचारपूर्वक करा. जज्ज चाचरतच ‘म्हणजे ?’ म्हणाले. त्यावर मामा म्हणाले, ‘‘सर्व गोष्टी खऱ्याखुऱ्या सांगून लग्न करा.’’ जज्जांची प्रश्नार्थक मुद्रा पाहून मामा म्हणाले, ‘‘हिला काही स्कीन डिसीज आहे का ?’’ डोळे विस्फारीत गळलेल्या आवाजात जज्ज म्हणाले ‘हो’ तिच्या उजव्या मांडीवर पांढरा ढाग आहे. जज्ज अवाकूच झाले आणि म्हणाले, ‘‘तुम्ही परत केंव्हा येणार ?’’ त्यावर मामा म्हणाले, ‘आता कशाला येऊ ? तुम्ही तारीख दिली नाही !’ जज्ज अपराध्याच्या सुरात म्हणाले, ‘नाही हो तुम्हाला पाहिजे ती तारीख देतो पण तुम्ही परत या.’’ आणि त्यानंतर मामा विजयाची पताका फडकवत आले.

## पहिले गंडांतर

१९४६ साल असेच ऊन पावसाच्या खेळामध्ये गेले. मामांनी कुरूंदवाडात घर बदलले. कुरूंदवाडकर सरकारांच्या वाड्यासमोर माणगांवकर मास्तरांचे घर होते. तिथे मामा रहायला आले. त्यावेळी मामांची आई, मामांच्या पत्नी आणि तीन मुले असे होते पण मामांचे काका आपल्या बहिणीजवळ म्हणजे मामांच्या आईजवळ रहायला आले. त्यांना धावरे झाले होते. स्थिती फार नाजूक होती. त्यांचे वयही झाले होते. त्यांची मुले अधुनमधून येऊन



भेटून जात असत. मुलांच्यापैकी अद्यापि कोणीही स्थिरस्थावर झाले नव्हते. नाही म्हणायला पंडीत नावचा त्यांचा दोन नंबरचा मुलगा मिलटरीत होता. एकदा मामांच्या काकांचा आजार जास्त झाला. नेमके त्यावेळी मामा शिपूरला गेले होते. त्यावेळी निरोप पाठविण्याची साधने उपलब्ध नव्हती. मामांचे काका गेले ही वार्ता सगळ्यांना कळली. मामा पुढे २-४ दिवसांनी आले.

मामा त्यावेळी सारखे म्हणत असत की, माझी शेतीची थोडी-फार घडी बसती आहे खरे पण सध्या मला गंडांतर योग आहे. मामांच्या पलिकडे कर्वे नावाचे एक ओव्हरसियर रहात असत. ते खास पुणेरी कोकणस्थ होते. त्यांना ४ मुलगे होते. दोन मुलांची लग्ने झाली होती. पण ते सुट्टीला पुण्याला गेले की, स्वत:च्या हाताने स्वयंपाक करीत व जेवत. सुनांच्यावर त्यांचा विश्वास नव्हता. नं. ३ च्या मुलाने प्रेमविवाह करण्याचे ठरविले होते. ते होऊ नये असे त्यांना वाटत होते. त्यांनी मामांना मुलाच्या आणि त्याच्या प्रेयसिची कुंडली दाखविली. मामांनी त्या कुंडल्या पडताळून पाहून त्यांचे वैवाहिक जीवन सुखाचे जाणार नाही. किंबहुना मुलगा विधूर होण्याची शक्यता आहे असे सांगितले.’’ तुम्ही मुलाला बोलावून घ्या. मी त्याला समजावून सांगतो.’’ मुलगा मोठा ऑफिसर होता. वडीलांच्या सांगण्यावरून एक दिवस तो मामांचेकडे आला. त्यांनी कुंडली दाखविली. मामांनी त्यांच्या पूर्वायुष्यातील घटना तंतोतंत सांगितल्या. त्याचबरोबर भविष्यात घडणाऱ्या घटना सांगून हा प्रेमविवाह यशस्वी होणार नाही. असे निक्षून सांगितले. त्या मुलीच्या लहरीपणाचे, स्वभावाचे वर्णन मामांनी बरोबर केले. त्याच्या चेहऱ्यावरून त्याला पटले असावे हेही लक्षात आले. पण हा रेशमी धागा इतका चिवट असतो की, तो तुटता तुटत नाही. मामांनी त्याच्या वडीलांना दोन महिन्यांचा कालावधी दिला होता आणि काय आश्वर्य ! या दोन महिन्यांत अशा काही घडामोडी घडल्या की, त्या प्रेमाचा अतूट धागा केवळ विरळच नव्हे तर खंडीत झाला. तो मुलगा नियोजीत वधूशी विवाह करायला तयार झाला. पत्रिका छापल्या कर्वे ओव्हरसियर अतिशय आनंदित झाले आणि मामांना लग्नाला येण्याचा आग्रह धरू लागले. आपल्या बरोबर त्यांनी चलावे असा त्यांचा आग्रह होता. मामांनी त्यांना सांगितले की, माझ्या कुंडलीत गंडांतर योग आहे. त्यावेळी मी कुठेही

बाहेर जाणार नाही. त्यांच्या आग्रहास्तव ते केवळ त्यांना नरसोबावाडीपर्यंत पोहोचविण्यास गेले. पूर्वी गाड्या नृसिंहवाडीहून सुटत. त्यामुळे कुरूंदवाडच्या लोकांना नृसिंहवाडीहून जावे लागे. सध्या जो नृसिंहवाडी-कुरुंदवाड पूल आहे. तेव्हा तो नव्हता. नावेतून जावे लागे. मामा आठच्या सुमारास परत आले आल्यावर त्यांचे पोट गुडगुडायला लागले. त्यांना जुलाब सुरू झाले. एकामागून एक जुलाब झाल्यामुळे त्यांना बसलेली जागा उठवेना. नेमके यावेळी मामांचे नेहमीचे डॉक्टर टी. बी. वाटवे परगांवी गेले होते. त्यामुळे काही घरगुती उपाय चालू होते. यावेळी मामांचे भाचे बंडूआण्णा सिंदगी यांचे काका श्री हणमंतराव मदतीला धावून आले. तसेच थोरले बंधू बाबुराव हे पण आले. दोघांनी उत्तम सुश्रुषा केली. त्यानंतर धाकटे बंधू आप्पाराव पण आले. रक्ताचे पाणी होऊ लागल्याने मामांची प्रकृती गंभीर होत चालली होती. नाडीचे ठोके मंद लागत होते. काय करावे ? कोणाला बोलवावे ? हा निर्णय घ्यायला कोणीही नव्हते. सांगलीहून डॉ. भडकमकर यांना बोलावून घेऊन यावे असा एक विचार चालला होता. श्री. हणमंतराव सिंदगी यांना देवीचा संचार होत होता. त्यांना संचार झाला. त्यांना सावरत असताना मामांचे बंधू बाबुराव यांना नाथांचा संचार झाला. दोघांनी आश्वासकपूर्वक सांगितले की, जीवाला काही धोका नाही. डोळे झाकून निपचित पडलेल्या मामांची स्थिती बघवेना. त्यास्थितीत त्यांना संचारावस्था निर्माण झाली व ''चार वाजल्यानंतर बरे वाटते रे'' असे त्यांनी जोरात सांगितले. इकडे डॉ. वाटवे करुंदवाडला आले. आल्या आल्या त्यांना कळल्यावर ते तडक मामांचेकडे आले. त्यांच्या औषधोपचाराने बरोबर ४ वा. त्यांची नाडी व्यवस्थीत चालू लागली. रक्ताचे पाणी होत असताना त्यांना फार शोष पडायचा त्यावेळी लिंबाचे सरबत सारखे त्यांना देण्यात आले. त्याचा डोस जास्त झाला की काय कोणास ठाऊक मामांचा घसा, जीभ सुजून आले. अंगाची कायली सुरु झाली. ते गडाबडा लोळू लागले. कालान्तराने औषधोपचाराने ते बरे झाले. असे ते सहा महिन्यांचे दुखणे झाले ते गावाला न गेल्याने बरे होऊन गंडांतर टळले.

## सुलतानी संकट

अशीच कालक्रमणा चालली असताना एकेदिवशी इचलकरंजीचे



आप्पासाहेब पळसुले आले होते. त्यांच्या बहिणीचे अजून लग्न ठरले नव्हते. मामा आणि पळसुले संध्याकाळी फिरायला म्हणून घराच्या बाहेर पडत असताना साठे नावाचे एक ग्रहस्थ आपल्या मुलीच्या लग्नाची आमंत्रण पत्रिका द्यायला आले. ते गेल्यावर मामांनी त्याच अक्षता घेऊन पळसुलेंच्या हातात दिल्या. आणि सांगितले **याच** अक्षता तुमच्या बहिणीच्या डोक्यावर टाका. महिन्याभरात लग्न ठरेल. ते लग्न कसे ठरले याची हकिकत या पूर्वीच आली आहे.

शेतीचे उत्पन्न येऊ लागल्यामुळे थोडेसे स्वास्थ्य लाभले होते पण सुखाचा काळ गरूडाच्या पंखांनी जात असतो. आणि दुःख मात्र पीपिलिका गतीने जात असते. ४७ साल उजाडले. राष्ट्राला स्वातंत्र्य मिळाले. सगळीकडे आनंदाचा कल्लोळ माजला होता. सरकारांपासून लोकांपर्यंत लोक उद्याची स्वप्ने पहात होती,. मामांच्या पत्नी यावेळी गर्भवती होत्या. माणगांवकर मास्तरांच्या घरात मामा माडीवर रहात असत. खालून पाणी न्यावे लागत असे. पूर्वीची बाळंतपणे ही घरातच केली जात असलेने मामांच्या आई मामांना म्हणाल्या, ''शंकर, आता बाळंतपण आलं आहे, मला खालून पाणी आणणं शक्य होणार नाही. म्हणून कोठेतरी तळमजल्यावर घर बघ.'' मग मामांनी कुरूंदवाडच्या मारूती देवळामागील श्री. केळकर यांच्या वाड्यातील घर पाहिले. त्या घरात पूर्वी एस. ए. पुजारी नावाचे गृहस्थ रहात होते. रेशनींगमध्ये ते काम करीत होते. त्यामुळे अनेक लोक दुखवले गेले होते. परत श्री. केळकर हे संघाचे (आर.एस.एस.) निष्ठावंत पाईक होते.

कुरूंदवाडग्रामी आर.एस.एस. आणि सेवादल यांची एकमेकांबद्दल दुष्मनी होती. आणि ते परस्परांना पाण्यात पाहत. त्यात भरीस भर म्हणून कुरूंदवाडचे फौजदार लोकूर यांचा मुलगा सेवादलात होता. तर परांजपे मामलेदारांचा मुलगा आर.एस.एस. मध्ये होता. लोकूरांच्या आणि परांजपेंच्या मुलात मारामारी झाली होती. हा वाद बरेच दिवस धुमसत होता. केळकरांचे घर तसे प्रशस्त व दुमजली होते. आत लाकडी जीना होता. त्या जीन्याखाली मामांचे देवघर होते. वरच्या बाजूला दिवाणखाना होता. तिथे मामांनी ज्योतिषशास्त्राची पुस्तके ठेवण्यासाठी एक फिरते कपाट ठेवले होते. मामांच्या

थोरल्या मुलाची मुंज करायची म्हणून आजऱ्याहून खंडीभर जिरगा तांदूळ आणला होता. मामांना येऊन तिथे ८-१० दिवसही झाले नसतील त्यावेळी देशामध्ये एक भयानक घटना घडली. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा खून झाला. तो नथुराम गोडसे नावाच्या पुण्याच्या ब्राह्मणाने केला. वाऱ्यासारखी ही वार्ता साऱ्या देशात पसरली. विशेषत: महाराष्ट्रात त्याने रौद्ररूप धारण केले. अगोदरच पोटात धुमसत असलेला ब्राह्मणांवरील राग उफाळून आला आणि सर्व गुंड एकत्र येऊन ब्राह्मणांची घरे पेटवायला सुरुवात केली. कुरुंदवाडला तर भयानक जाळपोळ झाली. त्यात सेवादल आणि आर.एस.एस. यांच्या वैराने आगीत तेल ओतले. लंका पेटावी तशी कुरूंदवाडची ब्राह्मणांची घरे पेटू लागली. माणगांवकर मास्तरांच्या घरापाशी लोक आले आणि येथे शंकरराव घोसरवाडकर (मामा) रहातात म्हणून माणगांवकर मास्तरांचे सामान काढून जाळले आणि एस. ए. पुजारींचे घर म्हणून मामांचं घर पेटवून दिले. सर्व ब्राह्मणांच्या बायका पुरूष भयभीत झाले होते. फौजदार कचेरीमध्ये सर्वजण आश्रयाला गेले होते. कोणाचा पत्ता कोणाला लागत नव्हता. मामांच्या घरातील सर्वजण बाहेर पडले होते. ''ओळखी नुरल्या प्रलयात'' अशी अवस्था झाली होती. पुढचा संकेत म्हणून काय कोणास ठाऊक मामांना बाहेर पडताना देवाची मूर्ती घेऊन जाण्याची इच्छा झाली आणि त्यांच्या मुलाने एक आजीची चांदीची वाटी आणि तिचा स्वेटर घेतला होता. दारू पिऊन ते लोक इतके बेहोष झाले होते की डॉ. फडणीस यांची गाडी पोलीस गेटसमोर आणली आणि त्यांची माणसे आत बसली असताना त्यावर पेट्रोल ओतून पेटवून दिली. ती पोरे आत सदेह जळाली.

एका कपड्यानिशी मामा आणि त्यांचे कुटुंबिय बाहेर पडले. आता कुठे जायचे हा त्यांच्यासमोर प्रश्न होता. दानशूर पलूस्करांनी एक अन्नछत्र उघडले होते. तिथे त्यांचे पाय वळले आणि आत पेटलेल्या जठराग्नीला मिळेल ती आहूती दिली. त्यांचा मुलगा ११ वर्षाचा होता व मुली दोन-चार वर्षाच्या त्याना जाड तांदळाचा भात जात नव्हता ते बघून त्याच्या आई व आजीच्या पोटात कालवा कालव झाली. दुसरेदिवशी घराकडे जाऊन पहातो तो सगळे घर बेचिराख झाले होते. आजऱ्याहून आणलेले धान्य पुढे आठ दिवस धुमसत



होते. हाताला कांही लागण्यासारखे नव्हते. मामांनी आपल्या पत्नीस ताकीद दिली होती की, यातील काहीही घ्यायचे नाही. पण एक चमत्कार घडला. ज्या लाकडी जीन्याखाली देवघर होते त्यातील सर्व मूर्ती वितळून गेल्या होत्या. मात्र मामांनी लहानपणापासून पूजलेला बाण मात्र होता तसा राहिला. ही भूमी आपल्याला कंटाळलेली आहे असे समजून मामांनी कुरुंदवाड सोडायचे ठरविले. पण कुरूंदवाडकर सरकारांनी आणि महाराष्ट्रसरकारने या पिडीत, होरपळलेल्या निराश्रीत लोकांना काही मदत देण्याची योजना काढली होती. त्यावेळी माधवराव देशपांडेंची अतिशय मदत झाली. त्यांनी कपड्यापासून सर्वकाही सहाय्य केले. त्यातही दैव आडवे आले. मामांची शिपूरला जमीन असलेने ते निराश्रीत म्हणता येणार नाही. असा अर्थ काढला गेला. शिपूरची जमीन पण गुंडांच्या भीतीने पेरली गेली नव्हती. मामांचे कोईमतूर नावाचे अधिकारी मित्र होते. त्यांना ही अडचण लक्षात आल्यावर कर्ज मंजूर करून दिले. त्यांना जामीन हवा होता. मामांच्या बहिणीचे यजमान महादेव डफळापूरकर हे जामीन राहिले. मामांना कळेना की एकदम सुलतानी संकट आले कसे ? देवाला विचारण्यासाठी त्यांनी थेट कारीकोळला जायचे ठरविले होते. ते कारिकोळला निघण्यापूर्वी त्यांचे थोरले बंधू त्यांना व त्यांच्या कुटुंबाला घरी घेऊन जाण्यास आले होते. सर्वांना त्यांच्याकडे ठेऊन त्यांनी कारिकोळचा रस्ता धरला. देवापुढे येऊन अत्यंत काकुळतेने व अन्त:करणपूर्वक देवाला त्यांनी प्रश्न केला की, ''मी असे काय तुझे घोडे मारले होते म्हणून मला ही शिक्षा दिलीस ?'' मामांच्या डोळ्यातून अश्रूधारा वहात होत्या. पुढे सगळा अंधार होता ते कींकर्तव्यमुढ झाले होते. त्यामुळे अतिशय आर्ततेने ते आळवीत होते. देवाने काहीतरी वाट दाखवावी. अशी ते मागणी करत होते. मामा आल्याची वार्ता त्या छोटेखानी गावात ताबडतोब पसरली. मामांना भेटण्यासाठी अनेक लोक देवळाकडे आले. मामांची ती अवस्था बघून देवापुढे भजन करायचे ठरले. भजन सुरू झाले. भजन रंगात आले. 'देवकुते' म्हणून एक पुजारी आपल्या शेतात बडीम रचत होता. त्याला संचार होत असे. बडीम रचता रचता त्याला काय आज्ञा झाली कोणास ठाऊक त्याच्यावरून उडी मारून तो थेट देवळात आला. मामांची व त्याची तशी फार ओळख नव्हती.

पण देवळात आल्या आल्या त्याला संचार झाला आणि संचारात त्यांनी मामांना बोलाविले. ''अरे तुझ्या वडीलांनी तुला सांगितले होते की नाही की, तुझे काम झाल्यावर दर आमावस्येला आप्पाच्यावाडीस जात जा म्हणून, मग गेलास का ? त्याचे हे प्रायश्चित्त आहे. याच राखेतून काढून देतो जा तू कागलला.'' हे कागल गांवदेखिल देवकुतेस माहित नव्हते. कागलला मामांची मेव्हणी होती. ती पण बोलावत होती. परत कुरूंदवाडला आल्यावर मामांनी कागलला जाण्याचा निर्णय घेतला. प्रश्न होता तो मामांच्या आईचा त्यांना परक्या घरात रहाणे प्रशस्त वाटत नव्हते. पण त्या थोर मनाच्या बाईने प्रसंग लक्षात घेऊन येण्याला संमती दिली. त्यावेळी मामांची दुसरी मुलगी शशीकला ही टाईफॉईडमधून उठली होती. तिला घेऊन जायचे म्हणजे गाडीची आवश्यकता होती. त्यावेळी पेट्रोल अतिशय महाग व दुर्मिळ होते. टॅक्सी करणे अशक्य होते. मामांचे स्नेही व गावातील एक मान्यवर व्यक्ती श्री. एल. पी. कुलकर्णी साहेब यांनी पेट्रोल घालून आपली गाडी दिली आणि मामा कागलला आले.

मामांच्या मेहुणीचे घर तसं मोठं होतं पण मनाचा मोठेपणा त्याहूनही मोठा होता. पतीच्या मागे चार मुलांचा संसार त्या चालवित होत्या. तरीही त्यांनी आपली बहिण म्हणजे मामांची पत्नी संकटात असताना सामावून घेतले. त्यावेळी मामांच्या पत्नी दिवसात होत्या. त्यावेळेपासून मामांनी कारीकोळला मिळालेल्या नाथांच्या आज्ञेप्रमाणे अमावास्या सुरु केली. मामा प्रथम ज्यावेळी अमावस्येस गेले ती चैत्र अमावास्या होती. दुसरे दिवशी पाडवा होता. स्वतःचा जेवणाचा डबा घेऊन ते जायचे व देवापुढे बसून भजन म्हणायचे. कोण येईल त्यांना भंडारा द्यायचा आणि डबा खाऊन परत यायचे. असे होता होता आज त्याचा वेल गगनावर गेला आहे. ती हकीकत पुढे स्वतंत्रपणे येईलच.


## पुनश्च हरी ॐ

शेतीकडचे ताणतणाव अजून कमी झाले नव्हते. त्यात एकच प्रामाणिक व जीवाला जीव देणारा रयत मामांना भेटला. तो म्हणजे ज्योती रामा घाटगे. हळूहळू परिस्थिती निवळत चालली. थोडे फार धान्य यायचे ते मेहूणीच्या घरी आणून टाकीत. पुढे मामांना १४ एप्रिल १९४८ ला मुलगा झाला. त्याच्या जन्माच्या आधी विनाश झाला होता तसे पुढे कधी होऊ नये





प. पू. रामराय केळकर महाराज



मामांचे गुरूतुल्य जेष्ठ बंधू



मामांचे कनिष्ठ बंधू



बंडोपंत शिंदगी (मामांचा भाचा)



१९७६ साली घोसरवाड मुक्कामी मामा व मामींनी केलेला सोहळा



घोसरवाडच्या यज्ञातील पूर्णाहुती



घोसरवाडच्या कार्यक्रमाच्यां वेळी निघालेली मिरवणूक

म्हणून आजीने त्याचे नांव 'अविनाश' ठेवले.

आता सहा महिने उलटून गेले होते. स्वतंत्र बिऱ्हाड करणे आवश्यक होते. मामा घराच्या शोधात होते. मध्यंतरीच्या काळात कागलचे नामांकित व प्रतिष्ठीत वकील श्री. व्ही. जी. नाडगौडे (ती. तात्या व रावसाहेब मामा) यांचा परिचय झाला होता व तो वाढलाही होता. श्रीयुत रावसाहेब नाडगोंडे यांच्या पत्नी सौ. इंदूताई ही मामांची भाची. ती त्यांना 'मामा' म्हणून हाक मारायची म्हणून त्यांचे नांव मामाच पडले. त्यांच्या ओळखीने एक छोटेखानी घर मिळाले. ते घर थोडे अचकूलच होते. तिथून सध्या जे महावीर टॉकीज आहे. त्याच्या तिकीट ऑफिसमध्ये बिऱ्हाड हालविले. तिथे पलीकडे थिएटरचे काम चालू होते. त्यामुले परत कोगेकरांच्या वाड्यात रहावयास गेले. ती तात्या आणि रावसाहेब यांच्या ओळखीने त्यांचे परममित्र श्री रतनचंद बाळाराम शहा. यांची ओळख झाली. त्यांच्यामुळे कोगेकरांचा वाडा रहावयास मिळाला. शहांची पुढे इतकी मैत्री झाली की, दोघे कोणतीही गोष्ट परस्परांच्या सल्याने करीत असत. शेटजींची मोठी शेती असलेने कोल्हापूरच्या व्यापारांचा संबंध येत असे. तात्यासाहेब पाटणे नावाचे व्यापारी मामांच्याकडे येऊ लागले. त्यांचा परिचय वाढत गेला. आता मामांनी परत कोगेकरांचे घर सोडून ब्राह्मणपूरीत अग्निहोत्री वकीलांचे घरी बिऱ्हाड हालविले होते. ते देखील सहा महिन्यांसाठीच होते. तिथून ते आळतेकरांचे वाड्यात आले. येथे ते थोडे स्थिरस्थावर झाले. हे आळतेकरांचे घर नाडगोडांच्या घरासमोरच होते. त्यामुळे नाडगोडांच्या घरात येणे जाणे अधिक वाढले. रात्री जेवण झाले की, ते नाडगोडे यांचे घरी जमणाऱ्या मंडळीत सामील होत. श्री. ल. बा. जोशी (वैद्यबुवा) एक वैद्यराज त्यांच्याकडे येत असत. तसे ते त्यांचे फॅमीली डॉक्टरच होते. मामांची व त्यांची वेव्ह लाईन जमली.

त्यांचेही ते फॅमिली डॉक्टर झाले. गल्लीतील लोकांना मामांचा परिचय झाला. शेजारी श्री. विठ्ठल कुलकर्णी कोगनोळीकर नावाचे मोठे जमीनदार रहात होते. त्यांची व त्यांच्या मातोश्रींची देवावर व मामांच्यावर नितांत श्रद्धा होती. दर यात्रेला त्यांच्या मातोश्री आप्पाच्यावाडीला येत असत आणि आपली सेवा म्हणून गुळाची ढेप देत असत. आजही त्यांच्या नातवांनी

ही परंपरा चालू ठेवली आहे. त्यांचे आप्पाचेवाडीस जाणे सुरूच होते. अधूनमधून त्यांच्या दैवी सामर्थ्याचा परिचय होऊ लागला. समोर दत्ता सिद्धनेरलीकर नावाचे गृहस्थ रहात होते. बरेच दिवस त्यांना मूल नव्हते. मामांना एकदा स्वप्न पडले. त्या स्वप्नात 'अरे दत्ता सिद्धनेरलीकरला मुलगा होतोय म्हणून सांग व नारळ दे.' त्याप्रमाणे मामांनी त्यांना बोलावून नारळ दिला व पुढे त्यांना मुलगा झाला. अद्याप ते आप्पाचेवाडीत येत असून सांवत्सरिक यात्रेत त्यांचा सहभाग असतो. वैद्यबुवांच्या पलिकडे जोशीबुवा नावाचे गृहस्थ रहात होते. बुवा हे स्वत: एक सत्पुरुष होते. त्यांना वाचासिद्धी होती. त्यांचा मुलगा जी. एन. जोशी उर्फ काका एक उत्तम शिक्षक होते. त्यांचा मुलगा त्यांनी सायन्स साईडला घातला, तो हुषार होता पण सायन्स साईडला त्याची प्रगती नव्हती. काकांनी मामांना कुंडली दाखविली. मामांनी सांगितले की हा सायन्स साईडचा मुलगा नव्हे. याला आर्टस्‌ला घाला एक दिवस डीन होईल. आणि आज तो देवचंद कॉलेजमध्ये इंग्रजीचा डीन म्हणून काम करतो.

तात्या नाडगोंडेची भाची उषा कांही दिवस त्यांच्याकडे रहात होती. एक दिवस तिला सकाळपासून उचकी लागली. प्रत्येक मिनिटाला तिला उचकी लागायची. त्यामुळे ती हैराण झाली होती. सर्व डॉक्टरी उपाय झाले पण काही फरक पडला नाही. शेवटी तिला मामांचेकडे आणले. मामा त्यावेळी पूजा करीत होते. तिला बसायला सांगितले. थोड्यावेळाने पूजा झाल्यावर आरती झाली आणि महाराजांना विनंती करून तिच्या भोवती भंडाऱ्याचेकडे केले आणि तिला उद्देशून म्हणाले, ''एक तासाची मुदत आहे तुला, झाड सोडलं पाहिजे.'' आणि तिच्या कपाळाला भंडारा लावला. हळूहळू तिचीउचकी कमी होत गेली आणि तासाभरात तिची उचकी थांबली.

मामा शेतीच्या कामासाठी म्हणून अर्जुनीला जात असत. वाटेत शिरगुप्पी लागे. शिरगुप्पीला व्यंकटराव कुलकर्णी नावांचे प्रतिष्ठीत ग्रहस्थ होते. ते तलाठी पण होते. मामांची व त्यांची ओळख वाढून आता त्यांचा घरोबा निर्माण झाला होता. व्यंकटराव कुलकर्णी, शिरगुप्पीकर हे एक आगळं वेगळं व्यक्तीमत्व होते. व्यवसायाने तलाठी असल्याने म्हणा अगर संगतीचा परिणाम म्हणून म्हणा. ते अतिशय सावध असत. कोणालाही सहजासहजी



लावून घेत नसत. अधिकार आणि पैसा या दोन्ही गोष्टी हाताशी असलेने त्यांच्या मुळच्या सात्विक स्वभावांवर मळभ चढले होते. त्यांनी आप्पाचेवाडीचे नाव खूप लोकांकडून ऐकले होते. तो धनगरांचा देव म्हणून ओळखला जात असलेने आपणाहून जाऊन सोहळा पहावा असे त्यांना कधी वाटले नाही. भंडारा देखील चिमटीत धरून पुसटपणे लावून घेत असत. मात्र ते एवढे ऐकून होते की, घोसरवाडचे एक ब्राह्मण आप्पाचेवाडीला यात्रेला न चुकता येतात आणि ते मात्र अतिशय निस्सीम भक्त आहेत. मामांच्या संगतीने ते अमावस्येला येऊ लागले. त्यावेळी विशेष माणसे नसल्याने अन्नदान फारसे होत नव्हते. व्यंकटराव शिरगुप्पीकर हे पहिले गृहस्थ की ज्यांनी मामांना अन्नदानाच्या बाबत मदत केली. मामा चांगले ज्योतिषी आहेत याचीही माहिती त्यांना होती. त्यांचा विश्वास एक घटनेने दृढ झाला. शिरगुप्पीकर आण्णांना चौथी मुलगी झाली आणि त्यांच्या पत्नीला काहीतरी बाधा झाली. ती झालेल्या मुलीला घ्यायला तयार होईना. जी बाई मान उंचावून पण आपल्या पतीकडे न पहाणारी, शालीन गृहिणी होती. ती त्या बाधेमुळे नवऱ्यास अद्वातद्वा बोलू लागली, ओरडू लागली, दंगा करू लागली. मामा इकडे कागलात होते. देवापुढे पूजा करत बसले असताना त्यांना एकदम देवाची सूचना झाली. ते आपल्या आईला म्हणाले, ''आत्याबाई शिरगुप्पीकर काहीतरी संकटात आहेत बघ. आत्ता बोलवायला त्यांचा माणूस येईल. मला तिकडे जावे लागेल. जेवण तयार आहे ना ?'' एवढे म्हणून ५ - १० मिनिटे गेली असतील नसतील एवढ्यात आप्पाच्यावाडीहून देवाचा सेवक 'भीमा माळी' आला त्याच्याच मागोमाग शिरगुप्पीकरांचा माणूस मामांना बोलवायला आला. ''आण्णांना मुलगी झाली आहे. मुलीची आई मुलीला जवळ घ्यायला तयार नाही. काय झाले ते कळत नाही तुम्हाला घेऊन यायला सांगितले आहे.'' जेवण करून सर्वजण निघाले. मामा शिरगुप्पीत आण्णांच्या घरी पोहोचले. चौकातून आत जाताच कॉटवर झोपलेल्या त्यांच्या सौ. एकदम उभे राहून ओरडू लागल्या. दात ओठ खात हाताच्या मुठी वळत मामांना उद्देशून त्या म्हणू लागल्या, ''तू इथे कां आलास?'' तो त्यांचा आवेश बघून सर्वजण घाबरले. जी बाई सर्वांना आदरातिथ्याने, बोलत असे त्या बाईचा हा असा अवतार अपूर्वच होता. मामा

तडक माजघरात गेले आणि तितक्याच आवेगाने हातातला भंडारा त्यांच्या डोक्यावर उधळीत म्हणाले, ''ए तेल्या कुणाला भीती दाखवतोस ? हे बघितलंस का हातातला भंडारा, तुला एक तासाची मुदत आहे. तुझ्या तू जागेवर जाऊन बैस नाहीतर नाथांशी गाठ आहे.'' मामांचे विस्फारलेले, फिरते डोळे, आवेगाने भंडारा फेकण्याचा तो अविर्भाव त्यांचा संतप्त झालेला चेहेरा पाहून ती अंगावर धाऊन आलेली बाई आपल्या कॉटवर जाऊन पडली. मामांनी तिच्या कॉटभोवती भंडारा टाकला व ते बाहेर सोप्यावर जाऊन बसले. त्या बाईला आपल्याला झालेल्या मुलीची आठवणच नव्हती. लहान मुलीला शेजारी रयताची बायको बाळंतीण झाली होती तिथे ठेवले होते. तसा तास दिडतास निघून गेला असेल तोच बेशुद्ध अवस्थेत असलेला माणूस शुद्धीवर आल्यावर डोळे उघडत इकडे-तिकडे ज्या बावचळलेल्या नजरेने बघतो त्या नजरेने बघत त्यांनी कुणाला तरी हाक मारून विचारले, 'माझी मुलगी कुठे आहे ?' सर्वांना फार हायसे वाटले. शिरगुप्पीकर आण्णांचे डोळे कृतज्ञतेने भरून आले. त्यांनी मामांना मिठी मारली व इथेच ऋणानुबंधाच्या गाठी दृढ झाल्या. आण्णांच्या परसात पाण्याची एक विहीर आहे. तिथे त्या तेल्याचे पिशाच्च असावे असा तर्क पहिल्यापासून होता. त्यावर काहीतरी उतारा मामांनी करायला सांगितल्यापासून सर्वकांही व्यवस्थित झाले.

आण्णा आता दर अमावस्येस श्री आप्पाचेवाडीस येथे येवू लागले. तेथील व्यवस्था ते पाहू लागले. आप्पाचेवाडीस माणसे हळूहळू जमू लागली. अन्नदानपण वाढू लागले. पण आता तो खर्च एकाला झेपण्यासारखा नव्हता. देवापुढील भिमा माळीच्या खोलीपासून अन्न दानाची सुरुवात झाली. त्यासाठी कांही भांडी देखील मामांनी खरेदी केली होती. त्या खोलीत बसून मामा लोकांना भंडारा देत असत व लोकांना अडीअडचणीतून मार्ग सांगत असत. कर्णोपकर्णी ही वार्ता सर्वत्र पसरली व ठिकठिकाणाहून माणसे येऊ लागली. बारा लोक मामांनी निवडले व प्रत्येकाला एक अमावास्या वाटून दिली. हीच प्रथा थोड्याफार फरकाने आजही सुरु आहे.

अमावास्येची ही अन्नदानाची परंपरा अखंडपणे सुरु आहे. आणि ती वाढत्या प्रमाणात आहे. बाराशेमध्ये (१२०० रू.) होणाऱ्या अमावास्येला



आता बारा हजार (१२,००० रु.) खर्च येतो. तरी पण ती अनुस्युतपणे चालली आहे. यामागे काहीतरी अनामिक सुत्र असावे, हे नक्कीच. एक माणूस गळाला की, त्याठिकाणी दुसरा आपोआप तयार व्हावा ही नाथांचीच किमया. गोमेचा एखादा कुंठित झाला म्हणून तिची गती कुंठित होत नाही. तशीच ही ईश्वरप्रेरित अन्नदानाची खरी गोम आहे. सध्याचे अमावास्याधारक खालीलप्रमाणे आहेत.

### १) चैत्र अमावास्या - श्री. नाडगोंडे व श्री. सुधाकर कमते

सुधाकर दत्तू कमते हे निपाणीचे रहिवासी असून चैत्र अमावस्येत त्यांचा सहभाग असतो. हा सहभाग त्यांच्या वडीलांच्या पासून आहे. त्यांच्या वडीलांचे नाव दत्तू कामते हे दत्तू कामते मामांच्या निपाणीच्या घराजवळच रहात असत. मामांना ते अक्षरशः देवाप्रमाणे मानत असत. दररोज त्यांना भेटल्याशिवाय आपल्या दिनक्रमाला सुरुवात करत नसत. मामांचे कोणतेही काम असले तर रामाच्या हनुमानाप्रमाणे ते सतत सिद्ध असत. मामांनी सांगितल्याप्रमाणे आपली परिस्थिती नसताना देखील ते अमावास्येमध्ये भाग घेवू लागले. आणि मुलाला पण सांगून ठेवले की अमावास्या कधीही बंद करायची नाही. म्हणून त्याप्रमाणे आजही त्यांची मुले अमावास्या श्रद्धेने करत आहेत. अमावास्या करायला लागल्यापासून 'प्रतिपत्चंद्ररेखेव' त्यांची परिस्थिती सुधारत आहे. मामांच्यावेळपासून हे अमावास्या करीत आहेत. किंबहूना मामांच्या सुरुवातीच्या काळात ज्यांनी मदत केली ते हे नाडगोंडे. ती. तात्या व रावसाहेब नाडगोंडे हे कागलचे प्रतिष्ठीत वकील. तरीपण रावसाहेब आप्पाचेवाडीस यात्रेच्यावेळी तीन दिवस येऊन रहात आणि पाणी आणण्यापासून सर्व सेवा ते करीत. या अमावस्येला सोंडपापासून ते घुमटापर्यंत-भिमाबाईच्या देवळापर्यंत दिंडी काढली जाते. ही भीमाबाई पंढरीची. नाथांच्या आज्ञेने आप्पाचीवाडी शोधत आली. तिच्या पुण्यतिथीलाच दिंडी निघावी हा देखील एक ईश्वरी संकेत आहे. या दिंडीला करडळ्याचे भजनी मंडळाचा सहभाग प्रामुख्याने असतो. गेली. ३० वर्षे या दिंडीचा कार्यक्रम सुरु आहे. दिवसेंदिवस हे वाढत चालले आहे. दिंडीतून अनवाणी येणाऱ्या पायिकांना लोक उत्स्फूर्तपणे लाडू, सरबत, लस्सी पाजत असतात.

**२) वैशाख अमावास्या - श्री. शुक्ल योगेश शामराव**

सध्याच्या राजाभाऊ शुक्लांच्या आजोबांच्यापासून ही अमावास्या सुरु आहे. सध्या राजाभाऊंना भेडसगांवकरही येवून मिळाले आहेत.

**३) जेष्ठ अमावास्या - श्री दत्तवाडकर, श्री नवलीहाळकर व शिपूरचे श्री. पाटील.**

दत्तवाडकर हे मामांच्या अंतरंगातले भक्त आहेत. ते एकदा त्यांच्या सासूबाईंच्या सांगण्यावरून आप्पाचेवाडीस आले आणि ''देव पहाण्यासाठी गेलो आणि देव होवोनचि ठेलो'' या परिस्थितीसारखी त्यांची स्थिती झाली. गेली २० वर्षे अमावस्येची व्यवस्था पाहणे. यात्रेची व्यवस्था पहाणे, हिशेब ठेवणे या गोष्टी अतिशय चोखपणे आणि निस्पृहतेने त्यांनी केल्या आहेत. सध्या ते पुण्यात असून दर अमावस्येस अजून येतात. त्यांची अध्यात्मिक उपासना अद्यापही चालू असून त्यांना भुक्तिची प्राप्ती झाली आहे. त्यांना आता परतवंड पण झाले आहे. ते आता मुमुक्षू झाल्याने सोलीव आनंदाचा आस्वाद घेत आहेत.

अनंतराव नवलीहाळकर हा एक कर्मनिष्ठ माणूस, कष्ट करून निपाणीला पोट भरत होता. मामांच्या सांगण्यावरून अमावस्येस येऊ लागला. निपाणी ते आप्पाचीवाडी पर्यंत एस. टी. ने येण्याएवढे पैसे त्यांच्याकडे नसायचे. परंतु दोघे नवरा-बायको चालत अमावस्येस यायचे. पडेल ते काम करायचे व परत चालत जायचे. ही सेवा नाथांच्या चरणी रूजू झाली आणि बँक ऑफ इंडियामध्ये त्यांना शिपाईची नोकरी मिळाली. तिथून त्यांची परिस्थिती सुधारली. अद्याप पावेतो त्यांनी अमावास्या व यात्रेची सेवा अव्याहतपणे चालू ठेवली आहे. नाथांच्या अविरत सेवेमुळे आणि दृढ श्रद्धेमुळे जन्मसार्थकीची वाटच त्यांना सापडली.

बळवंतराव पाटील हे शिपूरचे पाटील गांव कामगार पाटील होते. मामांच्या संगतीमुळे त्यांना देवाची आवड निर्माण झाली. ते ज्येष्ठ अमावस्येच्या यज्ञात आपलाही हविर्भाग देतात.



**४) आषाढ अमावास्या - श्री. कुबेर (श्रीमती कमल व. कुबेर)**

नाथांची सेवा यांच्या घराण्यात तीन पिढ्या चालत आली आहे. सध्याच्या कुबेरांचे आजोबा मामांच्या वडीलांचे पासून घोसरवाडच्या सेवेला येत असत. त्यांना मुलगा नव्हता. मामांच्या वडीलांनी ओटीत नारळ घातला आणि त्यांना मुलगा झाला. त्यांचे नाव वसंत कुबेर. त्यांनी आपले घराणे वर आणलेच आणि आपल्या पुढच्या पिढीच्या मनात नाथभक्तिचे बीज रूजवले. आपला देह ठेवताना आपल्या मुलांना सांगितले की, 'अमावस्येची सेवा काही झाले तरी सोडू नका.' असे ऐकावयास मिळाले. ही सेवा अद्याप त्यांनी चालू ठेवली आहे.

**५) श्रावण अमावास्या - श्री. शिपूरकर मामा**

ही मामांची अमावास्या. जेवढ्या चांगल्या रितीने अमावास्या करता येईल तेवढी ते करत असत. जितके जास्त लोक जेवतील तितका त्यांना आनंद व्हायचा. ''अन्नदान'' हाच नाथांचा मंत्र आहे. असे ते सांगत असत. १९४८ सालापासून ते ९-९-१९८० पर्यंत अमावास्या चुकवली नाही. याला अपवाद म्हणजे ते जेव्हा हॉस्पिटलमध्ये होते तोच काय तो. नाही म्हणायला एकदा कारिकोळला गेले असताना दोन दिवसांनी अमावास्या होती. कारिकोळचे लोक त्यांना रहायचा आग्रह करीत होते. म्हणून त्यांनी आपल्या चिरंजीवांच्या हाती भंडारा देऊन 'तू अमावस्येला जा' म्हणून सांगितले आणि त्याचबरोबर निपाणीचे एम. जी. जोशी जे अक्कलकोटच्या गजानन महाराजांचे शिष्य होते. त्यांना पाठविले. आज ती अमावास्या सुरु आहे. मामांची दोन मुले व व्ही एन. कुलकर्णी (नेसरीकर), जावई हे तिघे मिळून ही अमावास्या संपन्न करतात.

**६) भाद्रपद अमावास्या - श्री. बापू जोशी**

बापू जोशी हे मूळ कुरूंदवाडचे. हा मनुष्य मोठा जिद्दीचा. कष्टाला कधी मागे पडणार नाही. प्रथम मिलीटरीत होते. त्यांची अतिशय हालाखिची परिस्थिती होती. पण कोल्हापूरात येऊन त्यांनी कष्टानी आपले नशीब घडविले. आप्पाचेवाडीप्रमाणे अनेक देवालयांना त्यांनी देणग्या दिल्या, व अन्नदानही केले. ते जेवणाचे कॉन्ट्रॅक्ट घेत असत. अमावस्येचेही कॉन्ट्रॅक्ट त्यांच्याकडे

येऊ लागले. त्यानिमित्ताने त्यांचे अप्पाचेवाडीस येणे जाणे वाढले. नाथांच्याबद्दलची त्यांची भक्ती वाढत गेली. कारण मुळचे मन व स्वभाव हा भक्तीप्रवणच होता. एका अमावस्येची सेवा त्यांनी स्विकारली. (भाद्रपद) यानंतर १५ दिवसातच सांत्सरिक यात्रा असते. त्यातही त्यांचा सहभाग असायचा. त्यांच्यामागे त्यांची मुलगी श्रीमती आडीवरेकर ही अमावास्या चालवत आहे. ही अमावास्या पूर्वी आबा कुंभोजकर आणि मुजुमदार असे दोघे मिळून करीत असत. आबांची देवाशी संबंध त्यांच्या वडीलांचेपासून होता. मामांच्या वडीलांना अनुग्रहासाठी चिमडला नेणारे दत्तोपंत कुंभोजकर हे त्यांचे वडील होत. श्री. मुजुमदारांची श्रद्धा शेवटपर्यंत होती. पण त्यांच्या मुलाचे इकडे दुर्लक्ष झालेने सेवा खंडीत झाली.

### ७) अश्विन अमावास्या - श्री. घोसरवाडकर

यात्रा झाल्यावर ही अमावास्या दिवाळीत येत असलेने या अमावस्येला ठराविकच लोक येतात. उरलं सुरलं घेऊन ही पूर्वी देवाचीच अमावास्या केली जात होती. पण सध्या मनु, नन्दू व प्रकाश, प्रमोद व इतर सर्व घोसरवाडकर यांनी पुढाकार घेऊन सबंध घोसरवाडकरांची म्हणून अमावास्या करण्याचे ठरविले असून त्याप्रमाणे ते करतात.

### ८) कार्तिक अमावास्या - श्री. शशिकांत करड्याळकर (पाटील)

करड्याळचे शशिकांत पाटील हे एक सधन शेतकरी आहेत. ते ही अमावास्या चांगल्या रितीने करतात. जवळ जवळ त्यांचा निम्मा गाव अमावस्येस येतो. चैत्र महिन्यात निघणाऱ्या दिंडीत करड्याळच्या भजनी मंडळाचा मान आहे. ही परंपरा गेली ३०-३२ वर्षे चालली आहे. या कार्तिक अमावस्येस 'दीपोत्सव' करण्याची प्रथा आहे. संध्याकाळी अगदी सदरेपासून, वाडा, भागुबाईंचे देऊळ, लक्ष्मीचे देऊळ, घुमट आणि भीमाबाईचे देऊळ इ. ठिकाणी पणत्या लावल्या जातात. तो सोहळा नयनाला मोठा सुख देणारा असतो. यामागे एक छोटासा इतिहास आहे.

मामांनी हा दीपोत्सव सुरु करण्याआधी एक प्रतिष्ठीत गृहस्थ परंपरेने पूर्वी दीपोत्सव करत असत. काही कारणास्तव ते दीपोत्सव बंद होणार होता.



त्याचवेळी मामांना देवाने स्वप्नात येऊन सांगितले की, ''कार्तिक अमावस्येला दीपोत्सव कर.'' त्या गोष्टीला आता ३५-४० वर्षे होत आली असतील. नाथांना आवडणाऱ्या गोष्टी कुणातरी भक्तांकडून कशा करवून घेतात याचे हे नि:संदिग्ध उदाहरण आहे.

### ९) मार्गशीर्ष अमावास्या - श्री. बंडोपंत उत्तूरकर, श्री. प्रभाकर जोशी

हे एक संत पुरुष होते व महान दत्तभक्तही. दर पौर्णिमेस ते नृसिंहवाडीस जात व दर अमावस्येला ते आप्पाच्यावाडीस जात व त्यांचा लोकसंग्रह विलक्षण होता. ते स्वत: ज्योतिषी हाते. मामांना ते गुरुस्थानी मानत. ते एक हकीकत सांगत की, एकदा ते मामांच्याकडे गेले असता कुणीतरी ज्योतिष विचारायला मामांच्याकडे आले होते. मामा बंडोपंतांना उद्देशून म्हणाले, 'बंडोपंत सांगा यांचा प्रश्न.' बंडोपंतांच्या डोळ्यात डोळे घालून मामांनी समोर आलेली कुंडली त्यांच्याकडे सरकवली. बंडोपंतांनी त्या माणसाचा प्रश्न अचूक सोडवीला.

बंडोपंतांनी उत्तूरला आपल्या घराजवळ एक दत्तमंदिर बांधले असून तिथे मामांचा फोटो लावला आहे. त्या दत्ताचा उत्सव ते वर्षातून एकदा करतात. त्यांनी ३ वर्षापूर्वी देह ठेवला. तरी त्यांचे बंधू श्री. प्रभाकर हे तितक्याच श्रद्धेने अमावास्या करतात.

### १०) पौष अमावास्या - श्री. शिरगुप्पीकर

व्यंकटराव शिरगुप्पीकरांची ही अमावास्या. अमावस्येचा संस्थापिकातले एक ज्येष्ठ संस्थापक. प्रथमपासून त्यांनी अमावस्येला सुरवात केली आहे. अद्याप ती अमावास्या त्यांची मुले तितक्याच जोमाने करतात. ही अमावास्या पूर्वी दोन दिवस करावी लागे. कारण माघ प्रतिपदेला (शुद्ध) वाड्यात अभिषेक असतो. तो अभिषेक झाल्यानंतर प्रसाद देण्याची प्रथा होती. त्यामुळे त्यांना दोन दिवस अन्नदान करावे लागे. पण महाराजांची योजना अशी की, श्री. बाबुराव कोडणीकर देशपांडे नावाचे गृहस्थ मामांच्याकडे येत असत. तेही तलाठी होते. त्यांनी मामांच्याकडे काही सेवा मागितली आणि मामांनी त्यांना माघ शुद्ध प्रतिपदेची सेवा दिली. त्यावेळेपासून हा प्रसाद होत आहे. त्यांच्या माघारी त्यांची मुले हा प्रसाद करत आहेत.

वर माघ प्रतिपदेला होणाऱ्या अभिषेकाचा उल्लेख आला आहे. त्यामागे एक इतिहास आहे. वाड्यातील सिंहासनाला थोडीशी भेग गेली होती. त्यामुळे त्याचे वज्रलेपन करणे आवश्यक होते. गावातील प्रतिष्ठीत माणसे, लक्ष्मण खोत व मामा इ. लोकांनी ते शास्त्रोक्त पद्धतीने वज्रलेपन केले. सोहळा उत्तम झाला. एकवर्ष उलटल्यानंतर पौष अमावस्येला प्रतिष्ठीत लोकांत चर्चा झाली. मागच्या वर्षी वज्रलेपन झाले आणि आता यंदा काय ? असा प्रश्न त्यांच्या मनात आला. सर्वानुमते अभिषेक करायचे ठरले. कुणीतरी म्हणाले, 'उद्या तर अभिषेक, मामांना कसे कळवायचे ?' तेव्हा लक्ष्मण खोत म्हणाले, 'आम्ही एक विसरलो असू, देवाला कळवायला येत नाही का ?' त्याप्रमाणे रात्री मामांच्या कानावर शब्द आले. 'उद्या आप्पाच्यावाडीस ये' एकदा नव्हे तर २-३ वेळा असे शब्द कानावर आले आणि दुसऱ्या दिवशी मामा सकाळी तेथे अभिषेक सोहळ्यापूर्वी गेले. तेव्हा सगळ्यांना आश्चर्य वाटले.

**११) माघ अमावास्या - श्री. जयंत कुबेर व श्री. रवी जोशी**

सध्या ही अमावास्या हे दोघे मिळून करत आहेत. यापूर्वी ही अमावास्या भालचंद्र अष्टेकर व त्यांचे सर्व बंधू करत होते. वडीलांच्या मागे बरेच दिवस त्यांनी अमावास्या केली. महाराजांनी त्यांच्या वडीलांना मोठ्या संकटातून वाचवले हाते. त्या कृतज्ञतेप्रित्यर्थ आमरण त्यांनी अमावास्या केली.

**१२) फाल्गुन अमावास्या - श्री. दिलीप कदम**

हे मारूतराव कदमांचे चिरंजीव. मामांचे निपाणीतील नि:स्सिम भक्त. मोठे तंबाखूचे व्यापारी. अन्नदानाची त्यांना फार आवड. ते अगदी दणदणीत अमावास्या घालत असत. आता त्यांचे चिरंजीव अमावास्या घालतात. आता २-३ वर्षे झाली निपाणीचे कांही भक्त मंडळी आपली सेवा त्यांच्यात देतात.

पांगिरे, ता. चिकोडी, जिल्हा बेळगांव येथील हरी मल्हार कुलकर्णी उर्फ गागू. हे आपाच्वेवाडीस अनेक वर्षे अमावस्येस येत आहेत. त्यांच्या घराण्यात भजनाची परंपरा होती. त्यांचे काका हे नामांकित भजनी हाते. त्यामुळे हरी मल्हार कुलकर्णी त्यांच्या लहानपासूनच त्यांच्यावर संगीताचे संस्कार होत होते. त्यात मूळचा आवाज अतिशय गोड आणि मुलायम. त्यांनी अनेक



लोकांची भजने. गाणी, भावगीते ऐकून व त्यांचा धांडोळा घेऊन ती आत्मसात केली. त्यामुळे त्यांचे एक अद्वितीय रसायनच तयार झाले आहे. त्यामुळेच ते आपल्या गीतांनी अनेकांना मंत्रमुग्ध करीत. या गोड आवाजात त्यांची भक्तीप्रवण वृत्ती असल्याने दुग्धशर्करा योगच झाला आहे. गागूचे गाणे म्हणजे आप्पाच्यावाडीचे एक आकर्षणच आहे. दर अमावस्येला ते गेली ३०-४० वर्षे येत होते. पण सध्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे व रहायला लांब गेल्यामुळे दर अमावस्येला येणे जमत नाही. तरीही मामांची श्रावण अमावास्या, आप्पाचेवाडीची यात्रा व घोसरवाडची यात्रा ते चुकवत नाहीत. त्यांच्या ईश्वरनिष्ठेमुळे त्यांचा 'परमार्थ सांधून प्रपंच बरवा' झाला आहे.

रसुल मुल्ला वास्तवीक यवन, पण हरि भजनात इतका रंगलेला की लोक त्याला कबीरच म्हणत. तबला इतका सुरेख वाजवीत की, तबला प्रत्यक्ष बोल बोलतो की काय असं वाटावे. प्रसिद्ध तबला नवाज रूकडीकर यांच्याकडून त्यांनी शाबासकी मिळविली होती. त्यांच्या तबल्याच्या तपस्येबद्दल सांगायचे झाले तर 'दौतीची शाई हाताला लागण्यापूर्वीच तबल्याचीच शाई त्यांच्या हाताला लागली होती'. एवढ्या लहानपणापासून ते तबला वाजवत होते. तेही दर अमावास्या व यात्रेस न चुकता येत असत.गागू आणि रसुल यांची जोडी म्हणजे समसमा संयोग झाला असेच होते. रसुलचा मुलगा नसीर याने ही परंपरा आजही चालू ठेवली आहे.

शिरगुप्पीकर आता अमावस्येस रूळले होते. पण प्रापंचिक जबाबदाऱ्या आणि कटकटी माणसांचे मन बेचैन केल्याशिवाय रहात नाही. बद्ध आणि आर्त भक्ताला प्रापंचिक कटकटी दूर ठेवता येत नाहीत. त्याला भक्तीपासून थोडेसे विचलीत करतात. ती. आण्णा यांच्या थोरल्या मुलीचे लग्न कांहीकेल्या जमत नव्हते. आण्णांना ती काळजी पोखरत होती. लोक असे हिकमती असतात की दुसऱ्याच्या वर्मावर बोट ठेवण्यात त्यांना आनंदच वाटतो. आण्णांच्या मित्रांपैकी कुणीतरी आण्णांना डिवचले, ''का हो, शिपूरकर मामा जगाला सांगतात आणि तुमच्या मुलीच्या लग्नाचे का सांगत नाहीत ?' आण्णांनी ही हकिकत बोलता बोलता मामांच्या कानावर घातली. मामांना थोडेसे वाईट वाटले. थोडासा विचार करून म्हणाले, 'आपण देवलाच

विचारूया' आणि एके दिवशी आण्णांना घेऊन ते आप्पाच्यावाडीस कौल लावायला गेले. कौल लावला, कौल काही होईना. दोन्ही सुपाऱ्या पोटाशी चिकटून राहिल्या. देवाकडे बघत आणि हात करत मामा देवाला म्हणाले, 'महाराज पर्यायाने लोक तुम्हाला नावे ठेवतात. आप्पाच्यावाडीत बसून जगाचे प्रश्न सोडविता मग जवळच्या स्नेह्याचे प्रश्न सोडविता येत नाही का ?' असा बोलतुम्हालाच लावतात तेव्हा उत्तर द्या.' त्याचबरोबर देवाच्या उजव्याहाताला असलेली चांदीची गदा गरगर फिरली व तिने तीन फेऱ्या पूर्ण केल्या. एक रौद्र स्वरूप मामांना दिसले. दोन मिनिटे सन्नाटा निर्माण झाला आणि मामांनी आणि आण्णांनी देवापुढे मस्तक टेकले आणि हात जोडून मामा म्हणाले, 'महाराज तुम्हाला पाहिजे त्यावेळी करा आमचे काही म्हणणे नाही.' वर्षभरात आण्णांच्या मुलीचे लग्न झाले.

आण्णांचे एक नातेवाईक अतिशय प्रतिष्ठीत होते. त्यांचे नांव नारायणराव कुलकर्णी. त्यांच्याकडे भोजकर वकील म्हणून एक प्रसिद्ध वकील अधून-मधून येत होते. भोजकर वकीलांची तब्येत वरचेवर बिघडायची म्हणून त्यांना मामांना कुंडली दाखवायची होती. त्यांना माहित होते की, मामा व्यंकटराव शिरगुप्पीकरांचेकडे येतात व आत्ता आले आहेत. ही बातमी नारायणराव कुलकर्णीला कळली. नेमके त्याचवेळेस भोजकर वकीलही तेथे आले होते. नारायणरावांना भोजकर वकीलांनी गळ घातली की, मामांना बोलावून आणा. नारायणराव आण्णांचेकडे गेले. मामा नेमके त्यावेळी अर्जुनीला निघून गेले होते. आण्णा म्हणाले, आत्ताच ते गेले. नारायणराव थोडे चुकचुकले. पण तिथे असलेल्यापैकी कुणीतरी म्हणाले, आण्णांचे आणि त्यांचे संबंध असे आहेत की, आण्णांनी बोलवावयास लावून दिले तर ते निम्म्या वाटेतून परत येतील. आण्णांना माणूस पाठवून बोलावून घेणे भाग पडले. मामा निम्म्या वाटेवरून परत आले. आण्णांनी सर्व हकीकत सांगितली आणि नारायणराव व भोजकर वकील यांना घरी बोलवण्यास लावून दिले. नारायणराव व भोजकर वकील आण्णांचे कडे आले. नारायणरावांनी भोजकर वकीलांची ओळख करून दिली आणि सांगितले की, 'यानां काही विचारायचे आहे'. 'दाखवा कुंडली' मामा सरळपणे म्हणाले, कुंडली बघता-बघता मामांनी



सहज विचारले, नेमका काय प्रश्न आहे ?' ते म्हणाले, 'माझं मरण केंव्हा आहे सांगा.' हा प्रश्न ऐकताच त्यांच्या मनातील तिढा (किडा) लक्षात आला. मामा म्हणाले मरणाचं नंतर बघू. त्याच्या अलीकडच्या गोष्टी आधी बघू. मामांनी विचारले, 'आमक्या साली काय झाले ? तमक्या साली काय झाले?' त्यावर त्यांनी 'वडील वारले, आई वारली, बंधू वारले' असे सांगितले. आता बघा तुमच्या वडीलांच्या मृत्यूचे साल कळले, आईचे व बंधूंचेही साल कळले. यावरून तुमच्या मृत्यूची तारीख कळली नाही तरी महिना व साल कळायला काही हरकत आहे का ? तुम्हाला रोज मरणाची भीती आहे. असा एक भयंकर रोग तुम्हाला आहे. तुम्ही सांगता की मी सांगू. मामा आवेशाने बोलत होते. तुम्हाला सिव्हियर डायबेटीस आहे की नाही ? डॉक्टरांची परवानगी घेवून या म्हणजे तुमचे मरण सांगतो. असे म्हटल्यावर त्यांनी मामांची आपण उगीच परीक्षा पाहिली याचा पश्चाताप झाला.

शिरगुप्पीकर आण्णा एकदा आजारी पडले. निपाणीचे सर्व डॉक्टर झाले. पण उतार काही पडेना शेवटी कोल्हापूरच्या एस. के. कुलकर्णी (एम. डी.) (छत्रपती क्लिनिक) यांना दाखविले. त्यांनी सर्व चाचण्या घेतल्या आणि एक भयानक निदान केले. आण्णांचे हात पाय सुजलेले होते आणि डॉक्टरांचे निदान होते की, ''कर्करोग'' सर्वजण घाबरून गेले होते. डॉक्टरांनी, ''कांही उपयोग होणार नाही, त्यांना घरी घेऊन जा.'' असे सांगितले. आण्णा पण अतिशय हळवे झाले होते. ही सर्व हकिकत मामांना जेव्हा कळली तेव्हा त्यांना वाईट वाटले. त्यांचे डोळे पाणावले. ''अरे अरे अरे !!! एक भक्त आपल्यातून निघाला'' असे त्यांनी उद्‍गार काढले. मामा आणि त्यांचा थोरला मुलगा आण्णांना बघायला म्हणून कोल्हापूरात गेले. दवाखान्यात गेल्यावर आण्णांची आणि मामांची दृष्टादृष्ट झाली आणि दोघांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. तशा परिस्थितीतही आण्णांनी मामांच्या पायावर डोके ठेवण्याचा प्रयत्न केला. मामांनी त्यांची ती आर्त व कणव आणणारी स्थिती पाहून जणू काही नाथांनाच हाक घातली आणि त्यासरशी अंतरीक स्फूर्तीने व आतल्या आवाजाने मामा म्हणाले, ''आण्णा कसली काळजी करता ? तुम्हाला काहीही झालेले नाही. चला शिरगुप्पीला. अजून तुम्हाला जायला परवानगी नाही.''

असे म्हणून त्यांनी त्यांच्या कपाळाला भंडारा लावला. आण्णांनी गदगदलेल्या भावनेने मामांच्या पायाला हात लावून आपल्या कपाळाकडे नेला आणि मुलाला सांगितले की, 'आजच्या आज डिसचार्ज घ्या, आपण आता घराकडे जाऊ.' आण्णा शिरगुप्पीला आले. सकाळी उठल्यावर भंडाऱ्याची चिमुट तोंडात टाकत आणि ''देवा बोलल्याप्रमाणे कर'' असे म्हणत आणि काही किरकोळ औषधे घेत. आण्णा हळूहळू सुधारू लागले. पायाची, हाताची सूज कमी होऊ लागली. ते आता घरातल्या घरात फिरू लागले. त्यांची उमेद वाढली आणि पुढे ते १२ वर्षे जगले.

मामांचे असेच दुसरे एक मित्र होते. त्यांचे नाव श्री नारायण दत्तात्रय कुंभोजकर उर्फ आबा कुंभोजकर. आबा कुंभोजकरांच्या वडीलांच्यापासून घोसरवाडकर घराण्याचा संबंध होता. त्यामुळे आबा कुंभोजकर हे मामांचे बालमित्र होते. ते अतिशय ऋजू, सज्जन आणि भाविक असा त्यांचा स्वभाव. देवाची भक्ती त्यांच्या मनात आणि रक्तात रूजली होती. मामांच्या वडीलांच्या माघारी मामांच्यावरही हालसिद्धनाथांची कृपा कशी बरसली आहे याचे ते सश्रद्ध साक्षीदार होते.

एकदा ते त्यांचे (आबांचे) स्नेही बावडेकर म्हणून देशपांडे गल्लीत कोल्हापूर येथे रहात होते. वृद्धापकाळामुळे आणि लकवा मारल्याने त्यांना घरातून कोठे बाहेर जाता येत नव्हते. त्यांना एकच चिंता सारखी पोखरत होती. त्यांच्या मुलीचे लग्न ठरत नव्हते. आता ती ३२ वर्षाची झाली होती. आबा कुंभोजकर त्यांचेकडे गेले असताना मामांच्याबद्दल घडलेल्या दैवी गोष्टी ते सांगत होते. बावडेकरांना त्यामुळे मामांना भेटण्याची उत्सुकता आता शिगेला पोहोचली होती. पण हे घडावे कसे ? कारण त्यांना घराबाहेर जाता येत नाही आणि मामा इकडे येण्याची शक्यता फार कमी होती. त्याच दिवशी मामा कोल्हापूरला आले होते आणि आबा कुंभोजकरांना भेटायला म्हणून त्यांच्या घरी गेले. ''आबा कुठे गेले आहेत ?'' असे विचारले बावडेकर नावाच्या मित्राकडे गेले आहेत असे सांगितले गेले. मामांना आबांना तातडीने भेटायचे होते तेव्हा कोणालातरी बरोबर घेऊन ज्या बावडेकरांच्याकडे आबा होते तेथे मामा गेले. बावडेकरांच्याकडे आबा बसलेले पाहून आत गेले. बावडेकर



नवीन मनुष्य कोण आला आहे ? या नजरेने त्यांचेकडे टकमका बघू लागले. आबा मामांच्याकडे बघत म्हणाले, ''आहो ज्यांच्याबद्दल मी तुम्हाला सांगत होतो ते शिपूरकर मामा हेच.'' हे ऐकून बावडेकरांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांच्या मनात कानात अनेक आनंदाच्या भैरी वाजू लागल्याचा भास त्यांना झाला. ''आज चकोराघरी पातली भुकेजली पौर्णिमा.'' अशी त्यांची अवस्था झाली. बावडेकरांनी मोठ्या आदराने मामांना बसायला सांगितले आणि आपल्या व्यथेची कथा त्यांना सांगितली. वडीलांच्या आज्ञेप्रमाणे त्यांच्या मुलीने मामांना नमस्कार केला आणि त्या मुलीला मामांनी १ लाख ''रामनामाचा'' जप करायला सांगितला आणि ''तुझे उत्तम प्रकारे लग्न होईल काळजी करू नको.'' असे आश्वासन दिले. त्या मुलीने मनापासून 'रामनामाचा' जप केला आणि तिला बँकेत काम करणारा चांगला नवरा मिळाला. बँकेतला त्यांचा जावई काही एका अटीसाठी लग्न करत नव्हता. पण ती अट पूर्ण झाल्यावर तो लग्नास तयार झाला. त्यावेळी त्याचे वय सुमारे ३७ वर्षे होते आणि त्यामुळे बावडेकरांच्या मुलीला तो अनुरूप ठरला. श्रद्धेने, तपश्चर्येने कसे फळ मिळते याचे ते एक उत्तम उदाहरण आहे.

## झाकळले नभ मेघवरांनी

मामा आता कागलला आळतेकरांच्या घरात स्थिर झाले होते. शेतीचेही थोडेफार बस्तान बसत आले होते. त्यांचा थोरला मुलगा मॅट्रीकमध्ये शिकत होता. आजच्या काळाप्रमाणे त्यावेळी मुलाच्या शिक्षणाबद्दल त्यांचे आई-वडील फारसे जागरूक नसत. माणसाच्या जीवनामध्ये सुख-दुःख हे चक्र नेमिक्रमाने येत असतात. असा जरा सुखाचा वारा लागतो ना लागतो तोच मामांच्यावर शिपूरच्या शेतीचे एक संकट आले. मामांचा अतिशय प्रमाणिक आणि उजवा हात समजला गेलेला रयत ज्योती घाटगे यांनी एक हकीकत सांगितली. त्यांच्याकडे मुसलमान पट्टी (१२ एकर) नावाची जमीन कसायला होती. शिपूर गावामध्ये परशुरामासारखे फरशी कुऱ्हाड खांद्यावर टाकून लोकांना दहशत देणारा एक गुंड बाबू पवार म्हणून वावरत होता. अजूनही ब्राह्मण व ब्राह्मणेतरांचा पेटलेला वणवा पूर्णपणे शांत झालेला नव्हता. त्याने एक दिवस ज्योती घाटगे यास बोलावून सांगितले की, ''बामणाच्या शेतात

पाऊल टाकशील तर गुडघ्याच्या खालचे पाय तोडून टाकीन.'' ज्योती घाटगे पण माफक धैर्य आणून त्याला म्हणाला, ''मी त्यांचे अन्न खातोय. मला त्यांच्या शेतात जाण्याविना गत्यंतर नाही.'' ही हकीकत त्यांनी मामांना सांगितली. हा बाबू पवार म्हणजे तुरुंगाच्या अनेक वाऱ्या केलेला आणि त्यामुळे निर्ढावलेला गुंड होता. मामांच्यापुढे एक चॅलेंज होते, एक आव्हान होते. काय करावे त्यांना कळेना. ''तुर्तास शेतात जाऊ नकोस.'' एवढेच त्या ज्योतीला बोलले. मामांच्या जीवनाचे विहंगमावलोकन जर केले तर एक गोष्ट लक्षात येते की, त्यांची ज्या ज्या वेळी न सुटणारी कोडी होते त्या त्या वेळी अशी काही संधी त्यांना नाथकृपेने प्राप्त होते की त्यातून ते सहीसलामत सुटतात. एवढेच नव्हे तर त्यांचा वरचष्मा रहातो. यावेळीही असेच घडले. त्यावेळी भाषावार राज्यरचना नसल्यामुळे कर्नाटक-महाराष्ट्र यांचे एकच पोलीस खाते होते. त्यांचे आय.जी.पी. होते मारूतराव कामटे. त्यांनी एकदा मामांना बोलावून भविष्य विचारले होते आणि ते बरोबर आले होते. त्याचवेळी ते पन्हाळ्याला आले आणि कोल्हापूरच्या डी.एस.पी. ना मामांना घेवून येण्यास सांगितले. त्याचबरोबर कोल्हापूरचे डी.एस.पी., डी.वाय.एस.पी. मामांच्याकडे कागलला आले आणि 'तुम्हाला कामटेसाहेबांनी बोलावले असून तुम्हाला घेऊन जायला आम्ही आलो' असे सांगितले. तातडीने मामा त्यांच्याबरोबर गेले. वाटेत गाडीत मामा त्या डी.एस.पी. ना म्हणाले, 'आता मी त्यांचे काय भविष्य सांगू ? माझे मलाच कळेना. डी.एस.पी. मोठ्या उत्सुकतेने म्हणाले, 'काय झाले हो ?' ''अहो कर्नाटकात शिपूर येथे माझी जमीन आहे. तिथे माझ्या रयताला एका गुंडाने तंबी दिली आहे की, जर त्यांच्या शेतात जाशील तर तुझे पाय तोडीन.' त्यावर डी.एस.पी. म्हणाले, 'मामा हे साहेबांच्या कानावर घाला की ! मामा त्यावर म्हणाले की, 'माझेच काम मी कसे सांगू ? तुम्ही.... डी.एस.पी. म्हणाले, आम्ही त्यांच्यापासून २० फूट लांब उभारतो. आमचे काय धाडस होणार. तरीपण साहेब नसताना बाईसाहेबांच्या कानावर ही गोष्ट घालूया. आय.जी.पी. कामटे एवढे मोठे होते की, मुंबईस ते एकदा आजारी पडले असताना त्यावेळचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू त्यांना बघायला आले होते. मामा त्यांच्याबरोबर थेट पन्हाळ्याला गेले. तिथे एकट्याच



बाईसाहेब होत्या. डी.एस.पी. नी ही संधी साधून बाईसाहेबांच्या कानावर ही गोष्ट घातली आणि आपण मिटींगला निघून गेले. त्यावर बाईसाहेब म्हणाल्या, साहेब येऊ देत. त्यांना सांगते. ५५०० पोलीस ज्यांच्या ताब्यात आहेत त्यांना एवढे काम करता येत नसेल तर उपयोग काय ? मिटींग संपवून कामटे साहेब आले. आल्या आल्या बाई साहेबांनी त्यांना सांगितले. '' हे बघा. मामांना आपण नेहमी त्रास देतो. मामांचे एक काम तुमच्याकडे आहे ते करा मग आपण त्यांना आपला प्रश्न विचारू.'' आय.जी.पी. नी ताबडतोब फोन घेतला आणि बेळगांवच्या डी.एस.पी. ना फोन केला. आय.जी.पी. यांचा फोन म्हटल्यावर डी.एस.पी. हडबडून गेले. त्यांनी बाबू पवाराचे नाव मामांचा पत्ता वगैरे सर्व घेतले. आय.जी.पी. नी सांगितले की, चार दिवसात मला दिल्लीला रिपोर्ट पाठवा. दुसरे दिवशी ९-१० चे सुमारास बेळगांवच्या डी.एस.पी. ची गाडी मामांचा पत्ता शोधत आली. कागलच्या राम मंदिरापाशी गाडी उभी करून ते मामांची चौकशी करत आले व मामांना म्हणाले, या बाबू पवारला हद्दपारिचा हुकूम काढू का ?' ते डी.एस.पी. मामांच्या पुढे बसायला तयार होईनात. मामांनी त्यांना बळजबरीने बसवले व स्वत:शी थोडा विचार केला की, आय.जी.पी. च्या हुकूमामुळे हे वादळ ताबडतोब शमेलही पण हा उपाय तात्कालीकचा आहे. आपला कायमचा संबंध त्या 'बाबू पवार'शी आहे. तो कायमचा दुखावला गेला तर पुढे आपल्याला त्रास दिल्याशिवाय रहाणार नाही. असा काहीतरी एक उपाय काढला पाहिजे की, ज्याच्यामुळे त्याला दहशत तर बसली पाहिजे पण तो कायमचा दुखावला जाता कामा नये. एकलव्याने भुंकणाऱ्या कुत्र्यावर मारलेल्या बाणाप्रमाणे. 'त्याने असा बाण मारला होता की, कुत्र्याचे भुंकणे बंद झाले पण त्याला काही इजा झाली नव्हती.' मामांनी डी.एस.पी. ना सांगितले की, त्याला हद्दपार वगैरे काही करू नका. दंडाला काढण्या बांधून कुठल्यातरी वहानातून त्याला गावातून २-३ वेळा फिरवा व त्याच्याकडून बाँड लिहून घेतल्यासारखे काहीतरी करा. त्याप्रमाणे डी.एस.पी. नी त्याला पकडले. त्याला विचारले की, 'तू कुठल्या माणसाला दुखावलेस हे माहित आहे का ?' आम्हाला आय.जी.पी. चा हुकूम आहे. बाबू पवार मनातून सटपटलाच. 'मी.. मी.. चाचरत म्हणाला, मी ज्योती घाटगेला सहज

बोललो होतो. माझा तसा काही इरादा नव्हता. डी.एस.पी. नी दंडाला काढण्या बांधून एका ट्रकातून गावभर फिरवला. सगळ्या लोकांना कळले. हे मामांना त्रास दिल्याबद्दल झाले आहे. मामांची राजदरबारी उच्च स्तरापर्यंत ओळख आहे याची लोकांना जाणीव झाली. बाबू पवाराकडून मामांच्या कुठल्याही कामात मी यापुढे अडथळा आणणार नाही. आणि त्यांचे काही नुकसान झाल्यास मी ते भरून देईन.' म्हटला तर निरर्थक म्हटला तर अर्थपूर्ण बाँड लिहून घेतला. पुढे तो एकदा सामुहिक कारणांमुळे तुरुंगात गेला असताना मामा त्याला भेटायला गेले होते. तुरुंगात असलेल्या त्याच्यासह सर्व लोकांना सोडणार आहेत. याची कुणकुण मामांना होती. तुला दोन दिवसात सोडायला लावतो असे सांगून त्यांनी त्याला सोडवून आणला. त्यामुळे तो मामांचा जानी दोस्त झाला आणि 'खळांची व्यंकटी सांडो' या ज्ञानेश्वरांच्या म्हणण्याप्रमाणे भक्षकाचा संरक्षक झाला.

आणखी एक हकीकत, अंबिके नावाचे एक डी.एस.पी. होते. ते मामांच्याकडे येत असत. हा गृहस्थ पक्का वैष्णव होता. पोलीस खात्यात असूनही त्यांनी तप्त मुद्रांकित वैष्णवाचे आचरण ठेवले होते. तो राघवेंद्र स्वामींचा परमभक्त होता. त्याला बदली हवी होती. एके दिवशी कागलला मामांच्याकडे ते आले. मामा नेमके त्या दिवशी काहीतरी कामानिमित्त आप्पाच्यावाडीला गेले होते. आप्पाच्यावाडीचा ठाव ठिकाणा त्यांनी विचारून घेतला. आणि ते थेट आप्पाच्यावाडीस गेले. कामात असणाऱ्या मामांनी त्यांना सांगितले की, देव दर्शन घेऊन या. मग आपण बोलू. ते देवदर्शनाला घुमटासमोर (तुरबतीसमोर) उभे राहिले. तिथली मुसलमानी पद्धतीची तुरबत पाहून मनात म्हणाले, 'हे ! हे कसले देव, थडगं आहे, याला काय नमस्कार करायचा.' असे म्हणून नमस्कार न करता मागे हात बांधून परत आले. मामांना त्याची काही कल्पना नव्हती. रात्री झोपल्यावर अंबिके यांना एक स्वप्न पडले. त्या स्वप्नात राघवेंद्र स्वामी आले आणि म्हणाले, ''माझा अपमान करून नमस्कार न करता आला आहेस. अरे ! तुला ते थडगं वाटलं तरी ते माझंच स्वरूप आहे. परत जाऊन तू नमस्कार करून ये. आठ दिवसात तुझी बदली होईल.'' आंबिके साहेब बेचैन झाले पण कामातून त्यांना सवड मिळत नव्हती.



एक दिवस आपल्या घराच्या गॅलरित उभे असता खालून मामा जाताना दिसले. ते पळत पळत खाली आले आणि मामांना वर घरी घेऊन गेले. मामांना सारी हकिकत त्यांनी निवेदन केली. मामा म्हणाले, ''ठीक आहे आठ दिवसाला आता दोनच दिवस उरले आहेत तेव्हा दोन दिवसांनी बदली होती कां ते पाहू? आणि मगच देवाला जाऊ.'' दोन दिवसांनी खरोखरच त्यांची बदली बेल्लारीला झाली. दुसऱ्या दिवशी मामांना घेऊन ते आप्पाच्यावाडीला गेले आणि नाथांची त्यांनी क्षमा मागितली ते बेल्लारीला हजर झाले खरे पण एक अडचण निर्माण झाली. ज्याच्या जागी त्यांची बदली बेल्लारीला झाली होती. त्यांची बदली मुंबईला झाली होती. मुंबईला त्यांना क्वार्टर्स मिळत नव्हते. त्यामुळे ते बेल्लारीचे क्वार्टर्स सोडत नव्हते. त्यामुळे अंबिके साहेबांची फार कुचंबणा होत होती. त्यांना कोल्हापूरचे घर सोडणे भाग होते आणि बेल्लारीला घर मिळत नव्हते. अंबिकेसाहेब मामांच्याकडे आले. मामांनी त्यांना सांगितले की, बेल्लारीला प्रसिद्ध मारूती आहे. राघवेंद्र स्वामी हे त्यांचेच अवतार आहेत तेव्हा तुम्ही गेल्या गेल्या त्यांना एक अभिषेक घाला. ते तुमचे काम करतील. त्याप्रमाणे त्यांनी अभिषेक केला आणि काय आश्चर्य ! मुंबईच्या माणसाला अचानक क्वार्टर्स मिळाले आणि बेल्लारीचे क्वार्टर्स रिकामे झाले. आणि अंबिसाहेबांचा प्रश्न आपोआप सुटला.

## मार्ग चाले रामायण

कोल्हापूरात मामा डुबले नावांचे प्रसिद्ध हार्डवेअर व्यापारी होते. त्यांच्या आयुष्यातल्या घटना मामांनी सांगितल्या बरहुकूम घडलेल्या आहेत. रामायण आधी लिहावे आणि रामकथा नंतर घडावी असेच त्यांच्या बाबतीत घडले आहे. त्यांची व मामांची ओळख एका नाट्यमयरितीने झाली. मामा डुबले यांच्या घराच्या वरच्या मजल्यावर एक देऊसगांवकर म्हणून इन्कमटॅक्स ऑफिसर रहात होते. मामांचे मेहुणे प्रभाकर कोरगांवकर (नगरशेट) यांच्या भागिदारीत त्यांचे कापड दुकान होते. काही कारणांनी ही भागिदारी तुटली व डुबलेमामांचे फार नुकसान झाले. वेंगुर्ल्यासारख्या खेड्यातून आलेला हा गृहस्थ परत तिकडे जाणे शक्य नव्हते. आता काय करावे ? हा त्यांच्यापुढे एक यक्षप्रश्न होता. कुणाला विचारावे हे त्यांना कळत नव्हते. ज्योतिषी वगैरे संस्थावर

त्यांचा विश्वास नव्हता. त्यांची बेचैनी श्री देऊसगांवकर यांच्या लक्षात आली ते मामा डुबलेंचेकडे आले आणि म्हणाले, ''मामा मी तुम्हाला एक अनाहूत सल्ला देतो. तुम्ही असे करा, कागलला माझे एक स्नेही आहेत. त्यांचे नांव शिपूरकारमामा. ते उत्तम ज्योतिषी आहेत. ते पैसे वगैरे काही घेत नाहीत. त्यांना तुमची कुंडली दाखवा तुमचा प्रश्न सुटेल.'' तरी डुबळेमामांचा चेहरा साशंकच होता. देऊसगांवकर चेष्टेने आणि विनोदाने म्हणाले, ''कागलला जायला नऊ आणे व यायला नऊ आणे लागतात फार तर मी देतो पण तुम्ही जाऊंन याच.'' दुसरे दिवशी मामा डुबले मामांच्याकडे गेले. मामा डुबले यांचे व्यक्तिमत्व अतिशय प्रसन्न आणि छाप टाकणारे होते. पांढरे स्वच्छ धोतर, त्यावर पांढरा शुभ्र शर्ट आणि वर पांढरी शुभ्र गांधी टोपी घातलेले मामा अंगापिंडाने चांगले भरलेले होते. लांबून जणू 'रामूभैया दातेच' वाटत. डुबले मामांनी मामांना कुंडली दाखविली. घडून गेलेल्या अनेक बारिकसारिक गोष्टी मामांनी अचूक सांगितल्या त्यामुळे त्यांचा विश्वास बसला. आता त्यांचा मुख्य प्रश्न मी आता काय करू ? कसला व्यापार करू ? पार्टनर घेऊ की नको? घ्यायचे झाले तर कोणास घ्यावे ? मामांनी कुंडलीवर परत नजर टाकून ठामपणे सांगितले की, 'तुम्ही हार्डवेअरचे दुकान काढा आणि सख्या भावाला पार्टनर न घेता चुलत भावाला घ्या.' मामा परत कोल्हापूरला आले. त्यांचे थोडेफार समाधान झाले होते. दुसरे दिवशी जो त्यांचा चुलत भाऊ मुंबईस होता त्याचे पत्र आले. त्यात त्याने म्हटले होते की, ''कोल्हापुरात येऊन काहीतरी व्यापार करण्याची माझी इच्छा आहे. मला हार्डवेअरची थोडीफार माहिती आहे. तेव्हा तुमच्या व माझ्या भागिदारीत हार्डवेअरचे दुकान काढूया का ?'' आपला चुलत भाऊ भालचंद्र याचे पत्र घेऊन मामा डुबले मामांच्याकडे आले. मामा म्हणाले, 'हा शुभ शकुनच आहे' आता प्रश्न आला जागेचा. मामा डुबलेंनी लक्ष्मीपुरीतील एक जागा बघितली होती. ती जागा फार मोक्याची आणि प्रशस्त होती. पण माने नावाच्या मालकाने ती दुसऱ्याला देऊ केली होती. त्याचा ताबा घ्यायला दुसरे दिवशी परगावाहून कोणीतरी येणार होते. तेव्हा माने, डुबले मामांना म्हणाले की उद्या तीन वाजेपर्यंत ती माणसे आली तर माझा नाईलाज आहे. नाहीतर तुमचा मी विचार करीन. मामा डुबलेंनी



मामांना विचारले, 'काय होईल ?' मामांनी सांगितले की, येणारी माणसे वेळेत येऊ शकणार नाहीत. तुम्ही चार वाजता जा. त्या माणसांची रेल्वे चुकल्याने ते वेळेत येऊ शकले नाहीत. म्हणून ती जागा मामा डुबलेंना मिळाली.

डुबलेमामांच्या धाकट्या मुलीचे लग्न ठरले. त्यावेळी मामांनी सांगून ठेवले होते की, डिसेंबरच्या आत या मुलीचे लग्न केल्यास अनेक अडचणी येतील आणि डिसेंबर नंतर केल्यास अनपेक्षीत खर्च वाढेल. ज्या मुलाशी तिचे लग्न ठरले होते. त्याच्या मोठ्या भावाचे लग्न व्हायचे होते. ते ठरल्यावर मुलाकडील माणसांचा तगादा लागला आणि डिसेंबरच्या आधी मुलाकडील लोकांनी सांगितलेल्या मुहूर्तावर लग्न ठरले. लग्नाच्या आधी ८-१० दिवस डुबले मामांना अशौच आले. त्यामुळे लग्न होऊ शकले नाही. दुसऱ्या वेळेलाही अशीच अडचण आल्याने लग्न होऊ शकले नाही. आता मामा डुबले पाहुण्यांना म्हणाले, ''मी माझ्या ज्योतिषाला विचारून मुहूर्त काढतो आणि ते मामांच्याकडे आले व डिसेंबर मधला मुहूर्त दिला व सांगितले की तुम्हाला थोडा जास्त अनपेक्षित खर्च येईल. परगांवहून पाहुणे मंडळी रेल्वेनी येणार होती. पण अचानक रेल्वेचा संप पुकारला गेला. ती मंडळी वाटेतच अडकली. मग त्यांना गाड्या पाठवून घेऊन यावे लागले. त्यामुळे अकल्पीत खर्च वाढला. पण लग्न सुरळीतपणे पार पडले.

एके दिवशी मामांनी डुबले मामा यांना सांगितले की, तुमच्या वडीलांना धोका आहे. तुम्ही गावाकडे जा. पंचाहत्तर वर्षांचे वडील किराणा मालाचे दुकान चालवित असत. मामा गावी गेले. वडील दुकानात बसलेले त्यांनी पाहिले. दोन दिवस ते राहिले. वडीलांना प्रश्न पडला की, नेहमी गडबडीत असलेला आपला मुलगा निवांतपणे दोन दिवस कसा राहिला ? न रहावून त्यांनी विचारले, 'तुझी तब्येत बरी नाही का ? का पैशाची अडचण आहे.' त्यांनी काही नाही असे मोघम उत्तर दिले. त्याच रात्री त्यांना हार्ट ॲटॅक येऊन ते गेले.

भारत इंडस्ट्रीजचे मालक मुळजीभाई शहा व सुबोध प्रभू हे दोन पार्टनर्स. मुळजीभाईंचा मामांच्यावर नित्तांत विश्वास होता. आपल्या व्यापारात ते तरबेज व चाणाक्ष होते. पुढे-पुढे त्यांचा आध्यात्माकडे कल वाढला. ते

गीतापठण करू लागले. त्यांच्या मनामध्ये श्रीकृष्णाचे एक मंदिर बांधण्याची इच्छा होती. मंदिराला खर्च फार होता. लोकांचे सहाय्य विशेषत: गुजराथी लोकांचे सहाय्य मिळावे आणि एक उत्तम मंदिर तयार व्हावे म्हणजे आयुष्याच्या संध्याकाळी आध्यात्मप्रवण असलेल्या आपल्या मनाची मशागत करायला एक निवांत जागा मिळेल. शाहूपुरीत असलेले राधा-कृष्ण मंदिर येथे ते नित्यनेमाने जात असत. त्याचे ते एक ट्रस्टी होते. ते एकदा आप्पाचेवाडीस यात्रेला आले असताना वाड्यामध्ये अभिषेक चालला होता. मामांनी त्यांना मुद्दाम थांबायवयास सांगितले. नैवेद्य आरती झाल्यावर मामांनी त्यांना बोलावून सांगितले की, ''तुम्ही जे मंदिर बांधण्याच्या खटपटीत आहात त्यात अनेक अडचणी आहेत. चिकाटी धरा ते काम तुमच्या हातून उत्तम रितीने होणार आहे.'' हे घ्या श्रीफळ म्हणून त्यांच्या हातात श्रीफळ दिले आणि पुढे खरोखरच कोल्हापूरचे गीता मंदिर साकार झाले.

भारत इंडस्ट्रीचे दुसरे पार्टनर सुबोध प्रभू हेही मामांच्याकडे येत असत. सुबोधचे वडील एकदा मामांचे नाव ऐकून निपाणीस आले. तो गृहस्थ अक्षरश: कोट्याधीश होता. त्यांनी स्वत:ची कुंडली मामांना दाखविली. त्यांच्या व्यवसायाचा वाढता आलेख मामांनी अचूक सांगितला आणि शेवटी सांगितले की, तुमच्या पोटाचे ऑपरेशन होणार आहे. त्यावर ते चक्क म्हणाले, 'आजपर्यंत माझी काही एक तक्रार नाही. मला वाटत नाही माझे काही ऑपरेशन होईल असे.' त्यावर मामा म्हणाले, 'माझे भविष्य खोटे ठरल्यास मला तुमच्यापेक्षा जास्त आनंद होईल. पण काळजी घ्या.' आठ दिवसांनी त्यांचे पोट दुखू लागले आणि एक्स-रे मध्ये पित्तायात तीन गाठी आढळून आल्या. ऑपरेशन करणे गरजेचे असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. आता प्रश्न ऑपरेशन कुठे करायचे ? मुंबई की कोल्हापूर ? मामांच्याकडे सर्वजण आले. मामा फटकळपणे त्यांना म्हणाले, ''मी सांगणार नाही. याचे कारण ऑपरेशन चांगले झाले तर डॉक्टरांनी ऑपरेशन उत्तम केले आणि बिघडलेतर ज्योतिषाने कसला मुहूर्त काढला, असे तुम्ही म्हणणार उगीच मी दोषाचा धनी कशाला होऊ?'' हे ऐकल्यावर सुबोधचे वडील भावनाप्रधान होवून म्हणाले, 'मामा तुम्ही सांगाल तिथे व त्या डॉक्टरांचेकडून ऑपरेशन करून घेतो. तुम्हाला काही दोष देत



नाही.' त्यावर मामांनी त्यांना सांगितले, मेरी वॉनलेसमध्ये नवीन एम.एस. होऊन आलेल्या डॉक्टरांच्याकडून अमक्या दिवशी ऑपरेशन करून घ्या. पण एक सांगतो ऑपरेशन करायला घेतल्यावर अर्धातास अडथळा आहे. नंतर ऑपरेशन सुरळीत होईल. त्याप्रमाणे ऑपरेशन करायला घेतल्यावर मेरी वॉनलेस परिसरातील वीज खंडीत झाली. त्यानंतर दुसरीकडून वीज कनेक्शन घेवून ऑपरेशन करावे लागले व ते यशस्वी झाले.

इकडे शेतीच्या संबंधातील कटकटी सुरुच होत्या अर्जुनीच्या शेतातील विहीर समाईक असून त्या अवतीभवतीचा परिसर पण समाईक आहे. तिथे जवळ स्वत:च्या हद्दीत लावलेले केळीचे खांब मामांच्या प्रतिस्पर्ध्यांच्या रयतांनी अर्थात त्यांच्या सांगण्यावरून काढून टाकले. मामांच्या रयतांनी ते परत लावले. परत काढून टाकताना मारामारी झाली. त्यासाठी त्यांनी मामांच्यावर फौजदारी केली. मामांनीही त्यांच्यावर फौजदारी केली. कागल कोर्टात ती केस दाखल झाली. मामलेदार, फौजदार कोर्टाची माणसे आपल्याकडे आदराने विचारायला येतात. त्यांचेपुढे आरोपी म्हणून आपण कोर्टात उभे रहायचे. याला मामांचे मन तयार होईना. त्यांना ते कसेसेच वाटू लागले. मामांचे वकील रावसाहेब नाडगोंडे म्हणजे मामांच्या भाचीचे मिस्टर होते. त्यांनी एक क्लृप्ती लढवली. कोर्टाला सांगितले की, मामांना 'सायटीका पेन' आहे. त्यामुळे त्यांना बसायला परवानगी मिळावी. वकीलांचे कोर्टावरील वजन व मामांचे सर्वश्रुत असलेले नांव यामुळे कोर्टाने त्यांना ताबडतोब बसायला परवानगी दिली. त्यांचा प्रतिस्पर्धी पिंजऱ्यात उभा आणि मामा मात्र पिंजऱ्याच्या बाहेर खुर्चीवर विराजमान. हे दृश्यच स्पृहणिय होते. नियतीला यात काही सुचवायचे होते की काय कोण जाणे. अनेक तारखा पडल्या. प्रत्येक वेळी सर्व साक्षीदाराला घेऊन यायचे. त्यांना भत्ता द्यायचा. एस.टी. व चहा पाण्याला पैसे द्यायचे त्यामुळे मामांचा प्रतिस्पर्धी जेरीला आला. मामांना मात्र या त्रासातून वकीलांनी वाचवले होते. शेवटी केस मामांच्यासारखी झाली. यावेळी श्री. शिरगुप्पीकर आण्णा, श्री. रावसाहेब नाडगोंडे, श्री. तात्या नाडगोंडे यांची प्रत्यक्ष आणि श्री. रतनचंद शहा यांची अप्रत्यक्ष मदत झाली. देव कृपेने माणसांची अशी जुप्पी जमली होती. 'शिवाजी महाराजांच्यावेळी स्वराज्य स्थापनेसाठी मावळ्यांची आणि

महाराजांची जशी जीवाला जीव देणारी जुप्पी जमली होती तशी'. याचवेळी आर.टी.एस. चे काम चालले होते. पुण्याला त्यासाठी जावे लागे. एकदा श्री. तात्या नाडगोंडे, श्री. रत्नू शेटजी व मामा मिळून शेटजीच्याच गाडीतून पुण्याला गेले असताना आर.टी.एस. च्या ऑफिसमध्ये गेले. प्रथम तेथे दाद लागेना. पण इतक्यात तिथे असलेले एक क्षीरसागर नावाचे अव्वल कारकून आळखीचे वाटले. चौकशी करता कळले की, क्षीरसागरांचे वडील मामांच्या वडीलांच्याकडे पूर्वी येत असत. सहाजीकच त्यांच्या मनात आपुलकी निर्माण झाली. ते म्हणाले ते काम मीच बघतो खरे पण त्यावर रिमार्क मारून ठेवलाय हे बघा. असे म्हणून त्यांनी रिमार्क दाखवला. रिमार्क असा होता. The Appeal should be summarily dismissed. आता काय करायचे. यात बदल करता येणार नाही असे ते म्हणाले, हाडाचे वकील असलेले श्री. तात्या नाडगोंडे प्रसंगावधान साधून म्हणाले, तुम्ही मुळीच रिमार्कमध्ये बदल करू नका. फक्त त्यापुढे चार शब्द घाला. 'After, hearing the two Parties' ते क्षीरसागर देखील चमकलेच आणि पुढे केस चालली व ती मामांच्याबाजूने झाली. या कामात अनेकांनी मामांना फसवले. पण ज्यांनी-ज्यांनी फसवले त्यांना त्यांना कोणत्या न कोणत्या प्रकारची शिक्षा झालीच. कारण मामांना दुखावले नव्हते तर मामांच्यामागे असलेल्या शक्तीला दुखावले होते.

मामांच्या आयुष्याच्या गाडीला आणखीन एक वळण घेणे प्राप्त होते. महाराष्ट्र सरकारने अबसेंटी लँडलॉर्ड वर एक बंधन आणले होते. 'अबसेंटी लँडलॉर्ड' ने आपल्या जमीनीपासून ८ ते १० मैलाच्या आत रहायला हवे असा तो दंडक होता. कागल तसे लांब होते. तेव्हा दूरदर्शी मामांनी 'निपाणीला' रहायला जायचा निर्णय घेतला. ही गोष्ट त्यांच्या मित्रमंडळींना मान्य नव्हती. विशेषतः नाडगोंडे मंडळींना मान्य नव्हती. कारण त्यांची मने इतकी एकरूप झाली होती की, 'तुका म्हणे आम्ही एका देहाचे अवयव' अशी स्थिती झाली होती. पण मामांनी कठोर निर्णय घेतला आणि त्यांनी मामा, मामी ५ मुलं आणि त्यांच्या मातोश्री असे बिऱ्हाड निपाणीस नेले. निपाणी तसे कागलपेक्षा मोठे टाऊन परत तंबाखूचे केंद्र असलेने तिथे दोनच वर्ग होते. एक अतिशय श्रीमंत तर दुसरा हाताच्या पोटावर जगणारा कामगार. परत ओळखीचे कोणी



नाही. मामांनी चिमगांवकर गल्लीतील इस्लामपूरकर १५२३ घर नं. चे घर भाड्याने घेतले. दोन मोठ्या खोल्या होत्या. टॉयलेटची सोय लांब होती आणि भाडे होते मासिक रू. १५/- पण हे भाडे महिन्याच्या महिन्याला फिटेल का नाही याची मामांना चिंता होती. आपल्याला कोणीही नावे ठेऊ नयेत अशाने जगायला हवे असे त्यांचे जीवनाचे साधे तत्वज्ञान होते.

मामांच्या ज्योतिषरूपी मोगऱ्याचा सुवास हळूहळू सर्वत्र पसरू लागला. मोठ-मोठे व्यापारी माणसे मामांना विचारायला येऊ लागली. मामा मात्र कुणाच्या घरी जाऊन भविष्य सांगत नसत. मामांनी परत आता घर बदलले १५२३ घ. नं. वरून १५२४ घ.नं. च्या घरात गेले. ते कागवाडे नावाच्या सावकारांचे घर होते. दोन खोल्या व बाहेर एक बसायची खोली पण परसात टॉयलेटची सोय अगदीच खेड्यातल्यासारखी होती. मामांच्या पलिकडे बबन जोशी नावाचा मुलगा आपल्या आईसह रहायचा. तो मोठा चौकस व जिज्ञासू होता. मामांच्याकडे गावातील मोठमोठी माणसे विचारायला येत. त्यात अनेक हौसे-नवसे असत. मामा त्यांना काय सांगतात त्यांची काय प्रतिक्रीया होते त्याचे तो निरिक्षण करी व निवांत क्षणी आपली पत्रिका दाखवून आपल्या भविष्यात डोकावी. 'तू लक्षाधीश होशील.' असे मामांनी सांगितले आणि आज तो कोट्याधीश होण्याच्या मार्गावर आहे. तो एक मोठा कॉन्ट्रॅक्टर आहे. श्री. बबन जोशी नंतर तिथे एका कारकूनाचे बिऱ्हाड रहायला आले. त्यांच्या कुटुंबप्रमुखाला आप्पा म्हणत त्यांना एक मुलगा होता. हातापायांनी तो विद्रा होता त्याचे लग्न झाले होते व त्याला एक मुलगी पण होती. आप्पा एका दुकानात हिशेब करायचे काम करीत. आपल्या कामात अतिशय तरबेज. हिशेब सारा तोंडात असे. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या मालकाला त्यांच्या जागी तीन कारकून नेमावे लागले. आप्पा हे अतिशय सच्छिल ब्राह्मण होते. धर्मग्रंथाचे वाचन करावे, आपले काम करावे आणि ईशचिंतनात दिवस घालवावा हाच त्यांचा नित्यनैमित्तीक कार्यक्रम होता. नाही म्हणायला तंबाखूच्या दुकानात काम करीत असलेने बिडीचे व्यसन होते. त्यांना एक चिंता होती ती म्हणजे आपला मुलगा काही करत नाही. लौकिक जीवनात त्याला फारसा रस नव्हता. तो सारखा मारूतीचा जप करायचा आणि आपल्या मामांकडे शेडूरला जाऊन

काही तरी जप जाप्य करायचा होम-हवन करायचा. हा मुलगा म्हणजे सध्याचे शेंडूरचे मामा. ते आता एक वाचासिद्धी प्राप्त झालेले सिद्ध पुरुष मानले जातात. त्यांच्या वडीलांनी मोठ्या आर्ततेने अनेक वेळा मामांना विचारले होते की हा प्रपंच नीट केव्हा करेल ? मामा त्याचे उत्तर द्यायला टाळायचे. पण आप्पांची पत्नी गेल्यानंतर आप्पांनी निक्षून एकदा मामांना विचारले ''काय हो हा संसार तरी करेल की नाही ?'' त्यावेळी मामांनी सांगितले की, हा तुमच्या उपयोगाला पडणार नाही. हा संसार करण्यासाठी आलेला नसून तो एक पूर्वजन्मीचा योगभ्रष्ट आत्मा आहे. तो आपले अपुरे राहिलेले तप पूर्ण करून सनातन धर्माला उजाळा देण्याचे काम करेल.

मामांचा मुलगा आता एल.आय.सी. मध्ये 'डेव्हलपमेंट ऑफिसर' म्हणून लागला होता. ती देखील एक हकीकत आहे. ते यथाक्रम सांगितले जाईल.

इकडे आप्पाचेवाडीला मामांचे नियमाने जाणे चालले होते. त्यात स्वकीयांना आणि इतरांनी देखील अनेक अडथळे आणले पण मामांच्या अभेद्य श्रद्धेमुळे आणि कर्तव्यदक्षतेमुळे ते त्यातून तरले.

१९४३ साली मामांचे वडील ब्रह्मीभूत झाले. १९४४ साली जेव्हा मामा व त्यांचे थोरले बंधू यात्रेला गेले त्यावेळी भागवत स्वामी (अच्युतानंद सरस्वती) चे एक शिष्य त्या ठिकाणी होम करीत असत. यज्ञाला मामांची हरकत नव्हती उलट मदतच होती पण लोकांच्या मनात कांही वेगळेच होते. यात्रा ५ दिवसांची असे. दोन दिवसाचा यज्ञ अगर वाढला तर तिसरे दिवशी यज्ञाची समाप्ती होत असते व त्यानंतर मामांच्या घरची-बाहेरची माणसे यात्रेसाठी जमत असत. मामांना अडथळा आणण्यासाठी एकवर्षी या मंडळींनी यज्ञ लांबविला. काठ्या वगैरे बांधून केलेल्या भागात कोणाला शिरकाव मिळणार नाही असा दंडक ठेवला. मामांना त्यांचा अंत:हेतू लक्षात येताच त्यांनी त्या वाड्याचे मालक श्री. लक्ष्मण खोत यांना सांगितले. श्री. लक्ष्मण खोतांनी त्यांना योग्य ती समज दिली आणि अडथळा विरघळला.

मध्यंतरी मामांच्या आणि त्यांच्या बंधूंच्या मनांना तडा गेल्यामुळे नाही म्हटले तरी थोडे काटेरी संबंध निर्माण झाले होते आणि त्याचा इतर



लोक फायदा घेण्याची मजा लूटत होते. मामांच्या हे लक्षात आल्याबरोबर आणि त्यातच आपल्या परंपरेचा अंत असलेने त्यांनी समेट घडवून आणला. त्यांचे थोरले बंधू बाबुराव उर्फ आण्णा यांना समजाबून सांगितले की, दादांची ही परंपरा वर्धिष्णू ठेवायची असेल तर आपण अभेद्य रहायला हवे आहे. ही परंपरा केवळ आपल्यापुरतीच नाही तर पुढच्या पिढीलाही अनुस्युत झाली पाहिजे. समजा तू माझ्या आधी गेलास तर दत्ताला घेऊन मी ही परंपरा चालवेन आणि मी आधी गेलो तर मधूला घेऊन तू ही परंपरा चालवायची आहेस. या आर्त आवाहनाने आण्णा विरघळले आणि मामांच्या हातात हात देऊन म्हणाले, 'मान्य आहे, मान्य आहे, मान्य आहे.'

आण्णांच्याबद्दल मामांना किती आदर होता, हे एका प्रसंगावरून लोकांच्या लक्षात आले. कुरूंदवाडला हालसिद्धाप्पाचे देऊळ होते. ते खंदकात होते. म्हणून त्याला 'खंदकातला हासिद्धाप्पा' म्हणत असत. त्याचे डफेदार आणि हरिभाऊ पाठक असे दोघेजण त्या देवळाची सर्व व्यवस्था पहात असत. विशुद्ध भक्तीची तेथे वानवाच असल्यामुळे तो एक त्यांनी व्यवसाय बनवला होता. त्यामुळे खंदकातला हालसिद्धाप्पा हा एक चेष्टेचा विषय झाला होता. अभक्ष भक्षण, अपेय पान या गोष्टी तेथे राजरोसपणे चालत. एकदा हे डफेदार आणि हरिभाऊ आप्पाच्यावाडीच्या यात्रेस आले डफेदार तर प्यायलेलेच होते. त्यामुळे आपण काय बोलतो, कुणाशी बोलतो याचे त्यांना भानच राहिले नव्हते आणि आण्णा पण रागीट असल्यामुळे त्या दोघांची चकमक होण्याची मामांना शक्यता वाटली. त्यामुळे त्यांनी आण्णांना सबुरीने घेण्याचा विनंतीवजा सल्ला दिला होता. शेवटी भजनाच्यावेळी उद्रेक झालाच. त्यावर्षी भजन खोतांच्या वरच्या माडीवर चालले होते. बरेच भक्तजन हजर होते. खाली कारिकोळचे लोक ''दिम'' घालत होते. (नेहमीच्या सोप्यावर) मामा तिथेच बसले होते वर भजनात काय चाललंय याची मामांना कल्पना नव्हती. इकडे भजन रंगात आले असताना आण्णांना संचार झाला. त्यांनी अनेकांना आशिर्वादाचा भंडारा दिला आणि स्वारी शांत झाली. थोड्याच वेळात त्या डफेदाराला संचार झाला आणि त्याने आण्णांनाच जवळ बोलावून घेतले आणि म्हणू लागले. 'मी सांगतो त्यांना त्यांना भंडारा दे, माझी आज्ञा आहे.'

आण्णा सगळा राग गिळून. 'मी कां, तुझा तू भंडारा दे' एवढे म्हणाले. हे काय तिथल्या लोकांना पसंत पडले नाही. रावसाहेब नाडगोंडे तिथे होते. ते मामांना खाली बोलवायला म्हणून गेले. तोच मामांना तिथे सूचना झाल्याने ते माडीवर यायला निघाले. वाटेतच रावसाहेब भेटले. त्यांनी ही हकीकत मामांच्या कानावर घातली. त्यावेळी मामांच्या रागाचा पारा चढला आणि जवळ जवळ पळतच माडीवर गेले आणि दारात उभे राहून कोण तो डफेदार ?' माझ्या गुरुच्याठिकाणी असलेल्या माझ्या भावाला भंडारा द्या म्हणतो ? कोण तू ? तुझ्याकडे देव कुठून आला ? बैस खाली' असे गरकावून त्याला म्हणाले, आणि जवळ असलेल्या हरिभाऊ पाठकांना म्हणाले, 'काय हरिभाऊ काय चाललय ?' डफेदाराचा संचार एकदम नाहिसा झाला. फेफरे येणारा माणूस जसा धाडदिशी पडतो तसा तो खाली बसला. १५ मिनिटे एक सन्नाटा निर्माण झाला. मामांचा राग देखील कमी झाला. आणि भजन पुढे सुरु झाले. डफेदार आणि हरिभाऊ पाठक यानी पोबारा केला.

श्री. आप्पाचीवाडी येथील अमावास्या व यात्रा चांगलीच फुलून आली होती. लोकांना नाथ सेवेचे अनुभव येऊ लागले होते. मामांना अलिकडे जरा ब्लडप्रेशरचा त्रास सुरु झाला होता. एक दिवस ते झोपले असताना त्यांना असे वाटले की, आपण पंढरपूरच्या पांडुरंगाला जावे, पण जाणे सोपे नव्हते. पंढरपूरसारख्या क्षेत्रात जाण्याची केवळ वारकऱ्याची इच्छा असून चालत नाही तर पांडुरंगाची पण असावी लागते. मारूतराव कदमांचा निरोप आला की, मी उद्या पंढरपूरला चाललोय. तुम्ही येता कां ? ते पांडुरंगाचेच आमंत्रण समजून मामा जायला तयार झाले. पाळीत पांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी पुढे-पुढे सरकत होते. तिथले बडवे वारकऱ्यांना एक सेकंद देखील पांडुरंगाच्या पायावर डोके ठेवायला देत नसत. त्यांचे सारे लक्ष वारकऱ्यांच्या हातून किती पैसे देवाजवळ ठेवले जातात यावरून त्याला किती सेकंद डोके टेकू द्यायचे हे एखाद्या कॅलक्युलेटर सारखा हिशेब त्यांच्या मनात होत असे. मामांनी जेव्हा डोके ठेवले, कदाचित एखादा सेकंद जास्त ठेवला असेल आणि अपेक्षेप्रमाणे पैसे ठेवले गेले नसल्याने तिथल्या त्या बुटक्या बडव्याला राग आला आणि त्याने मुठ आवळून त्याने मामांच्या मानेवर एक बुक्की मारली. त्यांना तिरीमिरी आली.



मामा खवळून उठले आणि त्यांनी त्याचा गळाच पकडला. तिथल्या सगळ्या लोकांना बोलावलं. दुसऱ्याचा जीव घ्यायला याला इथं उभं केलंय काय ते विचारलं. सर्व लोक संतप्त झाले व त्या बडव्याबरोबर भांडू लागले. घाबरलेल्या त्या बडव्याने मामांना आणखी ५ सेकंद डोके ठेवायला दिले. पुढे गंमत अशी झाली की, त्या बुक्कीने त्यांना तिरीमिरी आली खरी पण त्या वेळपासून त्यांचे ब्लड प्रेशर कमी झाले.

आता मामांना थोडा दम्याचा त्रास होऊ लागला. अनेक आयुर्वेदिक, ॲलोपेथिक औषधे झाली. पण तात्पुरता गुण यायचा. छाती भरली की, अधिक त्रास व्हायचा. मामांचा हा दमा कार्डीक आहे की ब्राँको आहे याचे अद्याप निदान लागले नव्हते. मारूतराव कदम व त्यांचा मुलगा, मामा घटप्रभेस गेले. तिथे येणाऱ्या एका स्पेशालीस्टना तब्येत दाखविली. कार्डीक अस्थमा नसून ब्राँको अस्थमा आहे असे निष्पन्न झाले.

मामांचे रयत ज्योती घाटगे, जानबा माने, भिवा चौगुले, विष्णू घाटगे ह्या सर्वांना मामांची ताकीद होती की, 'दोन पोती धान्य कमी पिकवा पण आप्पाचीवाडी आणि घोसरवाड येथील देवाच्या सेवेस कोणतीही कसुर करू नका.' आणि त्याप्रमाणे त्यांनीही कधी कसुर केली नाही. ते लोक मामा म्हणतील तेव्हा गाडी घेऊन येत असत. ती परंपरा आताही त्यांची मुले शंकर घाटगे व नंदा चौगुले यांनी पुढे चालू ठेवली आहे.

१९६० सालची आप्पाचीवाडीची यात्रा होती. दारात बैलगाड्या येऊन उभारल्या होत्या ते बघण्यासाठी मामा उंबऱ्यापर्यंत गेले आणि त्यांना चक्कर आली. खोलीत आणून त्यांना झोपवले. त्यांना दरदरून घाम आला. पोटात खड्डा पडल्यासारखे झाले. त्यांनी अगोदरच सांगितले होते की, आपल्याला गन्डांतर योग आहे. त्यामुळे घरात सगळ्यांची भीतीने गाळण उडाली. डॉ. खांडके यांना बोलावून आणले. त्यांनी तपासून सांगितले की, त्यांना सौम्य हार्ट-ॲटॅक आला आहे. पळापळ झाली आणि मामांना कोल्हापूरला हालवायचे ठरले. पण आता न्यायचे कोठे ? त्यावेळी कोल्हापूरात हार्ट स्पेशालिस्ट कोणी नव्हते. डॉ. ग्रँट (पुण्याचे) तीन महिन्यातून एकदा

कोल्हापूरात येत असंत. डॉ. पी. बी. भद्रे नावाचे सर्जन हे मामांच्या माहितीचे होते. त्यांच्याकडे मामांना ॲडमीट केले. त्यांच्याबरोबर त्यांच्या सोबतीला त्यांच्या मुलाशिवाय कोणी नव्हते. आबा कुंभोजकरांना निरोप दिला. त्याचवेळी आप्पाच्यावाडीची यात्रा सुरु झाली आणि त्यावर्षी महारूद्र करायचे ठरवले होते. मामांनी एवढेच सांगितले की, महारूद्र व्यवस्थीत पार पडला की माझ्या जीवाला धोका नाही. मामांना सारखे कमी-जास्त वाटत होते. झोप अजीबात येत नव्हती. साधारणपणे दुपारी ११ च्या सुमारास मामांना ग्लानी आली. त्यात त्यांना आप्पाच्यावाडीचे दृश्य दिसले. वाड्यात चाललेला महारूद्र चित्रपटासारखा त्यांच्यासमोर दिसत होता. ग्लानीतून जाग झाल्यावर त्यांनी आपल्या मुलाला बोलावून सांगितले की, आप्पाच्यावाडीस जाऊन तीर्थ व भंडारा घेऊन ये. ते घेतल्यावर माझे २० वर्ष आयुष्य वाढेल. आणि हे बघ २१ ब्राह्मण आहेत. रूद्राची अवर्तने चालू आहेत. त्यातील तीन ब्राह्मण पेंगताहेत याची जाऊन चौकशी कर. व लवकर ये. त्याप्रमाणे त्यांचा मुलगा जाऊन तीर्थ व भंडारा घेऊन आला व मामांनी सांगितलेले दृश्य अक्षरशः बरोबर आहे. असे त्यांनी सांगितले.

हालसिद्धनाथांचे परमभक्त बाळाप्पा धनगर (बाळूमामा) हे एक आवलिया होते. त्यांना वाचासिद्धी प्राप्त झाली होती. मामांची आणि त्यांची चांगलीच ओळख होती. ते एकदा आपल्या भक्ताकडे कोल्हापूरला आले असता अनेक माणसे त्यांच्या दर्शनाला आली होती. एक रुबाबदार सुशिक्षीत ग्रहस्थ त्यांच्या दर्शनाला आले असताना बाळाप्पाने विचारले, 'हे कोण ?' तेव्हा त्यांची ओळख करून देताना त्यांचा भक्त म्हणाला, 'हे कोल्हापूरचे प्रसिद्ध सर्जन डॉ. भद्रे !' 'हां बरं झालं तुमची भेट झाली. 'माझा भगत तुमच्या दवाखान्यात आहे. तुम्ही जातीने त्याच्याकडे बघायला पाहिजे. तुमचे त्यात कल्याण आहे.' त्या दिवशीपासून डॉ. सकाळचा राऊंड मामांच्यापासून घेऊ लागले. एक महिन्यानंतर मामा बरे होऊन घरी आले. डॉ. भद्रेंनी स्वतः आप्पाचेवाडीस नेऊन घरी आणून सोडले. मामांची तब्येत हळूहळू सुधारू लागली. पण अशक्तपणा कमालीचा होता आणि वरचेवर दम्याचा त्यांना त्रास व्हायचा. डॉ. गौतम शहा यानी सरकारी नोकरी सोडून (गांधी



मेमोरियलमधील) स्वतंत्र प्रॅक्टीस सुरु केली होती. मामांच्यावर त्यांची श्रद्धा असल्याने ते वरचेवर येऊ-जाऊ लागले आणि त्यामुळे घरोबा वाढला तसेच लाफायटिसचे डॉ. पीटर, डॉ. ससे व कोल्हापूरहून येणारे डॉ. सातवेकर यांचाही घनिष्ठ संबंध आला. मामांच्या औषधोपचाराची देवाने व्यवस्थाच करून दिली म्हणायला हरकत नाही. डॉ. गौतम शहांच्याकडे येणारे डॉ. बी. जी. कुलकर्णी यांचीही मामांच्यावर श्रद्धा बसली व ते आले की मामांना भेटून जात. अशा रितीने बेस्ट मेडिकल सेवा मामांना मिळू लागली.

मामांची थोरली मुलगी चि. शिशिकला ही आता उपवर झाली होती. याचवेळी त्यांचा थोरला मुलगा विद्यामंदिर येथे शिक्षक म्हणून लागला होता. आपल्याला आजारपणामुळे फारसे फिरता येत नाही. मुलीसाठी स्थळे बघणे आवश्यक होते. याची नाही म्हटलं तरी चिंता त्यांना सलत होती. आप्पाच्यावाडीला येणाऱ्या अंतरंगातील भक्तांना व जवळच्या मित्रांनाही ही गोष्ट लक्षात आली होती. यात्रेची, अमावस्येची व्यवस्था पाहणारे व्यवस्थापकाचे काम करणारे कॅशियर श्री. हुकेरिकर नावाचे गृहस्थ होते. त्यांनी एक स्थळ आणले होते. मुलीला दाखवायला सांगलीला आणायला सांगितले होते. दाखवण्याचा कार्यक्रम झाला आणि दुसऱ्या अमावस्येला श्री. हुक्केरीकर यांचेकडून मुलगी पसंत असल्याचा निरोप आला. ते मुळचे बेळगांवचे. बेळगांवला येण्याचा त्यांचा निरोप होता. मुलगा एम.एस.ई.बी. मध्ये इंजिनिअर. घरची खूप शेती होती. एका थोरल्या भावाचा ट्रान्स्पोर्टचा व्यवसाय. वधू-पिता म्हणून मामांना स्थळ एकदम पसंत होते. याद्याचा दिवस निश्चित झाला. कागलच्या श्री. तात्या नाडगोंडेंना बोलावून घेतले. तीन वाजता निघण्याचे ठरले. चहा घेऊन आपल्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे ते आत जाऊन देवाला नमस्कार करण्यास गेल्यावर त्यांच्या कानावर शब्द आले. 'जाऊ नकोस, जाऊ नकोस.' असे कोणीतरी निक्षून सांगितल्यासारखे वाटले. त्यांच्या मनाची द्विधा स्थिती झाली. मुलीचा बाप म्हणून त्याचं एक मन म्हणत होते, 'एवढं सुंदर स्थळ कशाला सोडतोस, मनाचा हा खेळ आहे. कसलाही विचार न करता नीघ.' पण त्यांचं अंतरमन त्यांना सांगत होतं 'जाऊ नको म्हणतेय ना, जाऊ नको.' तात्कालीक व्यवहाराकडे बघू नकोस.' ही गोष्ट सम आणि

सम्यक विचार करणाऱ्या आपल्या परम स्नेह्याला - तात्यांना - त्यांनी सांगितली. तात्यानी ताबडतोब निर्णय घेतला की, 'महाराजांची परवानगी नाही. तर नाही जायचं.' त्यांनी त्यांच्या मुलाला बोलावून 'मामांचे ब्लडप्रेशर वाढले आहे ते येऊ शकत नाहीत.' अशी तार करायला लावली. काही दिवस मामा विषण्ण होते. पण नंतर कळाले की, त्या मुलाचे हार्टचे ऑपरेशन झाले होते व त्याला लग्न करू नकोस असे डॉक्टरांनी सांगितले होते. पुढे ४-५ महिन्यातच तो मुलगा हार्ट-ॲटॅकने गेला. महाराजांनी आपल्याला केवढ्या मोठ्या संकटातून वाचवले हे सर्वांना मामांनी साश्रू नयनांनी सांगितले. पुढे यथाकाली तिला उत्तम स्थळ मिळून तिचे लग्न झाले.

विनायकराव जोशी हे मामांचे पुरोहित होते. श्रावण महिन्यात रूद्राभिषेक करायला मामाचेकडे येत असत. त्यांनी मामांच्या दैवी शक्तीची प्रचिती सांगितली. हे मुळचे सौंदलग्याचे. त्यांचेकडील दर अमावस्येला आप्पाच्यावाडीस येत असत. त्यामुळे त्यांच्या घरातील सर्व लोकांची देवावर व मामांच्यावर श्रद्धा होती. विनायकरावांची पहिली पत्नी निवर्तली. त्यामुळे त्यांच्या वडीलांची विमनस्क अवस्था झाली हाती. त्यांच्यानंतर अमावस्येस ते आले आणि मामांच्यासमोर नुसते उभे राहिले. त्यांनी काही प्रश्न विचारला नाही. मामांनी भंडाऱ्यात पाहिले व त्यांना बोलावून सांगितले की, तुझी पहिली सून निवर्तली आहे. त्यामुळे विषण्ण वातावरण निर्माण झाले आहे. तू काही काळजी करू नकोस अमक्या महिन्याच्या आतच तुझ्या मुलाचे दुसरे लग्न होईल. हा घे भंडारा. त्याप्रमाणे ते आले. विनायकराव ही आठवण वरचेवर सांगतात.

मामा आप्पाच्यावाडीच्या यात्रेप्रमाणेच घोसरवाड येथील यात्रेस रथसप्तमीला जात असत. मामांच्या वडीलांनी (दादांनी) तयार केलेली एक चांदीची मूर्ती वाड्यातून घरात आणून त्याचा उत्सव करत. हा उत्सव तीन दिवस चाले. मधल्या दिवशी देवाला नैवेद्य असे. त्यादिवशी गावातील देवाच्या पुजाऱ्यांना आणि इतर धनगरांना प्रसादाचे पाचारण असे. त्यांना भरपूर अन्नदान करण्यात मामांना फार आनंद वाटे. तिसरे दिवशी जमतील तेवढ्या ब्रह्मवृंदाना बोलावून एकादशणी करून घेत. त्यामुळे रूद्राभिषेकाचा संस्कारही मूर्तीवर होत असे त्या दिवशी पण अन्नसंतर्पण मोठ्या आनंदाने होत असे. मूर्तीला



उत्तम प्रकारे सजविण्याचे काम करणे ही मामांची खासियत होती. कडक इस्त्रीचा फेटा देवाला बांधणे हे तर मामांच्यासारखे कुणालाही जमत नसे. असे पूजन झाल्यावर संध्याकाळी गुरूभजन करीत असत. हरी मल्हार कुलकर्णी उर्फ गागू पांगेरकर आणि रसूल यांच्या साथीने रसिकांची कानाभनाची धणीच पूर्ण होत असे. यावेळी संचार वगैरे होऊन लोकांच्या समस्यांची उत्तरे लोकांना मिळत असंत. त्यामुळे लोकांची भक्ती अधिक गहिरी आणि दाट होत असे. तो उत्सव आजही उत्साहात चालू आहे. यासाठी लागणारे धान्य वगैरे मामा घेऊन येत असत. एकेवर्षी म्हणजे १९७० साली निपाणीहून घोसरवाडला तांदूळ न्यायचे होते. निपाणी हे कर्नाटकात तर घोसरवाड महाराष्ट्रात. कर्नाटकातून महाराष्ट्रात धान्य न्यायला बंदी होती. म्हणून त्यांच्या मुलाचे साडू डॉ. एन. व्ही. कुलकर्णीहे त्यावेळी गळतग्यास होते. त्यांच्यावर ही कामगिरी सोपविली. त्यांनी आपला माणूस पाठवून एस. टी. तून तांदूळ नेत होते ते पकडले गेले व पोलीस ठाण्यात त्या माणसासह धान्य अडकवून ठेवले. हे कोणाचे तांदूळ ही चौकशी करता डॉक्टरांचे असल्याचे कळले. डॉ. ताबडतोब निपाणीस पोलीस ठाण्यात आले. मामा पण तिथे पोहोचले. ठाणे अमलदाराला विनवून मामा सांगत होते की मी काळ्या बाजाराने तांदूळ विकत नसून घोसरवाडला देवाच्या प्रसादासाठी नेतो आहे. ते ऐकायला तयार नाहीत. डॉ. चे वर केस घालायला उठले. डॉ. सरकारी नोकर त्यामुळे मामांनी ती केस स्वत:वर घेतली. इतक्यात हिरेमठ नावचे वरचे इन्स्पेक्टर तिथे आले. ते फार कडक होते. "देवाचे नांव सांगून लोक फसवतात. त्यामुळे हे तांदूळ मी सोडणार नाही" असे कठोरपणे म्हणाले. मामांनी त्यांना परोपकारीने समजावले. "गावात माझ्याबद्दल कोणालाही विचारा, मी काळाबाजार करणार माणूस आहे का ?" तरी तो ऑफिसर दाद देईना. त्यावर मामांना एक स्फूर्ती आली आणि खुर्चीतून उठून एका आवेशाने त्यांना म्हणाले, "या पदापर्यंत तुम्ही कसे आलात याचा एकदा विचार करा. तुमचे सस्पेन्शन होता होता टळले आहे की नाही ? अनेक कृत्यांची छाया तुमच्या मनात सस्पेन्शनची भिती निर्माण करते आहे. परमेश्वराने ही तुम्हाला एक पापक्षालनाची संधी दिली आहे. अनेक गरिब लोकांच्या मुखात प्रसादाचा घास घालण्यासाठी मी हे तांदूळ नेत आहे. त्यात तुम्हाला सहाय्यकारी व्हायचे आहे की नाही ते

तुम्हीच ठरवा.'' हे आवेशयुक्त उद्गार त्या अधिकाऱ्याने ऐकले मात्र अणि मामांना तो हात जोडून म्हणाला, मी स्वत: बेडक्याळपर्यंत तांदूळ पोहोचविण्याची व्यवस्था करतो जा तुम्ही. मामांच्या शब्दांनी त्यांच्या अंत:करणात झालेला बदल बघून आश्चर्यच वाटले. म्हटल्याप्रमाणे त्या ऑफिसरने तांदूळ पोहोचविले.

निपाणीला मारूतीराव कदम नावाचे तंबाखूचे व्यापारी होते. ते मारूतीभक्त होते. एकदा ते आणि मामा दक्षिण भारताच्या टूरवर गेले होते. तिथे श्रीशैल्याला रूद्राभिषेक चालला होता. त्या रुद्राभिषेक करणाऱ्यातला अध्वर्यु उंचापुरा व धिप्पाड होता. त्रिबोटी भस्म त्याच्या कपाळावर लावलेले होते. तो हिन्दीत म्हणाला, 'चलो अभिषेकमें शामिल हो जाओ' मामा म्हणाले, 'माझ्याबरोबर माझे स्नेही आहेत परंतु ते ब्राह्मण नाहीत चालेल का तुम्हाला ?' 'वो चलेगा । वो अच्छा आदमी है ।' आणि मामांना त्याने आपल्याजवळ बोलावून घेतले आणि आपल्या पाठीस हात लावण्यास सांगितले. त्याच्या माकडहाडाजवळ बोटभर शेपूट होती. मारूतीचा अवतार असावा अशी सर्वांची कल्पना झाली. दक्षिण भारताची सहल तशी चांगली झाली. अनेक देवस्थाने त्यांनी पाहिली.

पुढे मारूतराव कदमांना घशाचा त्रास होवू लागला. वरचेवर घसा येणे, आवाज बसणे असे होवू लागले. डॉक्टरी उपाय सुरु झाले. आणि शेवटी Vocal Cord च्या कॅन्सरचे निदान झाले. आता ऑपरेशन आले. त्यावेळी कॅन्सरचे ऑपरेशन म्हणजे मृत्यूच्या तोंडात शिरून परत येण्यासारखंच होते. त्यांचे कुटुंब मोठे होते. डॉ. गोसावी, मिरज, यांच्याकडे ऑपरेशन करण्याचे ठरले. मामांनी मुहूर्त काढून दिला. बरोबर निपाणीचे डॉक्टरही होते. ऑपरेशन थिएटरमध्ये जाण्यापूर्वी ऑपरेशन किती मोठे व जिवावरचे आहे याची कल्पना त्यांच्या मुलांना असल्याने त्यांच्या डोळ्यात पाणी तरारले. त्यामुळे त्याचा परिणाम मारूतरावांच्यावर होवून ते भावनाविवश झाले. त्यामुळे त्यांचे Low B.P. झाले. मामांनी सर्वांना बाहेर काढून देवाचा भंडारा लावला व सांगितले, 'मारूतराव तुम्ही यातून सुखरूप बाहेर पडणार आहात. तुमचा मारूती तुमच्यामागे उभा आहे. कशाला काळजी करता ? आम्ही बाकीचे लोक रडतो आहोत ते आमच्या स्वार्थासाठी. मारूतीचे स्मरण करा, नाव घ्या व



चला ऑपरेशनला.' मामांचा आवेश बघून त्यांना एक प्रकारचा धीर आला. कॉटवर उठून बसले व ऑपरेशन थिएटरमध्ये हसत हसत गेले पाच तास ऑपरेशन चालले. खाली कुजबूज चालू होती. बराच वेळ लागला. कठीण दिसते. मामांनी निक्षून सांगितले काही होणार नाही. १०-१५ वर्षे यांना काही होणार नाही. त्याप्रमाणे त्यांचे ऑपरेशन यशस्वी झाले. शुद्धीवर आल्यावर प्रथम मामांचे स्मरण त्यांना झाले. मामांच्यावरची त्यांची भक्ती दिवसेंदिवस वाढतच गेली. निपाणीला पाडव्याला वही पूजनाचा कार्यक्रम फार मोठ्या प्रमाणावर असतो. अनेक लोक मामांना बोलवीत. पण मामा फक्त मारूतराव कदमांच्याकडे वही पूजनाला जात. आप्पाचेवाडी येथील दर अमावस्येला ते त्यांच्या गाडीतून पोचवीत व आणत. असे बरेच वर्षे चालले होते. ही मारूतरावांची मामांच्याबद्दलची भक्ती शेवटपर्यंत टिकली एवढेच नव्हे तर मामांच्या मृत्यूनंतर देखील दरवर्षी त्यांना श्रद्धांजली वाहता यावी म्हणूंन श्रीक्षेत्र आप्पाचेवाडी येथील यात्रेच्या पहिल्या दिवशी त्यांच्या फोटोचे पूजन करून समयां ठेवून नवरात्र घालतात. त्यासाठी त्यांनी एक मोठा फोटो व दोन पितळी समया घेवून दिल्यात. अद्याप ती परंपरा सुरु आहे.

'पद्मसागरजी' नावाचे एक ज्येष्ठ व श्रेष्ठ जैन साधू होते. ते हैद्राबादला गेले असता तिथल्या राजांनी त्यांचेकरिता म्हणून सोन्याची खुर्ची तयार केली होती. आपल्या अमोल वक्तृत्वाने व उद्बोधक गोष्टीने त्यांनी विद्वत्जनांक्मासून सामान्य संसारी बद्धजीवापर्यंत सगळ्यांना भारून टाकले होते. त्यांचा एक चातुर्मास निपाणीला होता मा. देवचंद शहा यांनी त्यांना पाचारण केले होते. कापडाचे व्यापारी चंदूलाल शहा शेटजी यांचेकडे त्यांची व्यवस्था सोपवली होती. चंदूलाल हे मामांना मानीत. पद्मसागरजींचा मुक्काम जैन बस्तीत होता. चंदूलाल शहा एकदा मामांना त्यांचेकडे घेवून गेले. त्यांची ज्योतिषी म्हणून ओळख करून दिली. दोघांची चर्चा झाली. मामांनी त्यांना विचारले, तुम्हाला कधी सर्पदंश झाला आहे का ? त्यांनी सर्पदंशाचा व्रणच काढून दाखवला. मामांची व त्यांची वेव्हलाईन (मानसिक तार) एवढी जमली की पूर्व जन्मार्जित काहीतरी ऋणानुबंध असावेत असे वाटण्याइतपत. मामा कधीही प्रवचनाला वगैरे जात नसत. पण पद्मसागरजींच्या प्रवचनाला ते आवर्जून जात. चंदूलाल

शेटजींनी त्यांच्यासाठी एक जागा निश्चित केली होती. पद्मसागरजींची अमोघ वाणी व मुल्ला नसरूद्दीनच्या रूपाने दिलेले दृष्टान्त व त्यातून केलेले प्रबोधन मामांना इतके आवडे की त्यांना ती चटकच लागली होती. मामांच्यावरची श्रद्धा (पद्मसागरजींची) दिवसेंदिवस अधिक गाढ होत चालली होती. एकेदिवशी पद्मसागरजींच्याकडे मुंबईचे कोणीतरी पाहुणे आले होते. म्हणून पद्मसागरजींनी त्यांना दुपारी बस्तीत येण्यास विनंती केली होती. त्याचवेळी नेमका त्यांचा मुलगा व दत्तवाडकर हे घरी आले. हे तिघेही मिळून बस्तीत गेले. पद्मसागरजींनी विचारले, 'कोण कोण आलाय ?' मामा म्हणाले 'माझा मुलगा मधू व माझे स्नेही दत्तवाडकर आले आहेत.' 'मधू आणि तुम्ही आत या जरा खासगी मिटींग आहे.' असे म्हणून दोघांना आत घेतले. आतल्या बाजूला एक मध्यमवयीन जैन जोडपे बसले होते. पद्मसागरजींच्या शेजारी लांबट चेहऱ्याचे, लांब कोट घातलेले एक वयस्कर व्यक्ती बसली होती. पद्मसागरजींनी मामांची आणि त्यांची ओळख करून दिली. 'हे ब्राह्मण समाजातील प्रतिष्ठीत सज्जन गृहस्थ असून उत्तम ज्योतिषी आहेत. इथल्या एका देवाचे ते निःस्सिम भक्त आहेत. सध्या त्यांचे देवालयाचे मंडप बांधण्याचे काम सुरु आहे.' तरूण माणसांकडे वळून ते म्हणाले, 'दाखवा तुमची कुंडली.' तो गृहस्थ मामांच्याकडे कुंडली ठेवत म्हणाला ही माझ्या मुलाची कुंडली. कुंडली पाहताक्षणीच मामांनी विचारले, 'हे परदेशात असतात का ?' ते 'हो' म्हणाले. 'ते केंव्हा परत येतील ?' तेंव्हा मामांनी सांगितले या माहिन्याच्या 'तेवीस तारखेस तो येईल.' त्या गृहस्थाने खिशातून पत्र काढून दाखवले. पत्रात असे वाक्य होते, 'Most propably I am landing at Bombay on 23rd inst.' नंतर त्या गृहस्थांनी स्वतःची कुंडली दाखविली. त्यांची कुंडली बघताच मामांनी विचारले, आपल्याला किती Heart attacks येवून गेलेले आहेत ? ते म्हणाले, '३'. तुमचे क्लोरोस्टोल वाढण्याची टेंडन्सी आहे त्यामुळे हार्ट ॲटॅकची सारखी भीती आहे. डॉक्टर व औषधाला तुम्हाला कमी नाही. तुम्ही कोट्यधीश असाल. मामा चर्चेच्या ओघात समोरच्या व्यक्तीकडे बघून म्हणाले, यांनी न विचारता त्यांचे भविष्य सांगतो यांचा चेहरा उभट व लांबट असून त्यांची कुंभ रास असेल. वयाची पहिली तीस वर्षे खडतर गेली असतील.



त्यांना तीस वर्षानंतर एक चांगला टर्न मिळाला असेल. आणि ३६ वर्षापासून त्यांच्या भरभराटीचा आलेख उंचावतच गेला असेल. आज ते कोट्याधीशही असू शकतील. पद्मसागरांपासून सर्व जणू स्तिमितच झाले होते. पद्मसागरजी मामांना म्हणाले, 'तुमच्या देवालयाच्या कामासाठी काही मदत पाहिजे कां सांगा.' मामा निःस्पृहतेने व तात्काळ म्हणाले, 'नको. माझ्या आप्पाच्यावाडीच्या भक्तांकडून भक्तीत भिजलेला एक एक रूपया गोळा करून मला तो मंडप बांधायचा आहे. कुणाकडून एकदम पैसे घेवून नाही. भावमुक्त अशा पद्मसागरजींच्या डोळ्यात टचकन् पाणी आले. गदगदलेल्या स्वरात ते म्हणाले, 'ही तुमच्यासमोर बसलेली माणसे कोण आहेत तुम्हाला माहीत आहेत का ? मामांनी नकारदर्शक मान हलविली. 'अहो हे अशोक जैन, त्यांच्या मिसेस व त्यांचे वडील Times of India चे मालक.' दररोज सात लाखांचा त्यांचा इन्कम आहे.

मामा पुढे कांही दिवस आजारी पडले. कोल्हापूरात हॉस्पिटलमध्ये होते. त्यांना एकच ध्यास लागला होता. तो म्हणजे आप्पाच्यावाडीच्या घुमटासमोर मंडप बांधण्याचे काम कधी पुरे होते ! ते काम कोल्हापूरचे दोशी कॉन्ट्रॅक्टर करत होते. श्री. बाळासाहेब अळवेकर यांच्याअधिपत्याखाली ते काम चालले होते. श्री. वसंत कुबेर यांनी बांधकामासाठी पैसे दिले होते. ते बरे झाल्यानंतर प्रथम आप्पाचेवाडीस मंडप बघायला गेले. त्यांच्याबरोबर त्यांचा मोठा मुलगा पण होता. गाडीतून उतरता उतरता ते त्याला म्हणाले, ''आमच्या आयुष्यातले हे शेवटचे काम. आता यापुढे तुम्ही बघायचे आहे.'' अशा तऱ्हेने भक्तांच्याकडून अल्प-स्वल्प देणगी गोळा करून मंडप बांधल्याचे त्यांना समाधान होते. यापुढचे काम महाराजच स्वतः करून घेतील असा त्यांचा विश्वास होता.

मामांचा एक छंद होता. Medical Astrology च्या दृष्टीने कुंडल्या एकत्र करायच्या. कॅन्सरच्या ५०-६० कुंडल्या त्यांनी एकत्र केल्या होत्या. त्यापैकी अनेकांना त्यांनी कॅन्सरची पूर्वसूचना पण दिली हार्ती. फिटस् येणाऱ्या मुलांच्या, माणसांच्या कुंडल्या, ब्रॉंकॉयटीसच्या कुंडल्या, अशा अनेक कुंडल्या एकत्र करून, त्यांचा अभ्यास करून, त्यातून एक मार्गदर्शक तत्त्व (Common Factor) ते शोधून काढत असत. त्यांची ही संशोधनाची वृत्ती

असल्यामुळे त्यांचे आडाखे तंतोतंत बरोबर येत.

सांगलीचे प्रसिद्ध डॉ. एस्. बी. कुलकर्णी यांच्या थोरल्या बंधूंची कुंडली मामांच्या मित्राचा मुलगा श्री. सीना देशपांडे घेवून आले होते. मामांनी कुंडलीचा अभ्यास करून सांगितले की यांना पोटाचा कॅन्सर आहे व तो ॲडव्हान्स स्टेजमध्ये आहे. त्यांचे ऑपरेशन करायला घेतल्यानंतर डॉक्टरांच्या लक्षात आले की, कॅन्सर सगळीकडे पसरला आहे. मामांनी आपल्या थोरल्या बंधूंचा, मारूतराव कदमांचा कॅन्सर असाच ओळखला होता.

कोल्हापूरचे माजी महापौर श्री. द. न. कणेरकर यांची मित्रमंडळी मामांच्याकडे त्यांची कुंडली घेवून आले. या माणसाची तब्येतीची वरचेवर तक्रार आहे असे मामांना त्यांनी सांगितले. मामांनी बारकाईने कुंडली पाहून त्या मित्रांना स्पष्टपणे सांगितले की, यांना अन्ननलिकेचा कॅन्सर आहे. सगळ्यांना शॉकच बसला. पुढे मामा म्हणाले, तुम्ही यांना टाटामध्ये ताबडतोब नेलात तर एक वर्ष जगतील. अन्यथा अशक्य आहे. तेव्हा कणेरकरांना ताबडतोब टाटामध्ये हलवले. टाटा मधील डॉक्टरांनी त्यांना प्रश्न केला की, 'तुम्हाला कुठल्या डॉक्टरांनी इतक्यालवकर सांगितले.डॉक्टरांनी नाही एका ज्योतषवेत्यांनी सांगितले असे सांगितल्यावर डॉक्टरांना आश्चर्य वाटले. त्यांनी ट्रीटमेंट दिल्यानंतर ते एक वर्ष जगले.

मामांच्या शेजारी राहणारा बबन जोशी आता हायड्रॉलीक इंजिनियर झाला आहे. त्याने कांही मामांच्या आठवणी पाठवल्या आहेत. त्यात तो म्हणतो, 'माझ्या मावस मामी तापाने वरचेवर आजारी पडायच्या. तेंव्हा माझ्या आईने ती मामांना त्यांची पत्रिका दाखवली व त्याचे कारण विचारले. त्यावर ती मामांनी त्यांना कॅन्सर असल्याचे सांगितले. तथापि घाबरू नका. त्यांचे आयुष्य अजून १५ वर्षे आहे. त्या जावई-सुना, नातवंडे बघतील. परंतु त्यांनी मुंबईस जावून टाटा हॉस्पिटलमध्ये ताबडतोब उपचार करून घ्यावेत असे त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या टाटा हॉस्पिटलमध्ये ताबडतोब ॲडमीट झाल्या. तिथल्या डॉक्टरांनी कोल्हापूरच्या कुठल्या डॉक्टरांनी कॅन्सरचे निदान केले असे विचारले. कारण इतक्या प्राथमिक अवस्थेत हे निदान अशक्य होते. त्यांना सांगितल्यावर आश्चर्य वाटले. उपचारानंतर त्या कॅन्सरमधून बऱ्या झाल्या. जावई, सुना,



नातवंडे बघून १५ वर्षे मामांनी सांगितल्याप्रमाणे जगल्या.

मामांना तीन गोष्टींचा फार छंद होता. एक ज्योतिषशास्त्र. दुसरे देव-उपासना व तिसरे शेती, दूध दुभते. ज्योतिषशास्त्राच्याबाबतीत कांही नवीन गोष्टी त्यांच्या कल्पनेत येत आणि त्याचा पाठपुरावा करून त्याचे एक शास्त्र तयार करीत. उदा. कुंडल्यांचे गुणमिलन, परंपरागत आलेले गुणमिलन हे फक्त जन्मवेळेच्या नक्षत्रावरून काढलेले असते. ते अतिशय स्थूल असते. म्हणून त्यांनी गुण मिलनाचे पाच विभाग केलेले आहेत. १) सौभाग्ययोग, २) गृहसौख्य, ३) संततीसौख्य, ४) पायगुण आणि ५) आयुष्यमर्यादा हे पाच विभाग जर व्यवस्थित असतील तर गुणांना दुय्यम प्रतीचे सथान देत. अगदी बारा गुण जमले असतानाही गुणमिलन जमते असे त्यांनी सांगितले आहे आणि ती लग्ने यशस्वी झालेली आहेत. उदा. टोबॅको किंग म्हणून ओळखले जाणारे पद्मश्री देवचंद शहा यांचा चि. किरण शहा याची व त्याच्या सौ.ची कुंडली.

यडूरचे मोकाशी नावाचे एक ज्योतिषी होते. त्यांच्याकडून केतू आंदोलन कुंडली त्यांनी शिकून घेतली व त्याचा व महर्दशा व अन्तर्दशा यांचा अभ्यास करून आपल्या मृत्यूची तारीखही काढली होती. त्यात कांही दिवसांचा फक्त फरक झाला एवढेच. कारण त्यावेळी अधिक महिना होता.

हलकर्णीला एक शास्त्री होते ते उत्तम गणिती आणि ज्योतिषी होते. त्यांच्याकडून त्यांनी अष्टकवर्ग पद्धती समजून घेतली होती. मधमाशीने अनेक फुलांचा मध गोळा करावा आणि पोळ्यात भरावा तसा त्यांचा 'मधुसंचय' होता. मामांच्या घरात Astrological Magazines, You and your stars, How to judge a nativity अशी इंग्रजी पुस्तके होती. मामांना इंग्रजी फारसे येत नव्हते. पण त्या पुस्तकात महत्त्वाच्या ओळीखाली तांबड्या शाईने केलेल्या खुणा असायच्या.

असे म्हणतात की केवळ ज्योतिषाचा अभ्यास करून फलादेश बरोबर सांगता येत नाही. त्यासाठी Intuition ची गरज असते. एका इंग्रजी लेखकाने Intuition ची व्याख्या केली आहे. 'To know unknowingly, what you know' ह्या Intuition साठी शुद्ध आहार-विहार आणि उपासना याची

गरज असते. अशी अनेकांची अनुभूति आहे. मिरजेचे वेदशास्त्रसंपन्न घाटे शास्त्री नावाचे हस्तसामुद्रिक ज्योतिषी होते. ते अचूक भविष्य सांगत. लोकमान्य टिळक त्यांचेकडे १९१६ साली मुद्दाम भेटायला गेले होते. त्यांनी सांगितलेले भविष्य तंतोतंत बरोबर आले. या मागचे रहस्य सांगताना ते म्हणाले, ''ही सारी गजाननाची कृपा ! गेल्या ५०-६० वर्षे मी अव्याहतपणे गणपती आर्वतने करीत आहे. त्यामुळे मला एक सिद्धी प्राप्त झाली आहे. एखादी पत्रिका समोर आली की, 'एक्स-रे' प्रमाणे मी तिच्यातून आरपार पाहू शकतो. त्यामुळे प्रश्नाचे उत्तर मला सुचते व त्याचा ज्योतिषशास्त्राचा कोणता नियम लागतो याचेही मला ज्ञान होते.''

श्री. बबन जोशी यानी आपला एक अनुभव सांगितला आहे. ''माझ्या मुलाचा जन्म झाल्याचे पत्राद्वारे माझ्या आईने मामांना कळवले. त्यावर मामांनी माझ्या मुलाची पत्रिका बनवून पाठवली व बाळंतपणात खूप त्रास झाल्याचे व ईश्वरीकृपेने बाळ-बाळंतीण सुखरूप असल्याचे त्यांनी वृत्तांत लिहिले होते. या पार्श्वभूमीवर मी दुसऱ्या अपत्याचा योग आहे कां असे विचारले. डॉक्टरांच्या म्हणण्याप्रमाणे एवढ्या कठीण प्रसंगातून जाताना दुसरे अपत्य होवू देवू नये. पण ती मामांनी दुसरे अपत्य नैसर्गिक व सुलभ होईल असे सांगितले. त्याप्रमाणे वर्षभरात मला कन्यारत्न काहीही त्रास न होता प्राप्त झाले. हे मामांच्या आशिर्वादानेच घडले.''

आजारपणाुळे मामा विशेष कुठे बाहेर जात नसत. दुपारी तीननंतर मामांच्याकडे कुणी ना कुणी कुंडली घेवून येत असत. अकोळ (ता. चिकोडी) येथे श्री. कुलकर्णी विठ्ठल वासुदेव नावाचे गृहस्थ रहात असत. शेती भाती असणारे सुखवस्तू होते. त्यांना दोन मुलगे होते. थोरल्याचे लग्न झाले होते. धाकटा नोकरीच्या शोधात होता. चंचल असलेल्या लक्ष्मीने आता पाठ फिरवली होती. त्यांची बरीचशी जमीन कुळकायद्यात अडकली होती. का कुणास ठाऊक, त्या धक्याने त्यांचे डोळे गेले होते. त्याहून विचित्र गोष्ट म्हणजे ते बरोबर संध्याकाळी सात वाजता ओक्सांबोक्सी रडू लागत ते सकाळी सातपर्यंत रडत असत. सर्व डॉक्टरी उपाय व्यर्थ ठरले होते. एक दिवस त्यांच्या धाकट्या मुलाच्या मनात आले की शिपूरकर मामांना कुंडली दाखवून आपणास



नोकरी कधी मिळेल हे विचारावे. निपाणीला State Bank जवळ गुरुवारी बाजार भरे. तिथून मामांचे घर जवळ होते. गुरुवारी बाजारला येतानाच, त्यांनी खिशातून कुंडली आणली होती. बाजार करून तो मामांच्याकडे गेला. कुंडली दाखवून त्यांनी 'नोकरी कधी मिळेल ?' असे विचारले. परिस्थिती फार अडचणीची असल्याचे सांगितले. मामांनी कुंडली बघितली आणि ती तशीच बाजूला ठेवून विचारले, 'तुमच्या घरात दत्ताच्या पादुका होत्या का ? आणि असल्या तर आता त्या कुठे आहेत ?' बावरलेल्या चेहऱ्याने तो म्हणाला, ''नसाव्यात, आम्हाला कधी बोलल्याचे व बघितल्याचे आठवत नाही. पण माझ्या नोकरीचे काय ?'' मामा म्हणाले, 'नीट चौकशी करून आल्याशिवाय काही सांगता येत नाही.' तो हिरमुसला व निघून गेला ही गोष्ट तो आपल्या थोरल्या भावाजवळ बोलला असावा कारण दुसऱ्या गुरूवारी त्याचा थोरला भाऊ आपली कुंडली घेवून आला. मामांना त्यांना विचारायचे होते की, आपणास संततीचा योग आहे का ? लग्न होवून १४ वर्षे झाली होती. तरी संतती नव्हती. जगप्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. शिरोडकर यांनी गर्भाशय लहान असल्याने मूल होणार नाही असे सांगितले होते. मामांना माहीत नव्हते की आधी आलेल्या गृहस्थाचे ते बंधू आहेत म्हणून. मामांनी त्यांची कुंडली पाहिली आणि त्यांनाही तोच प्रश्न विचारला. ''तुमच्या घरात दत्ताच्या पादुका होत्या का ? सध्या त्या कुठे आहेत?'' त्या गृहस्थाने मामांना सांगितले की, ''माझ्या भावालाही हा प्रश्न तुम्ही विचारला होता व मलाही विचारत आहात, तर मी आता आईला जावून विचारतो आणि त्याचा छडा लावतो.'' घरी जावून त्याने आपल्या आईला विचारले, 'आपल्या घरी दत्ताच्या पादुका होत्या का ?' आपल्या पतीच्या विचित्र आजाराने त्रासलेली व परिस्थितीने गांजलेली ती स्त्री सैरभैर झाली होती. ती मागचे आठवत म्हणाली, 'हो बाळा, मी ज्यावेळी नांदायला आले त्यावेळी होत्या, पण आता त्या कोठे आहेत काही स्मरत नाही.' तातडीने थोरले भाऊ मामांचेकडे आले आणि मामांना म्हणाले, ''आई म्हणते पादुका होत्या खऱ्या पण आता त्या कुठे आहेत माहीत नाही.'' मामा त्यांच्याकडे भूवया उंचवीत वेगळ्या स्फूर्तीने म्हणाले, ''मी सांगतो त्या पादुका कुठे आहेत ते, तुझ्या घरातल्या परसात संडास आहे. मोरीचेही पाणी

तिथे सोडलेले आहे. मोरीचे आणि संडासचे पाणी जिथे एकत्र होते तिथे पादुका आहेत.'' काय सांगताय? असे आश्चर्यचकित होवून त्याने विचारले व त्याच्या अंगावर काटा आला. तो तडक गावी गेला आणि कुदळ खोरे घेऊन मामांनी सांगितलेल्या जागेपाशी आला. सगळा चिखल बाजूला केला. एक चौकोनी दगड लागला. कुदळीनी उलटा केला आणि काय आश्चर्य. त्यावर पादुका होत्या. दुसऱ्या दिवशी पळतच तो मामांच्याकडे आला. 'मामा, मामा पादुका सापडल्या आता याचे काय करायचे ?' असे आनंदाने म्हणाला, त्या पादुका स्वच्छ धुवून अभिषेक करा व एक घुमटी बांधा. घुमटी बांधतो असा संकल्प सोडा'' कुलकर्ण्यांच्याकडून हवा तसा प्रतिसाद आला नाही. त्यावेळी मामांनी विचारले, ''काय अडचण आहे ?'' तो अपराध्यासारखा चेहरा करून म्हणाला, नाही म्हटलं तरी दोन हजार रूपये खर्च आहे. आमच्याजवळ पैसे नाहीत.'' मामा त्यांचेकडे बघत म्हणाले, ''कृष्णा नावाचा कोण मनुष्य आहे ?'' त्याने सांगितले की, ''कृष्णा भारमल आमचा रयत आहे.'' मामा म्हणाले, ''त्यांच्याकडे घुमटी बांधायला पैसे मागा, फारतर माझे नाव सांगा तो देईल.'' कृष्णा भारमल हे अकोळचे तंबाखूचे मोठे व्यापारी. त्यांनी पैसे दिले. यावेळी अकोळचे प्रसिद्ध रमेश महाराज त्यांचेबरोबर होते.

आता घुमटी कुणाच्या पौरोहित्याखाली बांधायची हा प्रश्न निर्माण झाला. संकेश्वरच्या वे. शा. सं. रघुनाथ शास्त्रींकडे ते काम सोपवले. पण मामांनी सांगितले की, यातही अडचणी येतील. पण त्या न जुमानता कृती झाली पाहिजे. वेदशास्त्र संपन्न रघुनाथशास्त्रींना आधी आठ दिवस अशौच आले. त्यामुळे दुसऱ्या कुणाला तरी सांगणे भाग आले. मामांनी सांगितले की, ''कोल्हापूरच्या मा. वे. शा. सं. बंडोपंत धर्माधिकारी यांना माझे नांव सांगा व त्यांच्याकरवी हे काम करा.'' ते सर्वजण त्यांच्याकडे गेले. त्यावेळी कोल्हापूरातील अंबाबाईच्या देवळात षड्ग्रही शांतीचा यज्ञ होणार होता. त्याचे ऋत्वीज बंडोपंतच होते. तेंव्हा ते म्हणाले, 'मामांनी सांगितले आहे म्हणून मी येतो. पण मला गाडीने नेवून व आणून पोहोचवले पाहिजे. ते त्यांनी कबूल केले आणि १७-६-६८ ला यथासांग विधी होवून घुमटी बांधली गेली. त्यावेळी मामांनी सांगितले की, ''घुमटीच्या मागील बाजूस मध्यभागी एक औदुंबराचे



झाड आपोआप येईल. ते मोठे होवून त्याला फूल येईल. त्यावेळी तुमच्या घरात थोरल्या मुलाला मूल होईल.'' आज त्याठिकाणी औदुंबराचे झाड आले असून पुढे थोड्याच कालावधीत मोठ्या मुलाला मूलही झाले. धाकट्या मुलाला देवाची आरती करून ताम्हण खाली ठेवताच एक टपाल आले. सांगली बँकेत नोकरीसाठी त्याने अर्ज केला होता. त्याच्या इंटरव्ह्यू होता. इंटरव्ह्यूचा कॉल होता. इंटरव्ह्यू होवून त्याला भोज या गावी नोकरी मिळाली. ज्यादिवशी संकल्प सोडला त्यादिवशी मुलांच्या वडीलांचे रडणे थांबले. दत्तकृपेची पौर्णिमाच त्यांच्यावर उपासनेने बरसली.

एकदा श्री. नानासाहेब माधवराव देशपांडे, पाच्छापूरकर आपले मेव्हणे श्री. भाऊसाहेब खासबाग यानां घेऊन आले. मामांनी खासबागांना पाहून तुमच्याकडे गणपतीची उपासना आहे का ? असे विचारले, ते 'हो' म्हणाले खरं, पण त्याचा फारसा खुलासा झाला नाही. मामांनी त्यांना श्री क्षेत्र आप्पाचीवाडी येथे अमावस्येस येणेस सांगितले. अमावस्या २६ मार्च १९७१ ला होती. त्यादिवशी भाऊसाहेब यांच्या पत्नी, नानासाहेब यांचे बंधू सुरेंद्र वगैरे अमावस्येस आले. भाऊसाहेब मामांच्यापुढे बसले असता मामांनी भंडाऱ्यात बघून सांगितले, 'तुम्ही गणपतीला झाकून ठेवले आहे. त्याला बाहेर काढल्याशिवाय तुमची भरभराट होणार नाही.' तरीही त्यांचा नीट बोध त्यांना होईना त्यांच्यात चर्चा सुरु झाली खासबाग यांचे ते खाजगी देऊळ आहे. दरवर्षी गणेश चतुर्थीच्याआधी त्या गणपतीस ठराविक पेंटर रंग लावीत असे. अनेक वर्षे ही परंपरा चालू होती. आता काय करावे आणि कसे करावे अशा विचारात ते पडले. श्री. भाऊसाहेब खासबाग यांचे आत्याचे यजमान म्हणजे कोल्हापूरचे राष्ट्रीय संस्कृत पंडीत खुपेकर शास्त्री. हे अतिशय पंडीत तर होतेच पण त्यांचे लग्न होवून ५०-५५ वर्षे झाली असल्याने त्यांना देवळाच्या पूर्वस्थितीची कल्पना होती. त्यांचा सल्ला घेवून शास्त्रोक्त पद्धतीने कोणता आणि कसा विधी करायचा हे त्यांनी समजून घेतले आणि बेळगांवच्या वे.शा.सं. दांडेकरशास्त्री यांच्याकरवी करण्याचे ठरवले. २५ एप्रिल १९७१ ला अमावस्येला पुन्हा सगळे आप्पाच्यावाडीस गेले. त्यावेळी मामांनी अधिक स्पष्टपणे त्यांना सांगितले की, तुम्ही जी पूजा करता ती गणपतीची नसून

गणपतीच्या कवचाची आहे. तो आता योगनिद्रेतून जागा झाला आहे. 'तू मला बाहेर काढ, म्हणजे मी तुला बाहेर काढतो. असे तो म्हणतोय' असे मामा म्हणाले. ते तुम्ही कवच काढा. तुम्ही काढायला सुरुवात करा म्हणजे काय काय चमत्कार होतात ते पहा. श्रद्धेने खासबागांनी काढायचे ठरविले. चांगल्या कामात नेहमीच अडथळे असतात. त्यांनी पेंटरला बोलावून सांगितले. पेंटर काही केल्या तयार होईना. ''कुणाच्यातरी सांगण्यावरून तुम्ही काय करता? ते कवच खरडून काढता काढता मुर्तीलाच दुखापत झाली तर आणि आत मुर्तीच नसेल तर ?'' असे तो म्हणू लागला पण भाऊ साहेबांचा निर्धार पक्का होता त्यांचा निर्धार आणि निष्ठा पाहून पेंटरही तयार झाला. राष्ट्रीय संस्कृत पंडीत खुपेरकर शास्त्रींना बोलावून घेवून सर्वकाही विधिवत् करण्याचे ठरले. खरडून कवच काढण्याऐवजी ॲसिड लावून कवच काढण्याचे ठरले. ॲसिड लावून मूर्ती स्वच्छ करायला आठ दिवस लागले. आठ दिवसांनी शाळीग्रामची सुंदर मूर्ती दिसू लागली आणि सर्वांच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मूर्ती कोल्हापूरच्या अंबाबाईच्या समोर असलेल्या गणपती एवढी मोठी असून नागादि आभुषणांनी मंडीत आहे. १० मे १९७१ ला याची प्राणप्रतिष्ठा करण्याचे ठरले. मूर्तीच्या भोवतालचे खाली सांडलेले कवच गोळा केले तर ते ३०-३५ किलो निघाले. पहिला लेप पेशवेकालीन असावा असा तर्क करण्यात आला. पुढे मात्र सर्व जुळून आले. म्हणजे असे. बेळगांवात २१ ब्रह्मण एकदम मिळणे कठीण पण ते मिळाले. परत त्यासाठी कराव्या लागणाऱ्या यज्ञाला हत्तीच्या पायाखालची माती लागत होती. आता एक हत्ती म्हैसूर किंवा सांगलीला. पण महाराजांची योजना पहा. आदले दिवशी गावात सर्कस आली होती. अतिशय उत्कृष्ट समारंभ झाला. त्यावेळेपासून खासबाग मंडळी न चुकता प्रतिवर्षी १ हजार मोदकांचे हवन करून उत्सव करतात. वर्षा-वर्षाला तो वाढत्या श्रेणीने होत आहे. गणपतीची उपासना सुरु झाल्यापासून अनेक प्रश्न आपोआप सुटत गेले. आर्थिक परिस्थिती उत्तरोत्तर सुधारत गेली. आता त्यांनी मूर्तीला चांदीचा मुखवटा व सोंड केली आहे.

श्री. मामा आपल्या नातवाच्या बारशासाठी म्हणून सोलापूरला गेले होते. सोलापूरजवळ असलेल्या माढा या गावी श्री. बी. एस. पांडे नावाचे



जज्ज होते. ते आस्तिक्य बुद्धिचे, देवध्यानी, पण बुद्धीवादी होते. त्यांनी अक्कलकोट येथील श्री गजानन महाराजांचा अनुग्रह घेतला होता. मामा सोलापूर येथे आल्याचे कळल्यावर त्यांना आनंद वाटला. कारण मामांची व आपल्या गुरुंची भेट करून देण्याची त्यांची तीव्र इच्छा होती. ते सोलापूरला आले आणि एकेदिवशी मामांना घेवून अक्कलकोटला गजानन महाराजांचेकडे गेले. यज्ञ, दान, तप, कर्म व स्वाध्याय ही पंचसाधना सांगणारे गजानन महाराज हे अवतारी पुरुष होते. ''चैतन्या फुटली कर पदे, दैवत्व साकारले'' असे त्यांचे वर्णन ग. दि. मा. नी केले आहे. सकाळ संध्याकाळ अग्निहोत्र करण्यासाठी लोकांना सांगत त्यामुळे पर्यावरणाची शुद्धी होत असून मानवी जीवन अधिक सुकर होण्यास मदत होते. असे ते सांगत. अमेरिकेसारख्या देशातदेखिल त्यांचे २५-२५ हजार शिष्य अग्निहोत्र करत आहेत. हे सर्व मामांना माहित असल्याने मामा त्यांची भेट घेण्यास अतिशय उत्सुक होते. मामा बाळाप्पाच्या मठात पोहोचले आणि त्यांना कळाले की, आज एकादशी असल्याने महाराजांचे मौन आहे. मामा आणि पांडे दोघेही चुटपुटले, पण पांडेनी लांबून दर्शनाची परवानगी मागितली. पांडे, मामांचा मुलगा मधुकर आणि मामा असे तिघेजण आत दर्शनाला गेले. पांडेंनी साष्टांग नमस्कार घातला. महाराजांनी पाच बोटे उंचावून त्यांना आशिर्वाद दिला. मामांच्या मुलानेही साष्टांग नमस्कार घातला त्यावेळी त्यांनी तसाच हात वर केला. मात्र, मामांनी नमस्कार केल्यावर अनामिका आणि अंगठा एकत्र जुळवून एखाद्याला आपण 'छान-छान' म्हणून बोटांची हालचाल करतो तसेच महाजांनी भुवया उंचावून बोटांची हाताची हालचाल केली. खरा सद्गुरु आपल्यातील दैवी माणूस कसा ओळखतो याचे हे द्योतक आहे. मामा आणि त्यांचा मुलगा व श्री पांडे हे चहापानास आत गेले. महाजांच्या पत्नीने मामांना त्यांच्या मुलीची कुंडली दाखविली. मुलीचे लग्न होत नव्हते. मामांनी सांगितलेल्या उपायाने आणि सांगितलेल्या वेळेस तिचे पुढे लग्न झाले.

गं. भा. अंबाबाई दत्तात्रय कुलकर्णी, शिपूरकर ह्या मामांच्या मातोश्री यांचा जीवनवृत्तान्त पाहिला तर घोसरवाडकर घराण्यासाठी आणि ती दादांनी सुरु केलेल्या नाथ परंपरेला मदत करण्यासाठीच त्यांचा जन्म झाला होता असे

म्हणावे लागते. रामदास स्वामींची जशी वीणाबाई तशी गोविंदपंतांची ही गंगुबाई. त्यांच्या वेळच्या पद्धतीप्रमाणे त्यांच्या वयाच्या ९ व्या वर्षी लग्न झाले आणि एक वर्षाच्या आत त्यांच्या पतीचे निधन झाले. उभे आयुष्य त्यांनी आपल्या भावांच्यामुलांचे संगोपन करण्यात घालविले. गोविंदपंत दादांचेकडे खूप माणसे येत असत. त्यांना जेवण करून घालणे हे काम त्या अथकपणे करत असत. त्या उत्तम प्रकारच्या सुग्रण होत्या. हातावरची पातळ भाकरी आणि अमृतमुल्य ताक खाल्लेल्या अनेक माणसांना त्यांच्या मृत्यूसमयी गंगुबाईंची आठवण झाली आहे.

त्यांनी १९३२ साली मामांना दत्तक घेतले. त्यांची नाथांवर अतिशय श्रद्धा होती, विश्वास होता. आपल्या उत्तर आयुष्यात, व्रत, वैकल्ये, वैकुंठ चतुर्दशी आयुष्यभर अवलंबिली. मामांच्या बऱ्यावाईट प्रसंगात त्यांनी साथ दिली. त्यांनी नातवंडाचे संसार साक्षीरूपाने पाहीले आणि पणतू झाल्यावर अतिशय दुर्मिळ व मोक्षाचे द्वार उघडणारा सुवर्णाभिषेक करवून घेवून त्या कृतकृत्य झाल्या. देवा ब्राह्मणांना दक्षिणा वगैरे देवून त्यांनी देह ठेवला आणि जीवनमुक्ती साधली.

श्री. व्यंकटेश गोविंद कुलकर्णी, घोसरवाडकर उर्फ आण्णा हे मामांचे गुरुतुल्य ज्येष्ठ बंधू परिस्थितीमुळे यांचेही शिक्षण अपुरे राहिले. पण त्यांचा आवाज चांगला असल्याने त्यांच्या वडीलांनी त्यांना गाण्याच्या क्लासला घातले होते. 'ध्याये नित्यं....' सारखी स्त्रोत्रे ते फार चांगली म्हणत. देवाची गाणी विशेषत: 'काय तुझ्या सेवेला चुकलो' अशी गाणी अतिशय आर्त भावनेने व सुरात म्हणत. ऐकणाऱ्याला ऐकत रहावेसे वाटे.

ते कुरुंदवाड संस्थानात देवी डॉक्टर म्हणून नोकरीस लागले. त्यावेळी १५-२० माणसांच्या एकत्र कुटुंबाचा ते आधार होते. त्यांच्या पत्नी सौ. इंदिराबाई लवकर निवर्तल्या. आणि लौकिकार्थाने त्यांचा संसार संपला. स्थितप्रज्ञ बुद्धीने त्यांनी ते दु:ख सहन केले. 'आयुष्यातील सुखदु:खाची मजला का बाधा, जीवन नामक यज्ञातील दोन्हीही समीधा' मानण्या इतपत ते समचित्त झाले होते. त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर ते ज्येष्ठ असल्याने त्यांच्यात संचार सुरु झाला. त्यांचा संचार अतिशय देखणा होता. त्यांच्या शरिराचा होणारा कंप, संचारावस्थेतील त्यांची कानडी किंवा हिन्दी भाषा, प्रश्नाचे अचूक उत्तर



द्यायची त्यांची पद्धत, तलवारीचा आणि गुंडाचा बेहोशी खेळ हे सारे एकमेवाद्वितीय होते. ७-३-१९७१ साली त्यांनी कुरूंदवाड मुक्कामी देह ठेवला. त्यांच्या जबाबदाऱ्या अपुऱ्या राहिल्या तरी त्यांचा आत्मा कशात गुंतला नाही.

श्री. आप्पाजी गोविंद कुलकर्णी उर्फ आप्पा हे मामांचे कनिष्ट बंधू यांच्या जन्माच्यावेळी दादांनी संचारात सांगितले की हा तुझा शेवटचा मुलगा आहे. याला माझे नांव ठेव. म्हणून यांचे नांव 'आप्पा' (हालसिद्धप्पा) ठेवले आहे. यांचा जन्म २५-१०-१९११ सालचा आणि १९१४ साली त्यांच्या मातोश्री निवर्तल्या. त्यांचा स्वभाव करारी होता. ते फार शिस्तप्रिय होते. त्यांची नाथांच्यावर अतिशय श्रद्धा होती. वृद्धापकाळी ते आपला मुलगा अनिल याचेकडे गेले आणि त्यांनी ३-७-१९९६ साली देह ठेवला. त्यांच्या पत्नी श्रीमती लक्ष्मीबाई या नाथपरंपरेच्या सर्व घटनांच्या एकमेव साक्षीदार आहेत. त्या आपल्या मुलाकडे नाशिकला रहातात आणि नाथांच्या नामस्मरणांत कालक्रमणा करीत आहेत.

श्री. अनंत श्रीपाद शिंदगी हे मामांचे भाचे त्यांच्या मातोश्री म्हणजे मामांची बहीण त्यांच्या लहानपणीच गेल्यामुळे हे शिंदगी उर्फ बंडूआण्णा आपल्या आजोळीच वाढले. त्यामुळे त्यांना नाथपरंपरेची चांगलीच जाण होती. मूळचा यांचा पिंड हा अध्यात्मवादी होता. गोविंदपंत घोसरवाडकर म्हणजे त्यांचे आजोबा त्यांच्या दैवी चमत्काराच्या गोष्टी त्यांनी प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. त्यामुळे त्यांचा अधिकार काय आहे हे ते जाणून होते. त्यांच्यावर त्यांची अलोट श्रद्धा होती.

जीवन म्हणजे एक खेळ आहे, तो हसत हसतच खेळायचा असतो. त्यातली सुखदु:खे फारशी मनावर घ्यायची नसतात हे ते कुठे शिकले होते माहित नाही. पण हे तत्वज्ञान ते आयुष्यभर जगत होते. दारिद्र्याशी आयुष्यभर झुंज देत ते जगले. मोहाचे अनेक क्षण आले पण ते त्यांनी निश्चयाने आणि वैराग्याने टाळले. ते फक्त त्यांच्या दुर्दम्य श्रद्धेमुळे. ते एक साधे कामगार होते. पण त्यांनी कधी आपल्या परिस्थितीबद्दल कुरूबुर केली नाही. 'ठेविले अनंते' तसेच ते राहिले.

त्यांच्या निषस्पृहतेचा व अनासक्तीचा प्रसंग असा, एके दिवशी बस

पुरते खिशात पैसे असल्यामुळे ते बसने सांगलीहून माधवनगरला गेले. बसमध्ये त्यांना पुढची जागा मिळाली होती. माधवनगरला आले आणि सर्वजण खाली उतरले. हे खाली उतरत असताना त्यांच्या पायाला एक बॅग लागली. कुणीतरी पॅसेंजर बॅग विसरला होता. त्यांनी चेन उघडून बघितले तर त्यात १०,००० रू. रोख, पासबुक, चेकबुक होते. दुसरा कुणी सामान्य माणूस असता तर पैशाच्या अडचणीमुळे ती बॅग घेवून घरी गेला असता. पण त्यांनी तसे केले नाही. त्यांच्या सुजन मनाला ते पटले नाही. त्यांनी ती बॅग कंडक्टरच्या ताब्यात दिली. कंडक्टर त्या बॅगचे काय करणार हे माहीत असूनही ती बॅग त्याच्याकडे सोपवली ही त्यांची अनासक्ती.

अनेक लोकांना त्यांनी मार्गदर्शन करून मार्गस्थ केले होते. आप्पाच्यावाडीवर त्याची श्रद्धा अनिर्वचनीय होती. त्यांनी सांगलीला एखाद्या योग्याप्रमाणे देह ठेवला. पण दहाव्या दिवशी लवकर काकस्पर्श होईना. त्यांची इच्छा काय राहिली आहे हे कळेना. तेवढ्यात कुणीतरी त्यांच्या मुलाला म्हणजे महेशला सांगितले की, ''तू पुढे हो व दर अमावस्येला आप्पाच्यावाडीला जाईन, काळजी करू नका असे म्हण.' आणि आश्चर्य म्हणजे तो तसे म्हणताक्षणीच काकस्पर्श झाला आणि सर्वांना या मूर्तिमंत श्रद्धेचे दर्शन झाले.

मामा एकदा सांगलीला एका भक्ताकडे गेले असता, श्री अनंतराव कुलकर्णी, कुंभोजकर यांनी त्यांना आपल्या घराकडे बोलावून नेले. मामा आलेत असे कळल्यावर सांगलीची बरीच भक्त मंडळी जमली आणि सगळ्यांनी गुरुभजनाचा आग्रह धरला आणि गुरूभजन सुरु झाले. सुदैवाने प. पू. रामराय केळकर महाजांचे घर तिथून जवळच होते. त्यामुळे भजनाचे सूर त्यांच्या कानापर्यंत गेले. त्यांना मोठी उत्सुकता निर्माण झाली. आपले गुरुभजन कोण म्हणत आहे ? हे पहायला त्यांनी आपल्या मुलाला पाठवले. तेंव्हा त्यांना कळले की शंकरमामा शिपूरकर तिथे आले आहेत, सकाळी त्यांनी मामांना बोलावून घेतले त्यांचाही चिमड संप्रदाय व आपलाही चिमड संप्रदाय. हे ऐकून दोघांनाही अतिशय आनंद झाला. पुढे त्यांचा सहवास वाढला व ते मामांच्याकडे व आप्पाचेवाडीस येऊ जाऊ लागले.

प. पू. रामराय केळकर म्हणजे एक सात्विकतेचा पुतळा. वयाच्या



पाचव्या वर्षापासून ते कीर्तन करत असत. त्यांचे वडील गोविंद उर्फ मामा केळकर हे प. पू. हणमंतराव कोटणीस यांच्या आज्ञेवरून आमरण ३८ वर्षे कीर्तन करत होते. दादांनी त्यांची परंपरा केवळ अक्षुण्णपणे नव्हे तर उर्जस्वल स्वरूपाने चालवली. आज ६८ वर्षे त्यांच्याकडे कीर्तन सुरु आहे. त्यांचे थोरल्या चिरंजीवांनी ही परंपरा प्रज्वलीत ठेवली असून त्याला त्यांच्या बंधूंची व इतर घरातील लोकांचे त्यांना तन्मयी सहकार्य आहे. दादांच्या रूपाने एक आदर्श व्यक्तिमत्व आणि उत्तम आध्यात्मिक मार्गदर्शक मामांना आणि त्यांच्या वारसांना मिळाला आहे. घोसरवाडकरांचा चिमड सांप्रदायाचा चिमुकला ओहळ प. पू. रामराय केळकरांच्या गंगेला जावून मिळाला आहे.

'ओहळे तेचि करावे, गंगेचे अंग होवूनी ठाकावे' याप्रमाणे झाल्याने ओहळाला कृतकृत्य वाटते. मामांनी आपल्या पश्चात आपल्या थोरल्या चिरंजीवांना गुरुपदेश द्यावा अशी इच्छा दादांच्याकडे व्यक्त केली होती. त्याप्रमाणे दादांनी त्यांचे थोरले चिरंजीव मधुकर यांना गुरुपदेश देवून मार्गस्थ केले.

मामांच्यावर हालसिद्धनाथांची सांद्र कृपा कशी होती हे अनेक प्रसंगातून आपल्या लक्षात आले आहे. पण मामांना कुणी नावे ठेवलेले देवाला अजिबात खपत नव्हते. मामांची थोरली मुलगी सौ. शशिकला ही पहिल्या बाळंतपणाला निपाणीस आली होती. तिचे दिवस भरले होते. अशावेळी जवळच्या स्नेह्याच्या मुलीचे लग्न कोल्हापूरला होते. त्यांच्या आग्रहास्तव ते लग्नाला कोल्हापूरला गेले होते. नेमके त्याचवेळी मामांचे जावई श्री. बाबुराव नेसरीकर निपाणीस आले. रात्रीच्यावेळी अचानक तिच्या पोटता थोडे दुखू लागले. घरी मोठे पुरुष कोणी नव्हते. तेव्हा जावयांच्या मनात सहज विचार आला की असे दिवसात असताना मामांनी परगावी जावे का ? त्याचवेळी त्यांच्या दुसऱ्या मुलीला सुमनला कसेतरी होत होते. एकटक एकीकडे बघत राहीली. डॉ. गौतम शहांना बोलावले. त्यांना निदान झाले नाही. एक इंजेक्शन द्यावे म्हणून त्यांनी सिरींज भरली. तेव्हा एकदम तीउफाळून उठली आणि मला इंजेक्शन नको मला भंडारा द्या असे तिने मोठ्याने सांगितले. मग घरच्या लोकांच्या लक्षात आले. हातातला भंडारा बाबूराव यांच्याहातात देवून तिने सांगितले, 'मामा नसले तर काय झाले मी आलोय ना ? का काळजी करतोस?

त्या क्षणी बाबुरावांची खात्री झाली की 'हा नाथांचा संचार आहे कारण ती 'आलोय ना रे ?' म्हणाली, 'आले ना रे' असे स्त्रिलिंगी क्रियापद तिने वापरले नाही. हे विचक्षण बाबुरावांच्या नजरेतून सुटले नाही. तेंव्हापासून तिला संचार सुरु झाला.

मामांची दुसरी कन्या चि. सुमन हिच्या विवाहाची खटपट चालूहोती. मामा पण क्षीण झाले असल्याने त्यांना फिरणे, स्थळे बघणे जमत नसे. तिच्या लग्नासाठी म्हणून घरात उपासना चालू होती. लोकांचे विवाह केंव्हा होतील हे सांगणाऱ्या मामांच्या स्वत:च्या कन्येचा विवाह कां जमू नये असे कोणीतरी म्हटल्याचे त्यांच्या कानावर आले. मामांनी देवाला प्रार्थना केली आणि म्हणाले, 'देवा माझ्यापेक्षा तुला बोल लागेल याची मला भीति वाटते.' त्याच रात्री मामांना एक स्वप्न पडले. स्वप्नात देवांनी सांगितले की, 'सत्यविनायकाची पूजा कर.' पाच विनायकीत तुझ्या मुलीचे लग्न ठरेल. 'सकाळी उठल्यानंतर मामांनी घरी ही हकिकत सांगितली. पण ही पूजा कशी करायची वगैरे कुणालाच काही माहीत नव्हते. उपाध्यांना बोलावून घेतले आणि त्या पूजा विधीची माहिती विचारली. उपाध्यांनी सांगितले की माझ्याकडे पोथी नाही. तुम्ही ती पोथी मिळवा मग काय ते सांगतो. निपाणी, कोल्हापूर येतील पुस्तकांच्या दुकानात चौकशी करता कुठेही पुस्तक मिळाले नाही. दर अमावस्येला बेळगांवहून श्री. हुक्केरीकर म्हणून मामांचे मित्र येत असत त्यांना मामांनी सांगितले की, 'बेळगांवला पोथी मिळत असेल तर आणा.' हुक्केरीकरांनी 'रामतत्व' पुस्तकालयात चौकशी केली. त्या दुकानदाराने पाहिले पण पोथी कुठे मिळाली नाही. त्याने दुकानाची उलथा-पालथ केली पण तरीही पोथी मिळाली नाही. आता पोथी मिळत नाही म्हणून हुकेरीकर निघाले इतक्यात दुकानदाराने त्यांना हाक मारली. 'बापू जरा थांबा, शिडीवर चढून एक पोथीसारखे काहीतरी दिसते ते पाहतो.' दुकानदाराने वर चढून पाहिले तो काय आश्चर्य ! ती सत्यविनायकाचीच पोथी होती. पहिली पूजा पुण्याहवाचनासह करायची असते. त्या पूजेसाठी फळे, कमळाची फुले लागतात हे मामांना माहीत नव्हते. पूजेला तर प्रारंभ झाला. मामांचे एक मित्र श्री. दत्तवाडकर मामांच्याकडे कोल्हापूर आले. येताना देवासाठी म्हणून त्यांनी



कमळाची फुले आणली. थोड्याच वेळात मामांचे थोरले जावई आले त्यांनी निरनिराळी फळे आणली. त्यामुळे यथासांग पूजा झाली. समाधान झाले. दोन विनायकी झाल्या असतील तेवढ्यात एक स्थळ समजले व दाखविण्याचा कार्यक्रम पण झाला. ते स्थळ बेळगांवचे होते. तिसऱ्या विनायकीला बेळगावला याद्या व साखरपुडा झाला. अतिशय सुजन माणसे मिळाली. विशेष म्हणजे ती मंडळीही गणपतीभक्त मिळाली. त्यांच्या पूजेत उजव्या सोंडेचा गणपती आहे.

मामांची सर्वात धाकटी मुलगी सौ. जयश्री हीच काय ती लग्नाची राहिली होती. मामांना वरचेवर दम्याचा त्रास होता असल्याने ते अशक्त झाले होते त्यामुळे त्यांना शेवटच्या मुलीचे लग्न लवकर व्हावे असे वाटत होते. नोकरीच्या निमित्ताने त्यांचा थोरला मुलगा बाहेरगावी होता व धाकटा शिक्षणाच्या निमित्ताने मुंबईस होता. तेव्हा खटपट करणार कोण याची एक नकळत चिंता त्यांना होती. इतक्यात एक बेळगांवचे स्थळ कळले. मुलगा पुण्याला देना बँकेत होता. बेळगांवला दाखवून आले. त्यांच्याकडून अजून पसंती यायची होती. याचवेळी घोसरवाडला एक देवाचा समारंभ होता.

चि. सुमनचे पुढे लग्न झाले. सासरची माणसे अत्यंत समजूतदार व चांगली मिळाली. त्यांच्या सासऱ्याचे जिवलग मित्र सौंदलग्याचे जोशी म्हणून बेळगांव बँकेचे मॅनेजर होते. ते उत्तम ज्योतिषी होते. सुमनला पहिल्यांना दिवस गेल्यानंतर तिच्या कुंडलीवरून तिला मुलगी होणार असे भाकीत त्यांनी केले होते आणि मामांनी तर तिला मुलगा होणार म्हणून सांगितले होते. त्यामुळे तिची द्विधा मन:स्थिती झाली होती. बाळंतपणाला ती घरी आली तेव्हा मामांना तिने सांगितले की, सर्वजण तुझ्या कुंडलीत मुलीचाच योग आहे असे म्हणतात, तेव्हा मामा म्हणाले, 'अगदी बरोबर आहे. ग्रहावरून मुलीचाच योग दिसतो. परंतु नाथांच्या कृपेमुळे तुला देखणा, उत्तम मुलगा होणार आहे. त्याप्रमाणे तिला १५ ऑगस्ट १९७४ साली देखणा मुलगा झाला. त्याचे नांव चिंतामणी ठेवले आहे. अशी मामांची वाचासिद्धी व नाथांच्यावरची प्रेमाची सत्ता आणखी एकदा प्रत्ययाला आली.

फार दिवसांपासून मामांच्या मनामध्ये नाथांचा एक मोठा घसधसशीत उत्सव करायचा होता. कारण १९६० साली आप्पाचीवाडी येथे झालेल्या

महारूद्राला ते उपस्थित राहू शकले नव्हते. तो तसा उत्सव करण्याचा योग १९७६ साली त्यांच्याच जन्मगावी आला. पतिव्रता सावित्रीबाई शिंदे यांच्यामुळे श्री. हलसिद्धनाथांचा गावाला लाभ झाला. त्यांनी समाधी घेऊन दोनशे वर्षे पूर्ण होत होती. यानिमित्ताने मामांनी घोसरवाडला देवासमोर एक महारूद्र, स्वाहाकार करण्याचे ठरविले. गावातल्या सर्वलोकांना आमंत्रणे, आवाहन करून तो उत्सव संपन्न केला. तो समारंभ अभूतपूर्व झाला. ठिकठिकाणचे वेदमूर्ती ब्राह्मण बोलावले होते. वेदघोषांनी आणि रुद्राच्या चमक-नमकाच्या लयबद्ध उच्चाराने वातावरण भारावून गेले होते. गगनाचा गाभारा यज्ञातील धुमाने भरून गेला होता. प्रसन्न शुद्धतेचा, मांगल्याचा वावर सर्वत्र दिसत होता. मांगल्याच्या प्रकाशामुळे जनातले आणि मनातले काळे बेरे, वाईट, दुष्ट-पापी विचारांचा अंधार आपोआप नाहीसा झाला होता. सर्वांची मने कशी भक्तीप्रवण झाली होती. त्यामुळे मूर्तीमंत सात्विकता जणू कांही लोकांच्या मनात वस्तीला आल्यासारखे वाटत होते. संध्याकाळी गुरुवर्य प. पू. केळकर महाराज यांचे रसाळ आणि रवाळ कीर्तन झाले. त्यामुळे जणू काही अध्यात्माची उतारेपठच उतरल्यासारखे वाटत होते. दादांनी याची नोंद एका अभंगात केली आहे तो अभंग असा -

**घोसरवाडी माझे झाले कीर्तन । मागील ते लोण पुढे आले ॥१॥**
**द्विशत सांवत्सरिक सोहळा । जाहला आगळा काय सांगो ॥२॥**
**धन्य ते सावित्री धन्य गोविंदनाथ । परंपरा पंथ चाली लीले ॥३॥**
**दत्तोपंत व्यंकटेश आठवण । ते तरी तल्लीन सिद्धरूपी ॥४॥**
**हरिकीर्तन हे आमुची मिरासी । महाद्वारी कैसी सेवा झाली ॥५॥**
**शंकरेचि केले थोर कवतूक । भक्ति प्रेम भाक घातलीसे ॥६॥**
**दासरामा ऐसे लाभले वतन । पूर्ण समाधान दिले देवे ॥७॥**

त्यादिवशी देवाची पालखी काढली आणि पालखीने गावप्रदक्षिणा केली. लहान कळत्या मुलापासून थकलेल्या म्हाताऱ्यांपर्यंत सर्वजण त्यामध्ये स्वेच्छेने सामील झाले होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर एक प्रसन्न आणि वेगळा आनंद प्रगट झाला होता. संसारातल्या सर्व काळज्या, कष्ट आणि वेदना यांची विस्मृती झाली होती. त्यामुळे देहबुद्धिची मिठी सैल झाली होती. त्यामुळे



साऱ्या गावाला आनंदभुवनाचे स्वरूप प्राप्त झाले होते. पालखीच्या पुढे ढोल, ताशा, वाजंत्री यांचे स्वर परस्परात मिसळून एक जल्लोष घालत होते. एकमेकांचे बोलणे ऐकू न आल्यामुळे प्रत्येक जण आपल्या तंद्रीत होता. एक प्रकारचे द्वैत मोडून अद्वैत नांदत होते. तो सोहळा बघणाऱ्याच्या डोळ्याचे पारणे फिटावे आणि 'ऐसा सोहळा स्वर्गी नाही' असे उद्‌गार आपोआपच तोंडून निघावे अशी स्थितीही होते. अजितसिंह घोसरवाडकर सरकार आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांच्याहस्ते यज्ञाची पूर्णाहुती झाली. 'पाहे प्रसादाची वाट' म्हणणाऱ्या भक्तजनांना प्रसादाचे वाटप झाले आणि पालखी सोहळा संपन्न झाला. याचवेळी कुणीतरी अतिशय आनंदाची बातमी आणली की, जयूच्या स्थळाकडून होकार आला आहे. मामांना आनंद झाला. कुणीतरी त्यांना म्हणाले, 'स्थळाची सगळी चौकशी केली आहे ना ?' मामा ठामपणे म्हणाले, 'देवाचा उत्सव चालला असताना (२३-५-१९७६) त्यांच्याकडून होकार आला आहे ही मी महाराजांचीच अनुमती मानतो. मी काहीही चौकशी करणार नाही तिचे यात कल्याणच आहे. त्याप्रमाणे तिचे जीवन सुफल झाले आहे.

बेळगांवचे डॉ. बी. जी. कुलकर्णी मामांना येवून तपासून जात असत. एकदा मामांची छाती भयंकर भरली. बारीक ताप येवू लागला. डॉ. गौतम शहा हे मामांचे फॅमिली डॉक्टर होते. डॉक्टर स्वभावाने शांत, सज्जन, व सरळमार्गी होते. मामांच्यावर त्यांची निष्ठा असलेने आपल्या वडिलांचे ठिकाणी त्यांना मानत. त्यामुळे ते रोज येवून मामांना भेटत असत. त्यांनी मामांना नेहमीच्या गोळ्या दिल्या. पण त्याने उतारा पडला नाही. नेमका त्याचवेळी डॉ. बी. जी. कुलकर्णी यांचा हलकर्णीहून फोन आला. 'मामा मला कांही विचारायचे आहे. मी आता हलकर्णीहून बोलतोय, येवू का ?' मामांनी त्यांना निरोप पाठविला की, 'या पण येताना स्टेथोस्कोप वगैरे घेवून या. माझी तब्येत बरी नाही. माझी छाती भरलेली आहे.' आणि दोन तासात डॉक्टर तडक मामांचेकडे आले. डॉ. गौतम शहांना पण बोलावून घेतले. डॉ. बी. जी. कुलकर्णींनी त्यांना तपासले आणि म्हणाले, 'एका विशिष्ट प्रकारचे इंजेक्शन तुम्हाला द्यायला पाहिजे.' ते इंजेक्शन निपाणीत कुठेही मिळत नव्हते. डॉक्टर बी. जी. म्हणाले, 'माझेकडे बेळगांवला आहे पण तुमच्यापर्यंत पोचणार कसे ?' इतक्यात

निपाणीच्या टेलिफोन एक्स्चेंजमधील इनचार्ज असलेले श्री. पाटील मामांचेकडे आले. ते मामांचे भक्तच होते. तिथे येताच सर्व प्रकार त्यांच्या लक्षात आला. त्यांनी डॉ. बी. जी. नां विचारले, 'तुम्ही किती वाजेपर्यंत बेळगांवला पोचणार आहात ?' डॉक्टर म्हणाले, 'दोन-अडीच तासात.' पाटील म्हणाले, 'तुमच्या दवाखान्याचा पत्ता द्या. माझे नांव पाटील. माझे नांव सांगून टेलिफोन एक्स्चेंज मधला एक इसम तुमच्याकडे येईल. त्याच्याकडे बॉक्स द्या. तो ते घेवून बेळगांव एस. टी. स्टॅण्डवर येईल. निपाणीला येणाऱ्या एस. टी. ड्रायव्हरला तो बॉक्स देईल. गाडी नंबर व ड्रायव्हरचे नांव आम्हाला कळवेल. आमचा इथला निपाणीचा माणूस स्टॅण्डवरून ते घेवून मामांच्याकडे पोचवेल.' या सर्व गोष्टी ठरल्याप्रमाणे यंत्रवत् झाल्या. डॉ. शहांनी इंजेक्शने दिली. चार दिवसात मामा पूर्ववत् झाले. मामा नेहमी एक रामदासांची ओवी म्हणत,

**'राखावी बहुतांची अंतरे । भाग्य येई मग तद्नंतरे'**

मामांच्या व्यक्तिमत्त्वाच्या गुरुत्वाकर्षणाचा परिघ किती मोठा होता हेच यावरून दिसून येते.

शांतप्पा तवनाप्पा पाटणे नावाचे कोल्हापुरचे एक अभ्यासू आणि हुषार व्यापारी होते. गुळाचा व्यापार करीत असत. इतर आडत्यासारखे ते नुसते अडते नव्हते. कुठल्या भागात किती पाऊस पडला, नैऋत्य वारे कसे वाहीले यावरून शेंग कुठे किती पिकेल याचे अचूक आराखडे त्यांच्याकडे तयार होते. मामांची आणि त्यांची गाठ पडली त्यावेळी त्यांच्याकडे जन्मकुंडली नव्हती. जन्मकुंडली काढण्यासाठी लागणारी अचूक वेळ पण त्यांच्याकडे नव्हती. सगळेच अंदाजपंचे होते. मामांनी रोज चार चार तास बसून, कुंडलीचे सव्यापसव्य करून कुंडली सिद्ध केली. त्यावरून प्रत्येक वर्षाच्या तेजीमंदीचा अभ्यास करून ते पाटणेंना सांगत असत. एकदा शेंगेचा व गुळाचा व्यापार करणाऱ्या या व्यापाऱ्याला हळदीचा व्यापार करायला सांगितला. त्यांनी भराभर हळद खरेदी केली आणि हळदीचे भाव एकदम उतरले. ते मामांच्याकडे आले. मामांनी सांगितले की अजून हळद खरेदी करा, अमक्या अमक्या वेळी तेजी होईल. पाटणेंचा मामांच्यावर फार विश्वास. त्यांनी आपल्या रूईकर कॉलनीतल्या मित्राला पार्टनर घ्यायचे ठरवले आणि



हळदीचे सिंडीकेट निर्माण केले. हळदीच्या व्यापाराचे मुख्य केंद्र सांगली आणि पाकिस्तान. त्यांना देखील कोल्हापूरच्या सिंडीकेटची दखल घ्यावी लागली. इतका प्रभाव पाटणे सिंडिकेटने तयार केला. २-३ महिने गेल्यावर हळद दुपटीने वधारली आणि सिंडिकेटला ५-६ लाखाचा फायदा मिळाला असे त्यांच्या विश्वासाचे फळ त्यांना मिळाले.

मामांचे चुलत बंधू दिगंबर श्रीपाद कुलकर्णी, घोसरवाडकर यांची मुलगी उपवर झाली होती. तिच्यासाठी मामांचा भाचा बंडोपंत शिंदगी याने एक स्थळ सुचविले होते. त्याबद्दल विचारण्यासाठी दिगंबर मामांचेकडे आले मामांनी सांगितले की तू कुठेही जायचे नाहीस. माझ्याजवळ बसून रहा. चांगले स्थळ आपोआप चालत येईल. थोडासा दम खा. बापाचे मन चुटपुटत होते. पुढे दोन महिन्यांनी साताराजवळच्या धावडशी येथील तांबे यांचे स्थळ आले व उत्तम रितीने लग्न होऊन ती सुखात आहे.

श्री रूद्रो जिवाजी मुतालिक देसाई उर्फ आबासाहेब बेडक्याळकर हे नेहमीच आप्पाचेवाडीस येत असत. ते नाथांचे नि:स्सिम भक्त होते. ते यात्रेच्यावेळी देवाची कोठी सांभाळत. म्हणून त्यांना 'कोठीवाले' ही बिरूदावली प्राप्त झाली होती. त्यांचे जवळचे नातेवाईक निपाणीस रहावयास आले होते. मामा तिथेच असल्यामुळे त्यांच्या सगळ्या कुटुंबाचा घरोबा निर्माण झाला होता. त्यांचे एक चुलत काका मामांच्याकडे आपल्या मुलीची कुंडली घेवून तिच्या लग्नासंबंधी विचारायला आले. मामांनी कुंडली बघून विचारले की, 'आता दाखवायला जाणार आहात का ?' ते 'हो' म्हणाले. मामांनी सांगितले की, मुलगी त्यांना पसंत पडेल पण ते लोक अव्वाच्या सव्वा हुंडा मागणार, तुम्ही मला जमत नाही म्हणून निघून या, मुलगी त्याच घरात पडेल.'

शेडबाळचे संगोराम सावकार यांच्या मुलाला ते मुलगी दाखवायला गेले. संगोराम म्हणजे बडं प्रस्थ होतं. ते पिढीजात सावकार असून शेकडो एकर जमीन त्यांच्याकडे होती. मामांनी सांगितल्याप्रमाणे त्यांनी पुष्कळ पैसे मागितले. मुलाला मुलगी अतिशय पंसत होती. परंतु बाळासाहेबांना एवढे पैसे खर्च करणे शक्य नसल्याने ते परत निघून आले होते. याच्यामागे एका ज्योतिषी पुरोहिताचे षड्यंत्र होते हे नंतर उघडकीस आले. इकडे संगोरामांना

एकच मुलगा, बाबासाहेबांना एकच मुलगी. तेव्हा या दोघांना संतती होईल की नाही याची शंका त्यांच्या पुरोहितांनी व्यक्त केली. आणि संगोरामांचे कान भरले. त्यावेळी त्यांनी हुंडा जास्त मागून वाटाघाटी फिसकटवल्या. मुलाने आईला सांगितले की, 'मी लग्न केले तर याच मुलीशी करेन नाहीतर आजन्म ब्रह्मचारी राहीन.' झाले, संगोरामांच्यापुढे मोठा पेच निर्माण झाला. ही गोष्ट त्यांनी आपले स्नेही व वकील चंदूरकर यांना बोलले. चंदूरकरांच्या माहितीचे निपाणीला प्रसिद्ध असलेले ज्योतिषी जुगुळकर मास्तर म्हणून होते. चंदूरकरांनी संगोरामांना जुगुळकरमास्तरांकडे नेले. जुगुळकर मास्तर मामांना फार मानत होते. त्यामुळे ते म्हणाले, 'थांबा आपण मामांचेकडे जावून विचारू.' मामां कधी दुसऱ्यांच्या घरी जात नसल्यामुळे सगळा तो लवाजमा मामांच्या घरी गेला. संगोरामांनी दोघांच्या कुंडल्या मामांच्यापुढे मांडल्या. मामांनी सर्वदृष्टीने कुंडल्या पाहून सांगितले की, 'पत्रिका उत्तम जमतात, लग्न करण्यास हरकत नाही.' त्यावर भीत भीतच चंदूरकर वकील म्हणाले, 'संततीचे काय ?' वर्षभरात पहिला मुलगा होईल असे मामांनी सांगून टाकले. पुरोहिताच्याविरूद्ध हे भविष्य सांगितल्यामुळे चंदूरकरांना थोडी शंका आली. त्यांनी मामांना विचारले, 'मामा ही कुंडली तर बरोबर असेल ना ?' मामांचा Medical Astrology चा विशेष अभ्यास अल्याने मामांना प्रत्यक्ष संगोरामांना एक प्रश्न विचारला, 'तुमच्या मुलाच्या उजव्याडोळ्यात तांबूस तीळ आहे कां ?' त्यावर स्तिमित झालेले संगोराम म्हणाले, 'हो अगदी बरोबर ही गोष्ट त्याच्या आईला आणि मलाच फक्त माहीत आहे.' जून महिन्यात लग्न करावे असा त्यांचा विचार चालला होता. त्यावर मामांनी आपणहून सांगितले की, 'हे लग्न डिसेंबरमध्येच होईल.' चंदूरकर म्हणाले, 'एवढी कशाला वाट पहायची ?' 'बघा बघा' मामा म्हणाले.

या मुलाचे आजोबा बेळवी वकील म्हणून बेळगांवला होते. त्यांना दमा होता. त्यांना त्यांच्या नातवाचे लग्न ठरलेले कळले. त्यांना फार आनंद झाला, ते म्हणाले, 'हे लग्न जूनमध्ये करायचे नाही. जूनमध्ये मला दम्याचा फार त्रास होतो. माझ्या एकुलत्या एका नातवाचेलग्न मला डोळे भरून आनंदाने पहायचे आहे,.' डिसेंबरची तारीख ठरली. मामांना दोन्हीकडून मोठ्या आदराने



निमंत्रण आले. मामा लग्नाला म्हणून बेळगावला गेले. इकडे ज्योतिष पुरोहिताचा जळफळाट झाला. त्याचे षड्यंत्र निकामी ठरले. मामांची व त्याची एका हॉलमध्ये गाठ पडली. त्याने कुत्सितपणे विचारले, 'इथे शिपूरकर मामा कोण आहेत ?' बसलेल्या मामांनी 'मी' आहे असे सांगितले, 'तुम्ही काय काय वाचलय ? कशाच्या जोरावर संतती होईल म्हणून सांगितले ?' मामा विनम्रपणे म्हणाले, 'मी कसला खेड्यातला ज्योतिषी, माझा तो व्यवसाय नाही. मी हसबी घेऊन कुणाच्या दारात सांगायला जात नाही. विचारायला येणाऱ्या मात्र मला कळेल ते विनामूल्य सांगतो.' त्यावर तो अधिक आक्रमक होवू लागला. मामा अतिशय चिडून म्हणाले, 'तुला काय व्यवहारज्ञान आहे का ? दोन तासांनी लग्न होणार आणि अशावेळी ५-२५ लोकात मला हा प्रश्न विचारतोस ? तुझ्यासारखा दक्षिणा उकळायला मी आलो नाही. काढ तुझे पंचांग बघू, बरोबर आहे कां ? इथे बसलेल्या लोकांचे भविष्य एक तू तरी सांग नाहीतर मी तरी सांगतो. माझं चुकलं तर याच्यापुढे मी पंचांग बघणार नाही आणि तुझे चुकले तर मी सांगेन ती शिक्षा तुला भोगावी लागेल., तू संतती होणार नाही असे सांगितलेस. 'घे लिहून, १५ दिवसात कन्सेप्शन होवून वर्षाच्या आत मुलगा होईल.' हा संवाद सर्वजण तटस्थपणे ऐकत होते. बाबासाहेब व संगोराम यांना कळताच ते धावत आले व मामांची समजूत काढली. सर्व शांत झाले. डिसेंबरात लग्न झाले व ९ ऑक्टोबरला मुलगा झाला.

मामांचा थोरला मुलगा सातारा रोडला नोकरीनिमित्त होता. तेथे डॉ. महाजन म्हणून आयुर्वेदिक डॉक्टर होते. त्यांनी कूपरची नोकरी सोडून स्वत:ची प्रॅक्टीस सुरु केली होती. मामा ज्योतिषी आहेत हे कळल्यावर ते कुंडली घेवून आले. आल्या आल्या त्यांनी मामांना सांगितले की माझा कुंडली शास्त्रावर विश्वास नाही. तरी पण घरात कुंडली होती म्हणून तुम्हाला दाखवायला आलो. मामांनी उत्तरादाखल विचारले, 'तुम्ही याचा अभ्यास केला आहे का ?' त्यांनी नकारार्थी मान हलवली. 'मग तुम्ही कसे म्हणू शकता ? तुमचे वैद्यकीय चिकित्सा हे एक शास्त्र आहे. पण समजा, मामा म्हणाले, ''तुमचा स्टेथोस्कोप घेवून मी जर छातीवर ठेवून तपासायला लागलो आणि मला जर काही कळलं नाही तर तुम्हालाही काही समजत नाही असे म्हणायचे कां ?' मामांनी कुंडली

बघून डॉ. महाजन यांना विचारले, 'तुम्ही सध्या स्वतंत्र प्रॅक्टीस करता कां ? ते 'हो' म्हणाले, त्यांच्या कुंडलीतील रवि-बुध युती पाहून तुम्हाला स्कीन डीसीझ आहे ना?' एक्झीमा कुठे आहे तेवढे दाखवा.' त्यांनी पँटवर करून पायाला गुडघ्याला २-३ ठिकाणी असलेला एक्झिमा दाखवला. X-ray न काढता तुमच्या पँटमधला एक्झिमा मला दिसला मग हे शास्त्र आहे की नाही ? डॉक्टर आश्चर्यचकित झाले.

श्री. भवानराव नेर्लीकर नावाचे गृहस्थ हे प. पू. श्रीधरस्वामींच्या अंतरंगातील शिष्य होते. अहर्निश त्यांना स्वामींचा ध्यास. मामांची व त्यांची ओळख झाली होती. पुढे ही ओळख दाट मैत्रीत रूपान्तरीत झाली. त्यालाही तसेच कारण घडले. प. पू. श्रीधरस्वामींची ६४ वी जयंती कोल्हापूरात करण्याचे ठरले. स्वामीभक्त भवानराव नेर्लीकरांच्या माहितीचे व या अध्यात्मात रस घेणारे कोल्हापूरात कोणी मित्र अगर नातेवाईक नव्हते. त्यामुळे ते मामांच्याकडे आले. मामांनी त्यांना सर्वथैव मदत करायचे ठरवले. त्यांनी कोल्हापूरातील आपल्या मुलाला त्यांना जोडून दिले. उत्सव अतिशय उत्तम रितीने संपन्न झाला. पूर्णाहुतीच्या वेळेला मामा प्रत्यक्ष तिथे हजर होते. पूर्णाहुती झाल्यानंतर ज्या ज्वाला उफाळल्या त्यावर स्वामी आपला उजवा हात आशिर्वादासाठी उंचावलेल्या अवस्थेत आरूढ झालेले त्यांना दिसले. त्यांनी मनोभावे नमस्कार केला व भवानरावांना सांगितले की, 'स्वामी कार्यक्रमावर खूष असून त्यांनी तुम्हाला प्रसन्न मुद्रेने आशिर्वाद दिला आहे" असे सांगितले. तेथून पुढे भवानरावांची व मामांची मैत्री झाली. त्याचबरोबर त्यांचे मित्रवत असलेले दोन नातेवाईक श्री. नानासहेब पाच्छापूरकर व श्री दाजीसाहेब शिरगुरकर. यांचाही स्नेह जडला. श्री. नानासाहेब पाच्छापूरकरांची 'गायत्री मंत्राची' अनेक पुनःश्चरणे झाली होती. त्यामुळे त्यांना एक शक्ती प्राप्त झाली होती. त्याची त्यांना प्रचितीही आली होती. श्री. दाजीसाहेब शिरगुरकर हे मूळचे मोठे जमिनदार. कालवशात काहीतरी संकट आल्याने वेगवेगळ्या दिशेला एकत्र कुटुंबातील माणसे पांगली. दाजीसाहेब तर चक्क मिलिटरीत गेले. वाचेचा मवाळू, वृत्तीचा कनवाळू माणूस पण मिलिटरीत संस्काराने म्हणा अगर फिरलेल्या कालचक्रामुळे म्हणा सोवळे-ओवळे, धर्माचरण, कुलधर्म-



कुलाचार याला ते पारखे झाले होते. त्यांची मातृभक्ती मात्र अक्षुण्ण राहिली होती. त्यांचे बिऱ्हाड मिरजेला होते आणि त्यांची शेतीभाती परमानंदवाडी येथे होती. मिरजेहून शेती करायची म्हणजे Absentee Land चे जे होते तेच त्यांचे होत होते. हिशेब केला तर शेती आतबट्यातच होती. त्यांचेकडे 'पाटील महाराज' म्हणून एक सत्पुरुष यायचे. त्यांचा दाजीसाहेबांचेवर फार लोभ होता. त्यांच्या संगतीचा परिणाम म्हणून म्हणा किंवा यांचा गुरु पालटला म्हणून म्हणा दाजीकाकांच्या मनाचा लंबक अस्तिक्याकडे, कुलधर्म कुलाचाराकडे झुकू लागला. ते आता दर अमावस्येला आप्पाच्यावाडीस येवू लागले. त्यांचे बंधू श्री. भाऊसाहेब शिरगुरकर हे राजकारणात होते. कर्नाटकचे माजी मंत्री श्री. व्ही. एल. उर्फ ब्यावुडकर पाटील यांचे समवेत ते असायचे. पाटील देखील श्री. हालसिद्धनाथांचे परंपरेने मानकरी व भक्त. भाऊसाहेबांच्या पत्नीसारख्या आजारी असायच्या. एका अमावस्येला दाजीकाकांनी मामांना त्यांच्या आजारपणाचा प्रश्न विचारला. त्यावर मामांनी सांगितले की, 'देवाला वालूक घालतो म्हणून मागून घेतले आहे. तो अजून घातला नाही. राणी छाप रूपया उतरून ठेवला आहे. वालूकासाठी ! जावून चौकशी करून येण्यास सांगितले. त्यांनी आपल्या आईला (माईंना) विचारले. त्यांनी 'होय' असे सांगितले. त्यांच्या जमिनी कुर्ली गावात होत्या. त्यांचे पूर्वज तेथे रहात असत. त्यामुळे त्यांचा हालसिद्धनाथाशी अगदी जवळचा संबंध. या सगळ्या गोष्टीला उजाळा मिळाला. अंधूक झालेली परंपरेची लिंक आता स्पष्ट झाली. त्यांनी सांगितल्याप्रमाणे वालूक घातल्यानंतर भाऊरावांच्या पत्नींची तब्येत सुधारू लागली. दाजीसाहेब म्हणजे एक ऋजू, सकारात्मक विचारधारा असलेला, जिव्हाळा निर्माण करणारा, हवाहवासा वाटणारा, आपल्या सनदशीर वागण्याने, लिखाणाने व बोलण्याने सर्वांनाच जवळचा वाटणारा असा एक नातेवाईक, मामांचा व त्यांचा घरोबा वाढला. मामांच्या सहवासाने त्यांचे विचारांचे चक्र व आचाराचा धर्म बदलला. देव, धर्म आणि उपासना त्यांना जीवनात किती महत्त्व आहे हे त्यांना उमजून आले. त्यात त्यांना प. पू. श्रीधर स्वामींचा प्रत्यक्ष सहवास लाभला होता. त्या परसिस्पर्शाने अगोदरच त्यांचे सोने झाले होते. ते मामांच्या संगतीने उजळून निघाले. त्याला

सुगंध प्राप्त झाला. एकदा मामा व दाजीसाहेब शिपूरला रामलिंगाच्या देवळात गुरुचरित्राचा सप्ताह करायला बसले. दाजीकाकांना तंबाखू खाण्याची सवय होती एके दिवशी तंबाखू थुंकून आलयावर मामा त्यांना म्हणाले, 'दाजीसाहेब तुम्ही तंबाखू थुंकून आलात, तुम्हाला असे वाटत नाही कां की आपण जे नामस्मरण करतो तेच थुंकून आलो आहोत, जी तंबाखू आपला पुण्यक्षय करते ती सोडून द्या.' दाजीसाहबोंच्या मनाला तडितेचा आघात झाल्यासारखे वाटले आणि त्यांनी ते व्यसनाचे शिवधनुष्य त्यासरशी काडकन् मोडून टाकले आणि त्यांची ती सवय कायमची सुटली.

LL.B. शिकत असलेला त्यांचा पुतण्या (भाऊरावांचा मुलगा) याला व्यापार करशील म्हणून मामांनी सांगितले होते. 'आमच्या घराण्यात कुणी व्यापार केला नाही' असे आनंद म्हणाला, त्यावर मामा म्हणाले, 'याचे उत्तर काळच देईल.' मामांनी दाजीसाहेबांना मिरजेहून परमानन्दवाडीला बिऱ्हाड हलविण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे शेतात घर बांधून १६-१०-१९७९ ला वास्तुशांत करून ते रहावयास गेले. थोडी जमीन विकण्याचे ठरवले. कोल्हापूरचे श्री. रामभाऊ कबनूरकर गुळाचे व्यापारी यांनी ती जमीन योग्य किंमतीस घेतली व  एक अट घातली की माझ्या दुकानात तुमच्या पुतण्याला चार आणे वाटणी देतो. त्याने कर्नाटकातला गूळ आणायची व्यवस्था करावी. मी त्याला सर्व शिकवतो. काळजी करू नका. त्याप्रमाणे आनंदराव गुळाच्या व्यापारात पडले व आज कोल्हापूरात स्थायिक झाले असून सुस्थितीत आहेत.

श्री. माधवराव देशपांडे हे मूळचे कुरुंदवाडचे. १९७२ला मामा कुरूंदवाडला  असल्यापासून त्यांची मैत्री त्यांच्या घराण्यात मुले जगत नसत. माधवराव स्वत: लहानपणी फार आजारी होते. म्हणून त्यांची आईने त्यांना नरसोबावाडीला घेवून जावून दत्ताच्या पायावर घातले. त्यांना आजारपणात दत्ताचे तीर्थ पाजवले. दत्ताची कृपा होवून ते सावरले. मामांना त्यांनी १९४८ साली जळीत झाल्यावर अमूल्य अशी मदत केली, धीर दिला. ते रिटायर झाल्यानंतर न चुकता अमावस्येस येवू लागले. आदल्यादिवशी निपाणीस येत व मामांच्याबरोबर आप्पाचेवाडीस जात. त्यांच्या घराण्यात दत्तभक्ती चालत आली होती. त्यांच्या मुलाबाळांची देखील मामांच्यावर श्रद्धा होती. कोणतीही



गोष्ट ते मामांना विचारल्याशिवाय करत नसत. त्यांच्या मनोकामना सर्व पूर्ण झाल्या होत्या. एकदा ते आजारी पडले कावीळ झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले कांही केल्या कावीळ बरी होईना. अनेक तपासण्या केल्या. कॅन्सरचे निदान झाले. मामांना हे कळले. मामा त्यांना बघायला गेले. आजाराने कण्हत असलेले माधवराव मामांना बघून शांत झाले, उल्हसित झाले. मामांच्यावर त्यांची अतीव निष्ठा होती. मामांनी त्यांना खूप धीर दिला. त्यामुळे त्यांच्या मनाला थोडी उभारी आली. मामा परत निघाले तेव्हा त्यांचा मुलगा बसस्टॉपपर्यंत पोचवायला आला होता. त्यावेळी मामा ओक्साबोक्सी रडले त्याचवेळी त्यांचे पुढचे भविष्य लक्षात आले. बरा न होणारा रोग बळावत गेला. माधवरावांची तब्येत गंभीर झाली. त्यावेळी आप्पाच्यावाडीची यात्रा होती. माधवरावांनी यात्रा आहे हे लक्षात आल्यावर 'आप्पाच्यावाडीला जावून भंडारा व तीर्थ घेवून ये' असे मुलाला बोलावून सांगितले. त्याप्रमाणे त्यांचा मुलगा सीना देशपांडे स्कुटरवरून आप्पाचेवाडीला आला होता. त्यावेळी आप्पाचेवाडीस रूद्राभिषेक चालला होता. तो जाण्याची गडबड करत होता. मामांनी त्याला थांबायला सांगितले. माधवरावांची गंभीर झालेल्या प्रकृतीची जाणीव मामांना त्याने दिली. तेव्हा मामांनी त्याला सांगितले, 'इथला तीर्थ, प्रसाद व भंडारा तोंडात जाईपर्यंत काहीही होणार नाही. तू निवांत बस.' त्याचा नाईलाज झाला. अभिषेक संपल्यावर मामांनी त्याला प्रसाद व भंडारा दिला. तो निघाला. मनात सारखी धाकधुक होती. काय दृश्य दिसतय कुणास ठाऊक असे त्याला वाटत होते. तो पोचला त्यावेळी माधवराव ग्लानीत होते. 'सीना आला' हे कळताच ते शुद्धीवर आले. तीर्थ-प्रसाद घेतला कपाळाला भंडारा लावून घेतला आणि अर्ध्या तासातच प्रसन्न चित्ताने त्यांनी देह ठेवला. श्रद्धेची ही किमया 'जाणे तो जाणे' हेच खरे.

मामांचे बालपणाचे मित्र श्री. नारायणराव कुंभोजकर उर्फ आबा यांची द्वितीय कन्या चि. शैला तथा सौ. गायत्री कुलकर्णी आपला अनुभव सांगते. 'मी लग्न झाल्यानंतर आमच्या घरी आले. नोकरी करत करत घरातले व देवधर्माचे खूप करावे लागे. तसे मी सासऱ्यांना सांगितले. माझ्या एकटीवर सगळा भार पडतो. वाटणीप्रमाणे इतर भांवडांच्यावर पण थोडा भार टाका.' सासरे काही बोलले नाहीत. त्यामुळे मला मन:स्ताप झाला. त्याच रात्री मामा

माझ्या स्वप्नात आले. 'मी अंबाबाईच्या देवळातील गरूड मंडपासमोर जे शंकराचे छोटे देऊळ आहे तेथे आबा (मामा) उभे आहेत. ते मला म्हणाले, 'शैले, तुला देवाधर्माचे करायला एवढे जड जाते कां ? मग इथे सर्व देव आणून ठेव' असे म्हणून काठीने मला जागा दाखवली. मी विचारले, 'फोटोचे काय करू ?' आप्पाचेवाडीत आणून लाव.' मी कांही बोलले नाही कारण त्यांच्या चेहऱ्यावर रागाचे सावट होते . पण क्षणार्धात त्यांचा चेहरा बदलला व प्रेमळपणाने म्हणाले, 'हे बघ देवाचे सर्व कर तुझे चांगलेच होईल.' असे म्हणून अंतर्धान पावले. त्याप्रमाणे मी परत कधीही विषय काढला नाही. माझे त्याप्रमाणे चांगलेच झाले.'

'मी एस.एस.सी. पास झाल्यानंतर कॉलेजला पाठविण्याची वडिलांची इच्छा नव्हती. जूनमध्ये कॉलेजेस सुरु झाली आणि माझी खात्री झाली की आपलं शिक्षण थांबलं. पण एकदा आबा काही कामासाठी आमच्या घरी आले होते. त्यांना ही हकीकत कळली व त्यांनी कॉलेजमध्ये नाव घालण्यास सांगितले. पुढे ना. पा. हायस्कूल (प्राथमिक) मध्ये मला नोकरी मिळाली. पगार कमी असल्यामुळे मी नोकरी सोडण्याच्या विचारात होते पण आबांनी सांगितले, 'नोकरी सोडू नको. पुढे तुमचे पगार चेकने मिळतील.' त्यांचे बोल अक्षरश: खरे ठरले आणि मला आज त्याचे महत्त्वही पटले.

मामांची सगळ्यात धाकटी मुलगी चि. सौ. जयश्री, ती लग्न होवून पुण्यात हडपसरला रहायला गेली. त्या घरात काहीतरी दोष आहे असे तिला कुणीतरी सांगितले. मुळातच ती भित्री. या सांगण्याने ती पार घाबरून गेली. पण देवाने तिला संचारात सांगितले, 'अगं, माझा घोडा मी पुढे पाठवलाय. तो तुझे संरक्षण करेलच. रोज माझा भंडारा लावून घेत जा आणि घरात सगळीकडे शिंपड म्हणजे तुला कशाचीच भिती वाटणार नाही.' तिची नितांत श्रद्धा असल्यामुळे तिची भिती पार पळून गेली व तिला कसलाही त्रास झाला नाही. असे असते श्रद्धेचे फळ.

चि. सौ. जयश्री दुसऱ्यावेळी गरोदर असताना तिला दोन दिवस हॉस्पिटलमध्ये ठेवले होते. तिचे मिस्टर श्री. अनिलराव पहिल्या मुलाजवळ कोणी नसल्यामुळे घरात होते. तिला एकटीच दवाखान्यात असल्यामुळे भिती



वाटत होती. 'आज आबा (मामा) असते तर 'असे ती म्हणाली, तेवढ्यात तिला एक डुलका लागला. आणि स्वप्नात आबा (मामा) येवून म्हणाले, 'जयें मी इथेच आहे. कुठे गेलेलो नाही' असे म्हणत त्यांनी पाठीवरून हात फिरवला आणि ती जागी झाली. तिला फार बरे वाटले. ती सुखरूप बाळंत झाली. पार्थिव देह ठेवल्यानंतर देखील मामांची कूर्मदृष्टी आणि सावली आप्तेष्टांच्यावर आणि भक्तांवर कशी अखंड होती ते यावरून लक्षात येते.

चित्रमहर्षी भालजी पेंढारकर हे महाराष्ट्रातील एक सर्वमान्य व्यक्तिमत्व. त्यांचे मित्र बाळासाहेब जनवाडकर हे मामांच्याकडे येत असत. भालजींना एका सिनेमासाठी चांगला मुहूर्त हवा होता. तो जनवाडकरांनी मामांच्याकडून काढून घेऊन भालजींना दिला. भालजींची आणि मामांची तशी परस्पर ओळख नव्हती. उलट मामाच त्यांचे नाव आणि कर्तृत्व ऐकून होते. मुहूर्त दिल्यापासून २-४ दिवसात भालजींना अशी एक आतून उर्मी झाली की, या माणसाचे दर्शन घ्यावे. त्यांनी जनवाडकरांना बोलावून सांगितले की मला मामांना भेटायचे आहे. मामांना वरचेवर बरे नसते तेव्हा त्यांना विचारून तुम्हाला सांगतो असे जनवाडकरांनी सांगितले. भालजी म्हणाले, 'पण मला त्यांना लांबून बघायचे आहे व एक आदराने नमस्कार करून यायचे आहे.' जनवाडकरांनी दिवस ठरवला व भालजी आले. मामांची व त्यांची दृष्टादृष्ट झाली आणि दोघेही तास-दीड तास गप्पात, चर्चेत रंगून गेले. त्यावेळी 'बाल शिवाजी' या चित्रपटाविषयी चर्चा झाली.

दत्ताची जशी तीन ठिकाणे आहेत तशी श्री हालसिद्धनाथांची तीन महत्त्वाची ठिकाणे आहेत १) घोसरवाड २) कारिकोळ ३) आप्पाचीवाडी. घोसरवाड येथे नाथांच्या बाललीला झाल्यामुळे तिथे अजूनही पालखीमध्ये चमत्कार पहायला मिळतात. पालखीचा मार्ग ठरलेला आहे. एखाद्या नवीन माणसाने पालखी धरली तर पालखी त्याला बरोबर नेहमीच्याच मार्गाने घेवून जाते. विजापूर जिल्ह्यात कारिकोळ नावाचे ठिकाण आहे. तिथेही असा पालखीचा चमत्कार घडतो. मामांचे ज्येष्ठ जावई श्री. बाबूराव नेसरीकर, मामा आणि इतर लोक ७४-७५ साली कारीकोळला गेले होते. तिथल्या लोकांनी मामा आले म्हणून यात्राच भरवली. देवाची पालखी काढली. त्यावेळी

अचानकपणे मामांनी बाबुराव यांना पालखी धरण्यास सांगितले.पालखी धरण्याचा अनुभव त्यांना नव्हता. यापूर्वीही कधी मामांनी त्यांना पालखी धरायला सांगितली नव्हती. पालखी धरून ५-१० पावले गेले असतील नसतील तो पालखी एकदम इतकी जड झाली की पुढचे पाऊल कष्टाने टाकावे लागत होते. जवळपास कोणी फिरकत नव्हते. पालखीचा दांडा वर करण्याचा ते प्रयत्न करत होते. पण ते करता येईना. परत ८ ते १० पावले टाकल्यावर पालखी पूर्ववत् हलकी झाली व त्यांना पालखीच्या चमत्काराची प्रचिती आली.

मामांचे पुतणे श्री. दत्तोपंत घोसरवाडकर एका अमावस्येला मुक्कामाला आले होते. मामांची मोठी मुलगी सौ. शशी घुमटाला प्रदक्षिणा घालायला जाताना दत्तोपंतांनी तिला हाक मारली आणि सांगितले की, ‘माझ्या स्वप्नात आबा (मामा) आले होते. त्यांनी तिच्या मोठ्या मुलीला मामांच्या विनंतीवरून नाथमहाराज मुलगा देणार आहेत व त्याची प्रकृती ठणठणीत असेल असे सांगितले. दत्तोपंतांनी तसे मामांच्या मुलीस सांगितले. त्याप्रमाणे त्यांच्या मुलीला मुलगा झाला. एकदा तो आजारी असताना त्याला सलाईन लावले होते. त्यास्थितीत तो कॉटवरून खाली पडला. त्याला रक्तस्राव झाला पण काही झाले नाही.

बबनराव उर्फ नरहरी अध्यापकर,. बाबुरावांचे मेहुणे एकदा निपाणीस बाबुराव यांचेबरोबर आले होते. मामांनी जेवताना त्यांना आपल्याजवळ बसवून घेतले त्यादिवशी साखरभात केला होता. साखरभात वाढताना अध्यापकर म्हणाले, ‘मला साखरभात आवडत नाही, नको.’ तेव्हा जवळ बसलेल्या मामांनी डाव्या हाताने पाठीला स्पर्श करून विचारले, ‘बबनराव, तुम्हाला मुलगा हवाय ना ? मग खा साखरभात मुलगा होईल.’ त्याप्रमाणे त्यांना दोन मुलींच्यावर मुलगा झाला.

मामांचे एक्त भक्त श्री. बी. एच. पाटील सोळांकूरकर यांच्या थोरल्या बंधूंची त्यांनी सांगितलेली हकीकत नोंद करण्यासारखी आहे. त्यांनी B.E. च्या शेवटच्या वर्षाला असताना शिक्षण सोडले. पुढे ते राजकारणात पडले. साखर कारखान्यामध्ये डायरेक्टर झाले. लग्न झाले. त्यांना मुले होत पण जगत नव्हती. असे ३-४ वेळा झाले. सगळे डॉक्टरी उपाय झाले. पुण्याला ससून



हॉस्पिटलमध्ये डॉ. टिळक नावाचे स्त्रीरोग तज्ञ होते. त्यावेळी पाचव्यांदा त्यांच्या पत्नी गरोदर राहिल्या. डॉक्टरांनी पहिल्या महिन्यापासूनच विश्रांती घेण्यास सांगितली. त्याचवेळी नेमके श्री. महिपती पाटील आपले धाकटे बंधू श्री. बी. एच. पाटील यांचेबरोबर आप्पाचेवाडीस आले. मामांनी त्यांना पत्नीला घेवून दर अमावास्येस येण्यास सांगितले. त्यांचे मन तयार होईना. गेल्या चार वेळेचा अनुभव त्यांच्या गाठी होता आणि डॉक्टरांनी अजिबात हालचाल करायची नाही असे सांगितले होते. त्यावर मामा थोडेसे परखडपणे म्हणाले की, “जास्तीत जास्त काय होईल ? चार वेळेला जे झाले ते देवाच्या दारात होवू दे, पण मी तुम्हाला खात्री देतो की, नॉर्मल डिलीव्हरी होईल. कांही त्रास होणार नाही. मात्र मी सांगेपर्यंत तुम्हा दोघांनी अमावास्या बंद करायची नाही.” उभयतांनी ती कष्टदायक गोष्ट मान्य केली. आणि अमावास्येला येवू लागले. आठ महिन्यानंतर मामांनी सांगितले की, ‘पुढच्या अमावास्येला पेढे घेवूनच या.’ त्याप्रमाणे त्यांना कांहीही त्रास झाला नाही. नॉर्मल डिलिव्हरी होवून मुलगा झाला. त्यामुळे त्यांच्या श्रद्धा दृढ झाल्या. श्री. बी. एच. पाटील मामांना भेटले की मामा त्यांना विचारत, ‘कसे काय तुमचे ?’ त्यावर ते म्हणत उत्तम आहे.’ ‘तुमचे सगळे उत्तमच होणार आहे’ असे मामांचे त्यांना प्रत्युत्तर असे. त्याप्रमाणे खरोखरच त्यांचे उत्तम झाले असून त्यांचे सारे कुटुंब दर अमावास्येला आणि यात्रेला येत असते.

मामा हे सत्प्रवृत्तीचे संत असले तरी देवभोळे, कोणीही येवून टिकली लावावी असे व्यवहार पराङमुख कधीही नव्हते. त्यांना फसवणे सोपे नव्हते. लोकांची चाल, चालणूक आणि मनातला कपटी हेतू ते ताबडतोब ओळखत. घोसरवाडचा एक पुजारी पैशाची अडचण होती म्हणून दोघा तिघांना थापा मारून पैसे गोळा करीत होता. श्रद्धेचा गैरफायदा घेत होता. उरलेले पैसे मामांच्याकडून उकळावेत म्हणून मामांच्याकडे आला. मामांना काकुळतेने म्हणाला, ‘कोर्टाची जप्ती आली आहे. तीनशे रूपये कमी पडतात ते मला द्या. पंधरा दिवसात परत करतो. जयसिंगपूरला दुकानात शेंगा लावलेल्या आहेत. ते पैसे आले की तुम्हाला ताबडतोब तुमचे पैसे परत करतो.’ मामा त्याला म्हणाले, ‘ज्या आडत्याकडे शेंगा लावल्यास त्याच्याकडूनच आगाऊ

पैसे घे की', मामांनी त्याला चाचपायला सुरुवात केली. हा त्यांचा युक्तीवाद ऐकून तो पुजारी जरा गडबडला. हे सारे खोटे कुभांड आहे असा जो मामांचा तर्क होता त्याला त्याच्या या चाचरण्याने पुष्टी मिळाली. त्याच्या नक्राश्रूकडे दुर्लक्ष करून मामांनी त्याचे पितळ उघडे पाडण्यासाठी एक शेवटचा प्रश्न विचारला, 'किती हजाराचा दावा आहे रे ?' त्याने एक आकडा ठोकून दिला. 'सात हजाराचा'. मामांनी विचारले, 'कोणत्या कोर्टात चाललाय' पुजारी म्हणाला, 'कोल्हापूरच्या कोर्टात' एकदम मामा म्हणाले, 'दहा हजारपर्यंत जयसिंगपूरच्या कोर्टात काम चालते आणि सात हजारासाठी तुझी केस कोल्हापूरला कशी आली ? आतापर्यंत फुगवत आणलेल्या फुग्याला या मामांच्या शब्दांनी टाचणी लागली आणि त्याच्यातली हवाच गेली व तो उठून चालता झाला.

मामा हे तसे मिष्कील व विनोदही होते. निपाणीला मामा ज्या घरात रहात होते तिथे स्वयंपाकघरात देवघर होते. देवघराच्या पाठीमागे असलेल्या भिंतीच्या पलीकडे लहान मुलांची शाळा होती. त्या शाळेचे शिक्षक मामांना फार मानत. ते शिक्षक मुलांना जे शिकवीत ते सर्व मामांच्या घरात ऐकू येई. एके दिवशी मामा पूजा करत असताना पलीकडे शिक्षक शिकवत असलेला श्लोक मामांच्या कानावर आला. श्लोकाच्या शेवटी, 'शांतिः शांतिः शांतिः' असा पाठ होता. ते शिक्षक मात्र विसर्ग सोडून मुलांना शांती शांती शांती असे म्हणायला सांगत होते. मामांना हसू आले नेहमीप्रमाणे संध्याकाळी मामा बाहेर कट्यावर बसले असताना ते शिक्षक समोरून येत होते. मामांनी त्यांना हाक मारली व मिष्किलपणाने म्हणाले, 'मास्तर तुम्ही मुलांना तीन वेळा शांती शांती शांती असे सांगत. पहिली शांती तुमच्या बायकोचे नांव असेल, दुसरी शांती हे नांव तुमच्या ठेवलेल्या बाईचे असेल हे मी समजू शकतो. पण ही तिसरी शांती कोण हे सांगाल का ? मास्तर लाजले आणि निघून गेले.

मामांच्या पुतण्याचे अनिलचे सांगलीला लग्न होते. लग्नासाठी सर्व नातेवाईक जमले होते. जेवण झाल्यानंतर हात धुवायला म्हणून मामा बेसिनकडे चालले असताना त्यांचा भाचा बंडोपंत शिंदगी यांची मुलगी चि. अरूणा हिने त्यांच्या हाताला धरून नेले. हात धुता धुता मामांनी तिला विचारले, 'तू



आता काय करतेस ?' 'मी सध्या टायपिंग क्लामध्ये शिकवायला जाते' अरुणा म्हणाली. त्यावर मामा म्हणाले, ' सहा महिन्यात तुला सरकारी नोकरी लागते बघ.' आणि एका महिन्यातच तिला सांगली इरिगेशन डिपार्टमेंट कडून कॉल आला. सांगली इरिगेशनला काम जास्त असलेने त्यांना तात्पुरता एक टायपिस्ट हवा होता. तिने मामांना आनंदाने पत्र लिहिले. त्यावर मामांचे उत्तर आले की, ' ही नोकरी कायम स्वरूपाची नाही, दोन महिन्यात तुला कायम स्वरूपाची नोकरी लागणार आहे आणि खरोखरच दोन महिन्यात वारणा-प्रकल्प मधून तिला इंटरव्ह्यू चा कॉल आला. तोंडी, लेखी सर्व परीक्षा होवून तिला रेग्युलर ऑर्डर आली आणि ती कायम झाली. अद्याप ती तिथे काम करत असून आनंदात आहे.

मामांचे जिवश्च कंठश्च मित्र श्री. नारायणराव उर्फ आबा कुंभोजकर हे भाद्रपद-अमावस्या घालत होते. १९७९ साली नेहमीप्रमाणे ते अमावस्येसाठी सर्व तयारीनिशी आले. त्यांच्या सर्व कुटुंबियांचा त्यात सहभाग होता. पण कसे कुणास टाऊक, अचानकपणे स्वयंपाकाच्या छताला आग लागली. या अपशकुनाने त्यांचे मन चर्रर झाले. त्यांनी मामांना विचारले, मामा पण क्षणभर अगदी गोंधळले. पण त्यांना धीर देत म्हणाले की, 'हा निसर्ग नियम आहे. झाडाचे जुने पान गळत असते आणि नवीन पान फुलत असते. काही काळजी करू नका. तुमच्या पाठोपाठ मीही आहे. यानंतर नारायणरावांनी पुढे सहा महिन्यात देह ठेवला आणि मामांचीही प्राणज्योत पुढील वर्षा-सव्वावर्षात मालवली.

मामांची नाथसेवा बहराला येत होती. प्रकृतीची तक्रार सुरुच होती आणि भाऊबंदकी पण खतखतत होती. मामांना नाथांचे कसे संरक्षण होते याबद्दलचे एक उदाहरण नोंद करण्यासारखे होते. एकदा काही बेरडांना एका इसमास (मामांना) ठार मारण्याची सुपारी मिळाली. पाच-पाचशे रूपये त्यांना ॲडव्हान्स म्हणून दिले गेले होते. त्या बेरडाने विचारले, 'कुणासाठी ही सुपारी तेंव्हा मामांचे कागदोपत्री असलेले नांव 'शंकर दत्तात्रय कुलकर्णी' असे सांगितले गेले. बेरडांना कांही एकदम बोध झाला नाही. त्यांनी खोदून खोदून विचारल्यावर त्यांना 'शिपूरकरमामा' हे नांव सांगण्यात आले. 'म्हंजी आप्पाचेवाडीस जातात त्ये ?' त्यांनी भुवया उंचावून विचारले, 'होय' असे

म्हटल्यावर हातातले पैसे जमिनीवर ठेवून 'नाय बा' असे म्हणत 'त्या देव माणसाला आम्ही मारणार नाही.' असे म्हणून ते निघून गेले. मामांना ह्याची काहीच कल्पना नव्हती ही हकीकत मामांना सुपाऱ्या देणाऱ्या माणसांच्या जवळच्याच माणसाने येवून सांगितली.

प्रपंच द्वैतात असतो. परमार्थ एकत्वात असतो. प. पू. धुंडामहाराज म्हणायचे, 'चूल देखील एका लाकडाने पेटत नाही तिलाही दोन लाकडे लागतात पण जेव्हा प्रपंचाचे द्वैत अद्वैतात रूपांतरीत होते. त्यावेळी परमार्थीचा वृक्ष फुलतो. मामांचा प्रपंच असाच अद्वैतात रूपांतरीत झाला होता. मामांच्या पत्नीचे नांव पार्वतीबाई. त्यांनी ओढग्रस्त प्रपंचात जशी मदत केली तशी परमार्थात देखील त्यांनी सहभाग नुव्हे तर समभाग दिला. कोणत्याही क्षेत्रातल्या कोणत्याही कर्तृत्ववान माणसाच्या मागे एक स्त्री असते असे म्हणतात. त्याची प्रचिती अनेक संतांच्या जीवनात आपल्याला पहायला मिळते.उदा. - पैठणच्या एकनाथ महाराजांची पत्नी गिरीजाबाई. एकनाथ महाराज असे एक संत होते की, प्रपंच आणि परमार्थ ज्यांनी नेटकेपणाने केला, त्यात गिरिजाबाईचा सिंहाचा वाटा होता. मामांची देवाकडे हीच मागणी होती, 'परमार्थ साधोनि प्रपंच बरवा असावा' एका अर्थाने त्यांचा प्रपंच परमार्थरूपच झाला आहे. कारण त्यांच्या पावलावर पाऊल टाकून जाणारी त्यांची पत्नी. त्या माऊलीने लहानपासून अनेक कष्ट सोसले, लहानपणीच त्यांच्या आई-वडीलांचे छत्र नाहीसे झाले होते. किर्लोस्करवाडीला असलेल्या आपल्या थोरल्या बहिणीकडेच त्या वाढल्या. त्याच बहिणीने त्यांचे लग्न करून दिले. पुढे मामा कोर्टातील कामात अडकल्यामुळे सारखे फिरतीवर असत. लहान मुलांच्या आजारपणापासून सर्व गोष्टी त्यांनाच बघाव्या लागल्या त्यावेळी ते कुरूंदवाडसारख्या खेड्यात रहात असत. मुले आजारी पडली की पूर्वीच्या कोळशावर चालणाऱ्या गाडीतून सांगलीला औषधासाठी जावे लागे. परत एकत्र कुटुंबात रहावे लागत असल्यामुळे सर्व बंधने पाळून, सर्वांची मर्जी संपादन करावी लागे. मामांच्याकडे लोकांचे येणे-जाणे फार होते. त्यामुळे त्या माऊलीला सर्वांचे आदरातिथ्य करावे लागे. त्या आनंदाने सर्व करून मामांना सहकार्य देत असत. मामांच्या पश्चात त्यांनी १९८७ साली त्यांनी देह ठेवला.



मामांच्या ज्योतिषाच्या ज्ञानाचा सुगंध दूरवर पसरला होता. सर्व थरातील आणि व्यवसायातील लोक त्यांच्याकडे येत असत. कांही श्रद्धेने येत तर कांही परीक्षा पाहण्यासाठी येत असत. इचलकरंजीचे श्री. सदाशिव जोशी, जे स्वत: ज्योतिषी आहेत, ते एकदा मामांच्याकडे आपल्या दोन मित्रांना घेवून आले. एक कुलकर्णी आणि दुसरे लागू. लागूंची कुंडली बघताना मामांनी विचारले, 'आपण काय करता ?' ते म्हणाले, 'नोकरी'. मामा म्हणाले या नोकरीशिवाय तुमचा कांहीतरी जोडधंदा आहे. एक क्षणभर ते बावरले आणि कशाची तरी जमवाजमव करीत म्हणाले, ''हो मी मशिनरीचे पार्टस् विकतो.' त्यांचा कृतकपणा मामांच्या लक्षात आला. मामा म्हणाले, 'तुम्ही कोणता का व्यवसाय करेना, पण लक्षात ठेवा, आजपासून पंधरा दिवसात तुमच्या व्यवसायापासून तुम्हाला धोका आहे. अग्नीमुळे जीवाला धोका संभवतो.' लागू छद्मीपणाने हसले व मनातल्या मनात त्यांना वाटले की, 'अग्नीमुळे मशिनरी पार्टस्चे काय नुकसान होणार ?''

हा गृहस्थ नेहमी दिल्लीला जातो, मद्रासला जातो असे घरी सांगून जायचा आणि येताना नोटांची पुडकी घेवून यायचा. त्यामुळे घरच्या लोकांना बरे वाटायचे. मामांच्याकडून गेल्यानंतर ८ ते १० दिवसांनी घरी मद्रास पोलीस चौकीतून तार आली. 'Start Immediately' घरचे लोक त्या पत्त्यावर गेले. पोलीस चौकीत एक अगदी अर्धवट जळलेले प्रेत त्यांनी घरच्या लोकांना दाखवले आणि विचारले की, 'यांची ओळख पटते कां ?' कपडे, चेहरा व इतर गोष्टींवरून घरच्या लोकांनी त्यांना ओळखले आणि मोठ्या आश्चर्याने विचारले 'हे असे कसे झाले ?' त्यावर पोलीसांनी त्यांना मिळालेली माहिती सांगितली.

'हा गृहस्थ स्मगलरचा कॅरियर होता.' स्मगलरना शंका आली की हा गृहस्थ पोलीसांना सामील असावा. म्हणून याला त्यांनी बोलावून घेतले व गावाच्या बाहेर एका झाडाला बांधून घालून वर कडबा रचून त्यावर पेट्रोल ओतून पेटवून दिले. अर्धवट जळलेल्या अवस्थेत तो गावात येत असता ओढ्यात पडून मरण पावला. मामांनी सांगितल्याप्रमाणे अग्नी व व्यवसाय यापासून त्यांना मरण आले ही हकीकत वर्तमानपत्रातून छापून आली होती.

मामांचा थोरला मुलगा आता L.I.C. मध्ये Dev. Officer म्हणून

कोल्हापूरात नोकरीस लागला होता. त्याच्या नोकरीची देखील हकीकत आहे. एकदा मामा विश्रांतीसाठी म्हणून आपले वडील बंधू ती. बाबुराव उर्फ आण्णा यांचेकडे सांगलीस गेले होते. L.I.C. चे त्यावेळचे Divisional Manager श्री. लंबोदर काशीकर हे होते. ते मामांचे स्नेही. मामा आजारातून उठले आहेत असे कळल्याने ते मामांना भेटण्यासाठी आले होते. मामा सांगलीला आलेचे कळल्याने ते सांगलीलाच भेटायला आले. त्यावेळी सहज विषय निघाला' तुमचे थोरले चिरंजीव काय करतात ?' मामा म्हणाले, नुकताच B.A. झालेला आहे. सध्या निपाणीस विद्या मंदिर शाळेत शिक्षक आहे.' काशीकर म्हणाले, 'त्याला माझ्याकडे पाठवून द्या, मी त्याला नोकरी देतो.' खरं म्हणजे मामांच्या मुलाला L.I.C. बद्दल अत्यंत तिटकारा होता. L.I.C. च्या विशेषत: एजंटाची समाजात काय प्रत आहे, त्याची कशी चेष्टा होते हे तो पहात होता. समाजाची मान्यता नसणारा हा एक व्यवसाय होता. असा त्याचा पक्का समज झाला होता. पण मामांच्या आग्रहामुळे तो साताऱ्यास गेला. खरं म्हणजे त्याला क्लार्क व्हायचे होते. पण काशीकर त्याला म्हणाले, 'No, No, I want you to be an officer.' पण तो कांही खूष नव्हता. त्यावेळी नवीन विकासाधिकाऱ्याला शहरात नेमणूक मिळत नसे. मुलाने शहराचाच हट्ट धरला, जेणेकरून ही नोकरी टळेल. आणि ते देखील कोल्हापूर शहरासाठी नोकरीसंबंधी पत्र आले तेंव्हा त्याने एक महिन्याची मुदत परस्पर मागून घेतली. ती देखील त्यांनी मान्य केली. आता त्याचा नाईलाज झाला. हे सर्व घडले ते मामांच्यावरील काशीकरांच्या श्रद्धेमुळे.

त्यांचा थोरला मुलगा कोल्हापूरात व धाकटा मुलगा मुंबईला B.D.S. शिकत होता. त्यामुळे बँकेची वगैरे कामे करायला कोणी नव्हते. पण मामांच्यावर जीव असणारे, जीव टाकणारे अनेक लोक होते. एक 'नाईक' नावाचे गृहस्थ तेथील बेळगांव बँकेत क्लार्क होते. ते सर्व कामे करीत असत. ते दररोज मामांना भेटून विचारपूस करत. त्यांचा मामांच्यावर पूर्ण विश्वास होता. कोणतीही गोष्ट ते मामांना विचारल्याशिवाय करीत नसत. पुढे त्यांची बदली बेळगावला झाली. त्यामुळे संपर्क दुरावला. ते लग्नाचे उत्तम स्थळ होते. बेळगांवच्या ॲल्युमिनियम फॅक्टरीच्या एका ऑफिसरने त्यांना मुलगी



दाखवून घाईगडबडीने त्यांचे लग्न ठरविले. घाई झाल्याने मामांना कुंडली दाखवायची राहून गेली. निदान लग्नपत्रिका प्रथम मामांना द्यावी म्हणून नाईक निपाणीस आले. त्यांनी मामांना सर्व हकीकत सांगितली व लग्नाची पत्रिका हातात ठेवत लग्नाला येण्याचा आग्रह केला. मामा अगदी गंभीर होवून म्हणाले, 'तू मुलगी नीट पाहिली आहेस कां ?' नाईक म्हणाले, 'हो'. मामा म्हणाले, 'परत एकदा मुलगी पहा व तिला स्वत:ला चहा घेऊन यायला सांग.' झालं. मामांचा शब्द म्हणजे नाईकांना वेदवाक्यच. त्याने निपाणीतूनच मुलीच्या वडीलांना तार केली. 'मी मुलीला भेटायला येत आहे' म्हणून ते त्यांच्या घरी गेले. सर्वजण हॉलमध्ये बसले. नाईकांनी मुलीलाच चहा घेवून येण्यास सांगितले. ती मुलगी चहा घेवून मोटेच्या बैलाप्रमाणे 'उलटी' तबक घेवून आली. नाईकांनी ते बघितले आणि तिथल्या तिथे पत्रिका फाडून टाकली व हे लग्न मोडले असे निक्षून सांगितले. ती मुलगी ठार वेडी होती. त्यानंतर नाईकांचे लग्न एका चांगल्या मुलीबरोबर झाले व ते आता आनंदात आहेत.

मामांना आपला मुलगा L.I.C. तच रहावा असे वाटत होते. मामांनी त्याला एकच वाक्य सांगितले. L.I.C. मध्ये राहशील तर तुझ्या सर्व मित्रांच्या अगोदर चार चाकी गाडी घेशील आणि सर्वात अधिक पगार मिळवशील नंतर नांवे ठेवणारे लोकच तुझा हेवा करतील आणि पुढे तसेच झाले.

मामांचे शिष्य श्री. बंडोपंत जोशी, उत्तुरकर यांचेकडे श्री. परूळेकर नावाचे एक प्राथमिक शिक्षक येत असत. त्यांच्या पत्नीला वेताळाची बाधा झाली होती. ही बाधा १२-१५ वर्षे त्रास देत होती. अनेक उपाय करून परुळेकर थकले होते. कशाने कांही कमी होत नव्हते. घरची बाईच अशी बाधिक असल्यामुळे घरच उजाड झाले होते. लग्नाला आलेल्या मुली देखील तिच्याकडे जवळ जाण्यास घाबरत होत्या. कारण बाधा झालेली त्यांची आई अतर्क्य आणि अचाट गोष्टी करत असे. उदा. हातात (उजव्या) कोयता घेवून डाव्या हातावर कोयत्याचे घाव घालत असे. रक्तबंबाळ झालेल्या डाव्या हातावरून उजवा हात फिरवला की डावा हात पूर्ववत होत असे. एक दिवस एका सकाळी ती आपल्या पतीला म्हणाली, 'मी ब्राह्मण आहे. मला प्रिय काय तर भोजन. मला पुरणाच्या पोळीचे जेवण घाल म्हणजे मी हे झाड

सोडतो.' त्या भोळ्या पतीने पुरणपोळ्यांचा स्वयंपाक केला. रागोंळी घालून पाट मांडला, ताट मांडले आणि आपल्या पत्नीला पाटावर बसवले. ब्राह्मणासारखी मांडी घालून ती पाटावर बसली आणि गुरकावून आपल्या नवऱ्याला म्हणाली, 'ए ब्राह्मणाला जानवे कुठे आहे ? जानवे घेवून ये.' त्याप्रमाणे जानवे आणून कसेतरी घातले. त्यावर ती म्हणाली, 'हे अपसव्य झालय, सव्य कर.' व्यवस्थित जेवण झाल्यावर तिने गोविंदविडा मागून घेतला. विडा खाल्यावर जोरात हसू लागली आणि नवऱ्याला म्हणाली, 'तुला फसवलं मी. मी काही ब्राह्मण नाही. मी हे झाड सोडणार नाही.' परूळेकर हतबल झाले. पण त्यांनी जिद्द सोडली नाही. त्यांनी एक पंचाक्षरी आणला आणि त्या पंचाक्षरीनी कांही प्रयोग केले आणि परूळेकरांच्या पत्नी काकुळतीस येवून म्हणाल्या, 'आता मी जातो पण एक कर, 'माझ्यावरून दही भात उतरवून जवळच्या ओढ्यात नेवून ठेवून ये.' त्याप्रमाणे त्यांनी केले व हातपाय धुवून घरी आला. त्याबरोबर पत्नी विकट हास्य करीत त्यांना म्हणाली, 'हात् वेड्या, पंचाक्षरीने जो उपाय केला होता त्यावरचा उतारा करायला सांगितला. आता मी जात नाही.' त्यानंतर परुळेकर बंडोपंतांच्याकडे गेले. त्यांनी गुरुचरित्राचा सप्ताह करण्यास सांगितले. सप्ताह ऐकायला बरेच लोक येवून देवापुढे पैसे ठेवीत. त्यामुळे बरेच पैसे जमले होते. सप्ताह झाल्यावर काय करायचे असा प्रश्न आला. माननीय बंडोपंतांनी आप्पाचेवाडीस जायला सांगितले आणि जमलेले पैसे तिथेच देण्यास सांगितले. त्यानंतरच्या अमावस्येस परुळेकर पत्नीस घेऊन आले. काही कल्या पत्नी मामांच्यापुढे यायला तयार होईना. तेव्हा दोन माणसांनी धरून तिला मामांच्यापुढे आणले. मामांच्यापुढे येताच ती ओरडून मामांचा गळा दाबायला निघाली. त्यावर मामांनी भंडाऱ्याचा सपकारा मारला आणि म्हणाले, 'कुणाला भीती दाखवतोस ? ही नाथांची गादी आहे. हे झाड जर सोडले नाहीस तर गुंडाचे तडाखे मिळतील. दोन महिन्याची मुदत आहे वेताळा.' असे म्हणून डोक्यावर दोन थपडा मारल्या. मग ती बाई शांत बसली. तिला घुमटाला पाच प्रदक्षिणा घालायला सांगितल्या. दर अमावस्येस येण्यास सांगितले. तिसऱ्या अमावस्येला ती बाई पूर्ववत झाली. गेले २०-२२ वर्षे न चुकता ती व तिची मुलगी सौ. सामंत अमावस्येस येतात.



उतूरला जमा झालेले पैसे मामांच्यापुढे ठेवले. देवाच्या स्वयंपाकासाठी एक भांडे त्यावेळी घेतले होते. त्यातील कांही पैसे दुकानदाराला द्यायचे होते. त्यांनी (परूळेकरांनी) आणलेले पैसे मोजले. जेवढे भाड्याला पैसे कमी पडत होते तेवढेच ते भरले. अशी ती नाथ योजना होती.

श्री. प्रा. पा. ना. कुलकर्णी हे मराठी साहित्याचे व विशेषत: ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक. ज्ञानेश्वरीची जुनी प्रत हाती लागल्यापासून त्याचा २२/२३ वर्षे सूक्ष्म अभ्यास करून ती त्यांनी प्रकाशित केली. हे त्यांचे ऐतिहासिक काम आहे. मामांची व त्यांची ओळख फार पूर्वीपासून. कारण ते कुरूंदवाडचे जावई होते. B.A. परिक्षा झाल्यावर ते LL.B ला जाणार होते. पण मामांनी त्यांना M.A. करायला सांगितले आणि ते खरोखर नामांकित प्राध्यापक झाले. त्यांनी प्राचीन-अर्वाचीन साहित्याचा धांडोळा चांगला घेतला असला तरी भाविकाची श्रद्धा त्यांचेजवळ नव्हती. एकदा ते आप्पाचेवाडीस मामा काय सांगतात ते बघायला आले होते. मामा जिथे भंडारा देण्यासाठी बसत असत तिथेच पा. ना. कुलकर्णी बघत बसले होते. मामांच्या पायावर डोके ठेवून लोक मामांना संसारातील कांही प्रश्न विचारीत. मामा आगमचित्ताने उत्तरे देत असत. हे पाहून ते मामांच्यापुढे येवून बसले. नमस्कार करण्यापूर्वीच मामांनी त्यांना उत्स्फूर्तपणे सांगितले की, 'तुमचे तिरूपतीला जाण्याचे घाटतय आणि रहीत होतय. पत्नीची तेवढी इच्छा पूर्ण करा.' हे ऐकल्यावर प्रा. पा. ना. स्तिमित झाले.

निपाणीला असताना अब्दुल अजीज म्हणून एक गृहस्थ मामांचेकडे येवून बसत होते. इकडच्या तिकडच्या गप्पा आणि राजकारणावर चर्चा करत बसत होते. हे अब्दुल अजीज निष्कपटी व सरळमार्गी मनुष्य होते. त्यांच्या मनामध्ये मामांच्याबद्दल अतीव आदर होता मामांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांचा एकसष्ठीचा समारंभ करावा असे अजीजना वाटले. मामांचेकडे येणाऱ्या ५-१० माणसांना त्यांनी बोलून ठेवले. सर्वांनी ती कल्पना उचलून धरली आणि परस्पर वर्गणी गोळा करून देवचंद शेटजींच्या हस्ते मामांचा सत्कार करायचा त्यांनी ठरविले. ही गोष्ट मामांना प्रत्यक्ष सांगण्याचे धाडस त्यांना झाले नाही. ही गोष्ट गुप्त कशी राहील हे त्यांनी पाहिले. निश्चित केलेली तारीख दोन दिवसावर आली असताना या गोष्टीचा गौप्यस्फोट झाला.

श्री. गलगलेकर नावाचे एक गृहस्थ मामांच्या माहितीचे होते. ते सहज एकदा आले असताना बोलले की, ‘मामा, तुमचा सत्कार करण्याचे ठरविले आहे. हे तुम्हाला माहीत आहे ना ? अब्दुल अजीजनी सांगितलेच असेल.’ मामांना संताप आला. अब्दुल अजीजवर मामा भडकले. ‘तुम्हाला हा उद्योग करायला कुणी सांगितले होते ? सत्कार करून घ्यायला असा कोण मी मोठा माणूस लागून गेलो आहे ? माझ्या देवाला सत्कार, हार घालून घेणे मुळीच पसंत नाही. आणि तुम्ही काय काय उद्योग केलेत याची मला पुसटशी सुद्धा कल्पना दिली नाही.’ त्यावर अब्दुल अजीज खाली मान घालून नुसते शांत बसले होते. ‘कुणा कुणाला तुम्ही सांगितले. त्यांना परत जावून सांगून या आणि कुणा कुणाचे पैसे घेतलेत ते त्यांना परत करून टाका हे केल्यावर मगच माझ्या घरी पाऊल टाकायचे. कुणा कुणाकडून पैसे वर्गणी रूपाने घेतलेत याची यादी माझ्याकडे द्या.’ मामांनी ती यादी घेऊन तिसरे दिवशी म्हणजे सत्काराच्या दिवशी आपल्या मुलाला सर्व लोकांच्याकडे पाठविले व पैसे परत मिळाले काय असे विचारण्यास सांगितले. सगळ्यांना सांगून दुपारी तीन वाजता मुलगा परत आल्यावर त्यांनी जेवण घेतले व सुस्कारा टाकला. आपला सत्कार करावा म्हणून लोक पदरचे पैसे खर्च करतात तर इथे सत्कारासाठी जमविलेले पैसे ज्याचे त्याला परत केल्याशिवाय अन्नग्रहण करणार नाही असा निर्धार करणारा हा निःस्पृह मनुष्य आगळा-वेगळा आहे. अशी प्रतिक्रिया लोकांच्याकडून ऐकायला मिळाली.

मामांची आपल्या घरात चालत आलेली नाथांची परंपरा मंदावू नये अशी फार इच्छा होती आणि त्यासाठी त्यांची सारी धडपड होती. आपले वडील हे एक अधिकारी सिद्ध पुरुष कसे होते व आपल्या सामर्थ्याने लोकांना त्यांनी कसे मार्गी लावले हे त्यांच्या ज्यावेळी लक्षात आले त्यावेळी ही परंपरा केवळ चालूच ठेवावी एवढे नसून ती वृद्धींगत करण्याचे त्यांनी ठरवले. घोसरवाडची, त्यांच्या घरातील बंद पडलेली यात्रा त्यांनी परत सुरु केली. अमावस्यांचे नियोजन करून १२ लोकात त्या वाटून घेतल्या. कार्तिक अमावस्येस दीपोत्सव सुरु केला. आपल्या वडीलांनी घालून दिलेल्या नियमांच्या पलीकडे ते कधीही जात नसत. मामांनी कधी बसून जप-जाप्य, ध्यान-धारणा फारशी केली नाही. परंतु गोंदवलेकर महाराज म्हणतात त्याप्रमाणे



त्यांच्या अन्तःकरणामध्ये देवाची भेटीची, उत्सवाची अतीव तळमळ होती. तळमळ हीच त्यांची साधना होती. सदाचार आणि ईश्वरनिष्ठा हे त्यांचे तत्त्वज्ञान होते. धर्म हा त्यांचा आचार होता. कर्मठपणाने बसून नवनाथाचे वाचन अगर कोणत्याही मोठ्या ग्रंथाचे वाचन त्यांनी एकदा दोनदाच केले असेल. कारण नेहमीच त्यांच्या चिंतनात ईश्वर प्रीती असायची, पाण्यात रहाणाऱ्याचा माशाला वेगळी आंघोळ करावी लागत नाही, तसे.

त्यांना त्यांच्या आयुष्यात शरीरभोग, स्वतःच्या लहान मुलांचे मृत्यू, दारिद्र्य, शारिरीक कष्ट, त्यांच्याबद्दल झालेले समज-गैरसमज, यश-अपयश यांना तोंड द्यावे लागले. पण त्यांची ईश्वरनिष्ठा यत्किंचितही सैल झाली नाही. लोक त्यांना म्हणत, ‘मामा तुमच्या पाठीशी देव असताना असा त्रास कां होतो ? त्यावर ते म्हणायचे’ हा माझा कर्मभोग आहे. तो कुणालाही चुकला नाही. तो भोगूनच संपवावा लागतो. माझ्या देवाला नांवे ठेवू नका.’

मामांच्या आवडी निवडी - मामांना तीन गोष्टींची आवड होती.

१) देवाच्या गोष्टी बोलण्याची २) शेतीची आणि ३) राजकारण चर्चा. ज्योतिषशास्त्र त्यांच्या अंतःकरणाच्या वरच्या कप्यात होते. अक्षरशः मामा रात्ररात्र देवाच्या गोष्टी सांगत बसत. कित्येकदा त्यात तोच तोपणा असायचा पण जणू काही नव्यानेच सांगतो या अविर्भावाने ते सांगत. त्यावेळी ते तहान-भूक सर्व विसरत. त्यांच्याकडे विद्वान-अडाणी, श्रीमंत-गरीब, अमक्या जातीचा, तमक्या जातीचा असा भेद नसे. उलट त्यांना विद्वानापेक्षा अडाणी मनुष्य अधिक आवडे. कारण अडाणी माणसाची पाटी कशी स्वच्छ असते. आपण उठवू तो छाप त्याच्यावर चटकन उठत असतो. विद्वान माणसाची बुद्धि त्याचा शत्रू असते. ती बुद्धि भेद करून ईश्वरापासून त्याला लांब ठेवते.

मामांची वाणी ही सहज मधुर होती. त्यांचे सारे व्यक्तिमत्त्वच अगदी आकर्षक होते. तांबूसपणाकडे झुकणारा त्यांचा गहूवर्णीय वर्ण त्यांना फार शोभून दिसे. त्यांचे डोळे अतिशय तेजस्वी व चमकदार होते. ते म्हणायचे, माणसाची अध्यात्मिक स्थिती, प्रगती डोळ्यात दिसते. याबाबतची एक हकीकत आहे. एकदा चंदूरकर वकील (मागे उल्लेख आला आहे.) त्यांच्या वडीलांच्याबरोबर मामांचेकडे आले व म्हणाले, ‘मामा, सर्व व्यावहारिक गोष्टी

झाल्या. पण अध्यात्माचे सांगा.' मामा त्यांचेकडून वळून म्हणाले, 'अध्यात्म डोळ्यात बघायचे असते, काढा तुमचा चष्मा.' त्यांनी चष्मा काढला व म्हणाले, 'आता सांगा' मामांनी डोळ्यात डोळे घातले आणि एकदम म्हणाले, 'पाँडेचरीला कोण असतं ?' चंदूरकरांचे वडील अरविंद घोषांच्या सांप्रदायाचे पाईक होते. त्यांनी मामांना आश्चर्य वाटून नमस्कार केला. मामांना विरोध करणाऱ्या माणसाचा विरोध देखील मामांच्या दृष्टिच्या कक्षेत आल्यावर बोथट होत असे.

मामा एखादी गोष्ट दृष्टान्ताने सोपी करून अशी सांगत की ती गोष्ट सामान्यातल्या सामान्याला कळावी. एकदा अशीच चर्चा चालली होती की सर्वच गोष्टी देवाच्या इच्छेने होत असतील तर माणसाच्या हातून चूक झाल्यास देव शिक्षा का देतो यावर मामांनी सांगितलेले आठवते की माणसाला कर्माचे स्वातंत्र्य दिले आहे. ते तो योग्य ते कर्म न करेल तर त्याला शिक्षा ही होणारच. त्याला ते दृष्टान्त देत की, अजाणत्या मुलाला बाप जरीची टोपी घालतो व तो मुलगा हाताने ती टोपी घाणीत फेकून देतो. त्यावेळी त्याचा बाप कौतुक करतो, 'अरे लबाडा, टोपी टाकलीस का ?' पण जाणत्या मुलाने टोपी फेकून दिली तर 'एवढे कळत नाही' असे म्हणून थोबाडीत देतो त्याप्रमाणे देवाचे आहे. एखाद्या तथाकथित सिद्ध पुरुषाच्या हातून अक्षम्य चूक झाल्यास - स्खलन झाल्यास त्याचे अध:पतन खोलवर होते. तर सामान्य साधकाचे अध:पतन सावरता येते. त्याकरीता मामा दृष्टांत द्यायचे - ''५० पायऱ्या असलेल्या विहिरीत जावून पाण्याची घागर भरून आणताना खालून पहिल्या पायरीवरून घागर हातातून निसटली तर ती परत भरून घेता येते पण वरच्या पहिल्या पायरीवरून घागर निसटली तर घागरीचेही वाटोळे व परत भरून घेणेही मुष्किल.''

मामांना रूक्ष वेदान्त, गहन चर्चा, घटापटादी गोष्टी फारशा आवडत नव्हत्या ते मिष्किलपणे व विनोदाने म्हणत असत की, 'कारण देह, महाकारण देह हे सर्व विनाकारण आहे, अकृत्रिम भक्ती आणि परमेश्वरापुढे शरणागती एवढे झाले की बस.' मामांना देवाची पूजा करणे फार आवडे. विशेषत: देवाच्या मूर्तीला नटवणे, त्याला फेटा बांधणे, उत्तम प्रकारचे हार-फुले घालणे हे फार आवडत असे. ही त्यांची सगुण भक्ती होती. दररोजचे भजन करणे ही त्यांची निर्गुण भक्ती होती. अन्नदान करणे, विशेषत: गरीब लोकांच्या तोंडी उत्तम



प्रकारचे अन्न घालणे ही गोष्ट त्यांना समाधीचा आनंद देणारी होती.

मामांना आर्थिक चणचण असली तरी कोणाचे ते मिंधे नव्हते. त्यांच्या उत्पन्नाचे साधन म्हणजे त्यांची शेती. ४०-५० एकर त्यांची शेती होती. पण ९०% ती जिराईत होती. त्यामुळे पाच माणसांचे मध्यमवर्गीय कुटुंब चालण्याइतके उत्पन्न येत असे. पण ते कोणाकडेही हात पसरत नसत. त्यांनी कोणाचेही कर्ज काढले नाही. अगदी नेमस्तपणे त्यांनी आपला संसार केला. याबाबतीत एक गोष्ट इथे सांगण्यासारखी आहे. मामांच्या तपस्वी मातोश्री उर्फ आत्याबाई यांनी १९७४ साली देह ठेवला. देह ठेवताना त्यांनी मामांच्या थोरल्या मुलाला बोलावून सांगितले, 'मधू, शंकरने कसा संसार केलाय बघ. तू त्याचा आदर्श ठेव.' साक्षीरूपाने मामांचा संपूर्ण संसार पहाणाऱ्या या विचक्षण बाईचे अवलोकन किती मर्मग्राही होते हे कळून येते.

एखादे व्रत मनापासून करायचे ठरवले म्हणजे ईश्वरशक्ती कशी सहाय्यभूत होते हे मामांच्या चरित्रावरून लक्षात येते. मामा आजारपणातून उठल्यामुळे ते एस.टी.तून आप्पाचीवाडी येथे दर अमावस्येस जावू शकत नव्हते. त्यामुळे खाजगी वहानांची सोय करणे जरूर होते. पण दरवेळी नेणार आणणार कोण हा प्रश्न होता. पण सत्य संकल्पाचा दाता ईश्वर असतो असे म्हणतात याची प्रचिती मामांनी घेतली. त्यांचे परममित्र श्री. मारूतराव कदमांनी आणण्याचे व नेण्याचे उत्तरदायित्व पत्करले १-२ वर्षे नियमित सेवा चालू होती. पण व्यापाऱ्याच्या व्यापामुळे ही सोय खंडीत झाली. त्याबरोबर निपाणीचे 'श्री. सुखी' नावाचे गृहस्थ मामांना नेऊ आणू लागले. ते व्यवसायाने टॅक्सी चालकच होते. आता मामांना थोडे फार चालता येवू लागले होते. ते आता रिक्षा व एस.टी. ने प्रवास करत होते. निपाणी स्टँडचे डेपो मॅनेजर म्हणून कुलकर्णी नावाचे गृहस्थ होते. कांही गोष्टी मामांनी त्यांना सांगितल्या होत्या. त्या त्यांना पटल्यामुळे त्यांचा मामांच्यावर दृढ विश्वास बसला होता. त्यांनी आप्पाच्यावाडीस मामांच्या वेळेला स्पेशल एक बसच सुरु केली व मामा आल्याशिवाय गाडी सोडायची नाही अशी विनंतीवजा सूचना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना दिली. तसेच येताना एक बस सोडली व येताना मामांना घेऊन येण्यासाठी आपल्या ड्रायव्हर व कंडक्टर यांना सांगून ठेवले.

पुढे मामा कोल्हापूरास मुलाकडे गेले. आता कसे जायचे हा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला. तोपर्यंत मामांचा इचलकरंजीचे नानासाहेब कुलकर्णी यांच्याशी परिचय झाला होता. त्यांना भजनाचा अतिशय नाद होता आणि मामांच्यावर त्यांची भक्ती असल्याने नाना दर अमावस्येला येवू लागले. इचलकरंजीहून आप्पाचीवाडीस जाताना कोल्हापूरहून मामांना घेवून जात व येताना त्यांना सोडून जात. वळून पाहताना एक गोष्ट लक्षात आल्याशिवाय रहात नाही ती ही की या सर्वामागे एक काहीतरी अनामिक ईश्वरी सूत्र आहे. एरवी या सर्व गोष्टी हव्या त्यावेळी कशा जमून येतील ?

प्राणापेक्षा जास्त प्रिय असलेली आपली आप्पाचीवाडीची सेवा करत असताना मामांना काही अडचणींना, गैरसमजांना तोंड द्यावे लागले. ती विरोधभक्तीच आहे असे समजून त्यांनी अत्यंत संयमाने, विनयाने त्यांना तोंड दिले. वहात येणारे पाणी जसे वाटेतला खड्डा भरून पुढे जात असते. तशी त्यांनी आपली वागणूक ठेवली कारण आप्पाच्यावाडीचा प्रत्येक माणूस हा हालसिद्धनाथाचा अवतार आहे व प्रत्येक स्त्री ही भागूबाईच (बहीण) आहे. अशी त्यांची धारण होती. एकदा ध्यानमंदिर बांधत असताना गैरसमजाने ते नष्ट केले गेले. मामांच्या काही भक्तांनी नाराजी व्यक्त केली. त्यावेळी मामांनी त्यांना ही देवाचीच इच्छा आहे असे मानून गप्प रहाणेस सांगितले. याचा परिणाम लोकांच्यावर होवून त्यांना आपली चूक कळली.

**'जग झालीया वन्ही । संतमुखे व्हावे पाणी ।।'**

हे त्यांचे ब्रीद वाक्य होते. आणि ते केंव्हाही त्यांनी सोडलेले नाही.

१९७८ साली मामांचे धाकटे चिरंजीव एम्.डी.एस्.(Ortho.) होवून आले. त्यांच्या घराण्यातील तो पहिलाच डॉक्टर असल्याने त्यांना फार अभिमान वाटत होता. सर्वांना ते सांगत. त्याने परस्पर आपल्या इच्छेने विवाह केल्यामुळे मामांचा थोडा रोष होता. पण कालांतराने तो नाहीसा झाला.

मामांची प्रकृती आता वरचेवर बिघडू लागली. आणि निपाणीला ते आणि त्यांच्या पत्नी दोघेच होते. दूध-दुभत्याची आवड असल्यामुळे एक म्हैस बाळगली होती. तिची व्यवस्था करण्यासाठी एक मुलगा ठेवला होता.



त्याचे नांव नंदा चौगुले. तो त्यांचा रयताचा मुलगा होता. मामांना अनेक वेळा विनंती करूनही ते कोल्हापूरास यायला तयार नव्हते. 'मला इथेच बरे वाटते.' असे म्हणायचे. माझ्या सर्व जबाबदाऱ्या नाथांनी आता पार पाडल्या आहेत. माझे काय राहीले आहे ? कारण त्यांच्या मातोश्री १९७४ साली मोठ्या समाधानाने निवर्तल्या होत्या. त्या जाण्यापूर्वी आठ दिवस अगोदर भटजींना बोलावून त्यांनी दाने दिली होती. ब्रह्मवृंदांच्या पायाचे तीर्थ घेऊन मृत्यूच्या गुहेत शिरायला त्या सिद्ध झाल्या होत्या. ज्याला आपण दत्तक घेतला त्याचा वंश विस्तार झाला. त्याचा प्रपंच सुफलीत झाला. पुत्र-पौत्रादी अशा दुर्लभ गोष्टींचा लाभ झाला. त्यांच्या नातवाला पुत्र-प्राप्ती झाल्याने मामांनी पणतू त्यांच्या मांडीवर बसवला व त्यांचा सुवर्ण अभिषेकाचा मोठा कार्यक्रम केला होता. तसेच मामांच्या सर्व मुली सुस्थळी पडल्या होत्या. त्यांना यथाकाल मुलेबाळे झाली. मुलांची लग्ने होवून सर्वजण मार्गी लागले होते. नाही म्हटलं तर त्यांना एक काळजी होती. ती म्हणजे आपल्या देवाची, कुलधर्म कुलाचाराची आणि अमावस्याची धुरा कशी सांभाळली जाईल. याची मनोमन त्यांना खात्री होती की या सर्व गोष्टी आपले थोरले चिरंजीवच करतील.

एक दिवस मामांच्या छातीत दुखू लागले त्यांना कोल्हापूरात आणले. निष्णात हृदयरोग तज्ञ डॉ. ए. व्ही. भागवत यांना दाखवले. त्यांनी ताबडतोब 'आशा नर्सिंग होम' मध्ये दाखल करण्यास सांगितले. कारण तो सौम्य हार्ट ॲटॅक होता ही बातमी वाऱ्यासारखी पसरली. आणि मामांना बघायला माणसांची रीघ लागली. डॉक्टरांनी मामांना जास्त बोलण्यावर बंदी घातली. पण मामा मात्र भेटायला आलेल्या माणसांशी थोडे थोडे बोलत असत. शेवटी डॉक्टरांनी एक वही ठेवायला सांगितली आणि त्या वहीत भेटायला येणाऱ्या माणसाला स्वतःचे नांव लिहून ठेवण्यासाठी सांगायला सांगितले व ती वही रात्री त्यांना वाचून दाखवायला सांगितले. मामा त्यातून बरे झाले. आणि निपाणीस परत गेले. पण त्यांच्या मनाला खात्री पटली होती की आपण आता इथे निपाणीत दोघेच राहू शकत नाही. आता आपली अखेरची वेळ आली आहे. कोणताही अट्टाहास न करता आपण मुलांच्याकडे जाणे योग्य होणार आहे. म्हणून त्यांनी घरातील म्हैस विकून टाकली व कोल्हापूरला येण्याची

मानसिकता तयार केली आणि ते आपल्या मुलांच्या विनंतीला मान देवून कोल्हापूरास रहावयास आले. मोठ्या मुलांचे घर राजारामपुरी ४ थी गल्ली येथे माडीवर होते. त्यामुळे तिथे राहणे त्यांना अशक्य होते. त्यांचा धाकटा मुलगा १ ल्या गल्लीत खालीच असल्याने ते धाकट्या मुलाकडे रहावयास गेले. त्याचे घरही मोठे होते. त्यांना दम्याचा त्रास सुरुच होता. दम्यावरची औषधे घेतली की लघवीचा त्रास व्हायचा असे काहीतरी विचित्र होत असल्याने ते बेचैन होत असत. देव निपाणीला होते. देवाची पूजा व्यवस्थितपणे होत नसावी आणि त्यामुळे त्यांची तब्येत बिघडत असावी असे त्यांना वाटत होते. निपाणीहून देव आणायला सांगितले त्याप्रमाणे देव आणून मोठ्या मुलाकडे ठेवले.

१९६० साली मामांना फेशियल पॅरेलिसिसचा ॲटॅक आला होता. त्यावेळेपासून ते म्हणायचे की 'ज्या हातांनी मी भंडारा देतो ते हात कधी लुळे पडणार नाहीत. ज्या पायावर भक्ती भावाने लोक मस्तक ठेवतात ते पाय कधीच लुळे पडणार नाहीत. ज्या मुखाने मी लोकांना श्रीनाथांच्या प्रेरणेने मार्गदर्शन व समुपदेशन करतो ते मुख बंद आणि वाकडे होणार नाही. ज्या आगम बुद्धिने मी चार हिताच्या गोष्टी सांगतो ती बुद्धि कधी निकामी होणार नाही. अगर त्या बुद्धिवर आघात होणार नाही. माझ्या वडीलांच्यासारखा मी झळझळीत अवयवांच्यासह जाणार आणि त्यांचे ते शब्द अक्षरशः खरे ठरले. सप्टेंबर १९८० ची ५ किंवा ६ तारीख असावी त्यांचा थोरला मुलगा मधुकर त्यांना रूटीन चेकअपसाठी आशा नर्सिंग होम' मध्ये घेऊन गेला. डॉ. एस्.आर.पाटील यांनी नेहमीप्रमाणे तपासले सर्व काही ठीक होते. नाही म्हणायला हार्ट थोडे मोठे झाले होते. डॉक्टर म्हणाले, 'ठीक आहे' त्यावेळी मामा डॉक्टरांना म्हणाले, 'तुम्ही ठीक आहे म्हणता हे ठीक आहे. पण माझी शाश्वती संपली आहे हे मी जाणून आहे.'


त्यानंतर नऊ तारखेस अमावास्या होती. ती श्रावण अमावास्या असल्याने ती मामांचीच अमावास्या होती. नेहमीच्या उत्साहाने मामा आप्पाच्यावाडीला आले. त्यावेळी कल्पनाही नव्हती की मामा आणखी तीन दिवसांनी देह ठेवतील म्हणून.

कोल्हापूरास आल्यापासून मामांना अमावास्येला न्यायला






मामांची भावजय श्रीमती लक्ष्मीबाई आ. कुलकर्णी



मामांचा पुतण्या श्री. अनिल कुलकर्णी व त्यांची फॅमिली





श्री. दत्तोपंत घोसरवाडकर (मामांचा पुतण्या) व त्यांच्या पत्नी

## मामांच्या ताराबलातील तारे



कै. विश्वनाथ गणेश नाडगोंडे



कै. रावराहेब उर्फ व्यंकटेश नाडगोंडे



डॉ. दत्तात्रय नाडगोंडे



आंबा कुंभोजकर





कै. मारुतराव कदम



शिरगुप्पीकर आण्णा



दाजीसाहेब शिरगूरकर



श्री. जी. अे. कुलकर्णी उर्फ बाबा दत्तवाडकर



कै. लक्ष्मण खोत



कै. माधवराव देशपांडे

इचलकरंजीच्या नाना कुलकर्णी यांची गाडी यायची. त्याप्रमाणे याही अमावास्येला गाडी आली होती. त्यांनाही त्यांच्या बोलण्याच्या ओघात ते म्हणाले होते की, कदाचित ही माझी शेवटची अमावास्या असेल. १९८० च्या मे महिन्यात नाना कुलकर्णी मामांना घेवून बेळगांवच्या गणपतीच्या कार्यक्रमास गेले होते. त्यांच्याबरोबर त्यांचा थोरला मुलगाही होता. बेळगावहून परत येताना विश्रांतीसाठी निपाणीला गाडी थांबली. त्यावेळी मामा नानांना म्हणाले होते की हा गणपतीचा उत्सव माझ्या आयुष्यातला शेवटचा उत्सव आहे. यावर नाना गप्प राहीले. पण त्यांच्या मुलाच्या मनात मात्र चर्रर झाले. सप्टेंबर १९८० ची दहा तारीख, अकरा तारीख गेली आणि तो बारा तारखेचा काळा कुट्ट दिवस उजाडला. सकाळी त्यांचा मोठा मुलगा त्यांना भेटून, चौकशी करून इस्त्रीचे कपडे आणण्यासाठी गेला. धाकटा मुलगा व त्यांची डॉक्टर पत्नी नेहमीप्रमाणे दवाखान्याला निघून गेले व कामवाली व छोट्या दोन नाती होत्या. मामांनी आपल्या पत्नीला झोपल्या, झोपल्याच विचारले की, 'वाजले किती ?' पत्नीने 'दहा वाजले' म्हणून सांगितले. 'जेवणार काय' म्हणून मामांना विचारले. मामांना पिठले फार आवडायचे. त्यामुळे ते म्हणाले, 'पिठले कर म्हणजे मी जेवतो.' त्यांच्या पत्नी आत स्वयंपाकघरात पिठले करायला गेल्या. ती वेळ मामांनी बरोबर साधली. त्यांच्या पत्नी मामांच्याजवळ येवून बघतात तो उशीवर असलेली त्यांची मान खाली घसरली असून त्यांचे तोंड गादीवर टेकले होते. असे का झोपला असे पत्नीने विचारले म्हणून त्यांनी मान सरळ केली आणि त्यांना काहीतरी वेगळेच जाणवले. त्या ओरडल्या. इतक्यात त्यांचा थोरला मुलगा तिथे आला. त्यांची ती स्थिती पाहून मुलगा आशा नर्सिंग होमकडे धावतच गेला. डॉ. एस्. आर. पाटील नव्हते. त्यांचे असिस्टंट डॉक्टर आले. मामांना तपासले. मामांचा चेहरा शांत झोपलेल्या माणसासारखा दिसत होता. त्या डॉक्टरांना स्पष्ट सांगण्याचे धाडस होईना. इतक्यात डॉ. एस्. आर. पाटील स्वतः आले व मामांची बुबुळे बघितली. ती स्थिर आहेत. म्हटल्यावर डॉक्टर पाटील 'सॉरी' म्हणाले, घरात एकदम आकान्त उडाला. लाईटचे बटन जसे बंद करावे म्हणजे लाईट जसा एका क्षणात बंद होतो तसे मामा जीवनमुक्त झाले.

नाथ संप्रदायाच्या तत्वज्ञानामध्ये नाथसंप्रदायी साधकाचे मरण कसे होते याचे वर्णन करताना श्री. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**''किं झाकलीया घटीचा दिवा**
**काय झाला न कळे केव्हा**
**तयापरी तो पांडवा । देह ठेवी ।।''**
**अनाथांचा नाथ । सोडुनिया शरीर**
**गेला हा शंकर । कैलासासी ।।**
**नाथ माळेतला । मणी शेवटला**
**आज ओघळला । एकाएकी ।।**

याप्रमाणे श्री मामा नाथरूप झाले.

यथासांग त्यांचे और्ध्वदेहिक झाले. दशपिंडाच्यावेळी त्यांचाच एक भक्त क्रियाकर्म करत होता. मामांच्यावर त्याची अतीव निष्ठा होती. त्यामुळे त्याने श्रद्धेने सर्व क्रियाकर्म व्यवस्थित केले. त्यावेळी त्यांच्या थोरल्या चिरंजीवांना अक्षरश: मामांचा पार्थिव देह दक्षिणेकडे जात असताना दिसला. मामांची नाथांच्यावर एवढी मोठी श्रद्धा होती कीं त्यानीं आधीच सांगून ठेवले होते की, 'माझी राख गंगेत, कृष्णेत अगर कुठल्याही नदीत न टाकता ती आप्पाच्यावाडीच्या आणि घोसरवाडच्या रस्त्यावर टाका. भक्तांच्या पायांनी ती तुडवली जावू द्या. म्हणजे मला मोक्ष मिळेल. त्याप्रमाणे त्यांच्या दोन्ही चिरंजीवांनी आप्पाच्यावाडीच्या आणि घोसरवाडच्या रस्त्यावर रक्षा विसर्जन केले.

काळ हा कुणासाठी थांबत नसतो. मामांचा पार्थिव देह काळाने नेला त्याला आता महिना सव्वा महिना उलटून गेला होता. दु:खाची तीव्रताही कमी होत आली होती. अनेक लोक येवून भेटून गेले त्यावरून एक गोष्ट लक्षात आली की मामांची पार्थिव मूर्ती जरी काळाने नेली असली तरी लोकांच्या अंत:करणाच्या सिंहासनावर स्थापित झालेली मूर्ती काळाला नेता येत नाही. उलट ती अधिक अधिकच स्पष्ट होत जाणार आहे. मामांना खरी श्रद्धांजली त्यांनी चालविलेल्या कार्याची दिंडी पुढे नेण्यातच आहे हे ओळखून घरातील लोकांनी यात्रेची तयारी हळुहळू सुरु केली. अभिषेकाला लागणारे चौरंग निपाणीहून येत असत. त्यावर्षी मामांचा मुलगा मधु हा चौरंग आणायला



स्वत: गेला. कापडाचे प्रसिद्ध व्यापारी निपाणीचे श्री. चंदुलाल शहा यांचे दुकानी उभारला असता मागून कुणीतरी त्याच्या खांद्यावर हात ठेवला. वळून बघतो तो ते देवचंद शेडजी होते. ते त्याला म्हणाले, 'मामा गेल्याचे मी पद्मसागरजींना पण सांगितले,'' ते म्हणाले, ''मामा देवाच्या पायाजवळ गेले. त्यांना सायुज्य मुक्ती मिळाली आहे.'' पुढे मधुला उद्देशून शेडजी म्हणाले, ''मधू, मामांच्यासारखा नि:स्पृह मनुष्य मिळणार नाही. मामा म्हणजे निपाणीचे नाक होते. त्यांची पोकळी कधीच भरून निघणार नाही.'' हे म्हणताना शेटजी पण गदगदले व मधुही गदगदला.

मानव आणि मानवेत्तर प्राणी यात फरक करताना मानवाला बुद्धिची देणगी दिलेली आहे, इतर प्राण्यांना नाही असा फरक सांगितला जातो पण यापेक्षा एक वेगळा फरक सांगायला हवा. तो असा की, सर्व प्राणी सारखे असतात. मनुष्याचे शरीर जरी सारखे असले तरी त्यात उच्च-नीचपणा, श्रेष्ठ-कनिष्ठपणा असतो. कांही बुद्धिमान असतात तर कांही मंद असतात. कांही सज्जन असतात तर कांही दुर्जन असतात. कांहींना ईश्वराचे दर्शन झालेले असते तर कांही ईश्वर न मानणारे असतात. ईश्वराचे दर्शन झालेली माणसे स्वत: समाधानी असतात आणि दुसऱ्याला समाधानी होण्याचा मार्ग दाखवतात. देवदत्त गुण म्हणून म्हणा अगर पूर्वजन्मार्जित तपाचे फळ म्हणून म्हणा त्यांना एक ईश्वरशक्ती प्राप्त झालेली असते आणि ती त्यांच्या आयुष्यात हळुहळू दृगोचर होत जाते आणि त्या व्यक्तीच्या मनाचा प्रवास संतत्वाकडे जातो.

'संसाराच्या तापे तापलो मी विठ्ठला' म्हणणारा तुकाराम शेवटी तुका झालासे पांडुरंग या अवस्थेला पोचतो. बुद्धिच्या चिकित्सेच्या पलीकडे जाणाऱ्या घटनेनी व्यक्तिमत्वाचे रूपांतर विभूतीमत्वात होते. ते त्या व्यक्तिच्या हयातीत कळत नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. अशा विभूतीमत्वाच्या जीवन अमृतानेच मानवी जीवनाला महत्त्व प्राप्त होते. म्हणून अशा विभूती मानवी जीवनाचा स्तर वाढवण्यासाठी वरचेवर अवताराव्यात असे वाटते म्हणून मामांच्याबाबतीत देवांना अशी प्रार्थना करावीशी वाटते की,

**''घाल या आत्म्यासी । पुन्हा गर्भवासी ।।**
**नाथांच्या वंशी । याच पुन्हा ।।**

**भविष्यात डोकावू दे । हाती घेऊनी भंडारा ।।**
**द्याया या आधारा । आर्तजना ।।**

## परंपरेचे सोयरे

निपाणीचे श्री बच्चाराम रेपे नावाचे गृहस्थ मामांचेकडे वरचेवर येत असत. मामांच्याकडे येणारी माणसे लोकांना ते करत असलेले मार्गदर्शन, त्यांच्या ज्योतिष शास्त्रातील ठोकताळे, दैवी उपाय आणि उपचार हे ते बारकाईने पाहत असत. पिडीताला. दु:खीताला, दुरिताला योग्य ते मार्गदर्शन विनामुल्य करून लोकांची दु:खे हलकी करण्याचे जणू काय मामांनी व्रतच घेतले होते. हे पाहून मामांच्याबद्दल रेपेंच्या मनामध्ये आदरभाव निर्माण झाला. रेपेंच्या ऋजू व समर्पितवृत्तीमुळे ते मामांच्या अधिक जवळ आले. आणि घरचेच झाले. त्यावेळी मामा त्यांना नि:संकोचपणे त्यांच्या आजारपणामुळे तटलेली व नडलेली कामे सांगत असत. रेपे पण घरची कामे म्हणून आनंदाने करत असत. रेपेंना आरोग्यखात्यात चांगली नोकरी लागली आणि त्यांचे लग्न झाले पण लग्नात काही अपेक्षाभंग आणि फसवणूक झाल्याने ते अडचणीत आले. पण मामांच्या सल्याने व मार्गदर्शनाने अतिशय कठिण अशी ती अडचण दूर होऊन त्यांचा संसार व्यवस्थित सुरु झाला. आता सुफलही झाला. ते नियमितपणे आप्पाच्यावाडीला अमावास्येला येत असतात. त्यांनी मामांचा फोटो आपल्या घरात लावला असून रोज ते त्याचे पूजन करतात.

श्री. गोपाळकृष्ण हुक्केरीकर हे बेळगांवहून दर अमावस्येला आदलेदिवशी निपाणीस येत असत. दुसरे दिवशी मामांचेबरोबर आप्पाचेवाडीस जात. मामांनी त्यांच्याकडेआर्थिक जमाखर्च सोपवला होता. त्यांचा हिशोब अगदी चोख असे. हुक्केरीकर हे एका वकिलाकडे कारकून म्हणून काम करत होते. चार मुले त्यांच्या पदरात असल्याने आणि त्यामानाने मिळकत नसल्याने परस्थिती बेताचीच होती. पण त्यांची देवावरची, मामांच्यावरची निष्ठा कुठल्याही सामर्थ्याहून समर्थ होती. त्यांनी कधीही अमावस्या चुकविली नाही. एस.टी.च्या भाड्याला पैसे नसले तरी उसने घेऊन का होईना ते येत असत.



कोणतीही अपेक्षा न ठेवता ते सेवा करत असत. नारदांनी भक्तिसुत्रात भक्तीचे दोन प्रकार सांगितले आहेत. एक वैदीभक्ती आणि दुसरी रागानुराग भक्ती. भक्ती न केल्याने आपल्यास पाप लागेल या भीतीपोटी केलेली भक्ती म्हणजे वैदी भक्ती. आणि भक्तीसाठी केलेली भक्ती म्हणजे रागानुराग भक्ती. हुक्केरीकर बापू हे रागानुराग भक्तीचे उत्तम उदाहरण होते. त्यांची मामांच्यावर नितांत निष्ठा होती. ही अपूर्व आणि अतूट निष्ठा हेच त्यांचे तप. आणि पंढरीची वारी करणाऱ्या वारकऱ्यासारखी अमावस्येची वारी करणे आणि तिथे पडेल ती सेवा करणे ही त्यांची साधना होती. खुल्या दिलाचा, शुद्ध मानाचा, हळव्या भावनेचा, नि:ष्कपटी आणि अनासक्त भक्त कसा असतो त्यांचे हुक्केरीकर हे नि:संदिग्ध, ज्वलंत व जिवंत उदाहरण होते. बापू या नावाने ते विशेष ओळखले जात. १९७७ साली त्यांनी एकाएकी देह ठेवला. 'अनायासे मरणं' याला पुण्याई लागते असे म्हणतात. ते बापूंनी सिद्ध करून दाखविले. त्यांची मुले-मुली यांचीदेखील आप्पाचीवाडी येथे निष्ठा आहे. बापूंच्या पुण्याईचे फळ मुला-मुलींना भरभरून मिळाले आहे. त्यांची सारी मुले जीवनात यशस्वी झाली असून सर्वजण समृद्ध जीवन जगत आहेत.

श्री. बापू हुक्केरीकरांच्या आधी श्री. बाबुराव लाटकर नावाचे गृहस्थ हिशोबाचे काम बघत असत. हे मुळचे खडकलाटचे. हे असेच मामांचेकडे सल्यासाठी येता-येता मामांच्यावरची श्रद्धा वाढली. या श्रद्धेपोटी ते आप्पाचेवाडीला येऊ लागले. त्यांना डोळ्याला मोठ्या भिंगाचा चष्मा होता. त्यांना हिशोब करताना डोळ्याला थोडासा त्रास व्हायचा. पण त्यांनी कधी तक्रार केली नाही. नाथांची सेवा म्हणून ते काम करत असल्याने त्यांनी कधी कुचराई केली नाही. नाथांचं पण त्यांना संरक्षण होतं. याचं एक उदाहरण सांगावेसे वाटते. एकदा अमावस्या संपवून मामा, लाटकर आणि आबासाहेब बेडकेहाळकर कागलला यायला निघाले. सोंडपापर्यंत चालत आले. तिथे एस.टी. ची वाट बघत थांबले. काही केल्या एस. टी. मिळेना. रात्रीचे ९ - ९.३० झाले. इतक्यात शिपूरचे काही लोक बैलगाड्यात शेंगाची पोती भरून कोल्हापूरला चालले होते. मामांना बघून त्या गाड्या थांबल्या आणि त्यांनी मामांची विचारपूस केली. मामांना गाडी मिळाली नाही हे ऐकून त्यांनी सूचना

वजा विनंती केली. ''दादा (मामांना ते दादा म्हणत असत.) तिघांना तीन गाडीत सपैय जागा करून देताव. 'आमच्या गाडीत बसा. चला तुम्हाला कागलला सोडतो.'' तिघांनीही सूचना मान्य केली. आणि एकेक जण एकेक गाडीत बसला. बैलगाड्या कोगनोळीच्या पुढे आल्या असतील नसतील इतक्यात कोल्हापूराहून एक भरधाव ट्रक आला आणि त्यांनी उजवीकडील तिन्ही बैलांना धडक मारून गेला. त्या धडकेच्या मोठ्या धक्क्याने लाटकर, बेडकेहाळकर आणि मामा हे तिघेही गाडीच्या दुसऱ्या बाजूला पडले पण ते कसे एखाद्या मांजराने उडी मारली असता ते जसे अलगद चारी पायावर पडते तसे हे तिघेही दोन हात दोन पायावर अलगद पडले. कुणाला खरचटले देखील नाही. बाबुराव लाटकरांचा चष्मा मात्र लांब फेकला गेला होता. पण त्याच्या काचेला तडा देखील गेला नाही. तसे पाहिले तर ही किती आश्चर्याची गोष्ट आहे. हेच नाथांचं संरक्षण. हे कुठल्याही भक्तीपूर्ण अंत:करणाला वाटल्याशिवाय रहाणार नाही. ट्रकवाला पुढे निघून गेला होता. तिन्ही बैले मरून पडली होती. मामांनी ताबडतोब दुसऱ्या वहानातून ट्रकवाल्याचा पाठलाग केला. तो ट्रक कोगनोळीजवळ उलटा झाला होता. दारूच्या नशेतला तो ड्रायव्हर मामांची क्षमा मागून सोडण्याची याचना करत होता. मामांनी रितसर पंचनामा करून त्याची कोर्टात केस उभी केली. आणि स्वत: साक्षिदार होऊन शेतकऱ्याला न्याय मिळवून दिला. मामांच्या सहृदयतेचा व न्यायप्रियतेचा हा दाखलाच होता.

श्री. गजानन अप्पाजी दत्तवाडकर हे कोल्हापूरचे रहिवासी. सध्या ते पुण्याला असतात. मुळचे हे शिरोळ तालुक्यातील दत्तवाड या गावचे कुलकर्णी मामांचे घोसरवाड आणि दत्तवाड यांत २ मैलाचे अंतर. मामा कुरूंदवाडला असताना ज्या लट्ठेंच्या वाड्यात रहात होते त्याच वाड्यात बाहेरच्या बाजूला एक खोली गेऊन काही विद्यार्थी रहात होते. त्यातील हे एक. पण त्यावेळी मामांची त्यांची जवळून ओळख झाली नव्हती. दत्तवाडकरांच्या सासुबाई कागलला होत्या. त्या आप्पाच्यावाडीला अधून मधून जात असत. एकदा मामांनी त्यांना सलग पाच अमावस्या येण्यास सांगितले. परंतु तिसऱ्या अमावस्येला त्या आजारी पडल्या आणि सहाजिकच त्यांनी आपल्या जावयास विनंती केली की माझ्याऐवजी या अमावस्येस तुम्ही जा. त्याप्रमाणे ते आले



मामांची आणि त्यांची दृष्टादृष्ट झाली आणि दत्तवाडकरांना मामांना कोठेतरी पाहिल्याची आठवण झाली. विचारपूस करता करता कुरूदंवाडच्या लट्ठेंच्या वाड्यातील आठवण निघाली आणि त्यांचे ऋणानुबंध जुळले. श्री. दत्तवाडकर उर्फ आबा हे सहजासहजी अंध:श्रद्धेने कोणावरही विश्वास ठेवणारे नव्हेत. त्यांची आस्तिक्य बुद्धी इतकी विचक्षण आहे की, आपल्या परिक्षेला उतरल्याशिवाय कोणापुढेही नतमस्तक होणारे नाहीत. पुढे २-३ अमावस्या आल्यानंतर हा धागा अधिक पिळदार झाला. पण ते या परंपरेचे अविभाज्य भाग होतील असे त्यांना कधी वाटले नव्हते. मामांनी बरोबर त्यांना पारखले आणि हिशोबाचे काम त्यांच्याकडे सोपवले. प्रत्येक अमावस्येला जमत असलेल्या सेवेचा आणि त्यातून होणाऱ्या खर्चाचा हिशोब नाना फडणविसाच्या काटेकोरपणाने लिखित स्वरूपात त्यांनी ठेवला आहे. तसेच गेल्या ३०-३५ वर्षाचा यात्रेचाही हिशोब त्यांनी ठेवला असून त्या वह्या योग्य ठिकाणी सुपूर्त केल्या आहेत. मामांनी त्यांना अमावस्येला अगर यात्रेला इतर लोकांच्यासारखे काहीही विचारयायचे नाही असे सांगितले होते तो नियम त्यांनी आज पावेतो पाळला आहे. कारण एखाद्या बागेतल्या माळ्याने पाटातून वाहणारं पाणी हवी ती वळणे देऊन आपल्याला हवेत्या ठिकाणी न्यावे त्याप्रमाणे त्यांच्या जीवनाचा प्रवाह नाथांनी वाहवला आहे. ते भौतिक आणि आध्यात्मिक दृष्टीने संपन्न आहेत. गेले २५-३० वर्षे ते पुण्याहून दर अमावस्येस येतात. वयोमानामुळे आता हिशोबाचे काम होत नाही म्हणून त्यांनी श्री. शरद नाडगोंडे या योग्य माणसाकडे हिशोबाचे काम सोपवले आहे. ते एकदा निपाणीला मामांच्याकडे गेले असताना मामांनी त्यांना फुलांनी सजवलेली पूजा दाखविली ती त्यांच्या मनी इतकी ठसली की ते आजतागायत सकाळी ६ वा. फुलांनी सजवलेली पूजा ते करत आहेत. त्यांची भक्ती आता परिपक्वतेच्या पातळीवर पोहोचली आहे. एखादा रंग हलके-हलके पक्का होत जावा तशी ही गेल्या २५-३० वर्षाची परंपरा परिपक्व होत आहे. मंजिष्ठा नावाची एक वनस्पती आहे. तिच्या अर्कात रंगविलेले कापड सुरवातीस निस्तेज वाटते पण नंतर पुन्हा-पुन्हा पाण्यात बुचकळून काढले व उन्हात वाळवले की थेट सूर्यप्रकाशच आपल्यात शोषून घेत-घेत परिपक्व होत खुलत जातं आणि त्याचा रंग भगवा होतो पण ते

नुसत्या पृष्ठभागावरचं रोंगण नसतं तर ते उभ्या-आडव्या विणीच्या धाग्यात भिनलेला एकजीव होवून गेलला तो मूळचा रंग असतो. त्याचं विटणं देखिल मुळचं सौंदर्य वाढवणारं असतं बाबांच्या जीवनाचं वस्त्र असं संपूर्ण सुंदरमय झालेलं आहे. झाडाने जसे पानाच्याद्वारा हवेतील अन्न घ्यावे त्याप्रमाणे बाबा असतील तिथे आपल्या स्मरणाने नाथांची सेवा करीत असतात. हीच त्यांच्या आत्तापर्यंतच्या सेवेची फलश्रुती आहे.

श्री. नाडगोंडे हे कागलचे एक नामांकित घराणे. त्यांच्या घराण्यात वंश परंपरागत चालत आलेली वकिली विश्वनाथ उर्फ तात्या व व्यंकटेश उर्फ रावसाहेब यांनी बहाराला आणली. २०-२५ माणसांचे ते एकत्र कुटुंब होते. सर्वांना सामावून घेणाऱ्या वृत्तीचे बाळकडू त्यांना लहानपणीच पाजले गेले होते. वंशपरंपरागत आलेली शेती ते उत्तमरितीने सांभाळत असत. कागलला कोणतीही केस कोर्टापुढे आली तरी त्यातील एक बाजू श्री. नाडगोंडे वकिलांचीच असणार हा एक अलिखित नियमच होता. घरात सर्व कुळधर्म-कुलाचार याचे उत्तम आचरण होते. मुला-मुलींना आंग्लविद्या शिकण्याची मुभा होती. पण कोणीही आपल्या संस्काराची लक्ष्मण रेषा न ओलांडण्याचा धाक होता. असे आदर्श कुटुंब नव्हे तर एक संस्था होती. त्यांचे तीन प्रमुख खांब होते. एक थोरले डॉ. मामा, दुसरे तात्या आणि तिसरे रावसाहेब . मामांच्या संकटकाळी मामांना फारमोठा आधार या तिघांचा मिळाला. मामांना आप्पाच्यावाडीची परंपरा चालवण्यासंबंधी मनोबल देण्याचे काम या तिघांनी केले. म्हणून हे लहानसं रोपटं जीव धरू शकले. त्यांचा उल्लेख केल्याशिवाय व कृतज्ञता व्यक्त केल्या शिवाय मामांचे चरित्र पूर्ण होते शक्य नाही.

श्री. पांडुरंग काशीकर नावाचे गृहस्थ मामा कागलला असताना त्यांचेकडे आले ते एका मोठ्या संकटात होते. त्यांच्यावर चोरीचा आळा आला होता. त्यामुळे त्यांना फार भिती वाटत होती. मामांनी त्यांना आप्पाच्यावाडीस जायला सांगितले. आणि देवापुढे जावून मागणे मागायला सांगितले. 'मला या संकटातून मुक्त कर. मी तुझ्या प्रत्येक अमावस्येला व यात्रेला येवून पाकसिद्धीचे काम करेन. ही सेवा माझी गोड मानून घे.'' काशीकर दोषमुक्त झाले. आणि देवाला बोलल्याप्रमाणे त्यांनी शेवटपर्यंत सेवा करून



आपला शब्द पाळला.

श्री. पृथ्वीराज धुंडीराज भालेराव तथा प. पू. पापा राजे हे मुळचे हैद्राबादचे. त्यांचे वडील निजाम संस्थानात मंत्री होते. ऐश्वर्य घरात काठोकाठ भरलेले असायचे. गजान्तलक्ष्मी घरात असतानाही यांचा कल आध्यात्माकडे परमार्थाकडे होता. घरातील वातावरण आंग्ल संस्कृतीनुरूप होते. भाग्यवशात श्रीधरस्वामींच्यासारख्या सिद्धपुरुषाची त्यांची गाठ पडली आणि त्यांचे सारे जीवन उजळून निघाले. त्यांची प्रखर बुद्धीमत्ता, प्रतिभा, विद्वत्ता, पांडीत्य या साऱ्या नद्या श्रीधरस्वामींच्या समुद्राच्या दिशेने धावू लागल्या. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. उदा. 'सुबोध उपासना', 'उपासना महात्म्य', 'सद्‌गुरु मानस पूजा',' रेणूका सहस्त्रनामावली' व श्रीधर स्वामींचे 'चरित्र उन्मेष' आणि कितीतरी पुस्तके त्यांनी लिहिलेली आहेत. भवानराव नेरलीकरांच्यामुळे ते आप्पाचीवाडीला आले होते, ती कार्तिक अमावस्या होती. सदरेवरचा दीपोत्सवाचा कार्यक्रम संपवून ज्यावेळी मामा घुमटापाशी आले आणि घुमटापाशी दिवे लावल्यानंतर आरतीसाठी म्हणून देवासमोर उभे राहिले. बरोबर प. पू. पापा राजे पण होते. त्यांना आप्पाच्यावाडीच्या देवाच्या ठिकाणी श्रीधरस्वामी उभारलेले दिसले. ते दृष्य पाहिल्यावर त्यांना गहिवर आला. गुरुतत्व कसे चराचरात कोंदाटले आहे याची प्रचिती त्यांना आली. आणि त्यांची प्रतिभा जागी झाली. त्यांना एक काव्य सुचले ते तिथल्या तिथे त्यांनी शब्दबद्ध केले. उपासना, पूजा याज्ञिकादी गोष्टी कशा शास्त्रोक्त कराव्यात हे त्यांना अतिशय चांगल्या रितीने माहित आहे. पापाराजे म्हणजे एक संदर्भ ग्रंथ आहे. संगीतातील रागाचे ज्ञान चांगले आहे. 'श्रीधर उन्मेष' नावाच्या पुस्तकात त्यांनी मामांचा उल्लेख केला असून आप्पाच्यावाडीचाही त्यात उल्लेख आहे. सध्या ते पुण्याला असून आपल्या श्रीधर रेणूका उपासनेने भक्ती मार्ग रविप्रभेसम विस्तारीत आहेत.

श्री. माधव, पंडीत, दिगंबर आणि प्रभाकर हें मामांचे चुलत बंधू, परंपरेने आलेली नाथांची भक्ती त्यांनी मनापासून केली. या नाथांच्या भक्तीमुळे अनेक प्रापंचिक संकटाना ते धैर्याने तोंड देऊ शकले. इतकेच नव्हे तर पंडीत यास वेगळ्या रूपात दर्शनही झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात ते मिलिट्रीमध्ये गेले होते. एकदा डबलमार्च करता असताना मागे पडले त्यांना तहान लागली

हाती. तहानेने व्याकूळ झाले व खाली पडले. 'पाणी, पाणी' म्हणून ओरडू लागले. अशा कातरवेळी त्यांना नाथांचे स्मरण झाले. त्या ठिकाणी ना माणूस ना काणूस पण इतक्यात डोक्यावर पाण्याने भरलेले ॲल्युमिनीअमचे भांडे घेऊन एक वृद्ध दाढीवाला त्यांच्याजवळ आला. त्याने त्यांच्या तोंडात पाणी घातले. कासावीस झालेले प्राण शांत झाले. डोळे उघडून बघतात तर तिथे कोणीच नव्हते. त्यांना नाथांची खूणगाठ पटली

पुढे त्यांना कॅन्सर झाला. डॉक्टरांनी दोन महिन्याचे सोबती म्हणून सांगितले होते पण नाथ कृपेने पुढे १५ वर्षे जगले. माधवराव व पंडीतराव हे दोघेही कालवश झालेले आहेत पण त्यांच्या मुलांनी ही परंपरा सांभाळलेली आहे. श्री. दिगंबर आणि श्री. प्रभाकर हे ही आता उपासनेत स्थिरपद झालेले आहेत.

मामांचे ज्येष्ठ चिरंजीव मधुकर व त्याच्या सुविद्य आर्यपत्नी सौ. माधवी, मामांची ही परंपरा स्वखुषीने, आवडीने चालवीत आहेत. त्यांच्या घरी पण मामांच्या सारखा लोकांचा राबता आहे. तो देखील त्यांच्या पत्नीच्या साक्षेपि सहकार्याने प्रसन्न मनाने व हसऱ्या चेहऱ्याने ते सांभाळत आहेत. महाराजांनी पण त्यांचे सर्वतोपरी कल्याण केले आहे. त्यांची तिन्ही मुले सॉफ्टवेअरमध्ये नोकरीस असून सुस्थितीत आहेत. त्यांचा मोठा मुलगा प्रसाद व सून सौ. रुचिका परदेशात आहेत. विशेष म्हणजे या सर्वांची नाथांच्या ठिकाणी अन्योन्य भक्ती आहे.

सौ. शशिकला ही मामांची मुलीतील थोरली मुलगी. लहानपणापासून हिची देवावर अतिशय श्रद्धा. नाथांच्या कृपाप्रसादाची प्रचिती तिला अनेकवेळा आलेली आहे. आणि याची जाण तिला पूर्णपणे आहे. नाथांच्या आशिर्वादाने तिचा संसार सुफळ झालेला आहे. सर्व मुलींची लग्ने झालेली असून त्या सुस्थळी पडलेल्या आहेत. मुलाचे लग्न होऊन त्यालाही मुलगा झालेला आहे. पतिराज बाबुराव यांची व मुलांची देखील देवावर श्रद्धा आहे. आप्पाच्यावहीला अमावस्येला नेहमी सर्व कुटुंब येत असून सर्व कार्यात त्यांचा सहभाग असतो.

सौ. सुमन ही मामांची मुलीतील नंबर दोनची मुलगी. पहिल्यापासून ही अधिक संवेदनशील असून नाथांवर तिची अढळ श्रद्धा आहे. आजपर्यंत तिच्या आयुष्यात असे काही प्रसंग घडले आहेत की, ज्यावेली तिच्या हाकेला



नाथ उभे राहिले आहेत. तिचाही संसार फलद्रुप झालेला आहे. तिच्या मुला-मुलीचे लग्न झाले आहे. सध्या ती तळेगांवला असते. तिचे पतीराज सुधिरराव व मुले यांचीही देवावर श्रद्धा आहे. मामा म्हणायचे, ''आमचा देव मुलापेक्षा मुलींच्याकडे अधिक जातो'' याची प्रचिती येते.

सौ. जयश्री ही मामांची सर्वात धाकटी मुलगी. हे शेंडेफळ असल्याने मामांची विशेष मर्जी मामांच्या शेवटच्या काळात ती मामांच्याबरोबरच होती. त्यावेळी तिने देवाची आणि मामांची सेवा केलेली आहे. तिचे लग्न १९७६ साली झाले. तिला दोन मुलगे आहेत एक नोकरीस असून दुसरा शिकत आहे. तिलाही सून आलेली आहे. तिचे पतीराज श्री. अनिलराव यांचीही देवावर श्रद्धा आहे.

डॉ. अविनाश हे मामांचे दुसरे चिरंजीव. त्यांची लहानपणापासून देवावर याची श्रद्धा होती. डॉ. अविनाश व त्यांची सुविद्य पत्नी श्रीमती अनिता उर्फ मंगल हे दोघेही दातांचे डॉक्टर झाले. उत्तम प्रकारे त्यांनी कोल्हापूरात बस्तान बसविले. ते ऑर्स्थोडेन्टीस्ट होते त्यावेळी दुसरे कोणी ऑर्स्थोडेन्टीस्ट हुबळी ते पुण्यापर्यंत कोणी नव्हते. त्यामुळे त्यांची प्रॅक्टीस चांगली चालून लवकर बस्तान बसले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती मंगल ह्या देखील ए.डी.एस. (प्रोस्थो.) असल्याने त्यांना त्यांची खूप मदत झाली. दुर्दैवाने १९९८ साली ते हृदयविकाराने एकाएकी गेले. त्यावेळी अक्षरश: त्यांच्यावर आकाश कोसळले. मामा त्यांची वरचेवर कुंडली कां पाहात असत. याचा त्यावेळी उलगडा झाला. त्यांना दोन मुली असून त्याही उत्तम प्रकारे डॉक्टर झाल्या आहेत. त्यांच्या भौतिक जीवनाची प्रगती झपाट्याने झाली. वाचनाचा त्यांना नाद लागल्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व चौफेर झाले होते.

मामांच्या गुरूतुल्य बंधूंचे चिरंजीव दत्तोपंत. त्यांची देवावरची निष्ठा खरोखर अलोट आहे. ते घोसरवाडला शेती बघत होते. त्यांच्या जीवनाचे दोन भाग करावे लागतील. एक म्हणजे त्यांच्या वडीलांच्या हयातीपर्यंत म्हणजे १९७० पर्यंतचा भाग व दुसरा त्यानंतरचा. पहिला भाग हा त्यांच्या कर्मयोगाचा. पूजा अर्चा आदि करून त्यांनी देवांची उपासना केली. शिवाऱ्यातल्या सावळ्या पिकालाच विठठलरूप मानले. एखाद्या कातळाच्या आतून एक झुळझुळणारा

झरा व्हावा आणि तो वर दिसू नये. त्याप्रमाणे त्यांच्या भक्तीचा आणि निष्ठेचा झरा त्यांच्या अंतकरणातून वहात होता पण तो बाहेर दिसत नव्हता. पण त्यांच्या वडीलांच्या निधनानंतर ११ व्या दिवशी त्यांना संचार झाला. एखाद्या मुलांचे कान, नाक, डोळे हुबेहुब आपल्या वडीलांच्या सारखे असावेत. त्याप्रमाणे त्यांची, संचारावस्था हुबेहुब वडीलांसारखी होती. सध्या ते नाथांच्या परंपरेचे उध्वर्यु असून नाथांच्या नाम:स्मरणाच्या सेवेत रमलेले आहेत. त्यांच्या जीवनात अनेक अडचणी, अनेक त्रुटी, शारिरीक भोग आले तरी त्यांची निष्ठा तसूभरही ढळली नाही. हीच गोष्ट त्यांची भक्ती त्यांच्या अंत:करणात खोलवर रूजली आहे याचे द्योतक आहे. त्यांना एक मुलगा व एक मुलगी असून दोन बहिणी आहेत. सौ. कुसुम व शैलजा या दोन बहिणी. हे सर्व नाथांच्या सेवेत असतात. त्यांच्या पत्नी सौ. मालती त्यांचे पण त्यांना पूर्ण सहकार्य आहे. बहिणींचे पती अनुक्रमे रामभाऊ व मनोहरपंत यांच्याही श्रद्धा नाथांच्या ठिकाणी तितक्याच उत्कटतेच्या आहेत हे विशेष.

मामांचे दुसरे बंधू आप्पा यांना एक मुलगा चि. अनिल असून ते परंपरेच्या दिंडीत सामिल झाले आहेत. सध्या ते नाशिकला नोकरी करत असले तरी न चुकता दोन्ही यात्रेला येतात. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. या परंपरेच्या प्रत्यक्ष पाहिलेल्या व अनुभवलेल्या गोष्टींच्या साक्षीदार असलेल्या त्यांच्या मातोश्री नाशिकला असून ईशचिंतनात वेळ सार्थकी लावीत आहेत.

कागलच्या नाडगोंडा वकीलांची बहीण श्रीमती काशीताई धारवाडकर यांची मामांच्यावर नितांत श्रद्धा होती त्यांच्या पतीचा मृत्यु अपघाताने अचानक झाला. त्यामुळे त्यांच्यावर आकाशाची कुऱ्हाडच पडली. नाथांच्यावरच्या श्रद्धेमुळे त्या सावरल्या. हरभट रोडला त्यांचे घर होते. ते अतिशय बाधिक असल्यामुळे मामांनी ते घर सोडायला सांगितले होते पुढे त्यांनी विश्रामबागला बंगला बांधला त्यावेळपासून बऱ्याच कटकटी त्यांच्या कमी झाल्या त्यांचे थोरले चिरंजीव आनंदराव हे नित्यनियमाने अमावास्येस व यात्रेस येतात. इतर बंधू व भगिनी यात्रेस येत असतात.

श्री आबासाहेब बेडक्याळकर हे जवळ जवळ सुरुवातीलपासून यात्रेस व अमावास्येस येत असत. त्यांच्याकडे 'कोठीचे' काम होते याचा वर उल्लेख



आलेलाच आहे कोठीचे' काम अतिशय चोखपणाने ते बजावत होते. त्यामुळे त्यांच्या बद्दल एक आदरयुक्त भीति होती. मामांच्या दैवी शक्तीचे चमत्कार आणि ज्योतिष शास्त्राचे चमत्कार त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहेत. मूळच्या त्यांच्या भाविक स्वभावामुळे आणि दैवी शक्तीची अनुभूति लाभल्यामुळे त्यांची आप्पाच्यावाडीलवरील श्रद्धा दिवसें दिवस दृढ होत गेली. त्यांच्या पत्नीदेखील अतिशय श्रध्दावान होत्या दुर्देवानें त्या फार लवकर गेल्या. हा आबासाहेबांना फार मोठा धक्का होता. अशावेळी कित्येक वेळां नैराश्यामुळे माणूस भरकटत जातो. आणि तो भक्तिमार्गपासून लांब जातो. पण त्यांचे तसे झाले नाही. नरसोबाच्या वाडीला त्यानंतर कित्येक वर्षे दत्ताची उपासना करण्यासाठी राहिले होते. त्यांची ही श्रध्दा पुढच्या पिढीतही झिरपली आहे आणि त्याचे त्यांना समाधान आहे. 'तुका उरला उपकारापुरता' या तटस्थ भावनेनें ईशचिंतनात त्यांना कालक्षेप चाललेला आहे.

श्री नारायण दत्तात्रय कुलकर्णी तथा आबा कुंभोजकर हे मामांचे आबा कुंभोजकर लहानपणापासूनचे मित्र. त्या घराण्याचा संबंध मामांच्या वडीलांच्यापासून होता. मामांचे वडील कै. गोविंदपंत यांना चिमडच्या नारायण महाराजांचेकडून उपदेश घेण्याची नाथांची आज्ञा झाली. आबा कुंभोजकरांचे वडील दत्तोपंत हे गोविंदपंतांना नारायण महाराजांचेकडे घेऊन गेले होते असा हा ऋणानुबंध होता. त्यामुळे आबा कुंभोजकरांची देवावरची व पर्यायाने मामांच्यावरची श्रद्धा त्यांच्या रक्तातूनच वहात होती. अमावास्या, आप्पाचीवाडी व घोसरवाड यात्रा हे त्यांचे कुलधर्म कुलाचारच झाले होते. नाथांचे, मामांचे घडलेले चमत्कार हे त्यांच्या लेखी चक्षुर्वै सत्य होते. आपल्या वाट्याला आलेले कर्म कोणत्याही प्रकारची कसूर न करता करीत सरळ मार्गाने जाणारा, एक सात्विक व्यक्तिमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात असे. त्यांच्या मूळच्या ऋजू स्वभावात परंपरेने चालत आलेल्या श्रद्धेचे आणि भक्तीचे गुलाबपाणी मिसळले असल्याने ते लोकांना हेवे हवेसे वाटत होते. त्यांच्या पत्नी श्रीमती रमा पण अतिशय भाविक, संस्कारसंपन्न होत्या. आबांना त्यांनी आयुष्यभर सावलीसारखी साथ दिली. मामांच्यावर आबांची अलोट आणि अकृत्रिम श्रद्धा कशी होती हे त्यांच्या शेवटच्या आजाराच्या वेळी विशेष दिसून आले.

आबा कुंभोजकर डॉ. भागवतांच्या हॉस्पिटलमध्ये होते. मामांना त्यांना भेटण्याची इच्छा होती. तेही आजारी असलेने जाणे अवघड होते. परंतु एक दिवस त्यांनी जाणेचे ठरवले. इकडे आबा (ब्रेन-हॅमरेज) मेंदुतील रक्तस्त्रावामुळे अर्धवट शुद्धिवर होते. मामा त्याठिकाणी गेल्यावर त्यांचा मुलगा डॉ. मोरेश्वर यांनी आबांच्या कानात ओरडून सांगितले की 'मामा आलेत.' त्याबरोबर आबांनी डोळे उघडले. आणि त्यांनी हातवारे करून प्रथम मामांच्याच तब्बेतीची चौकशी केली. दोघांच्या डोळ्यातून अश्रूपुर वहात होता. मामांनी त्यांना उठवून बसवले. तक्याला टेकून बसवले व १५-२० मिनिटे दोघांच्या गप्पा झाल्या आणि तीच दोघांची शेवटची भेट ठरली. विझण्यापूर्वी दिवा मोठा व्हावा तसे घडले. व त्यांच्या मुलांनी, जावयांनी व नातवंडांनी त्यांची परंपरा श्रद्धेने जपली आहे.

श्री. जयवंतराव गुळवणी हे नाथांचे एक नि:स्पृह, अपेक्षारहीत निस्सिम भक्त. १९७० सालापासून ते आप्पाच्यावाडीस येत आहेत. श्री. शिरगुप्पीकर आण्णांचे जावई. त्यांच्या संगतीने गुळवणी पण येवू लागले. मामांच्याबद्दल असलेल्या आदरयुक्त भीतिमुळे जरा लांब लाबंच असत. निरीक्षणात्मक दृष्टी असल्याने या पंथांच्या कार्याबद्दल त्यांनी आपुलकी निर्माण जाली. नारळात निर्माण होणाऱ्या पाण्याप्रमाणे त्यांच्या अंतकरणात भक्तिचा उमाळा निर्माण झाला आणि ते आप्पाच्यावाडीच्या कार्यात शरीक झालेआहेत. देवाच्या भांड्यांची व्यवस्था ते पाहतात. दोन्ही यात्रा व प्रत्येक अमावस्येस त्यांचा सहभाग नव्हे तर सहयोग असतो. त्यामुळे त्यांच्या जीवनपद्धतीत अमूलाग्र बदल झालेला आहे. प्रपंचातील 'सत्पंथ' सापडल्याचा त्यांना आनंद आहे. तरी त्यांची अंगभुत असलेली 'गाळ तळाला बसवून पाणी स्वच्छ करण्याची तुरटीची वृत्ती' अजूनही त्यांना सोडून गेलेली नाही.

**''किंबहुना तुमचे केले । धर्मकीर्तन सिद्धी गेले ।**
**एक माझे जी उरले । पाईकपण ।।''**

***- संत ज्ञानेश्वर***

■ ■ ■



चि. पंकज मधुकर शिपूरकर म्हणजे मामांचा नातू, जर्मनीतील मॅनहॅम (Mannheim) येथे ट्रेनिंगसाठी ऑफिसने पाठवले होते. तरी त्यांचे लक्ष आजोबांच्या जवळ येत चाललेल्या पुण्यतिथीकडे होते. मनात एक विचार तरळून गेला की आपणही या कार्यक्रमात सक्रीय भाग घ्यावा आणि आजोबांना श्रद्धांजली वहावी. रात्री तो झोपला असता त्याला स्वप्न पडले आणि कांही कवितेचे चरण सुचले. सकाळी उठून त्याचे स्मरण करताना त्या ओळी कांही आठवेनात म्हणून तो विषण्ण झाला. त्याच खिन्न मनाने ऑफिसला गेला असताना कॉम्प्युटरवर काम करू लागला आणि काय आश्चर्य ! रात्रीच्या त्या काव्याच्या ओळी कॉम्प्युटरवर अक्षरश: दिसू लागल्या. हातात मिळालेल्या सिसपेनने त्या ओळी भराभर लिहून घेतल्या ते हे स्वयंभू काव्य -


**नाथांच्या कृपेचा महिमा वर्णावा किती**
**नाथ भक्तिसागरातील हा एक अनमोल मोती ।।**
**नाथांच्या कृपेने हजारो लोकांच्या**
**आयुष्याचे केले सोने**
**असा हा नाथभक्त न झाला, न होणे ।।**
**नाथांचे स्मरण करूनी घेतला**
**जेव्हा हाती भंडारा ।।**
**जो समोर येईल त्याच्या**
**कर्माचा वाचला रे पाढा ।।**
**गोविंदांनी जे रोवले बीज**
**त्याचा केला तुम्ही कल्पवृक्ष ।।**
**मनापासुनी नाथभक्ती करिता**
**भक्त हो तुम्हा मिळेल मोक्ष ।।**
**नाथकृपेने आपणास मिळाली**
**अद्भूत सिद्धी ।**
**सिद्धीयोगे केलीत तुम्ही**
**जनजागृती ।।**


'योगनिद्रेतून जागा झालो आहे'
तुम्हा सांगे चिंतामणी ।।
घराण्याचा उद्धार केला
त्या कवच काढूनी ।।
वाडीची कीर्ति दाहीदिशा
वाढविली प्रयत्ने ।।
बीजाचा झाला वटवृक्ष
आपल्या आशिर्वादाने ।।
नाथांनी दिलेली ही सेवा
आहे आमची मिराशी ।।
विनवणी करतो तुजला
कसूर न होवो जराशी ।।
कित्येक चमत्कार आपण
या वाडीस दावियले ।।
पुस्तकरूपे भक्तासन्मुख
आजि आम्ही ठेवियले ।।
दिगंत कीर्ति होवो तुमची
वाढुनिया ओजा ।
रजततिथीपदी वाहतो
शब्दांची ही पूजा ।।

***पंकज शिपूरकर***
*दि. ७-७-२००५*
*मॅनहॅम (जर्मनी)*





मामांचा मोठा मुलगा मधुकर व त्यांची फॅमिली.


मामांचा दुसरा मुलगा डॉ. अविनाश शिपूरकर व त्याची फॅमिली.


मामांची लहान मुलगी सौ. जयश्री कुलकर्णी व तिची फॅमिली.



मामांची मोठी मुलगी सौ. शशिकला कुलकर्णी व तिची फॅमिली



मामांची मधली मुलगी सौ. सुमन कुलकर्णी व तिची फॅमिली.



मामांच्या तेजस्वी 'पणत्या'

# नाथपंथ-प्रदर्शिका

मामांनी नाथसंप्रदायाचे कांही नियम व अटी साधकांसाठी सांगितल्या आहेत.

१) नाम:स्मरण, पूजा-अर्चा, सेवा-अन्नदान या गोष्टी देवाला अधिक प्रिय.

२) चिमड संप्रदायातील गुरुभजन व पंचपदी रोज म्हणावी.

३) गुरुभक्ती ही सर्वात महत्त्वाची आणि गुरुआज्ञा ही वेदासारखी प्रमाण.

४) कुलधर्म व कुलाचार हे कटाक्षाने पाळले पाहिजेत.

५) प्रापंचिक गोष्टीतील अडचण दूर होण्यासाठी कुलदेवतेची उपासना आवश्यक.

६) पारमार्थिक उन्नतीसाठी उपास्य देवतेची आराधना चालू ठेवावी.

७) प्रपंच व परमार्थ उत्तमपणे साधावा असे या सांप्रदायाचे ध्येय आहे. प्रपंच परमार्थरूप कसा करावा हे या सांप्रदायात कळते.

८) साधक भक्ताने प्रत्येक अमावस्येस व यात्रेस देवदर्शनासाठी येण्याचा नियम कटाक्षाने पाळावा. आपल्या मुलाबाळांनाही घेवून यावे म्हणजे परंपरा टिकण्यास मदत होते.

९) गुरुपदेश घ्यावा पण आपल्या सांप्रदायातील अधिकारी पुरुषाकडून घ्यावा.

१०) परद्रव्य विषासमान मानावे. परस्त्री मातेसमान मानावी. परान्न शक्यतो वर्ज्य करावे.

११) अभक्ष भक्षण, अपेय पान कटाक्षाने टाळावे.

१२) 'गुरुचरित्र' व 'नवनाथ' या ग्रंथांची पारायणे करावीत.

१३) नाथपरंपरेत अन्नदानास विशेष महत्त्व आहे. गोर-गरीब व भक्तगणास अन्नदान करावे.

१४) हालसिद्धनाथांना अंबिल फार प्रिय आहे. यासाठी अंबिलाचा प्रसाद वाटावा.

१५) नम्रता, निर्व्यसनीपणा, साधी राहणी, आनंदी वृत्ती आणि शरणागती या सर्व गोष्टींकडे साधकाने विशेष लक्ष द्यावे. त्यामुळे तो अंतर्बाह्य सिद्ध होतो.

१६) अखंड नाम:स्मरण करण्याचा प्रयत्न करावा. निदान रोज दोन तास तरी नाम:स्मरण करण्याचा नेम करावा. त्यामुळे देह-बुद्धी फिकट होवून आत्मबुद्धि जागृत होते.

## ॥ प्रात:स्मरण ॥

श्री गणेशाय नमः । श्री सरस्वत्यै नमः
श्री गुरुभ्यो नमः । श्री वेदपुरुषाय नमः
इष्टदेवताभ्यो नमः । कुलदेवताभ्यो नमः
श्री लक्ष्मी नारायणाभ्यो नमः । श्री उमामहेश्वराभ्याम् नमः
श्री मातृपितृभ्यो नमः ॥ ■ ■ ■

कराग्रे वसते लक्ष्मी करमध्ये सरस्वती ।
करमूले तु गोविंदं प्रभाते करदर्शनम् ॥१॥
समुद्र वसने देवी पर्वतस्तन मंडले ।
विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्वमे ॥२॥
वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभ ।
निर्विघ्नं कुरुमेदेव सर्वकार्येषु सर्वदा ॥३॥
गणनाथ सरस्वती रवि शुक्र बृहस्पती ।
पंचैतानि स्मरेनित्यं वेदवाणी प्रवर्तते ॥४॥
गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्री गुरवेनमः ॥५॥ ■ ■ ■

## ॥ श्री देवी बीज मंत्र ॥

ॐ क्षं ऐं बीजं र्‍हीं शक्तिः क्लीं कीलकम्
नमोदेवी महादेवी दाक्षायणिं नाना रोग भयहारिणी
त्र्यैलोक्य चिंतामणी कलिमलदहनी, योगांग-कारिणी
सत्व-तम-गुण धारिणी हिमनग नंदिनी
पापक्षयकारिणी सर्व रोग ताप हारिणी
त्रैलोक्य स्वामिनी जगत्र जननी
प्रजा पालिनी.... नाम संवत्सर भक्षिणी
क्लीं र्‍हीं ऐं क्षं ॐ नमस्ते नमस्ते ■ ■ ■

## ॥ अथ योगिनी मंत्र ॥

चतुःषष्ठी समाख्यातां योगिनी सिद्धिदायिर्नी ।
जयादी देवता रुपां तां नमामि शिवप्रदाम् ।
यों योगिनोभ्यों नमः ॥ ■ ■ ■



## भूपाळी

उठी उठीबा श्री हालसिद्धा । चमसनारायणा महासिद्धा
रेवणनाथा तू प्रसिद्धा । धरी पोटसी भक्तजना ॥धृ ॥
द्वारावरती नवनारायण । एकदा मिळाले सर्वही जण
त्यासी सांगती श्रीकृष्ण । घ्यावे तुम्हीं अवतारा ॥१॥
ज्ञानदेव मी होईन । नाम तुमचे रेवण
रेवातीरी अवतीर्ण । व्हावे तुम्ही सत्वरी ॥२॥
अयोनि-संभवबाळ तान्हा । रेवा प्रवाही वाहताना
सहन सारूका पाहवेना । घरीं आणुनि वाढविला ॥३॥
दत्तात्रेया करूनि गुरु । नाथ दीक्षेचा स्वीकारू
करिती भक्तांचा उद्धारू । हिंडतसे महीवरी ॥४॥
आर्तादिक जे पुण्यजन । तुम्हा येताती शरण
त्यांचे हेतू पुरवून । कृपा त्यावरी करावी ॥५॥
मोरेश्वरासी दयाघना । घ्याजी पदरी या दीना
गोविंदाच्या प्रेमळ वचना । मान द्यावा महाराजा ॥६॥
■ ■ ■

## काकड आरती

काकड आरती देवा तुजला ओवाळू
सद्‌गुरुराया तुजला ओवाळू
सप्रेम पाऊले हृदयी तुमची कवळू ॥धृ ॥
मायाविद्या पीळ घालूनि काकडा केला
स्वामी काकडा केला
अनुसंधान स्नेह घेऊनी, सगळा भिजविला ॥१॥
स्वयंप्रकाश उजेड त्रिभुवनी पडला
स्वामी त्रिभुवनी पडला
उदयास्त ग्रासुनी नित्य उजळीला ॥२॥
पूर्णानंदे तव मुख पाहता तृप्ती भुकेली
स्वामी तृप्ती भुकेली
शिवरामी आराम तोही न बोले बोली ॥३॥
■ ■ ■

## पद

गुरुराया रे गुरुराया रे गुरुराया रे गुरुराया ।।धृ।।
धन्य सद्‌गुरु राय रे, धन्य सद्‌गुरु माय रे
धन्य वासुदेव रे, धन्य दत्त अवतार रे ।।१।।
जरी तव चरणी चित्त न जडले । जन्मुनी केले काय रे ।।२।।
पूर्णानंद गुरुराज दयाधन, स्वामीराज महाराज रे ।।३।।
पूर्णानंद गुरुराज दयाधन, वासुदेव महाराज रे ।।४।।
पूर्णानंद गुरुराज दयाधन, दत्तराज महाराज रे ।।५।।

■ ■ ■

## श्री सद्‌गुरु स्तवन

छंद मना घे अखंड सद्‌गुरु समर्थ चरणांचा
याविण दुस्तर सागर तरण्या मार्ग नसे साचा।।धृ ।।
मना तुला हे बीज सांगतो समर्थ ग्रंथीचे ।
ग्रंथराज भावार्थहि ऐसा वदती गिरिवाचे ।
अनन्यभावे स्मरण करोनि श्रीगुरुचरणांचे ।
मानसपूजा ध्यान-जपाने रिझवी मन त्याचे।।१।।
तरीच जन्मा येऊनी केले सार्थक देहाचे ।
जरी अहर्निशी ध्यान लागले योगीरायाचे ।
गुरुचरणाची गोडी तुजला किती सांगू वाचे ।
सेवक किंकर स्वच्छंदाने गुरु पुढती नाचे ।।२।।

■ ■ ■

## श्लोक

गोरक्ष जालंदर चरपटाक्ष, अडभंग कानीफ मच्छिंद्राद्या: ।
चौरंगी रेवाणक भर्तृरी संज्ञा, भूम्यां बभुर्वो नवनाथसिद्धा: ।।
अस्य श्री रेवणनाथमंत्रस्य श्रीकृष्णऋषि: नारायणदेवताउष्णीकछंद:
ॐ बिजं चमस शक्ति: नाथ इतिकीलकं रेवणनाथप्रीत्यर्थ मम
समस्त पुरुषार्थ सिध्यर्थे जपे विनियोग:

■ ■ ■



(सायंकाळचे भजन)

## श्री सद्‌गुरु करुणाष्टक

श्री दत्तात्रेया तव शरणम् । दत्तनाथा तव शरणम्
त्रिगुणात्मका त्रिगुणातीता । त्रिभुवन पालक तव शरणं ।।१।।
शाश्वतमूर्ते तव शरणं । शाम सुंदरा तव शरणं
शेषाभरणा शेषभूषणा । शेषशायी गुरु तव शरणं ।।२।।
षड्‌भुजभूर्ते तव शरणं । षड्‌भुजयतिवर तव शरणं
दंड कमंडलु गदा पद्मकर । शंखचक्रधर तव शरणं ।।३।।
करुणानिधे तव शरणं । करुणासागर तव शरणं
श्रीपाद श्रीवल्लभ गुरुवर । नृसिंह सरस्वती तव शरणं ।।४।।
श्रीगुरुनाथा तव शरणं । सद्‌गुरुनाथा तव शरणं
कृष्णासंगम तरुवर वासी । भक्तवत्सला तव शरणं।।५।।
कृपामूर्ते तव शरणं । कृपासागरा तव शरणं
कृपाकटाक्षा कृपावलोकना । कृपानिधे प्रभु तव शरणं ।।६।।
कालांतका तव शरणं । कालनाशका तव शरणं
पूर्णानंदा पूर्ण परेशा । पुराण पुरुषा तव शरणं ।।७।।
जगदीशा तव शरणं । जगन्नाथा तव शरणं
जगत्पालका जगदाधीशा । जगदुध्दारा तव शरणं ।।८।।
अखिलांतरा तव शरणं । अखिलेश्वर्या तव शरणं
भक्तप्रिया वज्रपंजरा । प्रसन्नवक्त्रा तव शरणं ।।९।।
दिगंबरा तव शरणं । दीन दयाघन तव शरणं
दीनानाथा दीन दयाळा । दीनोद्धारा तव शरणं ।।१०।।
तपोमूर्ते तव शरणं । तेजोराशी तव शरणं
ब्रह्मानंदा ब्रह्म सनातन । ब्रह्ममोहना तव शरणं ।।११।।
विश्वात्मका तव शरणं । विश्वरक्षका तव शरणं
विश्वंभरा विश्वजीवना । विश्वपरात्पर तव शरणं ।।१२।।
विघ्नांतका तव शरणं । विघ्ननाशका तव शरणं
प्रणवातीता प्रेमवर्धना । प्रकाशमूर्ते तव शरणं ।।१३।।

■ ■ ■

# श्री हालसिद्ध अष्टक

श्री हालसिद्धा तव शरणम् । श्री गुरुबोधा तव शरणं
परमानंदा सच्चित्‌कंदा । अरुप अगाधा तव शरणं ।।१।।
श्री सिद्धेश्वर तव शरणं । हालसिद्धेश्वर तव शरणं
घोसरवाडेश्वर परमेश्वर । वंदित सुखर तव शरणं ।।२।।
श्री सिद्धनाथजी तव शरणं । जगन्नाथजी तव शरणं
हालसिद्धनाथजी अनाथनाथा । अनाद्यनंता तव शरणं ।।३।।
हालसिद्धप्पा तव शरणं । जगन्नाथा तव शरणं
अमूपरूपा सुखदस्वरूपा । चिन्मयदीपा तव शरणं ।।४।।
जयमुकुटस्थित तव शरणं । भस्मविभूषित तव शरणं
श्रृंगी शैली कंथा झोली । कर्णीकुंडल तव शरणं ।।५।।
कौपिनधारी तव शरणं । त्रितापहारी तव शरणं
संकटवारी पाप निवारी । जयत्रिपुरारी तव शरणं ।।६।।
पदी पादुका तव शरणं । धर्म रक्षका तव शरणं
भक्तपालका कलिमलहरका । वाडी स्थापका तव शरणं ।।७।।
स्वयंभू-सिद्धा तव शरणं । सावित्री वरदा तव शरणं
गोविंदनाथ हृदय निवासी । संचारस्थित तव शरणं ।।८।।
चिमड भजन प्रिय तव शरणं । दत्तात्रय मानस तव शरणं
श्री गोविंदप्रभू कीर्तनरूप । अखंड वरप्रद तव शरणं ।।९।।
जगद्‌गुरु श्री तव शरणं । नागनाथ श्री तव शरणं
उत्पत्ती स्थिती विनाशकर्ता । हालसिद्धनाथा तव शरणं ।।१०।।
चांगभला ध्वनी तव शरणं । नामरूप गुणी तव शरणं
अनंतरूपा भक्तस्वरूपा । भक्तिप्रदीपा तव शरणं ।।११।।
हालसिद्धण्णा तव शरणं । भवभय हरणा तव शरणं
मुनिजन मानस हंसपरात्पर । सुगंध सागर तव शरणं ।।१२।।
अंबिलतृप्ता तव शरणं । भंडारदीप्ता तव शरणं
भजन, ढोल, संकीर्तन प्राप्त । गोविंदानुज तव शरणं ।।१३।।

ईति श्री हालसिद्धनाथाष्टकं श्री दासरामविरचितं स्तोत्रं संपूर्ण ।

■ ■ ■



# गुरुभजन

गणाधीश जो ईश सर्वांगुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा
नमू शारदा मूळ चत्वार वाचा । गमू पंथ आनंत या राघवाचा ।।१।।
नारायणं नमस्कृत्य नरंचैव नरोत्तमं । देवीं सरस्वतीं व्यास ततो जयमुदिरयेत् ।।२।।
श्रूयतां देव देवेश नारायणं जगत्पते । त्वदीयनामध्यानेन कथयिष्ये शुभाः कथाः ।।३।।
ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्ति । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यं
एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षीभूतं । भावातीतं त्रिगुणरहितं सद्‌गुरु तन्नमामि ।।४।।
सद्‌गुरुनाथ माझे आई । मजला ठाव द्यावा पायी ।
*(याप्रमाणे १० वेळा म्हणावे)*

■ ■ ■

## पद

भज सद्‌गुरुराजं भज श्रीगुरुराजं ।
त्यज त्यज भवजंजालं मायागुणशीलं ।।धृ।।
सत्‌पद् चित्‌पद् रूपं अखिलानंद स्वरूपं ।
अगणित तेजो अनुपम् निरांजनदीपं ।।१।। भज....
दृष्टवादृश्यं व्योमं पीतं शुभ्रं ताम्रं ।
नीलं धवलं शामं अभिनवनवरंगम् ।।२।। भज....
गुप्तागुप्त स्वरूपं दृष्टवा नाशन पापं ।
हत्वां भवभयतापं श्रुतिगर्भित सोपं ।।३।। भज....
घंटा किणीकिणी नादं सिंहं शंखं नादं ।
भेर्यादिक महानादं अनुभव मन लुब्धं ।।४।। भज....
मुनिजन मानस हर्षं मायागुण आकर्षं ।
शोधनमार्ग शीर्षं तव पुराण पुरुषम् ।।५।। भज....
इतिस्तोत्रं पठ श्रुत्वां पावन दास जीवित्वं ।
पापं सर्व हत्वां भवभय नाशत्वम् ।।६।। भज....

■ ■ ■

## अभंग

आता फार काय बोलो तुम्हापुढे । पुढे कर्म झाले भोगणे ते ।
भोगणे ते स्वसुख उचित या जीवा । पुरवावी केशवा आस माझी ।।
माझी आंस तुम्ही करावी सफळ । आता उताविळ जीव झाला ।
झाला जीव कष्टी तुजवीण । झुरे पुरे आता पुढे गर्भवास ।।
गर्भवास माझा चुकवी बा दयाळा । विनवितो कृपाळा परीसा दासा ।।

■ ■ ■

## पद

सद्गुरू चित्घन तुजला । आलो शरण मी तारी मजला ।
जयगुरु, जयगुरू, जयगुरू जय । जयगुरु, जयगुरू, जयगुरू जय ।। धृ।।
श्रृति, स्मृति तुजला गाती । परिती आजवरी न होय पुरती । जयगुरु....।।१।।
शेष सहस्त्र मुखी वर्णिता । परि ती आजवरी न होय पुरता । जयगुरू ....।।२।।
पहा वागीश्वरी तुजस्तविती । परि ती आजवरी न होय पुरती । जयगुरू ....।।३।।
संत-सज्जनी वर्णियले बहू । ऐसा तूं एक देवाधिदेवू ।। जयगुरू ....।।४।।
पाहू जाता तुमचा अंत । न लागे म्हणूनी तुम्ही अनंत ।। जयगुरू....।।५।।
जाणूनि जे नर धरतील पंथ । ते ते झाले तवपदी संत । जयगुरू .... ।।६।।
साधकाचे पुरवूनि काम । तूचि सहज करिसी निष्काम ।। जयगुरू ....।।७।।
या दासा तव पदी प्रेमा । देवूनी करिसी मला उत्तमा ।। जयगुरू.... ।।८।।

■ ■ ■

## प्रार्थना

प्रार्थना ऐका माझी गुरुराया समर्था । त्रिभूवनी तूचि थोर
दीन जन उद्धरिता । प्रार्थना ऐका माझी ।।१।।
सद्बुद्धी दे मजला । दुर्बुद्धीचा वीट आला
कामादि वैरी वारी । करी निष्काम मजला ।। प्रार्थना.... ।।२।।
वासना मनी वसली । कधी निघेनाशी झाली
कोठवरी तिशी भांडू । मति माझी थकली ।। प्रार्थना.... ।।३।।
मोहमाया ममता भारी । गांजीताती परोपरी
यातून सोडवी बा । तूचि माझा कैवारी ।। प्रार्थना.... ।।४।।
निद्रा ही रांड खोटी । नित्य लागलीसे पाठी
आयुष्य व्यर्थ गेले । पाहो नेदी जगजेठी ।। प्रार्थना.... ।।५।।
देहभाव बहु खोटा । मज करूनि करंटा
देशोधडी लावियेले । अन्न न मिळे पोटा ।। प्रार्थना.... ।।६।।
ऐसे हे अनंत गुण । गांजिताती कठीण
यातून कोण मजला । सोडवी बा तुजवीण ।। प्रार्थना.... ।।७।।
प्रार्थना परिसावी । गुरुराया गोसावीं
दुर्गुण मारूनिया । देशी सायुज्ज पदवी ।। प्रार्थना.... ।।८।।
दासासि संरक्षा । कामधेनु कल्पवृक्षा
आपुले हे ब्रीद रक्षा । पुरवी माझी अपेक्षा ।। प्रार्थना.... ।।९।।

■ ■ ■



## अभंग

हेचि दान देई स्वामी । राहो नित्य मन नामी ।।१।।
तुझी सेवा अखंडीत । घडो रूपी जडो चित्त ।।२।।
अहर्निशी संतसंग । घडो मज हा प्रसंग ।।३।।
दुरितकानन दहन करा । पुण्यरूप वैश्वानरा ।।४।।
शिरी ठेवूनिया हात । दासा करिसी जीवनमुक्त ।।५।।
तूच माझी माता पिता । तूच माझी भगिनी भ्राता
तूजवीणे चित्ता नावडेचि दूसरे ।।६।।
तूच माझे कुलदैवत । तूच माझे गणगोत ।
तूच माझे वित्त । नावडेचि दूसरे ।।७।।
तूच माझे प्रेम सुख । तूच माझे निरसी दुःख़
तुजवीणे देख । नावडेचि दुसरे ।।८।।
तूच दासाचा सारथी । तूच माझी भागीरथी
तूजवीणे गुरुमूर्ती । नावडेचि दूसरे ।।९।।

■ ■ ■

## भजन

सद्गुरूनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी
(दहा वेळा म्हणणे)
जय मच्छिन्द्र गोरख कानिफनाथ । जालंधर भर्तरी रेवणनाथ ।।
गहिनी चर्पटी नागनाथ । घ्या पदरी या दीनानाथ ।।
(दहा वेळा म्हणणे)
दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा
(दहा वेळा म्हणणे)

■ ■ ■

मामांचे वडील कै. गोविंदपंत घोसरवाडकर यांच्या संचार अवस्थेत सांगितलेले भजन

बजरंग बजरंग भज रे मना । पुरवी भक्त कामना
शोधे राम अंगना । जंबुक मर्दना
लंकापूरी दहना । अशोकवन मर्दना
किष्किंधीशी जाशी राम दर्शना
सवें घेवून वालीवंदना
करशी रावण कंदना ।। बजरंग......।।१।।

■ ■ ■

## अभंग

मी तव अनाथ अपराधी। कर्महीन मतिमंद बुद्धी।
तुज म्या आठविले नाही कधी। कृपानिधी मायबाप ।।१।।
आकल्प आयुष्य व्हावे तयाकुळा। माझिया सकळा हरिच्या दासा ।।२।।
कल्पनेची बाधा न हो कोणे काळी। ही संतमंडळी सुखी असो ।।३।।
अहंकाराचा वारा न लागो राजसा। माझिया विष्णुदासा भाविकासी ।।४।।

नामा म्हणे तया असावे कल्याण। ज्या मुखी निधान पांडुरंगा ।।५।।
अचूक साधन साधो या गुरुकुला। तुझिया सकळा दासदासा ।।१।।
संकल्प विकल्प नुपजो यांचे चित्ती। ऐसे कृपामूर्ती करा वेगी ।।२।।
ज्यासी तुझी खूण लाधली असेल। तो पुन्हा न येईल गर्भवासा ।।३।।
हेचि तुझे ब्रीद सत्य करी देवा। शरणागत जीवा उद्धरावे ।।४।।
ऐसिया कृपेची भाकितो करूणा। उदार सद्‌गुरूराणा दान देई ।।५।।
एवढी विनवणी दासाची ही ऐका। पुढती देऊ नका गर्भवास ।।६।।

■ ■ ■

## गणपतीची आरती

सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची।
कंठी झळके माळ मुक्ताफळांची
जय देव जय देव जय मंगलमूर्ती
दर्शनमात्रे मन कामना पुरती ।। जय देव.... ।।धृ।।
रत्नखचित फरा तुज गौरीकुमरा।
चंदनाची उयी कुंकुमकेशरा
हिरेजडित मुगुट शोभेतो बरा।
रुणझुणती नुपुरें चरणी घागरिया ।। जय देव....।।१।।
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना
दास रामाचा वाट पाहे सदना।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावे सुरवरवंदना ।। जयदेव.... ।।२।।

■ ■ ■



## श्री दत्ताची आरती

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा। त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।
नेती नेती शब्द न ये अनुमाना। सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना।
जयदेव जयदेव जय श्री गुरुदत्ता। आरती ओवाळीतां हरली भचिंता ।।जयदेव।।धृ।।
सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त। अभाग्यासी कैची न कळे ही मात।
पराही परतली तेथे कैसा हेत। जन्ममरणाचा पुरलासे अंत ।। जय देव ।।१।।
दत्त येऊनिया उभा ठाकला। भावे साष्टांगे प्रणिपात केला।
प्रसन्न होऊनी आशिर्वाद दिधला। जन्म मरणाचा फेरा चुकविला ।।२।।
दत्त दत्त ऐसे लागले ध्यान। हरपले मन झाले उन्मन।
मी तूं पणाची झाली बोळवण। एका जनार्दनी श्रीगुरुदत्तध्यान ।।३।।

■ ■ ■

## सद्‌गुरुआरती

सुखसहिता दु:खरहिता निर्मळ एकांता। कलिमलदहना गहना स्वामी समर्था।
न कळे ब्रह्मादिका अंत अनंता। तो आम्हा सुलभ तू जय कृपावंता।
जय देव जय देव जय करुणाकरा। आरती ओवाळू सद्‌गुरु माहेरा ।।जय देव।।१।।
मायेविण माहेर विश्रांती ठाव। शब्दी अर्थी लाभ बोलणे भाव।
सद्‌गुरु प्रसाद सुलभ उपाय। रामी रामदासा फळला सद्‌भाव ।।जय देव ।।२।।

■ ■ ■

## श्री मल्हारीची आरती

पंचानन हयवाहन सुरभूषितनीळा। खंडामंडित दंडित दानव अवलीळा
मणिमल्लां मर्दुनिया जो धूसर पिवळा। हिरेकंकण बासिंगे सुमनांच्या माळा ।।१।।
जय देव जय देव जय शिव मल्हारी। वारी दुर्जन असुरां भव दुस्तर तारी ।।धृ ।।
सुखर संवर वर दे मज लागी देवा। नाना नामे गाईन हीं तुमची सेवा
अघटित गुण गावया वाटतसे हेवा। फणिवर शिणला ते किती नर पामर केवा ।।२।।
रघुवरनामस्मरणी शंकर हृदयी नीवाला। तो हा मल्लांतक अवतार झाला
यालागी आवडे भावे वर्णिला। रामी रामदासा जिवलग भेटला ।।३।।

■ ■ ■

# श्री हालसिद्धनाथांची आरती

आरती सिद्धनाथा । ओवाळिती समर्था
आरती सिद्धनाथा
कफनी घोंगडीशी । तुजवरी हौसेची
बससी पांघरूनी । विकलासी निजभक्ता ।।
आरती सिद्धनाथा... ।।१।।
तिन्ही काळी पूजा घेशी । हुडकिशी नच मंत्रा
भजना भुललासी । भुकेलासी तूं आता ।।
आरती सिद्धनाथा... ।।२।।
धूप दीप उपचारा । उधळिसी भंडारा
देवा तुझा चांगभला । आण्णाशी शिकविता ।।
आरती सिद्धनाथा... ।।३।।

■ ■ ■

आरती गोविंदा । हालसिद्धप्पा मुखी सदा ।
संचार होय अंगी । नुरवी भक्तांची अपदा ।।
आरती गोविंदा ।।१।।
सिद्धांची आज्ञा होता । आपण चिमडासी आला ।
नारायण महाराजे । हस्त मस्तकी ठेविला ।।
आरती गोविंदा ।।२।।
नित्य चाले पंचपदी । वृत्ती मुरे आनंदी ।
भंडारा हाती येता । नाचतसे ब्रह्मानंदी ।।
आरती गोविंदा ।।३।।
आप्पाचीवाडी तैसी । घोसरवाडी महायात्रा ।
दासराम आठविता । सुख होय सर्वत्रा ।
आरती गोविंदा ।।४।।

*– राम गोविंद केळकर*

■ ■ ■



*(प. पू. रामराय गोविंद केळकर महाराज कृत)*

आरती हालसिद्धा । पूर्ण काम प्रसिद्धा ।
स्वात्मबोध भंडारा हा । भुलसी सोऽहं ढोल नादा ।। धृ ।।
सावित्री सेवेसाठी । घोसरवाडी साकारला ।
गोविंदनाथ हृदयी । संचरोनी राहीला ।।१।।
आप्पाचेवाडी माजी । पंढरीची भीमाई ।
पांडुरंग पाठविली । भली भक्ती नवाई ।।२।।
अपूर्व भाकणूक । करी अधिकारी लीळा ।
मानकरी खेळती ते । थोर पालखी सोहळा ।।३।।
अंबील तृप्त देवा । तुझा मंत्र चांगभला ।
अपार पुण्यराशी । दत्त नामी रंगला ।।४।।
चिमड भजनप्रिय । रामपाठ कीर्तन ।
गोविंद सुत रामा । आशिर्वादे आली खूण ।।५।।

■ ■ ■

जय जय श्री हलसिद्धा । विश्वाचा तू त्राता ।
नाना रूपा धरूनी । होशी वरदाऽता ।।धृ।।
तूं धरला नाथपंथ । तारीलेस जन अनंत ।
कर्मभोग जाय विरून । पूजिताच पद्म चरण ।
तारक होशी तूचि । आम्हा भगवंता ।।१।।
घोसरवाडी जात जात । सावित्रीच्या फल तपास ।
बालरूप धरून खास । पूर्ण करी मनोरथास ।
गुप्त होशी त्या पळास भाव संपदा ।।२।।
विप्राचा वंश वृक्ष । शापाचा होता भक्ष्य
डंवरूनि ये पान पान । घडताचि सुधा स्नान
नाथपदी लीन होय । कर्म वारितां ।।३।।
अश्विनी त्या पौर्णिमेस । रोहिणीच्या नक्षत्रास ।
अग्रहक्क गोविंदास । भाक दिली धनगरास ।
नाद ब्रह्म ये भरास भक्ती रंगता ।।४।।
दत्त शिष्य हे महान । आपणती योग ज्ञान ।
भक्तीचे करूनि पान । मंत्र दिला 'अन्नदान'
सर्व सिद्धी होय लाभ मंत्र पाळिता ।।५।।

■ ■ ■

*– मधुसूदन शिपूरकर*

# श्री लक्ष्मीची आरती

लक्ष्मी आली, तिची कृपा आम्हांवर झाली ।।धृ।।

रत्नजडित तो मुकुट शीरावर । कर्णकुंडले तळपती कानी ।
नथन शोभति ते कमलापरि । कुंकुम भाळी ।
तिची कृपा आम्हावर झाली ।।१।।

इंदुवदन बिंबाधर सुंदर । कुंदन मंदः स्मित मुखावर
भक्तांसाठी अभय वर कर । सन्निध ठेऽऽवि ।
तिची कृपा आम्हावर झाली ।।२।।

केस मोकळे स्कंधावरति । हरिण कंचुका भुजा शोभति ।
हरिप्रिया पितांबर विभुति । कृपा वेल्हाळी
तिची कृपा आम्हावर झाली ।।३।।

सभक्त शत्रु ते निर्धारी । चिंता गेली भीति हरवली ।
आनंदे ही सृष्टि कोंदीली । करी दिवाऽऽळी ।
तिची कृपा आम्हांवर झाली ।।४।।

धरूनि हाती सुवर्णकलशा । नवरत्ने ही होती गर्गशा ।
सिंहवाहिनी माता सरसा । सदैव वेल्हाळी ।
तिची कृपा आम्हावर झाली ।।५।।

वैकुंठीचिया हरिची राणी । जगदंबा ही कृपा रूक्मिणी ।
असे जनाच्या मनी सांजणी । आज हो कळली ।
तिची कृपा आम्हावर झाली ।।६।।

संत साधुजन गाती नाचती । ओवाळुनिया मंगल आरती ।
आसन्न किंवा ना नच गणती । तहान-भूक निवाऽऽरी ।
तिची कृपा आम्हांवर झाली ।।७।।

द्दष्ट चराचर व्यापुनि ठेवि । भक्तांसाठी सगुण जाहली
दिगंबराच्या दासा कळली । निज कुल कमळी ।
तिची कृपा आम्हांवर झाली ।।८।।

■ ■ ■



# श्री जगदंबेची आरती

प्रथम मुळारंभा घटशोभा तोरण मकरस्तंभा ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।१।।
दुसरी मूळ माया सुखदाया, वंदिन मस्तकी पाया ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।२।।
लोकत्रय छंदा आनंदा, ध्याती मानस वृन्दा ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।३।।
चौथीही पूजा तुज ओजा, ओवाळिन सुख काजा ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।४।।
पंचारती पायी तुज आई, सुंदर अंबाबाई ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।५।।
षड्गुण संपन्ना अन्नपूर्णा, देवी मंगल सदना ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।६।।
सप्तच्छद मौली तुज बाळी नाना वाद्य रसाळी ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।७।।
भाव भरे आट सुखदाट, वृन्दावन मूळपीठ ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।८।।
नवदिन नवरात्र शिवस्त्रोत्र, स्थापिती मंगलमंत्र ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।९।।
दास कदा आस तुज ध्यायी, कुलदेवी मूळमाई ।
आरती तुज अंबे जगदंबे तारक विश्व कुटुंबे । जय जय जगदंबे ।।१०।।

■ ■ ■

## श्री ज्योतिबाची आरती

भागिरथी तुलसीतल हिमाचलवासी। न लगत पल खल दुर्जन संहारी त्यासी।
तो हा हिमकेदार करवीरापाशी। रत्नागिरीवर शोभे कैवल्यराशी।
जय देव जय देव जय जय केदारा। दासा संकट वारा भवभय नीवारा।
जय देव जय देव ॥१॥
उत्तरीचा देव दक्षिणी आला। दक्षिण केदार नाम पावला।
रत्नासूर मर्दून भक्त रक्षिला। दास म्हणे थोर भाग्य लाधला।
जय देव जय देव जय जय केदारा। दासा संकट वारा भवभय नीवारा।
जय देव जय देव ॥२॥

■ ■ ■

## श्री हालसिद्धराजा आरती

जय देव जय देव जय हालसिद्धराजा
घ्यावी भक्ता हातून त्रिकालीच्या पूजा ॥धृ॥
वाजत शिंगे झांजा आणि ढोल
स्नाना पाणी आणि करूनि अंघोळ
घेई पूजा करूनि घालू नको घोळ
ऊठ सावित्री म्हणते भक्ता सांभाळ ॥१॥
घेई धूपदीप आदी फुल गंध
नैवेद्याला तुजला आवडते दूध
ऐहिक सुख इच्छिती भक्त मतिमंद
या युगिचे आर्तांना हा आहे छंद ॥२॥
ठक ठाकूर चोर मागतिते द्यावे
नाही ऐसा धर्म तुज आहे ठावे
सुबुद्धी देऊनि त्यांना मार्गी लावावे
धर्मपालन कार्य तेचि करवावे ॥३॥
हालसिद्ध महाराजा भक्ती राखावी
कार्ये त्यांची करूनी कीर्ति उरवावी
आण्णाला मति देऊनि स्तोत्रे करवावी
गोविंदाची विनंती येवढी मानावी ॥४॥

■ ■ ■



## अष्टक

भूमि आप तेज वायू व्योम तूचि निर्मिसी
चंद्र-सूर्य वर्ततात्ति तूचि त्यासी रक्षिसी
धरामरा सुरासुरा तू निर्मिसी चराचरा
नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा ॥१॥
निरंजना जनावना तू दिसतोसी लोचना
आता तुला मी प्रार्थितो दयानिधे तू घे मना
काम प्रोध गांजिती तया आधीच [illegible]हारा ॥२॥
वेद-शास्त्र वर्णिती तुम्हासि हो ज[illegible]पती
पुराण सर्व बोलती न जाय कोण दुर्गती
पुराणपुरुष तू खरा तुम्हाविणे न दुसरा ॥३॥
पुष्कळासि पावलासि म्हणूनी कर्णी ऐकिले
तसे मला तू पावसील म्हणोनि हे आरंभिले
आता प्रभू कृपाळू व्हा ब्रिदावळी खरी करा ॥४॥
चकोरचंद्र न्याहाळिला तसा मी लक्षितो तुला
अहो कृपाधना मला तू म्हणविसी की आपुला
येई येई ईश्वरा तुम्हासी पाहू द्या जरा ॥५॥
विनवितो तुलाच मी मला नको तू विसरू
कल्पवृक्ष कामधेनु माय तू मी लेकरू
धरा मला की पोटशी जशी ती माय लेकरा ॥६॥
काळ मला ग्रासितो तया हाती नका देऊ
अहोजी प्राणनायका नका मला दगा देऊ
तुझी आस धरूनी खास बैसलो हाती धरा ॥७॥
राम हा आराम फार म्हणूनी होसी आळसी
मग कसा मी येईन हो शेवटी तुम्हापाशी
नका उशीर लावू बा तू झडकरी करी त्वरा
नमो नमो दिगंबरा प्रकाशरूप सुंदरा ॥८॥

■ ■ ■

## पद

माझी प्रार्थना ऐका प्रभुजी हे मम प्राणेश्वरा
तुमच्या मनास येईल ते करा ।।धृ ।।
तुझा दास मी होऊनि तवपदी केले जेव्हा अर्पण।
तन, मन, धन आणि ते मी पण ।।
तेव्हापासुनि सर्व तुझे हे जाया आणि गृह धन।
मजकडे काय तुम्हा आधिन ।।
आता तुम्हाला कळेल ते करा नाही दुजा आसरा
पतित मी पावन मजला करा ।। माझी प्रार्थना ।।१।।
नाही तुम्हाला मागत काही नका दडू भगवंता।
तुम्हावरती माझी सत्ता ।।
काय उणे तुजपाशी देवा सर्वांशी पाळीता।
देसी आपणचि न मागता ।।
तुमचे तुम्ही विचार करूनि हवे तसे पुढे करा।
मजला आठवा की विसरा ।। माझी प्रार्थना ।।२।।
येथे माझे कांहीच नाही निश्चय मम अंतरी।
म्हणूनिया आलो, तुमचे द्वारी ।।
नका मला हो आणिक काही येवढे द्या झडकरी।
दासा दर्शन वरचेवरी ।।
काय करू मी कांही कळेना, हीन, दीन हाती धरा।
भवचक्रातुनि पार करा ।। माझी प्रार्थना ।।

■ ■ ■

## धावा

विनवितो तुला दीन होऊनी। पावसी मला ध्यास निशिदिनी ।।
निशिदिनी मला शत्रू गांजिती। धाव धाव बा भक्तसारथी ।।
धाव धाव बा विश्वपालना। धाव धाव बा भय निवारणा ।।
धाव धाव बा भक्तरक्षणा। धाव धाव बा धाव निर्गुना ।।

■ ■ ■



## अष्टक

पायी तुझ्या मस्तक हे असावे। नयनी तुझे रूप सदा वसावे
तुझे चरित्र श्रवणी श्रवणास द्यावे। श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे
वाणीस हे अतुलनाम तुझे घडो दे। ध्यानी तुझ्या मन सदैव बरे जडो दे
पाणीस पूजन तुझे विधियुक्त व्हावे ।। श्रीनाथजी ।।१।।
हे चित्त निश्चल तुझ्या भजनी वळावे। दुर्गुण दु:संगती ना तळावे
अज्ञान मोह कुमती सखया हरावे ।। श्रीनाथजी ।।२।।
पायी अमंगल पथा पथी न क्रमावे। यात्रा शिवालय कथा पथ आचरावे
क्रोधादि काम रिपु हे समुळी गळावे ।। श्रीनाथजी ।।३।।
वाचे सहीत मन देह वळोनी मार्गे। भक्तीस लावी आपुल्या दृढ हेचि मागे
बाह्यांतरी अचल रूप तुझे भरावे ।। श्रीनाथजी ।।४।।
ब्रह्मस्व मुक्त करणे तुजभार पायी। घालू नको मजदीना भलत्या अपायी
आहे पतीत सखया दीन उद्धरावे ।। श्रीनाथजी ।।५।।
परमार्थ साधोनि प्रपंच बरवा असावा। दारिद्र्य दु:ख भयेलश कदा नसावा
स्त्रीपुत्रयुक्त कमला सुख हे असावे ।। श्रीनाथजी ।।६।।
पायी ब्रिदावळी विराजित पावना की। धावे भक्तांचे संकट हे हरावयाकी
राखे ब्रिदासी भवसंकट हे हरावे ।। श्रीनाथजी ।।७।।
हे नाथजी शिवजगद्‌गुरु हालसिद्धा। दे जन्मजासी तवभक्ती तया कुलीगा
गोविंद नंदन सुतांतर कीं न द्यावे ।। श्रीनाथजी ।।८।।

■ ■ ■

## पद

काय तुझ्या सेवेला चुकलो सांग मला गुरुराया रे ।।धृ।।
मतिहीन मी काही न जाणे भक्ती, बुद्धि नाही रे
सर्व जाण तू मनीचा आशय करुणाकर तू पाही रे ।।१।।
धुंदी झाली तव दरबारी दाद माझी लागे ना रे।
कोठवर ओरड कोण पुसेना भिक्षा न मिळे द्वारी रे ।।२।।
दाता तू जरी देशील तरी दे ना कोठे न मिळे रे
दास तुझा आशेने झुरतो काय तमाशा पाहसी रे ।।३।।

■ ■ ■

# शेजारती

भक्तिमार्ग वाढवूनिया हरिला भूभार। स्वामी हरिला भूभार
तेणें तुम्हां सद्‌गुरुराया शिण झाला फार ।।१।।
म्हणवूनि वेगी वेग करूनि निरंजनी निजा। स्वामी निरंजनी निजा
विश्रांती घेऊनि उठावे भक्तांच्या काजा ।।२।।
अन्न गंध, पत्र पुष्प धूपदीपादी। स्वामी धूपदीपादी
स्वीकारावे देवा नंतर घ्यावी समाधी ।।३।।
नामामृत रसनेलागी देवुनि गुरुराया। स्वामी देऊनी गुरुराया
उशीरा लावू नका गोविंद विडा घ्या सखया ।।४।।
आता सुखे निद्रा तुम्हीं करावी धननीळा। स्वामी करावी घननीळा
पुरले मनोरथ असते आपुल्या स्थळा ।।५।।
दास सदा सन्मुख पाहुनि करीतसे वो जा। स्वामी करीतसे वो जा
सुखे सुखरूप निजी निजा महाराजा ।।६।।

■ ■ ■

निद्रा भ्रमयोगी हालसिद्धा। बैसुनि अनादि सिद्धा।
पिसी सतरावी ज्ञानसुधा। वास्तव्याते बहुधा।
भूता देऊनिया लयउद्धा। साक्षीरूपे सिद्धा ।। निद्रा ।।
गरला ओकुनिया। जी दावी
आपली तृप्ती बरवी
प्रेमे सेवितसे, शांभविला। द्याया अलींगन तुजला ।। निद्रा ।।
सदैव जागृतजी। कुंडलिनी
जी हो प्रताप तरणी। समाधी मोक्षाची संजीवनी
विद्या षोडश ध्यानी ।। निद्रा ।।
दुष्टा संहरणा। बुधपाला, धर्मा दे जागृतीला
हरयुगी येसी तू उदयाला। नाथा दीन दयाळा ।। निद्रा ।।
पाजी निजबाळा। जगपाला, ज्ञानामृतमय प्याला
गणपतीसुत प्रार्थी भो तुजला
दावी निजपदयुगुला ।। निद्रा ।।

■ ■ ■



# श्लोक

ज्या ज्या स्थळी हे मन जाय माझे। त्या त्या स्थळी हें निजरूप तुझे।
मी ठेवितो मस्तक ज्या ठिकाणी। तेथे तुझे सद्‌गुरु पाय दोन्ही ।।
जय जय रघुवीर समर्थ। राजाधिराज सद्‌गुरुनाथ महाराज की जय

हालसिद्धनामे हृदयी निवाला। नारायणी पूर्ण रंगोनी गेला।
भजनामृते जो स्वयमेव झाला। नमस्कार गोविंद प्रभुराजयाला ।।

संत पूजा ज्याचे घरी। तेथे विठ्ठलाची फेरी
संत पूजेचे महिमान। ब्रह्मा, विष्णू येती शरण
संत पूजा ज्याने केली। फेरी काळाची चुकविली
तुका म्हणे संतपूजा। बहू आवडे गुरुडध्वजा

पाहे प्रसादाची वाट। द्यावे धुवोनिया ताट ।।
शेष घेवून जाईन। तुमचे झालिया भोजन ।।
झालो एकसवा। तुम्हा आडुनिया देवा ।।
तुका म्हणे चित्त। करोनि राहिलो निवांत ।।

सर्वे सुखिनः सन्तु। सर्वे सन्तु निरामयः ।।
सर्वे भद्राणि पश्यन्तु। मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।।

दुरितांचे तिमिर जावो विश्व स्वधर्म सूर्ये पाहो।
जो जे वांछिल तो ते लाहो प्राणीजात।
सुखिनः सन्तु सर्वेत्र सर्वेत्र सर्वेत्र

■ ■ ■

# पद

अजि सगुण स्वरूप म्या पाहिले ।।धृ।।
नंदकुमारा कंस चाणुरा, अवतारिया मारिले ।।१।।
यमुना विपिनी गोप मिळोनी दधि नवनीत म्या भक्षिले ।।२।।
लक्ष्मीकान्ता, हे रमासुता, दधि अमृत मज पाजिले ।।३।।

■ ■ ■

अमृत आले रसाळ होण्या जिव्हेच्या संगती
चालल्या नाथा घरी पंगती ।।धृ ।।
ऋद्धिसिद्धी आल्या उतरून
मुक्त करांनी करिती उधळण
उणेपणाचे नांव न उरते नाथांच्या जगती ।।१।।
पक्वानांचा नसे हो बेत
नैवेद्या ते पायस, भात
उच्छिष्टांच्या लाभाकरीतां देव बघा थांबती ।।२।।
नामाचा तो दुमदुमे गजर
स्वर्गी पोहोचला त्याचाही स्वर
स्वर्गासंगे नारद तुंबर आनंदे डोलती ।।३।।
भजनांच्या या हलकल्लोळी
निष्ठांची ती मांदियाळी
रंगुनी जाता सुखदुःखांची जाहली विस्मृती ।।४।।
त्रिविध असे हो ईशसाधना
कुणी आपणती योगा ज्ञाना
भक्तीसाठी निर्गुण घेई, मनातली आकृती ।।५।।
मना लागता छंद आगळा
भक्त न राहे दुजा वेगळा
कोटी-कोटी जपा-तपांची मिळे त्या अनुभूती ।।६।। ■ ■ ■

*- मधुसूदन शिपूरकर*

## साधका ! समजुनी घे हा पंथ

साधका ! समजुनी घे हा पंथ
मोक्षाची ही नाही लालसा, मरणाची ना खंत ।।धृ।।
'पिण्डे पिण्डांचा ग्रासु
तो हा नाथ संकेतुचा डंसु'
दावुनि गेली ज्ञानमाऊली स्तिमित केले संत ।।१।।
पिंडाची ही जाणूनी सृष्टी
लयास नेणे पिण्डच व्येष्टी
आत्मरूप तो होई साधक, मरण जिंकतो संथ ।।२।।
पृथ्वी, पाणी विलग करूनी



कर्पुरसे हा जाई विरूनी
बघता बघता विलय पावतो, उरती कुठले बंध ? ।।३।।
योगमार्ग कुणी आपणती
ज्ञान-भक्तीने 'ब्रह्म' कवळती
तिन्ही शक्ती 'बद्ध अंजुली' बांधुनी घेता कंथ ।।४।।
नाथांची ती घडता सेवा
आविष्कार तो परिणत व्हावा
संचाराने जागृत होते, कुंडलिनी जगदंब ।।५।।
'भाक' कसली ही तूर्यावस्था
भाकणूक ना ही भृगुसंहिता
भोळ्या भावा वाचुन दावी, भविष्य ग्रंथीचा स्कंद ।।६।।
सामतत्वसे ढोल बोलती
नाथांचे ते नामच गाती
भक्तीरूपे एकरूपते घेती ब्रह्मानंद ।।७।। ■ ■ ■

*- मधुसूदन शिपूरकर*

## असा हा नाथांचा दरबार

असा हा नाथांचा दरबार
देवांनाही वाटे हेवा आठव वारंवार ।।धृ।।
अश्विनीच्या त्या भौम पौर्णिमी
स्वर्गसौख्य ते येई धामी
पालखीतल्या सिंहासनी ते बसले सर्वाधार ।।१।।
भक्त कुणी रे चवऱ्या ढाळी
ढोल-वादकां लागे समाधी
छत्र्यांची ती होतां दाटी, माध्यान्ही अंधार ।।२।।
मानकरी ते पालखी धरती
सौख्याला त्या सीमा नसती
बेहोषी ते उन्मनी होवूनी करती जयजयकार ।।३।।

शिंग फुंकता पालखी चाले
एक अनामिक सूत्रच हाले
भक्तीसाठी 'ब्रह्मच' आले लेवुनिया आकार ।।४।।
मार्गावर अवतीभवती
स्वये बाहती 'रमा', 'पार्वती'
वाटेवरती थांबुनिया करी भक्तीचा स्वीकार ।।५।।
देवमणी तो अश्व देखणा
नाचत घाली स्वये प्रदक्षिणा
डौलत, मुरडत, खिंकाळत करी तालवर संचार ।।६।।
सदरेवरती स्थापित मूर्ति
समूर्त झाली जणू उगवती
रविचंद्रानी जणू घेतला डोळ्यांचा आधार ।।७।।
बोलामधूनी 'नाद' बोलतो
'सोऽहम् सोऽहम्' मंत्र चालतो
ज्ञान-त्रिपुटी होई हिंपुटी, हा त्यांचा अधिकार ।।८।।
घंटानादे शांत घोळका
संचाराची 'स्वार' मालिका
देह वाहिला अवघा श्रीपदीं ऐसे हे इरगार ।।९।।
भान हरपले भक्तजनांचे
ब्रह्मपदी शिवकळा ती नाचे
मानपरत्वे गुंड खेळती, पोटी सुखे तलवार ।।१०।।
वाघापूरचा भक्त शिरोमणी
उर्ध्वमुख त्याची कुंडलिनी
दिक्कालाच्या पल्याड नेई प्रीतिचा पडिभार ।।११।।
भंडारा तो भाळी फासुनी
जाती-भेद ते टाकी पुसुनी
समतेची ती ध्वजा धरुनि, करि धर्मग्लानी संहार ।।१२।। ■ ■ ■

*- म. शं. शिपूरकर*



# श्रीरामा जयरामा

श्रीरामा जयरामा जयजयरामा । वेदविधी शिव तुझ्या स्तविती नामा ।।धृ।।
जन्मुनीया रघुवीर रवीकुल भूषविले । खर मर्कट मुख ताटीयचे प्रति संहरीले ।
ब्रह्मसुता स्वपदाब्धे वनी उद्धरीले । त्र्यंबककार्मुक भंगुनी महिजे वरीले ।।१।।
ताताज्ञा प्रति पाळुनिया मग जाय वना । संगे घेऊनी सीता सह लक्ष्मणा ।
शत्रुघ्न भरताच्या त्या अनुताप मना । त्या शोके अज नंदन पावे निधना ।।२।।
वाली मर्दूनी सुग्रीवा प्रति दे रमणी । मेळविली बहू तेणे कपीलेस वनी
धाडूनी मारूती शोधे त्रिभुवन जननी । जाळूनी लंका पुच्छे विजयी भुवनी ।।३।।
बांधुनी सेतु सत्वर मग जलधी तरला । मर्दुनी रावण आणि आपुली अबला
भक्त विभिषण भावे पदी स्थापियला । घेऊनी शीघ्र अयोध्ये विजयी झाला ।।४।।
पाठकरी अथवा इतुके जो नर ऐके । श्रीरामायण सुंदर शतकोटी निके ।
श्रवण जयाला घडले, वाल्मीक मुखे । आनंदात्मज कथितो देहस्वात्मसुखे ।।५।।

■ ■ ■

# श्री सद्‌गुरु प्रार्थना

येई येई बा गुरुनाथा । घ्या मज पदरी आता ।।धृ।।
समर्थ महाराया गुरुराया । माऊली तुचि सखया ।
अन्वर्थक शब्दी आळवाया । बुद्धी नाही सदया ।।१।।
घोसरवाडीचा सिद्धाचा । भक्त चिमाजी त्याचा ।
बालकं गोविंद नाथाचा । सेवक हालसिद्धाचा ।।२।।
म्हणूनी हालसिद्धनाथांनी । पदरी तुझ्या घालोनी ।
मार्गा लावियला तुजकडूनी । उपदेशा देवोनी ।।३।।
पात्रे चात्वाली रक्षावी । जगी कामा ती घ्यावी ।
तुमची रीत अशी ही बरवी । लोक ती बोधावी ।।४।।
विनवी शिष्य म्हणे सद्‌गुरुने । शुचि माझी मंत्राने ।
झाली अनुतापे शुद्ध मने । आता पूजा घेणे ।।५।।
जगदोद्धाराच्या कार्यासी । नाना रूपा धरिसी ।
अनंत रूपे बा तुजपासी । सीमा नच ध्यानासी ।।६।।
यास्तव आळवितो मी नमुनी । हृत्कमली बैसोनी ।
या दासा करवी शांतपणी । घ्यावी पूजा करूनी ।।७।।
तू यरगट्टीकर कुलभुषणा । बापा नारायणा ।
शिष्या गोविंदा हा चिमणा । स्तवितो तुजला आण्णा ।।८।। ■ ■ ■

हालसिद्धेश्वर रेवणनाथचि रुप दिसे भपक्यापरीचे ।
धारणभूषण भार जटेवर रत्नखडे मुकुटावरचे ।
भाल विशालचि तोंडही गौरचि दात शुभ्रची नाक शुका ।
दृष्टिच लांबट केसही पिंगट भोवई कोरीव गाल सुका ।।१।।
मान भरीवची लांबट हातची रूंदट हाडचि मनगटीचे ।
छातीच रुंदचि कंबर बारीक पोट दिसे सडपातळीचे ।
तंगचि कौपिन रंगीत सुंदर पळस फुलासचि लाजविते ।
मांडी दिसे भर जानुत घोटिव खोट तरी धरी गोलची ते ।
पाऊल पद्महि चाहूल दावित सेवक भ्रांतीस घालविते ।।२।।
धारण भस्मचि माळ मणी खुप गुंफीयले जणू रत्न तसे ।
सादृश शैलीस हारचि भावित शिंगीच वाजत गात असे ।
गोधडी आवडी फावडी लाकडी फाकडी कुबडी घे कफनी ।।३।।
प्रेमळ भक्तची घालिती लिंगही गोविंद दे स्मृती 'मोरू' मनी ।। 'मोरू' मनी
जय जय चमस अवतार, अयोनि संभव रेवणनाथ, हालसिद्धनामधर
भागवत धर्म प्रकाशक भक्तिमार्ग संस्थापक
जय जय जाति धर्म, कुल धर्म, दृढोपासना प्रतिपालक तुजप्रत
नमस्कार असो । चांगभला, चांगभला, चांगभला ।।४।।
पायी तुझ्या मिठी घालूनी मागत सांग कुठे नच थांग मला ।
ओटीत घेऊनी रेटीत ने मज घाबरते मति फार तिला ।
कोणी नसे तुज दीन असा जन मीन जलाविण आढळला ।
पूर्वीच सेवक खास नसे पण आजचि शिष्य बनीव मला ।।५।।
जय जय शिष्य पालनैक चतुर, जय जय मुत्तीमार्गदर्शक, जयजय
चरणसेवा प्रदायक, सांप्रदायक दर्शक परंपराग्रहणधारण समर्थ,
शिष्य संदेह हारक श्रीमद् सद्गुरु नमस्ते, नमस्ते, नमस्ते ।।

■ ■ ■

## शिवहर शंकर

शिवहर शंकर नमामि शंकर शिव शंकर शंभो ।
हे गिरिजापती भवनी शंकर शिव शंकर शंभो ।।धृ ।।
सिद्धीदाता बुद्धिदाता मोक्षदाता ईश्वरा
सुरवर सैंवर दंगची होती ऐकूनी तुझ्या दत्तवरा ।।१।।



नंदिवाहना नागभूषणा राजीव नयना शंकरा
पार्वतीरमणा कल्मशदहना गणपती ताता उमावरा ।।२।।
पार्वतीच्या भिल्लीणरूपा वेडा होसी त्रिपुरारी
त्रिनेत्र उघडुनी काम जाळीला नाम पावसी मदनारि ।।३।।
त्रिपुरांतक त्रिपुरारी त्र्यंबका त्रितापशमना चूडामणी
शोभे अंक मृडानी ।।४।।
नामस्मरणे शिवची केले बाण रावण चंडिशा
श्रृंगी भृंगी जटालयासी तेवीच केले जगदीशा ।।५।।
नाचे ब्रह्मा, नाचे विष्णु धरूनी रूपा अतिसुकुमार
नारद नाचे तुंबर नाचे ब्रह्म्याचे सप्तकुमार ।।६।।
विघ्नहराचा मृदंग बोले बम् बम् बम्
शंभो तुझा डमरू बोले शिवोऽहम् शिवोहम् ।।७।।
विघ्नहराचा मृदंग बोले किम् किम् किम् किम् ।
शंभो तुझा डमरू बोले शिवोऽहम् शिवोहम् ।।८।।
शिवहर शंकर सांब सदाशिव शिवशंकर शंभो
हे गिरिजापती भवानी शंकर शिवशंकर शंभो ।।९।।

■ ■ ■

## स्मरे नाथासी

स्मरे नाथासी कलिकाला सचि तो नाशी ।।धृ।।
हिंडत आले गावा विटया, 'अलख' म्हणोनी गाजवी मोठ्या
सरस्वती ब्राह्मण ऐके गोठ्या । जात दारासी ।।१।।
सात अपत्ये त्यासी झाली, बारशाआधी सहा मेली
सातव्या बारशा मंडळी जमली । समारंभासी ।।२।।
सुवर्णकांती भव्यची मूर्ती, ठेवूनी डोकी पायावरती
भिक्षा घ्यावी माझे हाती । धरी प्रेमासी ।।३।।
वाढूनी अन्ने ताटा आणि स्वत: भरवी पाजवी पाणी
विनवूनी निजवी डाव्या शयनी । हालसिद्धासी ।।४।।
सारूनी घेतो विधी रात्रीचा, सेवक बनला हालसिद्धाचा
गोविंदा तो डुलतची साचा । रक्षि आण्णासी ।।५।।

■ ■ ■

दीन नित्राण पणित्राण, श्री ठाई निर्वाण, सत्धर्म स्वातंत्र्य
ही आज वाण ।।धृ।।
पार्था प्रतिबोध बा धर्मग्लानी। होताची ती हो धरही निशाणी
बोला प्रतिपाल ब्रिदाची आण ।।१।।
विश्वासहानी, विश्वासहानी, वाटे जणू त्या महावसानी,
लिंगोदरी लीन हे पंचप्राण ।।२।।
साकार अवतार संहार भूभार
ये तार ये तार दे हेचि दान ।।३।।

■ ■ ■

## रेवणनाथा प्रेम वाढवा

रेवणनाथा प्रेम वाढवा भक्त जनाचे हेतु पुरवा
सत्यवती सुत ज्यासी वर्णती। पद्ये रचिली नवरस भरूनी
नाहीच झाली शांती मनाला। पाझर नाही भक्ती रसाला ।।१।।
भागवती तो सुटला पुरता। भवनारायण यासी वर्णिता
अवताराया आज्ञा देई। चमसाचा तू रेवण होई ।।२।।
काडसिद्ध कोणी तुजला म्हणती। हालसिद्धही प्रेमळ भक्ती
चिमाजी सुत बहु तुज आळविती। अण्णाकरवी कीर्ति तव ही ।।३।।

■ ■ ■

## नाथ घरी आले

नाथ घरी आले, कृपा आम्हावर झाली ।।धृ।।
भव्य दिव्य हें रूप मनोहर
जटाजूट हा मुकुटही सुंदर
विशालभाळी, वदन सुधाकर
अमृतवृष्टी झाली ।।१।।
नाक शुकाचे, कुंदर द्युती
कूर्म दृष्टी ती पुरवि अर्ती
भुवई कोरीव, पिंगट केशीं
आभा आगळी दिसली ।।२।।
तीन वळे ती कंधुरावरती
'त्रिगुणातीत' हें म्हणून सांगती
आजानुबाहु लांबुनि दिसती
मनगटी गोलाई भरली ।।३।।
सिंहकटी ती विशाल छाती

■ ■ ■



'करूणा' भरली पातळ पोटी
रंगिन कौपिनी, अंगी थाटी
जणूं पळसफुले ल्याली ।।४।।
मांसल भांडी, डौलदार तनु
समचरणावर घोटीव जानु
अभय देती दोन्हीकर जणूं
दिसली भक्तांची माऊली ।।५।।
शूलीश्रृंगी पाठी लाविली
हाती कमंडलु फावडी धरली
छातीवरती कंथा विणली
शाबरी अवतरली ।।६।।
पीतवर्ण तो गुरुतत्वाचा
वेदमंत्र हा नाथपथाचा
भंडारा हा गुण हो त्याचा
त्रिसाधना माहेरा आली ।।७।।
अज नव्हे, अयोनिसंभव
'शिवरूप' हा तरीही वैष्णव
'मक्का' 'काशी' यांचे वास्तव
नाथांचे पाऊली ।।८।।

■ ■ ■

## आरती

आरती शिवशंकरा। तुझ्या हाती भंडारा।
हालसिद्ध नाम घोषे। होसी सकळा सोयरा ।।धृ ।।
जनक पिता गुरु। धन्य गोविंदनाथ।
संचारी वर्तनाची। जगी झाले विख्यात ।।१।।
दत्तोपंत करवी देवे। चिमडपंथ दाविला ।।
भजन चिमडाचे। बहु आवडे देवाला ।।२।।
बाबुराव अण्णा ऐसे। श्रेष्ठ बंधू लाभले।
परंपरा चालवोनी। ज्यांनी नाव राखीले ।।३।।
गोविंदसुत राम। आठवितो नाथलीला।
अखंड कीर्तनाचा। वर देवे दिधला ।।४।।

■ ■ ■

## श्री नाथांचा गोंधळ

आम्ही गोंधळी गोंधळी
आम्ही नाथांचे गोंधळी ॥धृ॥
आमचा हत्यारांचा खेळ
धरू धारेवरी काळ ॥१॥
लावू भंडारा हा भाळी
करू पातकांची होळी ॥२॥
मुखे बोला चांगभला
जन्ममरणा लावू टाळा ॥३॥
भाव अंबील ही वाढा
चालवू संसाराचा गाडा ॥४॥
जेथे नाथांचे मंदीर
तेथे स्वारीचा संचार ॥५॥
नामरूपा घालुनि मेळ
चाले दासाचा गोंधळ ॥६॥

***प्रा. डॉ. दा. वि. कुलकर्णी***

■ ■ ■



## घोसरवाडकर वंशावळ

- खंडोपंत
  - बाबूराव
    - खंडोपंत
      - दत्तोपंत
      - चिमाजीपंत
        - गोविंदपंत
          - व्यंकटेश (बाबुराव)
            - दत्तात्रय
              - शरद
          - शंकरराव (दत्तक) शिपूरकर
            - मधुकर
              - प्रसाद, अभिजीत, पंकज
            - अविनाश
          - आप्पाजीपंत
            - अनिल
              - मंदार
        - बाळाजीपंत
        - श्रीपादपंत
          - माधव
            - मनोहर, रमाकान्त नंदकुमार
              - मनोहर
                - मनीष, मंदार
          - पंडित
          - दिगंबर
            - मुकुंद
              - उद्धव चिंतामणी
          - प्रभाकर
            - प्रमोद
              - अनिरूद्ध
            - प्रशान्त
            - प्रवीण
      - रघुनाथपंत

# ती. मामांचे हस्ताक्षर

श्री                निपाणी

चि. मधुकर याम               १-३-७२

अनेक आशीर्वाद उ. वि.

काल संध्याकाळी मला टेंपरेचर येऊन आज कमालीचा अशक्तपणा आलेला आहे. माझ्या तब्येतीचा विचार करीतां व पुढील महमान लक्षात घेता जास्त दायक असून व श्रीनाथांनी १९७० सालात दिलेली गॅरंटी ही संपली

तुझा स्वभाव भावना प्रदान वसरल आहे श्रीनाथावर अटल श्रध्दा तुझी आहे. म्हणून च [illegible] तु आहेस तु केलेली [illegible] हृदयस्पर्शी झाली आहे. [illegible] पुढे माझी सांप्रदायिक परंपरा तांही अंशी चालवशील अशी खात्री आहे. हीच महाराजांनी माझ्या सेवेचे फळ दिले आहे. चि. जयश्रीचे लग्न चालू वर्षी झालेच पाहिजे नाहीतर ३ वर्षे करिता येत नाही



बेळगांवचे श्री खासबाग यांचेकडील कवच भेदनानंतरची गणेश मूर्ती